# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_196086
UNIVERSAL LIBRARY

# रामकृष्ण-वाक्सुधा.

(' गॉस्पेल ऑफ श्रीरामकृष्ण ' या इंग्रजी पुस्तकावरून)

## प्रथम वृष्टि.

भाषांतरकार,
**कृष्णाजी गोविंद किनरे;**
शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणे.

आवृत्ति पहिली.

—:०:—

प्रकाशक,
**भट आणि मंडळी, पुणें.**

(सर्व हक्क भाषांतरकर्त्यांचे स्वाधीन.)

सन १९१२.

किंमत सव्वा रुपया.

हे पुस्तक पुणें येथे '**यशवंत**' छापखान्यांत अच्युत चिंतामण भट
यानी छापून प्रकाशित केले.

# प्रस्तावना.

रामकृष्णवाक्सुधेची ही प्रथम वृष्टि अल्पावकाशांत चांगल्याच नांवारूपास आलेल्या 'चित्रमयजगत्' या मासिकांत बिंदुशः प्रसिद्ध झालीच होती. मूळ पुस्तकाचें भाषांतर अद्याप पुरें झालें नाहीं. तें त्या मासिकांत असेंच बिंदुशः येत राहून पुरें होण्यास आणखी एक वर्षाच्यावर काळ लागेल. तोंपर्यंत न थांबतां झालेला अर्धा भागच पुस्तकरूपानें प्रसिद्ध व्हावा, अशा फार लोकांकडून सूचना आल्या, व विचारा-अंतीं मलाही त्या ग्राह्य वाटल्या, म्हणून लोकांची आतुरता तृप्त व्हावी या हेतूनें मी हा एक भाग प्रथमवृष्टीच्या रूपानें महाराष्ट्राच्या हातीं देत आहें.

रामकृष्ण परमहंस हे सवाई शंकराचार्य स्वामी विवेकानंद यांचे गुरु. त्यांचें त्रोटक चरित्र पुढें दिलें आहे, त्यावरून त्यांची सामान्य माहिती वाचकांना होईलच. त्यांच्या अमृततुल्य वाणीचा संग्रह या पुस्तकांत केला आहे. हें पुस्तक समग्र मननपूर्वक वाचलें, म्हणजे रामकृष्णांची

खरी योग्यता कोणाच्याही लक्षांत येईल. तेव्हां हें पुस्तक म्हणजे रामकृष्णांचें खरें चारित्र आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्वामी विवेकानंद, बाबू केशवचंद्र सेन इत्यादि आपल्या शिष्यांना व दुसरे जे कोणी त्यांच्या दर्शनाला येत त्यांना धर्माचीं गहन तत्त्वें समजावून सांगण्याकारितां आपल्या प्रासादिक व रसाळ वाणीनें अगदीं सोप्या पण जोरदार भाषेंत अनेक रोजच्या व्यवहारांतले दृष्टांत देऊन श्रीरामकृष्णांनीं प्रासंगिक विषयांच्या अनुरोधानें जीं संभाषणें केलीं, तींच या पुस्तकांत भाषांतररूपानें दिलीं आहेत. परमहंसांच्या एका गृहस्थाश्रमी शिष्यानें तीं सर्व अनुपम संभाषणें जशींच्या तशींच उतरून घेऊन 'श्रीरामकृष्णकथामृत' या नांवानें प्रसिद्ध केलीं. हे गृहस्थ अद्याप हयात आहेत. ते एम्. ए. आहेत. मोठे विद्वान् आहेत. श्रीरामकृष्णांनीं इंग्रजी विद्येनें नास्तिक बनलेल्या ज्या अनेक तरुणांना धर्ममार्गावर आणलें, त्यांपैकींच हे एक आहेत. त्यांची धर्माचे बाबतींत पहिल्यानें अवस्था काय होती, याची कल्पना या पुस्तकांतील आरंभींचेच दोन बिंदु वाचले, म्हणजे सहज होणार आहे. पुढें त्यांची श्रीरामकृष्णांवर अत्यंत श्रद्धा बसून ते त्यांचे अगदीं प्रेमळ भक्त बनले. त्यांनीं आपला उल्लेख केवळ निरंहकारभावानें व विनयानें या पुस्तकांत 'एम्' या टोपण नांवानें केला आहे. खरोखर या गृहस्थांनीं सर्व जगाला आपलें चांगलेंच ऋणी करून ठेविलें आहे, यांत शंका नाहीं. हा संभाषणांचा संग्रह जर त्यांनीं

करून ठेविला नसता, तर एका अमोल रत्नभांडाराला आज जग मुकलें असतें.

असो. श्रीरामकृष्णकथामृताचे मूळ तीन भाग आहेत. ते बंगाली भाषेंत आहेत. या कथामृताची स्वामी विवेकानंद यांनीं फारच प्रशंसा केली आहे. त्यांनीं ‘ एम् ’ यांना त्याबद्दल किती धन्यवाद दिले, याची कल्पना, पुढें त्यांचीं जीं दोन पत्रें भाषांतर रूपानें दिलीं आहेत, त्यांवरून वाचकांना होईलच. बंगालींतील कथामृताच्या तीन भागांतील कांहीं प्रसंगांचें ‘ एम् ’ यांनीं स्वतः इंग्रजींत भाषांतर करून तें ‘ गॉस्पेल आफ श्रीरामकृष्ण ’ या नांवानें प्रसिद्ध केलें आहे. हिंदूस्थानांतील बंगालशिवाय इतर प्रांतांतील आंग्लभाषाभिज्ञ अशा धर्मप्रवण लोकांत हा ‘ गॉस्पेल ’ फार पूज्यता पावला आहे. इतकेंच नव्हे, तर ज्या पाश्चात्य देशांत वेदान्त-धर्माचा प्रसार झाला आहे, तेथेंही हा ‘ गॉस्पेल ’ चांगलाच लोकादरास पात्र झालेला आहे. याच इंग्रजी पुस्तकाचें ‘ रामकृष्णवाक्सुधा ’ हें मराठी भाषांतर आहे.

सर्व सुधारलेल्या जगाच्या आज आदरास पात्र होऊन बसलेला जो आपला वेदान्तधर्म त्याच्या सर्व अंगांचें विशद विवेचन रामकृष्णांनीं आपल्या अधिकारपूर्ण वाणीनें या संभाषणांत केलें आहे. त्यांच्या विवेचनांत आला नाहीं, असा एकही धार्मिक

प्रश्न नाहीं. या पुस्तकाचा श्रद्धेनें व मननपूर्वक जो अभ्यास करील, त्याची धर्मबावतींत कांहीं शंका राहील, असें माझ्या तरी अल्पमतीला वाटत नाहीं. यांतील साधे पण समर्पक दृष्टांत पाहून विचारी व सहृदय माणसाच्या मनाला तर गुदगुल्या होतील !

'एम्' यांनीं भाषांतरांत वापरलेली इंग्रजी भाषाही मोठी समर्पक, मोहक, गोड, साधी पण जोरदार आहे. भगवंतानें तसें भाषाप्रभुत्व मला दिलें असतें, तर मला मोठी आज धन्यता वाटली असती ! शिवाय, 'एम्' यांना जसा गुरुकृपेचा व ज्ञानाचा पाठिंबा होता, तसाही दुर्दैवानें मला नाहीं ! धर्माचे वाचनापुरतेही संस्कार मला घडलेले नाहींत ! मग मनननिदिध्यासानें अपरोक्षानुभव मिळविण्याची गोष्ट तर लांबच ! असा सर्व बाजूंनीं मी या कामाला अगदीं अनधिकारी असतां, सत्कार्यांचा पाठीराखा भगवान् या कामांत आपली लाज खचित राखील, अशी दृढभावना ठेवून मीं या कार्याला हात घातला. दर महिन्यास कांहीं तरी धार्मिक लेख लिहून देण्याबद्दल चित्रमयजगत्कारांनीं मला विनंती केली, व मागचा पुढचा विचार न करितां मीं त्यांना एकदम 'होय' म्हटलें. पण मग पंचायतींत पडलों. तोंच भगवंतानें एका माझ्या मित्राला निमित्तमात्र करून 'गॉस्पेलचें' भाषांतर करण्यास घे, असें मला सुचविलें. तीच त्याची आज्ञा असें समजून मी एकदम कामाला आरंभ केला.

अशी खरी स्थिति आहे. तेव्हां मराठी भाषांतरांत मूळचा जोर जर उतरला असेल, तर त्याची कर्तबगारी मजकडे अगदीं नाहीं हें मी अगदीं प्रांजलपणें सांगतों. व जर हें भाषांतर चांगलें उतरलें नसेल, तर भगवंताच्या कृपेचा मला नुसता आभासच झाला, असें म्हटलें पाहिजे. मग जसा कुंभार तसें मडकें तयार झालें, यांत नवल करण्यासारखें कांहींच नाहीं. वस्तु-स्थितीचा निर्णय रसिक महाराष्ट्र करीलच.

रामकृष्णांचा अवतार होण्यापूर्वी लोकस्थिति काय होती, याचा आतां आपण विचार करूं. खऱ्या धर्मासंबंधानें लोकांत अगदीं अज्ञान पसरलें होतें. त्या अज्ञानामुळें धर्माच्या पांघरुणा-खालीं अनेक अत्याचार रूढ झाले होते. खऱ्या भक्तीचा व खऱ्या ईश्वरस्वरूपाचा लोकांना अगदीं विसर पडून त्यांच्यांत अंधश्रद्धा, दंभ, भोळेपणा इत्यादि खऱ्या धर्मवृद्धीला प्रतिकूळ अशा अनेक दुर्गुणांचें प्राबल्य झालें होतें. पंथद्वेष भयंकर माजून राहिला होता. परमत व परधर्म यांसंबंधानें असहिष्णुता फारच बोकळली होती. इंग्रजी शिकलेले लोक पाश्चात्य सुधारणेच्या दिखाऊ तेजानें विमूढ बनल्यामुळें नास्तिकपणाकडे व जडवादाकडे झुकले होते. एकंदरींत समाजाचें व राष्ट्राचें योगक्षेम चालण्याला अत्यंत आवश्यक असा जो धर्म त्याला सर्वत्र ग्लानि आली होती. ही सर्व स्थिति सुधारावी व समाजाला पुन्हा मार्गावर आणावें, हें रामकृष्णांचें अवतार-कार्य होय.

बंगालप्रांतापुरतें तें आपण स्वतां कांहीं अंशीं तडीस नेऊन व पुढील सर्व कार्यभार विवेकानंदांसारख्या शिष्यांवर टाकून रामकृष्णांनीं आपली अवतार-समाप्ति केली. पुढें त्यांच्या शिष्यांनीं—विशेषतः स्वामी विवेकानंद यांनीं—केवढें धर्मकार्य केलें, याचें विवरण करीत बसण्याचें हें स्थळ नव्हे. त्यांनीं धर्मजागृति आणण्याकरितां सप्तद्वीप-पृथ्वीला खडबडावून तर टाकलेंच; पण हिंदूस्थानांतील इतर प्रांतांपेक्षां बंगालांत सर्व बाजूंनीं जी चेतना दिसत आहे, तिचें सर्व श्रेय श्रीरामकृष्ण, स्वामी विवेकानंद, व भगिनी निवेदिता या तीन व्यक्तींकडे आहे, हें जो डोळे उघडून पाहील त्याला दिसल्यावांचून राहणार नाहीं.

हजारों उलाढाली झाल्या, काळाचे अनंत तडाखे बसले, तरी अनादिकालीं अस्तित्वांत आलेलें आपलें राष्ट्र अद्याप निदान जीव धरून आहे. हें एवढें आमच्या समाजाला स्थैर्य आलें कशानें? या चिकाटीचें मूळ बीज कशांत आहे? याचा जर आपण विचार करूं, तरच यापुढें तरुणोपाय आहे. नाहीं तर आपलें मरण अगदीं निश्चित आहे. माझ्या अल्पसमजुतीप्रमाणें आमच्या प्रत्येक गोष्टीला धर्माचा खडकी पाया आमच्या दूरदृष्टि पूर्वजांनीं आगाऊ दिल्यामुळेंच केवळ कष्टमय स्थितींत कां होईना, पण अद्याप आम्ही जिवंत तरी आहों. व हल्लींचें आमचें दैन्य घालवून जर आम्हांला पुन्हा सतेज व्हावयाचें असेल, तर धर्माला

आम्ही पायांखालीं न तुडवितां त्याला डोकीवर धारण केलें पाहिजे. आपण ‘ हरि हरि ’ म्हणत अगदीं स्वस्थ पडूनर हावें, असें सांगण्याचा माझा हेतु नाहीं. तर प्रवृत्तीची टोलेजंग इमारत निवृत्तीच्या पायावर आपण उभारली पाहिजे. आमच्या राष्ट्राची किल्ली हीच आहे. त्याचें मर्मस्थान हेंच. मर्मस्थान एकदां विकृत झालें, म्हणजे जी स्थिति येते, तिचें चित्र रेखाटण्याचा मी प्रयत्न करण्याचें कांहीं कारण आहे, असें वाटत नाहीं. तीं चित्रें आज आपल्या घरोघर टांगलेलीं आहेतच.

आमच्या दूरदृष्टि पूर्वजांनीं धर्माच्या पायावर जी आमच्या समाजाची अढळ मांडणी केली, तिचें कौतुक तिऱ्हाइतांनीं करावें, व ‘ घरीं कामधेनू पुढें ताक मागे, ’ अशी आमची अवस्था होऊन आम्ही आज सामाजिक सुधारणेचे तुकडे मागत दारोदार फिरत राहावें, हा देखावा मोठ्या गमतीचा आहे ! आमची सामाजिक स्थिति आज असावी तशी आहे, असें म्हणण्याचा मुळींच हेतु नाहीं. पण जो समाज आपल्याला आज आदर्शरूप वाटतो, त्यानें पुरते तीन दिवसही अद्याप स्थैर्य दाखविलें नाहीं, याचा विचार व्हायला पाहिजे. आज पाश्चात्य समाजांत जो भयंकर असंतोष माजून राहिला आहे, त्यानें तिकडील तत्त्वज्ञांचीं मनें अगदीं गुंग करून टाकलीं आहेत. ‘ त्यांना दे माय धरणी ठाय ’ होऊन गेलें आहे. प्राथमिक शिक्षणाची गुटिका देऊन झाली, तरी रोग

इटत नाहीं, असें दिसून आल्यामुळें आतां सर्वांना उच्च शिक्षणाच्या मात्रेचे वळसे दिल्याशिवाय हा असंतोष थांबावयाचा नाहीं, असें जवळ जवळ ठरलें आहे! पुढें काय गमती होतात त्या दिसतीलच. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, आमच्या घराजवळ उकिरडयाखालीं जीं रत्नें पडून राहिलीं आहेत, तीं आम्ही डोळे उघडून पाहिलीं म्हणजे पुष्कळच काम होईल.

आतां, निवृत्तीच्या चरणीं तनमन वाहून प्रवृत्तीशीं यथेच्छ विहरत राहण्याचें काम कांहीं सोपें नाहीं. धांगडधिंगा सहज घालतां येतो, पण बाटल्यांवरची कसरत करायला कसबच लागतें. तें कसब अंगीं आणण्याला श्रमच केले पाहिजेत. पण जरी श्रम पडले, तरी धांगडाधिंग्यापासून जें सुख कधीं प्राप्त व्हावयाचें नाहीं, तें सुख जर कसरतीपासून प्राप्त होणार आहे, तर श्रमांकरितां रडत बसण्यांत काय अर्थ आहे? चांगला मोबदला दिल्याशिवाय चांगली वस्तु मिळणारच नाहीं.

धर्माचा जर आश्रय केला, तरच ही कसरत साधणारी आहे. तेव्हां जर आपलें पुनरुज्जीवन व्हावें, असें आपल्याला वाटत असेल, तर त्याला खऱ्या धर्माच्या प्रसाराशिवाय दुसरा मार्ग आहे, असें माझ्या तरी अल्प बुद्धीला वाटत नाहीं. हा जो माझ्या समजुतीप्रमाणें माझा निर्णय झाला आहे, तत्सिद्ध्यर्थ

यथाशक्ति साहाय्य करावें हाच, अंगीं फारशी योग्यता नसतां अशा ग्रंथांचें भाषांतर करण्याचें धाडस करण्यांत माझा हेतु आहे. हें व्रत मी यथाशक्ति असेंच चालविणार आहें. अशा ग्रंथांचें मासिकांतून भाषांतर करण्यांतही माझा एक उद्देश आहे. तो हाच कीं, सबंध ग्रंथाचें एकदम भाषांतर करून प्रसिद्ध केल्यास, तें पुस्तक ज्यांचा धर्माकडे मूळचा ओढा आहे, तेच फक्त वाचतील; पण 'खाना, पीना और मजा मारना' या तत्त्वाला अनुसरणारे जे हजारों लोक आपल्याकडे चैनींत लोळत आहेत, त्यांच्या नजरेखालीं तें पुस्तक केव्हांही यावयाचें नाहीं. हल्लीं मनोरंजनाकरितां मासिकें पुष्कळ आबालवृद्ध स्त्रीपुरुषें वाचतात. तेव्हां प्रेम-कहाण्यांच्या खडीसाखरेंत ही बारीकशी कडू गोळी जर मिसळली, तर निदान कांहींच्या घशाखालीं तरी ती उतरेल.

आतां, माझ्या मतें एकाच मुद्याचा थोडासा विचार करावयाला पाहिजे. मी जें वर आमच्या दैन्यावस्थेचें निदान केलें आहे, तें धडधडीत आमच्या थोर थोर अश्विनीकुमारांनीं केलेल्या निदानाच्या अगदीं विरुद्ध आहे. पाश्चात्य प्रवृत्तीमय विद्येचें आकंठ पान करून धुंदावलेल्या आमच्या विद्वानांचा असा एक सिद्धांत ठरला आहे कीं, 'आपल्या देशाची ही सर्व घाण केवळ वेदान्तानें केलेली आहे. आम्ही जे आळशी बनलों आहों, आमची

जी प्रगति खुंटून बसली आहे, आमच्या अंगांत जो घरखुजेपणा भरून राहिला आहे, धाडस नको, हिय्या नको, अशी जी आमची शिळपट अवस्था झाली आहे, त्याचें मूळ केवळ या वेदान्तांत आहे.' हें कारण ऐकून हंसावें कीं रडावें, हेंच मला समजत नाहीं. 'डोळ्यांत केर व कानांत फुंकर' असेंच हें म्हणणें आहे. माझ्या तर अल्प बुद्धीला असें वाटतें कीं, या सर्व दुरवस्थेचें कारण वेदान्त नाहीं, तर खऱ्या वेदान्ताचें अज्ञान हेंच त्याचें मूळ कारण होय. खऱ्या वेदान्ताचें ज्ञान हें अत्यंत तेजस्वी आहे, पौरुष उत्पन्न करणारें आहे. मी लाथ मारीन तिथे पाणी काढीन, मी खडकावर उभा राहिलों तरी तिथे सोनें पिकवीन, मी मनांत आणलें तर नराचा नारायण होईन, ही वेदान्ताच्या अंगीं धमक आहे. ज्या वेदान्तानें ऐन प्रसंगीं कर्तव्य-विमूढ बनलेल्या वीर-श्रेष्ठ अर्जुनाला कर्तव्यपर बनविलें, त्या वेदान्ताला पंगू म्हणणाऱ्याचा बुद्धिभ्रंश झालेला आहे, असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आम्ही कर्मवादाचा भलताच अर्थ करून व 'असेल हरि तर देईल खाटल्यावरी' या घातक तत्त्वाचा अंगिकार करून जर कपाळाला हात लावून बसलों असलों, तर त्याचा दोष आमच्या वेदान्ताच्या अज्ञानाच्या माथीं न मारतां मूळ वेदान्ताच्या माथीं मारणें म्हणजे चोर सोडून संन्याश्याला सुळीं देण्यासारखें आहे. 'आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः' हा कर्मवादाचा खरा अर्थ आहे. ज्या आमच्या कर्मानें आम्ही आपल्याला दैन्य आणलें, त्या आम-

च्याच कर्मांच्या जोरावर, आम्ही मनांत आणूं तर, आम्हांला आपला उत्कर्षही करून घेतां येईल. या कर्मवादाच्या खऱ्या अर्थाचा अज्ञानानें लोप झाल्यामुळें दैन्याला खुशाल आमच्या घरांत पिंगा घालायला सवड झाली आहे. तेव्हां हें दैन्य दूर करण्याला खरा उपाय म्हटला म्हणजे वेदान्ताच्या खऱ्या तत्त्वांचा प्रसार जितका समाजांत होईल, तितका करण्याची खटपट करणें हाच होय.

आतां शेवटीं एक गोड कर्तव्य करून मी ही लांबलेली प्रस्तावना पुरी करणार आहें. तें कर्तव्य म्हणजे ज्यांनीं ज्यांनीं हें काम करण्यांत मला साहाय्य केलें त्यांचे आभार मानणें हें होय.

सर्वांत पहिल्यानें चित्रमयजगत्कारांचे आभार मानणें, हेंच योग्य होय. त्यांनीं दर अंकांत एक धार्मिक लेख घालण्याची योजना करून लोकांत धर्मप्रसार करण्याचें व्रत स्वीकारलें, याबद्दल ते खरोखर स्तुतीस पात्र आहेत. हें व्रत चालवून ते मोठेंच समाजकार्य करीत आहेत, यांत शंका नाहीं. हें व्रत असेंच पुढें चालविण्याला भगवंतानें त्यांना इच्छा व सामर्थ्य हीं द्यावीं, इतकीच त्याची प्रार्थना करणें माझ्या हातीं आहे.

भांषातर करितांना मला पदांसंबंधानें फार अडचण वाटत होती. मला कविता करण्याचें अंग नाहीं. परंतु रा. परशराम लक्ष्मण

वैद्य व प्रसिद्ध आधुनिक कवि रा. दत्तात्रय अनंत आपटे उर्फ 'अनंत-तनय' यांनीं ती अडचण दूर केली, याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें. या दोघांनींही आपल्या हजारों अडचणी बाजूला ठेवून मोठ्या हौसेनें मला या कामीं साहाय्य केलें आहे. यांतील बिंदु बारापासून पुढचीं सर्व पदें 'अनंत-तनय' यांचीं आहेत.

माझे मित्र रा. नारायण कृष्ण गोगटे बी. ए. यांनीं कांहीं ठिकाणीं माझें शंकानिवारण केलें, याबद्दल मी त्यांचाही फार आभारी आहें.

भाषांतरकर्ता.

# ‘ गॉस्पेल ऑफ श्रीरामकृष्ण ’ या पुस्तकासंबंधानें, श्रीमत्स्वामी विवेकानंद यांचीं

# दोन पत्रें.

## १.

**मित्रवर्य एम् यासः—** आक्टोबर १८९७.

आतां मात्र योग्य कार्य तूं हातीं घेतलेंस! हेंच पाहिजे होतें! अहारे बहाद्दर! असाच पुढें चल! नको ती झोंप जन्मभर! पहा, काळ कसा उडत चालला आहे! शाबास! असेंच चालूं दे!

फार फार आभार आहेत, खरोखर तुझ्या त्या पुस्तकाबद्दल—फक्त अशा पुस्तकांचा खर्च भागेल कीं नाहीं याचीच मला शंका आहे. पण कांहीं हरकत नाहीं. खर्च भागो कीं न भागो, तीं प्रसिद्ध तर होऊं देत खरीं! तुला पुष्कळांचे आशीर्वाद मिळतील; शापांचाही तुझ्यावर वर्षाव होईल;—पण ‘वैसाही सब काल बनता साहेब.’—जगाची ही नेहमींची रीतच आहे! हीच वेळ आहे.

निरंतर प्रभुचरणीं लीन, तुझा,

**विवेकानंद.**

## २.

**मित्रवर्य एम् यासः—** डेराडून, २४ नोवेंबर १८९७.

तुझ्या दुसऱ्या पुस्तकाबद्दल फार फार फार फार आभार आहेत. खरोखरच तें विलक्षण आहे. ही तुझी दिशा अगदीं नवीन आहे. लेखकाच्या मनाचे रंग कांहीं तरी वर चढल्याशिवाय आजपर्यंत

कोणाही महात्म्याचें चरित्र जगापुढें आलेलें नाहीं. तुझ्या हातून बाहेर पडत असलेल्या चरित्रांत तसा कांहीं प्रकार नाहीं.

भाषा तर इतकी चांगली आहे, कीं, बोलायची सोय नाहीं. किती मोहक, किती जोरदार! शिवाय किती तरी साधी आणि सोपी. त्यांच्या (पुस्तकांच्या) वाचनानें मला जो आनंद झाला, तो सांगतां पुरवत नाहीं. मी जेव्हां जेव्हां तीं वाचतों तेव्हां तेव्हां खरोखरच आनंदानें देहभान विसरतों. चमत्कार नव्हे बरें? आपल्या गुरुदेवांत कसा पण सगळा नवीनपणा होता! दृष्टांत, दाखले, कल्पना, सर्व कांहीं नवें असायचें! त्यांची कल्पकताच अपूर्व! आपण सगळ्यांनीं तसा नवीनपणा,—तशी अपूर्व कल्पकता दाखविली पाहिजे. नाहीं तर काय उपयोग? आम्हांपैकीं कोणीही आजपर्यंत त्यांचें चरित्र लिहिण्याचा कां प्रयत्न केला नाहीं, हें आतां माझ्या लक्षांत आलें. हें महत्कार्य तुझ्याकरितां राखलेलें होतें. खरोखर त्यांचा वास तुझ्या ठिकाणीं आहे.

प्रेमपूर्वक व नमस्कारपूर्वक तुझा,

**विवेकानंद.**

ता० क०—साक्रेतिसाचे जे प्लेटोनें संवाद प्रसिद्ध केले आहेत, त्यांत जिथे तिथे प्लेटो दिसतो,—पण तूं आपला अगदीं नांवानिराळा. शिवाय नाटकाप्रमाणें त्यांत जो हुबेहूबपणा साधला आहे, तो तर बहार उडवून देतो. तो सगळ्यांना फारच आवडतो—इथे काय, पश्चिमेकडे काय.

**वि०**

# रामकृष्ण-वाक्सुधा.

## उपोद्धात.

### रामकृष्ण परमहंस यांचें अल्प चरित्र.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ १ ॥

श्रीमद्भगवद्गीता.

प्रत्येक मनुष्याची या जगांत जी धडपड चालू आहे, तो ज्या हजारों उलथापालथी करीत आहे, एकंदर प्रपंचाचा तो जो व्याप करीत आहे, त्या सर्वांचें मूळ कारण पाहूं जातां तें एकच आहे. कोणतें ? तर सुखाची—आनंदाची—प्राप्ति. सर्व माणसें सुखाचीं-आनंदाचीं-भुकेलीं आहेत, व त्याची प्राप्ति व्हावी म्हणून जो तो आपापल्या परी उद्योग करीत आहे. बद्ध, साधक, मुमुक्षु किंवा सिद्ध कोणीही पाहा. त्याचे सर्व प्रयत्न एकाच वस्तूच्या प्राप्ती-करितां असतात. मनुष्यच कां ? कोणताही जीव पाहिला, तरी त्याची सर्व खटपट सुखाकरितांच चाललेली असते. वृक्षपाषाणादि जड वस्तूंचाही प्रकार तोच. इष्ट वस्तूची किंवा परिस्थितीची प्राप्ति हेंच सर्व चराचर विश्वाचें अंतिम साध्य आहे, असें दिसून येतें.

आतां, असा प्रश्न उत्पन्न होतो, कीं सुख किंवा आनंद हेंच **सर्वांचें**—सर्व चराचर विश्वाचें—साध्य कां असावें? या प्रश्नाचा जर आपण बारीक विचार केला, तर आपणांस असें दिसून येईल, कीं सुख—आनंद—हेंच आमचें **वतन** होतें, **मूलस्वरूप** होतें व कांहीं विलक्षण योगायोगानें त्या **वतनापासून** आम्ही भ्रष्ट झालों. तें **मूलस्वरूप** आम्ही विसरून गेलों. तेव्हां त्या **वतनाची** पुन्हा आपल्याला प्राप्ति व्हावी, त्या **मूलस्वरूपाची** पुन्हा आपल्याला ओळख पटावी, एवढ्याकरितां आम्ही झटून प्रयत्न करावा, हें अगदीं ओघानेंच होणारें आहे. कोणाचीही एखादी वस्तु हरवली म्हणजे तो तिच्याकरितां त्रिखंड नाहीं बरें शोधीत?

जीव हा मूळ नारायणस्वरूपी असून, आनंदस्वरूपी असून आपण नर आहों, आपल्याला दुःख होतें, अशी त्यानें पहिल्यानें अज्ञानानें, भ्रमानें आपली समजूत करून घेतली, आणि सुखाचा शोध सुरू केला. आपण प्रबळ असतां, आपलें सामर्थ्य अनंत असतां, आपण केवळ दुर्बळ, आपली शक्ति मर्यादित, आपली बुद्धि कोती, आपली दृष्टि संकुचित, आपण अगदीं अप्रबुद्ध, पंगु परतंत्र अशी मिथ्या भावना करून घेऊन हीं सर्व काल्पनिक व्यंगें घालविण्याकरितां जीवानें उद्योग सुरू केला. पण 'डोळ्यांत केर आणि कानांत फुंकर' या म्हणीप्रमाणें त्यानें उद्योगाची दिशा धरली. पदार्थ सोडून तो पडछायेच्याच मागें लागला. साप साप म्हणून भुईच धोपटण्यास त्यानें आरंभ केला. वृद्ध आजीबाईच्या

किल्लया असतात कंबरेलाच; पण वयोमानानें स्मरणशक्ति धड न राहिल्यामुळें ती जशी किल्ल्यांकरितां हातांत दिवा घेऊन संतापत संतापत, आपल्यालाच शिव्या देत देत, आदळ आपट करीत करीत सर्व घरदार पालथें घालते, व 'आजी, या पाहा किल्ल्या तुझ्या कंबरेलाच आहेत,' असें नातवानें म्हटल्याबरोबर चटकन शुद्धीवर येऊन 'काय बाई माझी आठवण तरी! आतांसें जळ्ळें मला असें होतें,' असें आपल्यालाच धिक्कारून लागलीच सानंद होते, त्याचप्रमाणें 'तुझें आहे तुजपाशीं। परी जागा चुकलासी' अशी जीवाची स्थिति होऊन वाट चुकलेल्या मनुष्याप्रमाणें बाह्य जग सुखाकरितां तो पालथें घालीत सुटला. व या सगळ्याचा परिणाम जसा व्हावयाचा तसाच झाला. स्वतां अज असून तो जन्म-मरणाच्या सपाट्यांत सांपडला. मग काय बुडत्याचा पाय ज्या-प्रमाणें खोलांतच पडत जातो, त्याप्रमाणें 'पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनम्' या चक्रांतच तो गुर-फटून गेला.

जीवांची अशी दिशाभूल होऊं नये, सुखाच्या शोधात ते भलत्या मार्गाला लागूं नयेत, एवढ्याचकरितां धर्माची योजना असते. आपल्या मूळच्या आनंदस्वरूपाकडे जाण्याला ज्या ज्या गोष्टी साहाय्यभूत होतील त्या त्या सर्व धर्मांत मोडतात; व याच्या उलट मार्गाला नेणाऱ्या, पापाकडे नेणाऱ्या, दुःखाकडे नेणाऱ्या, मोहजालांत गुंतविणाऱ्या ज्या ज्या गोष्टी त्या त्या अध-

र्गांत येतात. ज्या आपल्या मनाच्या वृत्ति धर्ममार्गाला पोषक त्या दैवी वृत्ति; व ज्या अधर्माला पोषक त्या आसुरी वृत्ति होत.

बरें, ही निवडानिवड करण्याला विचारशक्तीचें साहाय्य लागतें व ती फक्त मनुष्याचेच ठिकाणीं असते. तेव्हां सर्व जडजीव जरी सुखाच्या शोधांत आहेत, तरी त्या सुखाची खरी प्राप्ति मनुष्यालाच शक्य आहे. एवढ्याच कारितां 'नरजन्मामधिं नरा करुनि घे, नरनारायणगडी। तरिच रे सार्थक मानवकुडी।' असें साधुलोक कठरवानें सांगत आहेत. व श्रीमच्छंकराचार्यांनीं या जगांतील दुर्लभ गोष्टींच्या यादींत मनुष्यत्वाला पहिलें स्थान दिलें आहे. हें दुर्लभ मनुष्यत्व प्राप्त झालें असतां तें जीवानें व्यर्थ घालविलें, कीं पुन्हा तो चौऱ्यायशींच्या फेऱ्यांत सांपडलाच.

पृथ्वीवर जेव्हां अधर्म माततो व धर्माची पायमल्ली होते; बहुतेक लोकांची दिशाभूल होऊन ते सुख म्हणून मृगजलाचेमागें जेव्हां लागतात; आसुरी वृत्ति व दैवी वृत्ति यांच्या सदैव चाललेल्या झटापटींत आसुरी वृत्तीची जेव्हां सरशी होते; संसारातच—विषयांतच—खरा सुखाचा ठेवा आहे, तेव्हां येनकेनप्रकारेण त्या विषयांची प्राप्ति करून घेणें हेंच खरें जीवितसाफल्य आहे, असें जेव्हां बऱ्याच लोकांना वाटूं लागतें; देव नाहीं, धर्म नाहीं, स्वर्ग नाहीं, नरक नाहीं, सर्व कांहीं देहाबरोबर संपावयाचें आहे, तेव्हां दोन दिवस आयुष्य आहे तोंपर्यंत खावें. प्यावें, मजा मारावी असे नास्तिकी अतएव घातक विचार जेव्हां बोकाळूं लागतात,

तेव्हां मनुष्यांना ताळ्यावर आणण्याकरितां, त्यांना योग्य मार्गाला पुन्हा लावण्याकरितां परमेश्वर स्वतः गर्भवासाचें दुःख भोगायला तयार होऊन साकार रूपानें आमच्यामध्यें येतो, व आपलें कार्य झालें कीं पुन्हा देहाचा आश्रय सोडून स्वस्वरूपांत मिळून जातो. यालाच आपण अवतार असें म्हणतों. असे अवतार या पृथ्वी-तलावर त्यानें आजपर्यंत अनेक घेतले आहेत. आपल्या हिंदु-धर्माकरितां घेतले आहेत इतकेंच नव्हे, तर सर्व धर्मांकरितां घेतले आहेत. सुमारें ७५ वर्षांपूर्वी बंगाल प्रांतांत असाच त्याचा एक अवतार होऊन आपलें कार्य करून गेला. तो अवतार श्रीराम-कृष्ण परमहंस या लौकिक नांवानें तिकडे प्रसिद्ध आहे. त्याच्या वागमृताचें ताट मुमुक्षूंकरितां पुढें वाढून तयार आहेच. पण त्याचें सेवन करूं लागण्यापूर्वी त्यांना त्यांच्या चारित्रामृताची गोडी समजावी एवढ्याकरितां त्यांचें अल्प चरित्र पहिल्यानें देण्याचें योजिलें आहे.

जन्म.

बुधवार तारिख २० माहे फेब्रुवारी सन १८३४ रोजीं बंगाल प्रांतांत हुगळी जिल्ह्यांत कमारपूकर नांवाच्या गांवी एका दरिद्री पण थोर अशा ब्राह्मण कुलांत या महात्म्याचा जन्म झाला. कमारपूकर हें गांव आरामबागच्या पश्चिमेस आठ मैलांवर व बरद्वानच्या दक्षिणेस सुमारें २६ मैलांवर आहे. या गांवांत हलक्या लोकांचीच विशेष वस्ती आहे. म्हणजे कोळीकोष्टी, लोहारसुतार, चांभारधेड, अशा लोकांचाच तेथें भरणा फार आहे.

रामकृष्णांचे वडिलांचें नांव खुदिराम चतर्जी ( चट्टोपाध्याय ). हा ब्राह्मण अत्यंत दरिद्री पण मोठा ईश्वरनिष्ठ होता. असा तो निस्सीम भगवद्भक्त असल्यामुळें सर्व सात्त्विक गुणांची त्याच्या ठिकाणीं वसति होती. तो मनानें शुद्ध,

पिता

अंतःकरणानें सरळ व व्यवहारांत निःस्पृह होता. त्याला वाक्सिद्धिही होती म्हणजे त्याच्या मुखांतून जें जें निघे तें तें खरेंच होत असे. या सर्व गुणांमुळें लोकांचीही त्याच्यावर फार भक्ति असे. रामकृष्ण जन्मास येण्यापूर्वीं खुदीराम हा एकदां गयेच्या यात्रेस गेला असतां, श्रीविष्णूंनीं, मी तुझ्या उदरीं अवतार घेणार आहें, असाही त्याला दृष्टांत दिला, अशी आख्यायिका आहे.

रामकृष्णांच्या आईचें नांव चंद्रमणी देवी. ही बाईसुद्धां गुणांनीं आपल्या पतीला शोभण्यासारखीच होती. दयेची तर ती मूर्तिमंत पुतळी होती. तिच्या ठिकाणीं

माता

आंत-बाहेर कांहीं नसे. ती निःस्पृहही तशीच असे. दक्षिणेश्वराचें देवालय ज्या थोर स्त्रीनें बांधलें तिचा जांवई मथुरानाथ यानें एकदां एक हजार रुपयांची थैली देवी चंद्रमणी हिजपुढें आणून ओतली; व त्या रुपयांचा स्वीकार करण्याबद्दल त्यानें तिला पुष्कळ विनवून सांगितलें. पण तिची निर्लोभता किंचित्‌ही ढळली नाहीं.

अशा सात्त्विक व भक्तिमान्‌ आईबापांचे पोटीं उत्पन्न झालेला

पुत्र 'परमहंस' पदाला पोंचावा हेंच स्वाभाविक नाहीं काय?

'शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं,' हें

बाज तसें फळ.

त्रिकालाबाधित सत्य खोटें कसें पडणार? आजपर्यंत जगामध्यें जे जे अवतारी पुरुष किंवा सत्पुरुष होऊन गेले, त्यांचे आईबाप महान् भगवद्भक्त, भाविक, व सात्त्विक वृत्तीचे होते, असेंच दिसून येतें.

असो. कमारपूकर हें कांहीं या कुटुंबाचें मूळ गांव नव्हे. कमारपूकरपासून सुमारें तीन मैलांवर देरे नांवाच्या गांवीं खुदि-राम पूर्वीं राहत असे. पण तेथील जमीन-

पित्याची निस्पृहता.

दाराची त्याच्यावर कांहीं प्रसंगानें दृष्टि वक्र झाल्यामुळें त्याला तें गांव सोडून देणें प्राप्त आलें. तो प्रसंग असा. त्या जमीनदारानें त्यास एका कज्जांत आपल्या वतीची साक्ष दे, अशी फार भीड घातली. पण खुदि-राम कांहीं त्याचें म्हणणें ऐकेना खऱ्या ब्राह्मणाला तसें करणें अनुचित आहे, हें जाणून त्यानें जमीनदाराच्या म्हणण्याला किंवा धमकावण्यांलाही मुळींच भीक घातली नाहीं. याचा शेवटही व्हावयाचा तसाच झाला. जमीनदाराच्या जाचानें त्याला अगदीं सळो कां पळो करून सोडलें. दिवसेंदिवस देरे येथें राहण्याची सोय न उरल्यामुळें त्याला त्या गांवाला रामराम ठोकून कमार-पूकर येथें प्रयाण करावें लागलें. तेथें गेल्यावर गारिबींत कसे तरी दिवस कंठून तो आपला गुजारा चालवूं लागला. हिऱ्याचें तेज जसें तो कोठेंही पडला तरी लपत नाहीं, त्याचप्रमाणें सद्गुणी

माणसाच्या गुणाचें तेज तो कोठेंही जाऊन पडला तरी फांकल्याशिवाय राहणार थोडेंच! तशा त्या गरीबीच्या स्थितींतसुद्धां त्यानें, दयाशीलता, परोपकारीपणा, कनवाळुपणा इत्यादि आपल्या आंगच्या स्पृहणीय गुणांनीं आपलें नांव सर्वतो-मुखीं केलें.

बाल्य.

रामकृष्णांचें मूळ नांव गदाधर असें होतें. गदाधर हें विष्णूचें नांव होय. बंगालप्रांतांत कालीपंथाप्रमाणेंच वैष्णवपंथाचाही फारच प्रसार आहे. 'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात,' या म्हणीला अनुसरून गदाधराच्या भगवद्भक्तीचे अंकुर त्याच्या अगदीं बालपणांतच दिसूं लागले. तो बोलता-चालता झाल्याबरोबरच ईश्वरभक्तीची त्याची उत्कटता जागृत झाली. भक्तिपर पदें पाठ करणें, ईश्वराचा महिमा कोणी वर्णूं लागला म्हणजे एकाग्रतेनें तो ऐकत बसणें, हरिकीर्तन ऐकण्याची संधि कधीं वायां जाऊं न देणें, इत्यादि गोष्टींचा छंद त्याला बालपणींच लागला. त्याच गांवच्या शाळेंत साधारण लिहिण्या-वाचण्यापुरतें त्याचें प्राथमिक शिक्षण झालें. गणिताचा त्याला फारच तिटकारा असे.

शिक्षण.

पण पुढें त्यास शिक्षणाचा कांहींही लाभ झाला नाहीं. त्याला संस्कृताचा गंधही नव्हता. शाळा सोडल्यावर देवपूजेचें काम गदाधराकडे आलें. त्याच्या घरीं श्रीरामाची मूर्ति होती. मुखमार्जन, नामस्मरण, इत्यादि प्रातर्विधि उरकून तो स्वतः फुलें, तुळशी,

वगैरे गोळा करी; नंतर स्नान करून संध्या, जप, ब्रह्मयज्ञ, वगैरे आटोपल्यावर मोठ्या भक्तिभावानें तो रघुवीराची पूजा करीत असे. त्याला गाण्याचा फार नाद असून त्याचा आवाज केवळ गंधर्वासारखा होता. जत्रांतून किंवा ललितांतून देवांसंबंधाचीं जीं जीं पदें तो ऐके, तीं तीं आरंभापासून अखेरपर्यंत तो अगदीं पाठ म्हणे. बाळपणापासूनच त्याची वृत्ति अगदीं आनंदी असे. केव्हांही पहा तो दुर्मुखलेला नसावयाचा. नेहमीं आपला हंसतमुख. बायका, पुरुष, मुलें—सगळ्यांना तो आपला हवा हवासा वाटे.

त्याचे गांवावरूनच जगन्नाथ-पुरीस जाण्याचा रस्ता असल्यामुळें हजारों संन्यासी, यति, गोसावी, बैरागी, व साधुसंत तेथील अतिथि-शाळेंत किंवा धर्मशाळेंत उतरून व कांहीं दिवस तेथें मुक्काम करून मग पुढें जात असत. असा साधुसंतांचा मेळा धर्मशाळेंत येऊन उतरला म्हणजे त्याचा आनंद गगनांतही मावेनासा होई. गोड पदार्थ खाण्यास मिळतात म्हणून दिवाळीसारखे सण आले म्हणजे सगळ्यांना, त्यांतल्यात्यांत लहान मुलांना फार आनंद वाटतो. पण गदाधराचें तसें नव्हतें. 'साधुसंत येती घरा। तोचि दिवाळी-दसरा,' त्याला वाटत असे. एखाद्या गुरुनिष्ठ शिष्याप्रमाणें तो त्या साधुसंतांची सेवा करी. त्यांच्या मुखांतून भगवल्लीला ऐकतां ऐकतां आनंदानें तो देहभान विसरे.

गांवांत कोठेंही पुराण सुरू झालें, कीं हा आपला नित्यनेमानें तें श्रवण करण्यास जाई. पुराण चालू असतां त्याची वृत्ति अगदीं

तन्मय होत असे: या त्याच्या नादामुळें महाभारत, रामायण, श्रीमद्भागवत, इत्यादि पुराणग्रंथांशीं त्याचा चांगला परिचय झाला.

कमारपूकरपासून तीन मैलांवर अनूर म्हणून एक गांव आहे. गदाधर अकरा वर्षांचा असतां एक दिवस शेतें तुडवीत तुडवीत त्या अनूर-गांवीं जात होता. जातां जातां वाटेंत असा चमत्कार झाला, कीं एकाएकीं त्याला एक दिव्याकृति दिसली; व तिचें दर्शन झाल्याबरोबर त्याचें देहभान नाहींसें झालें. ही आपली लहानपणची गोष्ट श्रीरामकृष्णांनीं पुढें आपल्या शिष्यांना सहज सांगितली. घेरी आल्यामुळें तो पडला असें लोकांनीं त्या वेळीं ठरविलें; पण ती खरोखर घेरी नव्हती. देवाचें तें मनोहररूप प्रत्यक्ष पाहिल्याबरोबर त्याची स्वाभाविक समाधि लागली.

साक्षात्कार व समाधि.

गदाधर सुमारें सतरा-अठरा वर्षांचा असतां त्याला पितृवियोग झाला. लागलाच त्यानें आपल्या वडील भावाबरोबर कलकत्त्याचा रस्ता धरला. कलकत्त्याला कांहीं तरी उद्योग-धंदा लागला तर पहावा, या हेतूनें ते दोघे बंधु घरा-बाहेर पडले. तेथें पोहोंचल्यावर कलकत्त्याचे नाथेर बागन नांवाच्या भागांत त्यांनीं कांहीं दिवस काढले; नंतर त्यांनीं आपलें बिऱ्हाड झामापूकर भागांत नेलें. तेथें गोविंद चतर्जी (चट्टोपाध्याय) या नांवाच्या एका पंडिताकडे ते राहिले. गोविंद चट्टोपाध्याय हे भिक्षुकच होते. त्यांनीं

पितृवियोग.

गदाधराला आपल्या हाताखालीं ठेवून घेतलें. यामुळें झामापूकर भागांत राहणाऱ्या मित्र वगैरे अनेक मोठमोठ्या श्रीमान् कुटुंबांत गदाधराची ओळख होऊन त्यांनीं त्याच्याकडे आपलें रोजचें देवपूजेचें काम सोंपवून दिलें.

दक्षिणेश्वरचें देवालयः जातिभेदाचा तीव्र अभिमान.

राणी रासमणी नांवाच्या एका श्रीमंत व धर्मशील बंगाली बाईनें कलकत्त्यापासून सुमारें ४ मैल अंतरावर असलेल्या दक्षिणेश्वर नांवाच्या गांवीं कालीचें देवालय बांधिलें. देवालयाचें काम गुरुवार तारिख ३१ मे सन १८५५ रोजीं पुरें झालें. या देवळाचें पुजारीपण रामकृष्णांचे वडील बंधु पंडित रामकुमार यांस देण्यांत आलें. या वेळीं रामकृष्णांचे मनांत जातिभेदाविषयीं इतका तीव्र अभिमान होता, कीं आपल्या भावानें शूद्रानें बांधलेल्या देवळाचें पुजारीपण पत्करावें, हें त्यांस मुळींच रुचलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्या मंदिरांत शिजविलेलें अन्न खाणेंसुद्धां त्यांस योग्य न वाटून मूर्तिस्थापनेच्या दिवशीं हजारों लोक तेथें जेवले, पण यांनीं कांहीं अन्नग्रहण केलें नाहीं. रात्रीच्या वेळीं रामकृष्णांची स्वारी एका वाण्याच्या दुकानीं गेली व तेथें त्यांनीं कांहीं फराळाचे पदार्थ घेऊन खाल्ले; व लागलीच स्वारी कलकत्त्यास परत आली. पण तेथें त्यांना मुळींच करमेना; कारण त्यांचा भावावर लोभ फार असे. त्यामुळें ४।६ दिवसांत ते परत दक्षिणेश्वरास आले व आपल्या भावाजवळ राहिले. मात्र गंगेच्या कांठीं जाऊन ते

आपल्या हातानें अन्न शिजवून खात असत. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांचा भाऊ अजारी पडल्यामुळें त्यास पूजेचें काम होईनासें झालें; तेव्हां अर्थात् रामकृष्णांवर ती कामगिरी येऊन पडली.

रामकृष्णांचे द्वितीय बंधु, रामेश्वर चट्टोपाध्याय, हेही मधून मधून पूजेचें काम करीत असत. या बंधूंना एकंदर तीन अपत्यें होतीं. रामलाल व शिवराम असे दोन पुत्र व लक्ष्मी देवी नांवाची एक कन्या.

रामकृष्ण पूजेचें काम अत्यंत भक्तीनें अगदीं यथासांग करीत असत. असा क्रम कांहीं दिवस चालल्यानंतर त्यांच्या वृत्तींत आपोआप फरक पडत चालला. एक दिवस देवीची यथासांग व श्रद्धापूर्वक पूजा केल्यानंतर त्या मनोहर मूर्तीकडे भक्तिपूर्ण अंतःकरणानें ते टक लावून पाहात असतां त्यांच्या मनांत पुढील विचार आले,—

अंकुर फुटला.

'या मूर्तीच्या पलीकडे कांहीं असेल का? या विश्वावर कृपादृष्टि ठेवणारा, या विश्वाचें नियमन करणारा, असा ईश्वर म्हणून कोणी तरी आहे, हें खरें आहे काय? कीं हें सारें स्वप्नच? धर्मांत कांहीं सत्यांश असेल का?' या विचारांचा पगडा त्यांच्या मनावर असा कांहीं विलक्षण बसला, कीं त्यांना दुसरें कांहीं सुचेचना. ते देवीची पूजा करण्यास बसले, कीं विचारपूर्ण दृष्टीनें त्या मूर्तीकडे सारखे पाहातच राहात; व पूजेचा हात तसाच थांबून राही. त्यांचें लक्ष ठिकाणावर नाहीं—नव्हे या जगाचें त्यांना भानही

नाहीं—असें त्यांची ती अवस्था पाहणारास वाटे. सामान्य संसारी जनांचें जिच्याकडे कधीं लक्षही जात नाहीं, अशा एका वस्तूच्या शोधांत तें गुंतलेलें असे.

लग्न.

रामकृष्णांची अशी ही अवस्था पाहून त्यांस कांहीं लोक वेडा म्हणूं लागले, व कांहीं लोक हा एक मोठा भगवद्भक्त आहे, असें म्हणूं लागले. त्यांच्या आप्तांना तर त्यांच्यासंबंधानें फार काळजी वाटूं लागली. त्यांना असें वाटलें, कीं या स्वारीचें जर लग्न केलें तर हे बुआ ताळ्यावर येतील. विषयकर्दमांत खिचपत पडलेल्या लोकांना असें न वाटलें तरच आश्चर्य! चोराला सर्व जग चोरच दिसावयाचें! किंवा धर्मराजाला सर्व माणसें सात्त्विक व दुर्योधनाला दुष्ट व कपटी दिसावीं हें साहजिकच आहे. असो. कमारपूकरपासून चार मैलांवर जयरामवती म्हणून एक गांव आहे. तेथील रामकमल मुखोपाध्याय नांवाच्या एका गृहस्थाच्या मुलीशीं त्यांनीं रामकृष्णांचें लग्न लावून दिलें. त्यांच्या पत्नीचें नांव श्रीशारदामणी देवी हें असून लग्नांत (१८५९) त्यांचें वय केवळ सहा वर्षांचें होतें; व त्या वेळीं रामकृष्णांचें वय पंचवीस वर्षांचें होतें.

लग्न झाल्यानंतर श्रीरामकृष्णांची स्वारी परत दक्षिणेश्वरीं येऊन आपलें पुजारीपणाचें काम करूं लागली. लोकांचे मतानें वेडावलेलें

भक्ताचें वेड.

किंवा बावचळलेलें त्यांचें चित्त लग्नाचे योगानें ताळ्यावर न येतां, तें दिवसें दिवस अधिकच बहकूं लागलें. पण या वेळीं त्यांच्या निस्सीम भक्तीचीं फळेंही त्यांना मिळण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. लग्नाहून परत आल्यावर थोड्याच दिवसांत असें होऊं लागलें, कीं आई-ची ते पूजा करण्यास बसले, कीं कांहीं दिव्याकृति त्यांना दिसत. संध्याकाळीं देवीला धूपदीप वगैरे करून पंचारती ओंवाळण्याची वहिवाट आहे; रामकृष्णांनीं एकदां पंचारती ओंवाळण्यास आरंभ केला, कीं ते मुळीं थांबतच नसत. इतके ते देवीच्या ध्यानांत चूर होऊन जात. अखेरीस कोणीतरी जेव्हां त्यांना थांबण्याबद्दल सुच-वावें, तेव्हां कुठे स्वारी भानावर येई. पूजेचाही प्रकार तोच. इतकेंच नव्हे, तर आश्चर्याची गोष्ट अशीं कीं, देवीकरितां आणलेलें पुष्पादि साहित्य ते कधीं कधीं आपल्याच मस्तकावर वाहात!

प्रहरानुप्रहर तर काय, पण दिवसाचे दिवस देवीच्यापुढें बसून डोळ्यांतून घळघळां अश्रु ढाळण्यांत जाऊं लागले. ते आप-ल्याशींच सारखे बडबडत राहात, मधून मधून रडत. सामान्यजन अशा कृति वेडेपणाचीं चिन्हें समजतात. देवाचें वेड मनुष्याचे डोक्यांत सारखें भरून त्याची अशी अवस्था होईल, हें संसारी दृष्टीच्या माणसांना कधीं खरें वाटत नाहीं. साहजिक आहे, कसें वाटावें? आपलेवरून जगाची पारख करण्याकडे माणसाची प्रवृत्ति असते. मायामोह सोडणें आपल्याला जर इतकें जड वाटतें,

तर तें सहसा कोणाला साधावयाचेंच नाहीं, असें स्वाभाविक त्यांना वाटतें.

बाबू मथुरानाथ यांनीं तर कलकत्त्यांतील व इतर ठिकाणच्या नामांकित वैद्यांना व डाक्तरांना त्यांची प्रकृति दाखविली; पण उपयोग काय? ज्याला देवाचें वेड भरलें, त्याची व्याधि या लौकिक रोगांच्या वैद्याकडून दूर कशी होणार? डाका येथील एका वैद्यानें तर स्पष्ट असें सांगितलें कीं, 'याला व्याधि तर कांहीं नाहीं. हा सत्पुरुष केवळ मुक्त आहे. महा विरागी आहे. याला औषधें देऊन कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं.' त्याचें भक्तिप्रेम तर दिवसेंदिवस सारखें वाढतच चाललें.

औषधोपचार.

पुढें देवळाच्या व्यवस्थापकांना असें वाटूं लागलें, कीं ज्या अर्थीं पूजेचें काम यांच्या हातून चांगलें निभण्यासारखी यांच्या मनाची स्थिति नाहीं, त्या अर्थीं यापुढें यांच्याकडे तें ठेवणें कोणत्याही तऱ्हेनें इष्ट नाहीं. कारण कोणत्याही कारणानें कां असेना, पण त्यांचें मन ठिकाणावर नव्हतें इतकें खास. राणी-रासमणी यांचे जांवई, मथुरानाथ यांचें मतमात्र त्यांच्यासंबंधानें अगदीं निराळें झालें होतें. मनुष्यजातीच्या उद्धाराकरितां राम-कृष्णांच्या रूपानें प्रत्यक्ष परमेश्वरच अवतरला आहे, असें त्यांच्या मनानें ठाम घेतलें होतें. पूजेचें काम यथासांग त्यांच्या-

हातून निभेना, तेव्हां मथुरानाथांनीं तें काम रामकृष्णांचे पुतण्याकडे सोंपवून दिलें.

यानंतर रामकृष्ण आपला सगळा वेळ कोठेंतरी अरण्यांत काढीत. या वेळच्या आपल्या स्थितीसंबंधानें नंतर बोलतांना ते म्हणत. 'सूर्य उगवे केव्हां, मावळे केव्हां, मी रहात असें कसा, यांचें मला त्या वेळीं कांहीं भान नसे.' त्यांना खाण्याचीही आठवण होत नसे,—नव्हे ज्या विचारानें त्यांच्या मनाला ग्रासून टाकलें होतें त्या विचाराशिवाय सर्व गोष्टी ते विसरून गेले होते. अशा स्थितींत ते असतांना त्यांच्या एका नातेवाइकाचें त्यांच्यावर सप्रेम लक्ष असे. तो त्यांच्या तोंडांत अन्न आणून घाली व केवळ विमनस्कपणें ते तें घशाखालीं लोटीत. संध्याकाळ होऊन देवळांतील आरत्यांचा घोष, तास्यांचा व झांजांचा गजर, घंटांचा मंजूळ ध्वनि हीं कानांवर आलीं, म्हणजे त्यांना फार वाईट वाटे. त्या वेळीं त्यांच्या मुखांतून असे दुःखोद्गार निघतः—"गेला एक दिवस! नी तूं मला भेट देत नाहींस ना? या क्षणभंगुर आयुष्याचा एक दिवस गेला, पण मला **सत्याचा** बोध कांहीं झाला नाहीं." अशी मनाची तळमळ चालू असतां कधीं कधीं भुईंत डोकें खुपसून ते मुळूमुळू रडत बसत.

अरण्यांत.

प्रिय वाचकहो! कोण निर्धार हा! केवढी चिकाटी ही! असें निश्चयाचें बळ असल्यावर फळ मिळाल्याशिवाय कधीं तरी राहील

का ? श्रीरामकृष्ण ज्या कोटीला पोहोंचले होते, तिची सर्व मख्खी या त्यांच्या दृढ निश्चयांत नाहीं बरें ? बाबद ऐहिक असो, कीं पारमार्थिक असो, पण तिच्या प्राप्तीकरितां अशी चिकाटी, असा दीर्घ प्रयत्न जोंपर्यंत मनुष्याच्या हातून होणार नाहीं, तोंपर्यंत त्यानें यशाची नुसती अपेक्षा करणें, व तें मिळालें नाहीं म्हणून कपाळाला हात लावून बसणें, यांतच त्याची दुर्बलता अतएव अपात्रता दिसून येते. थोरपण व लहानपण यांतील अंतर यानेंच पडलेलें आहे. हें अंतर आपण जर नाहींसें केलें, तर अपयश, दुःख, पराजय वगैरे शब्द आपल्याला ऐकूंही येणार नाहींत. नराचा नारायण होण्याचें कार्य आपण हातीं घेतलेलें असो, किंवा यःकश्चित् एखाद्या व्यावहारिक कार्याला आपण हात घातलेला असो, आपल्याला सिद्धि प्राप्त व्हावी, अशी जर आपली मनीषा असेल, तर त्या कार्याचें केवळ आपल्याला वेड लागलें पाहिजे; 'देह जावो अथवा राहो' अशी वृत्ति आपण अंगिकारली पाहिजे; 'शेंडी तुटो अथवा पारंबी तुटो' हातीं घेतलेलें कार्य आम्ही कदापि सोडणार नाहीं, अशा पौरुषी निश्चयाची कास आम्हीं धरिली पाहिजे; हें जर कां आपल्या हातून झालें, तर साधूंचीं, महात्म्यांचीं, सत्पुरुषांचीं चरित्रें वाचून आपल्याला असें म्हणतां येतें, कीं आपण माती जरी हातीं घेतली तरी तिचें सोनें होऊं लागेल! मग इतर गोष्टींची ती कथा काय ?

असो. त्या अशिक्षित मुलाला देवाचें पिसें भरलें. अशा तळमळीमध्यें दिवस, आठवडे, महिने निघून गेले. पण अशा निश्च-

याचा अंत भावासाठीं भुकेलेला, भक्तांसाठीं वेडा झालेला, करुणेचा केवळ मूर्तिमंत पुतळा, असा जो परमेश्वर तो कधीं तरी पाहील का ? छे! असें कदापि घडावयाचें नाहीं. पुढें त्या वेडा म्हणून मानलेल्या पोराला दृष्टांत होऊं लागले. आत्मस्वरूपाच्या उदयकाळची सुखमय प्रभात त्याला दिसूं लागली. **अनंतावरचा** एकेक पडदा आपोआप गळून पडूं लागला. 'तुझें आहे तुजपाशीं। परी जागा चुकलाशी।' या साधूक्तीची सत्यता त्याला पटूं लागली.

कालीमातेचें दर्शन.

देवी आपणास प्रत्यक्ष दर्शन देत नाहीं, तेव्हां असलें हें निरर्थक शरीर ठेवून तरी काय करावयाचें, असा विचार करून रामकृष्ण एक दिवस आत्महत्त्या करण्यास तयार झाले. त्याबरोबर एकदम त्यांची समाधि लागून त्यांस **कालीमातेनें** दर्शन दिलें. पण हें दर्शन खरें आहे, कीं हा केवळ आपल्या कल्पनेचाच खेळ आहे, हें कांहीं त्यांना समजेना. त्यामुळें तर त्यांची तळमळ फारच वाढली. त्यामुळें त्या शंकेच्या निवारणार्थ त्यांनीं देवीला कांहीं तरी अट घालावी. 'अमुक अमुक वेळीं अमुक अमुक गोष्ट जर घडली, तर हा दर्शनाचा चमत्कार खरा असें मी समजेन,' असें त्यांनीं म्हणावें.

एक दिवस तर त्यांनीं अशी अट घातली कीं, 'राणी रासमणीच्या दोघी मुली आजपर्यंत या देवळांत केव्हांच आल्या

नाहींत. तेव्हां त्या येथें येऊन पलीकडच्या पिंपळाच्या झाडाखालीं उभ्या राहून जर मला हांक मारतील, तर मी हें सगळें खरें मानीन.' आणि चमत्कार असा झाला

चमत्कार.

कीं, त्या दिवशीं खरोखर त्या दोघी मुलींच्या मनांत एकदम तें आपल्या आईनें बांधलेलें देऊळ पाहण्याचें आलें. यापूर्वीं त्या आपल्या अंतःपुराच्या बाहेर केव्हांही पडल्या नव्हत्या. पण त्या दिवशीं काय त्यांच्या मनांत आलें कोण जाणे! आपल्या आईची व नवऱ्यांची परवानगी घेऊन त्या दिवशीं त्या मुद्दाम देऊळ पाहण्यास आल्या. व तेथील पिंपळाच्या झाडाखालीं उभ्या राहून व रामकृष्णांस हांका मारून त्या म्हणाल्या 'तुमची भक्ति पाहून खरोखर जगदंबा तुम्हांला भेटेल. तुम्हांला प्रत्यक्ष दर्शन ती देईल.' याप्रमाणें कधीं न होणारी गोष्ट अशा अकल्पित तऱ्हेनें घडल्याबरोबर मग काय पाहिजे? रामकृष्णांच्या भक्तीला व आनंदाला पारावार नाहींसा झाला, व त्यांच्या वारंवार समाधि लागूं लागल्या.

यानंतर बारा वर्षेंपर्यंत अगदीं अश्रुतपूर्व अशी तपस्या रामकृष्णांनीं आचरली. त्या तपस्येविषयीं पुढें गोष्टी निघाल्या म्हणजे ते म्हणत, "या बारा वर्षांत मला कधीं गाढ

तप.

झोंप म्हणून लागली नाहीं. रात्रींच्या रात्री मी अगदीं ताटकळलेल्या डोळ्यांनीं काढीत असें. डोळे निदान मिटावे तरी म्हणून एखाद वेळ बोटांनीं

पापण्या दाबून धरण्याचा मी प्रयत्न करीत असें, पण व्यर्थ. शेवटीं अगदीं केंवीलवाणा होऊन मी मोठ्यानें आईला म्हणें, 'आई, या दीन बालकाच्या शरिराला हे असे क्लेश होतात, हें तूं पहातेसना? मग अजून तूं दया कां बरें करीत नाहींस?' असे कळवळून उद्गार निघाल्याबरोबर अत्यंत मधुर अशा वाणीनें मला असे उत्तेजनपर शब्द ऐकूं येत कीं, 'वत्सा, हा तुझा शरिराचा लोभ सुटल्याशिवाय परब्रह्माचें ज्ञान तुला होणार तरी कसें? बाबा, देहाचा तुला विसर पडला पाहिजे. त्याशिवाय सगळें कांहीं व्यर्थ आहे.'

नाधने.

"अशी माझ्या आईची वाणी ऐकली, म्हणजे माझ्या अंतःकरणांत एकदम आत्मप्रकाशाचा लोटच्या लोट येऊन माझें मन अगदीं आनंदांत बुडून जाई. व भक्तिमार्गांत पुढें पुढें पावलें टाकण्याला उल्हास वाटे. तेव्हांपासून मी आपल्या शरिराची अगदींच परवा सोडली. माझा पुतण्या अन्न आणून माझ्या तोंडांत घाली. तें मीं खाल्लें तर खाईं, नाहीं तर नाहीं. कधीं कधीं मी चाकरांनोकरांच्या, नव्हे भंग्यांच्यासुद्धां घरांत जाऊन झाडलोट करीं. हेतु हा कीं, माझ्या ठिकाणचा अहंकार व भेदबुद्धि हीं अगदीं नाहींशीं व्हावीं. आईला मी म्हणें, 'आई कृपा करून माझ्या ठिकाणीं अहंपणाचें वारेंही ठेवूं नको. मी मोठा, मी ब्राह्मण, हा हलका, हा नीच, असा द्वैतभाव, भेदबुद्धि व अहंपणा हीं माझ्या मनांत

अगदीं ठेवूं नको. सर्व तुझींच लेंकरें आहेत, हें ज्ञान माझ्या मनावर पूर्णपणें ठसूं दे.' मनुष्यें तेथून सगळीं सारखीं. आपलीच योग्यता म्हणजे मोठी आहे असें नाहीं. हें तत्त्व मनावर बिंबावें एवढ्याकरितां माझी सारी खटपट होती. पैसा म्हणजे मातीच आहे, हें मनावर ठसविण्याकरितां मी असें साधन करीत असें. एका हातांत कांहीं रुपये व एका हातांत मातीचें ढेंकूळ घेऊन मी म्हणें, 'बा मना! जग ज्याला पैसा म्हणतें तोच हा. याच्या योगानें तांदूळ, शाकभाजी वगैरे पदार्थ घेतां येतात. गरीबांना अन्नदान करितां येतें. घरेंदारें बांधतां येतात. आणि असें केलें म्हणजे अमक्यानें महत्कृत्यें केलीं असें जग म्हणतें. पण याच्या प्राप्तीनें सच्चिदानंदस्वरूप जें परब्रह्म त्याची प्राप्ति केव्हांही व्हावयाची नाहीं. तेव्हां याची व मातीची किंमत सारखीच.' असें म्हणून रुपये व माती एकत्र करून मी गंगेंत फेंकून देत असें. किंवा एका हातांतील रुपयांना मी माती म्हणें, व दुसऱ्या हातांतील मातीच्या ढेंकळाला मी रुपये म्हणें. पुन्हा त्यांची अदलाबदल करून मी तसेंच म्हणें. असें करितां करितां पैसा व माती यांतील भेदभाव माझ्या मनांतून पार नाहींसा झाला. हें सर्व पाहून लोक मला वेडा म्हणूं लागले यांत काय बरें नवल?"

ते खरोखरच समलोष्ठाश्मकांचन बनले होते. द्रव्याचा त्यांना विटाळही खपत नसे. पुढें पुढें जेव्हां त्यांची शिष्यशाखा फार वाढली, तेव्हां आपल्या गुरुदेवतेला नानातऱ्हांच्या वस्तु अर्पण

कराव्या असें स्वाभाविकपणें त्यांना वाटे. पण उपयोग काय? अगदीं साध्या राहणीला जें जें लागे त्याशिवाय कशाचाही ते स्वीकार करीत नसत. एकदां मथुरानाथानें सुमारें १५०० रुपये किंमतीची एक शालजोडी आणून त्यांच्या अंगावर घातली. ती पाहतांच प्रथमतःच त्यांस थोडासा आनंद झाल्यासारखें दिसलें. पण दुसऱ्या क्षणींच काय चमत्कार झाला तो पहा! त्यांनीं ती जमिनीवर आंथरली, पायांनीं यथास्थित तुडविली, नंतर तिच्यावर थुंकून ते म्हणाले, 'अहंता व लोभ यांचे ही मूळ आहे. सच्चिदानंद अशा परब्रह्माच्या प्राप्तीला हिचा काडीचाही उपयोग नाहीं. तेव्हां फाटकी चिंधी व ही, या मला दोन्ही सारख्याच.'

निरपेक्षता.

पैसा पाहिला, कीं त्यांची अशी कांहीं चमत्कारिक वृत्ति होई, कीं ते अगदीं भयानें गांगरून गेले आहेत, असें वाटे. वर त्यांनीं स्वमुखानें वर्णन केलेल्या साधनानें पैशासंबंधाचे मनावरचे मोहसंस्कार त्यांनीं अगदीं मारून टाकले होते. शेवटीं त्यांच्या मनाची रचनाच अशी बनून गेली होती कीं, लोष्ठ व कांचन यांमधील भिन्नत्वाची त्यांची वेदनावृत्तिच अगदीं मरून गेली. या त्यांच्या अभ्यासाचा परिणाम त्यांच्या मनावर झाला होता इतकेंच नव्हे. तर शरिराच्या प्रत्येक परमाणूंत तो जणूं काय अगदीं भिनून गेला होता. यासंबंधानें एकदां फार

अभ्यासाचा परिणाम.

मौजेचा अनुभव आला. एका प्रसंगीं ते दोन प्रहरच्या वेळीं निद्रिस्त असतां त्यांचे पट्टशिष्य **स्वामी विवेकानंद** यांनीं त्यांच्या तळहातावर एक रुपया हळूच ठेविला. तों, काय चमत्कार सांगावा! रुपयाचा स्पर्श झाल्याबरोबर तो हात—फक्त तळहात—वांकडा होऊन त्यानें त्या द्रव्याला आपल्यापासून दूर लोटून दिलें. परमहंस गाढ झोंपेंतच! मानसशास्त्राचें ज्यानें अध्ययन केलें असेल, त्याला यांत अश्रद्धेय व विलक्षण असें कांहींच वाटणार नाहीं. वैराग्यवृत्ति म्हणजे धर्माचा केवळ प्राण होय. ती अंगीं आणण्याचा प्रयत्न करणें, हें साधकाचें पहिलें कर्तव्य होय. 'ब्रह्मज्ञान नव्हे लेंकुरांच्या गोष्टी। तेथें व्हावा पोटीं अनुताप।' असा साधु—अधिकारी पुरुष—आपला अनुभव सांगतात, तोच खरा. कोणतीही गोष्ट अभ्यासाशिवाय साध्य व्हावी, अशी इच्छा धरणें, म्हणजे सूर्यानें शीतळाई द्यावी, अशी इच्छा धरण्यासारखेंच आहे.

पुढें रामकृष्णांची वृत्ति फारच लोकविलक्षण झाली. अहोरात्र त्यांच्या मुखांतून 'आई, हे आई,' असा सारखा जप चाले. कधीं ते एखाद्या जड वस्तूसारखे निश्चल व स्वस्थ असत. जसा कांहीं पाषाण, खुंट किंवा एखादा लांकडी पुतळाच! कधीं ते एखाद्या भ्रांतचित्त माणसाप्रमाणें वागत! कधीं पाहावें तर त्यांची स्थिति केवळ बालाप्रमाणें असे! संसारनिमग्न लोकांना ते तोंडही दाखवीत नसत! ज्यांच्या मनांत भक्तीचा लेशही नाहीं, असे

लोक दृष्टीसमोरही नकोत, असें त्यांना वाटूं लागलें! परमेश्वराचे महिम्याशिवाय कसलाही शब्द ऐकण्याचा त्यांना अगदीं तिटकारा उत्पन्न झाला! 'आई, हे आई,' हा काय तो एक मंत्र सारखा तोंडानें सुरू असे!

एका साध्वी स्त्रीची भेट.

दक्षिणेश्वर येथील देवळाच्या अतिथि-शाळेंत (धर्मशाळेंत) यावेळीं एक साध्वी स्त्री येऊन उतरली होती. रामकृष्णांची ती अवस्था पाहून तिनें असे उद्गार काढले कीं, "बाळा, असें वेड ज्याला लागतें तो खरोखर धन्य होय. या जगांतील सर्व लोक वेडेच झालेले आहेत; कांहीं पैशासाठीं, कांहीं विषय-सुखासाठीं व कांहीं कीर्तीसाठीं. पण ज्याला देवाचें वेड लागलें तोच धन्य होय."

रामकृष्णांनीं पुढें आपल्या शिष्यांना या बाईसंबंधानें एक दिवस चमत्कार वाटण्यासारखी हकीकत सांगितली. ते म्हणाले. "षड्रिपूंचें दमन होऊन ब्रह्मप्राप्ति व्हावी, म्हणून मी साधन करीत असतां एके दिवशीं माझ्या सर्वांगाची कहाली होऊं लागली! जसें कांहीं सर्व शरीर पेटलें आहे! तेव्हां गंगेंत उतरून मी गळ्यापर्यंत पाण्यांत उभा राहिलों व मस्तकावर ओल्या फडक्याची घडी ठेविली. पण कांहीं केल्या अंगाला शांतता येईना! इतक्यांत एक ब्राह्मणस्त्री येऊन तिनें माझ्या सर्वांगाला चंदनाची उटी लाविली;

व माझ्या गळ्यांत फुलांच्या माळा घातल्या. तेणेंकरून मला चांगलें बरें वाटलें."

ही ब्राह्मणस्त्री बंगाल्यांतीलच असून मोठी विदुषी व साध्वी होती. ती सर्व-शास्त्र-पारंगत असून महायोगिनी होती. सर्व मीमांसा व दर्शनें यांत ती पूर्ण असून वेदान्त-विषयावर ती पंडितांशीं वादही करीत असे. रूपानेंही ती तशीच सुंदर होती. शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक श्रेष्ठतेचें ती केवळ निधान होती. तिचा कंठही अत्यंत मधुर असून संगीतांतही ती चांगलीच निपुण होती. सर्वसंगपरित्याग करून संन्यासिनीच्या वेषानें ती हिंदुस्थानभर हिंडे. ती कोठली, कोणाची कोण, यासंबंधानें कोणालाही माहिती लागली नाहीं. तिचें नांवही कोणास कळलें नाहीं. तिच्या एकंदर वृत्तीवरून असें वाटे कीं, दुःखीकष्टी जडजीवांना साहाय्य करण्याकरितां ही कोणी देवीच पृथ्वीवर अवतरली आहे. तीन व्यक्ति परब्रह्मप्राप्तीला योग्य झाल्या असून त्यांना साहाय्य करण्याचें कार्य आपल्याला करावयाचें आहे, ही जाणीव तिच्या ठिकाणीं होती. या बाईचें दर्शन झाल्यावर रामकृष्णांना असें वाटलें कीं, 'मी तुला प्रत्यक्ष भेटून आत्मज्ञानाचा लाभ करून देईन,' असा जो जगदंबेनें आपल्याला साक्षात्कार दिला, तोच पूर्ण करण्याकरितां ती या बाईच्या रूपानें अवतरली आहे. तिनेंही त्यांस तसेंच सांगितलें. ती म्हणाली, 'मी तिघांसाठीं अवतरल्यें आहें. त्यां-

ही बाई कोण?

पैकीं दोघे पूर्वींच सांपडले. तिसरा सांपडत नव्हता, त्याचा मी शोध करीत होत्यें. तो तूं आतां सांपडलास.' आपल्या भक्तिमत्तेची व मनःशुद्धीची कोणालाही किंमत कळत नसे; ती किंमत ओळखणारी एक तरी व्यक्ति आपल्याला भेटली, हें पाहूनही रामकृष्णांना फार धन्यता वाटली.

या स्त्रीच्या विद्वत्तेबद्दल व वक्तृत्वाबद्दल सर्व लोकांना अतिशय आश्चर्य वाटे. त्यांतले त्यांत "वेडप्या रामकृष्णाला" ती स्वतःपेक्षां श्रेष्ठ व पूज्य कां मानिते. याचा उलगडा कोणासच होईना. रामकृष्ण वेडा नसून महाभक्त आहे, असें ती म्हणे. व आपल्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ अनेक वैष्णवग्रंथांचे ती आधार पुढें मांडी. पूर्वी चैतन्यस्वामी होऊन गेले, त्यांची वृत्ति अशीच होती. ती वृत्ति बदलण्याला कोणते उपाय करावे, तेंही अनेक ग्रंथांच्या आधारें तिनें दाखविलें.

भुकेचा चमत्कार.

एके वेळीं असें झालें कीं, रामकृष्णांस क्षुधेची अत्यंत पीडा होऊं लागली. कितीही खाल्लें, तरी कांहीं केल्या त्यांची भूक म्हणून निवेना. अशीच स्थिति श्रीचैतन्यांचीही एकदां झाली होती, असें सांगून त्यांनीं केलेला उपायच तिनें या वेळींही केला. तो असाः—त्यांच्या खोलींत जिकडे तिकडे पक्वान्नेंच पक्वान्नें तिनें भरून ठेविलीं. ते खाणार किती? शेवटीं तीं पाहूनच त्यांना अतोनात वीट आला.

या विदुषी व साध्वी बाईनें रामकृष्णांना योगाची दीक्षा दिली. तंत्रशास्त्रांत सांगितलेल्या सर्व साधनांचा तिनें त्यांच्याकडून उत्तम अभ्यास करविला. योगशास्त्राच्या अभ्यासानें शरीर व मन यांजवर मनुष्याचें पूर्ण स्वामित्व बसून त्याला इंद्रियदमन अत्यंत सुकर होतें. त्यामुळें परमार्थप्राप्तीला त्याच्या मनाची तयारी लवकर होते. शरीरबल वाढण्यालाही योगशास्त्राचें चांगलें साहाय्य होतें. कांहीं दिवसांनीं रामकृष्ण पातञ्जलीनें सांगितलेल्या अष्टांग योगांत अगदीं पारंगत झाले. ही पारंगतता त्यांनीं इतक्या लवकर संपादन केली कीं, त्यांच्या ग्राहकतेबद्दल त्यांच्या गुरूसही फार आश्चर्य वाटलें.

योगाभ्यास.

एके दिवशीं स्वामी योगनिमग्न असतां एकाएकीं त्यांच्या दोन्ही नाकपुड्यांतून रक्त वाहूं लागलें. तें पाहून ते फार भयभीत झाले. भय वाटण्याचें कारण असें झालें, कीं त्याच्यापूर्वीं दोन दिवस त्यांचा चुलत भाऊ हलधारी यानें त्यांस कांहीं बोलाचालीवरून असा शाप दिला होता कीं, 'तुझ्या नाकांतून रक्त वाहील.' हलधारी हा महापंडित होता. त्यास वाक्सिद्धिही प्रसन्न होती. तेव्हां त्याच्या शापाचाच हा परिणाम, असें स्वाभाविक रामकृष्णांना वाटलें. पण त्यांच्या गुरूनें त्यांची भीति दूर केली. तिनें त्यांस सांगितलें, "बाबारे तुझ्या नाकांतून रक्त वाहूं लागलें, हें फार चांगलें झालें. ब्रह्मांडीं प्राण नेणें हें योगाचें पर्यवसान आहे. तो

दोन्ही नाकपुड्यांतून रक्त येते.

नेण्यांत सिद्धि मिळाली, कीं कार्य झालें. मग द्वैत मावळतें. अगदीं आपण परब्रह्मस्वरूपच आहों असा अनुभव घडतो. आणि मग साहजिकच मनुष्य जगाकडे ढुंकूनही पहात नाहीं. असा प्राण ब्रह्मांडीं गेला म्हणजे शरिरांतील सर्व रक्त मस्तकांत जातें. आणि ज्याला पूर्ण सिद्धि झाली, तो परब्रह्मांत मिळून जाऊन पुन्हा भानावरही येत नाहीं. तेव्हां तुझ्या नाकांतून रक्त येऊं लागलें, यावरून जगांत तुझ्या हातून अद्याप बरेंच मोठें कार्य व्हावयाचें आहे. पुष्कळ लोकांना बोधामृत पाजून त्यांना ज्ञानी करून सोडावयाचें काम तुझ्यावर आहे. परब्रह्माशीं ऐक्य अनुभवून परत पूर्वस्थितीवर येतांना केव्हां केव्हां असें रक्त वाहूं लागतें. ''

ती साध्वी त्याला श्रीचैतन्यांचाच अवतार मानी. रामकृष्णांना ती निरंतर ' चैतन्यामृत ' वाचून दाखवीत असे.

श्रीचैतन्यांचे आसन गांठल.

त्या काळीं वैष्णवचरण म्हणून एक वैष्णवांमध्यें महापंडित होते. ते पुष्कळ वेळा रामकृष्णांचे भेटीस येत असत. चैतन्यसभेचे ते अध्यक्ष होते. एकदां पंडित वैष्णवचरण यांनीं रामकृष्णांना आपलेबरोबर चैतन्यसभेच्या बैठकीचें काम पाहण्याकरितां नेलें. कलकत्त्याचा कलूतोला म्हणून एक भाग आहे. तेथें सभेची बैठक व्हावयाची होती. सभेमध्यें चैतन्यस्वामींकरितां म्हणून एक उच्चासन तयार करून ठेविलें होतें; कारण सर्व लोक त्यांना परमेश्वराचा एक अवतारच मानून त्यांची भक्ति व उपा-

सना करीत असत. रामकृष्णांनीं सभेमध्यें जेव्हां पाय ठेविला, तेव्हां ते समाधींतच होते. पण स्वारी एकदम जी गेली ती तडक श्रीचैतन्यांच्या आसनाकडे. तेथें त्यांना गेलेले पाहून सर्व लोक अगदीं विस्मयानें थक्क होऊन गेले.

राणी रासमणी यांचे जांवई मथुरानाथ यांजवळ वैष्णवचरण एकदां रामकृष्णांसंबंधानें म्हणाले कीं, 'या माणसाचें वेड कांहीं सामान्य नाहीं. हें देवाचें वेड आहे!' ती साध्वी ब्राह्मणस्त्री व वैष्णवचरण या दोघांचीही अशी खात्री होऊन गेली होती कीं, ध्यानीं, मनीं, स्वप्नीं त्यांना एका गोष्टीशिवाय—परमेश्वराशिवाय—कांहीं दिसत नव्हतें. चैतन्यस्वामींप्रमाणेंच तीन अवस्थांपैकीं ते कोणत्या ना कोणत्या तरी एका अवस्थेंत असत. त्या तीन अवस्था म्हणजे ह्याः—(१) अगदीं निर्विकल्पावस्था; (२) सविकल्पावस्था किंवा अर्धजागृति; आणि (३) जागृति;—या अवस्थेंत मुखानें सारखें नामोच्चारण चालू असतें. 'आई, हे आई' असा निरंतर नामोच्चार त्यांचा चालू असे, हें मागें सांगितलेंच आहे. शिवाय आईजवळ त्यांचें अखंड कांहींना कांहीं तरी बोलणें सुरू असे. आपणाला शिकविण्याबद्दल—ज्ञान देण्याबद्दल—ते तिला नेहमीं विनवीत. ते म्हणत, 'आई मला शास्त्रें कांहीं समजत नाहींत, व शास्त्रसंपन्न पंडितांशीं मला मुळींच संबंध ठेवावयाचा नाहीं. तुझ्याशिवाय कोणाचेच शब्द माझ्या कानांवर

तीन अवस्था.

पडावयाला नको आहेत, ऐकेन तर मी तुझेच शब्द ऐकेन! शिकव तूं आणि मला एकदां शिकूं दे.'

त्या साध्वीपासून रामकृष्णांना योगशास्त्राचें यथासांग ज्ञान झालें खरें; पण त्यांची ज्ञानपिपासा कांहीं केल्या शांत होईना. ती शांत करणारा गुरुही त्यांना लवकरच भेटला. तेथील अतिथिशाळेंत एक संन्यासी येऊन उतरला होता.

तोतापुरी.

त्याचें नांव तोतापुरी असें होतें. रामकृष्ण एक दिवस गंगेच्या कांठीं बसले असतां तोतापुरी तिकडून चालला होता. त्यानें त्यांस पाहिलें. त्यांना पाहतांच त्याच्या लक्षांत आलें कीं, हा महायोगी असून ज्ञानी बनण्याला योग्य अशी याची अवस्था झालेली आहे. लागलाच तो रामकृष्णांजवळ जाऊन म्हणाला, 'वत्सा, ज्ञान प्राप्त होऊन मुक्ति मिळावी अशी तुला उत्कंठा लागली आहे ना? बरें आहे. मी तुला तिच्या प्राप्तीचा मार्ग दाखवितों.' कालीची आज्ञा झाल्याशिवाय त्याचा उपदेश घेण्याला रामकृष्ण तयार होतना. ते देवळांत गेले व अंबेची अनुमति घेऊन नंतर त्यांनीं तोतापुरीपासून अनुग्रह घेतला. वेदान्तशास्त्राचें सर्व ज्ञान त्यानें रामकृष्णांना करून दिलें. तोताचें अध्यापन चालू असतां त्याच्या असें अनुभवास आलें, कीं आपला शिष्य कांहीं असा तसा नाहीं; तर त्याची भूमिका फारच तयार आहे. तीन दिवसांचे आंतच रामकृष्णांनीं निर्विकल्प समाधि गांठली. या समाधीमध्यें विषय व विषयी

किंवा मी व तूं ही भावना अगदीं मावळून जाऊन एक अद्वैत-मात्र शिल्लक राहातें. आपल्या शिष्याची ही अलौकिक पात्रता पाहून तोतालाही अत्यंत आश्चर्य वाटलें. त्यानें त्याच्याजवळ असे उद्गार काढले कीं, "जी गोष्ट साध्य करण्याला मला सारखे चाळीस वर्षें श्रम करावे लागले, तीच गोष्ट तूं केवळ तीन दिवसांत साध्य केलीस! धन्य आहे तुझी! आजपासून तूं माझा शिष्य नव्हेस. मी तुला आतां मित्राप्रमाणेंच मानणार." तोतापुरीचा मुक्काम तेथें अकरा महिने होता. त्या काळांतली एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. एक दिवस तोतापुरी व रामकृष्ण धुनीजवळ बसले असतां एका माणसानें येऊन त्या धुनींतील निखारा घेतला व आपल्या चिलमीवर ठेवला.

गुरूच्या डोळ्यांत अंजन.

हें पाहतांच तोता अगदीं संतापला व त्या मनुष्यास शिव्या देण्याच्या बेतांत आला. तितक्यांत रामकृष्णांनीं त्याच्या डोळ्यांत चांगलें अंजन घातलें. ते म्हणाले, "सर्व विश्व ब्रह्ममय आहे असें समजावयाचें तें असेंच का? हा अग्नि, अग्नि घेणारा तो इसम, तुम्ही व मी हीं सर्व ब्रह्मस्वरूपच आहेत ना?" हे शब्द ऐकतांच स्वामी चटकन भानावर आला. आणि त्यानें रामकृष्णांस म्हटलें, "होय, तूं म्हणतोस तें खरें आहे. आजपासून मीं तुला रागावलेला असा केव्हांही दिसणार नाहीं." त्याप्रमाणें तोतापुरी पुन्हा केव्हांही क्रोधवश झाला नाहीं.

तोतापुरी निघून गेल्यानंतर रामकृष्णांचा बहुतेक काळ निर्विकल्प समाधींत जात असे. या काळासंबंधानें पुढें एके वेळीं बोलतांना ते म्हणाले, "त्या काळांत मी सहासहा महिनेपर्यंत अगदीं तादात्म्यवृत्तीनें असें. मला बाह्य जगाचें भानही नसे. ब्रह्माशीं माझी पूर्ण लीनता होऊन जाई. अशी एकदां तल्लीनता झाली म्हणजे तेथून मंडळी क्वचितच परत येतात. एकदां तर समाधिस्थितींत असतां मीं तीन दिवसपर्यंत अन्नपाणी वगैरे कांहीं खाल्लें नाहीं. तशा स्थितींत पोषण नसल्यामुळें शरीर मृत होण्याचा संभवही होता. पण मी समाधिस्थ आहें हें जाणून एका साधुपुरुषानें माझी चांगली काळजी घेतली. त्याला बिचाऱ्याला माझ्यासंबंधानें फारच त्रास पडला." असा क्रम सारखा सहा महिने सुरू राहिल्यामुळें रामकृष्णांचें शरीर अगदीं कृश होऊन गेलें व त्यांना आमांशाचाही उपद्रव झाला. या विकारामुळें स्वारी समाधींतून लवकरच देहावर आली. पुढें ते औषधोपचारांनीं थोड्या दिवसांत बरे झाले.

समाधिस्थिति.

समाधि लागली म्हणजे रामकृष्णांस शरिराची कशी ती मुळींच शुद्ध नसे. एके वेळीं तर समाधिस्थ असतांच ते जवळच्या निखाऱ्यांत पडले. निखाऱ्यांनीं अंग भाजून निखारे अंगांतही शिरले. ते पुढें डाक्तरांकडून बाहेर काढावे लागले. पण त्यांना स्वतः त्यांचें कांहींसुद्धां ज्ञान झालें नाहीं.

पुढें रामकृष्णांच्या वृत्तींत पालट झाला. ते भक्तिमार्गाकडे वळले. वैष्णवांच्या मतें भक्ति ही चतुर्विध आहे. एक सेव्याचे ठिकाणीं सेवकाची असते तशी. दुसरी मित्राचे ठिकाणीं मित्राची असते तशी. तिसरी मातेच्या ठिकाणीं अपत्याची असते तशी. आणि चवथी पतीच्या ठिकाणीं पत्नीची असते तशी. या चारही प्रकारांत पतिपत्नीभावाची भक्ति ही सर्वांत श्रेष्ठ आहे असें मानितात.

मी ब्रह्म आहें.

रामकृष्ण हे पुरे अद्वैती होते. साधारणतः बोलतांना आपण भक्त व बाकी सगळे लोक देव, असें जरी ते म्हणत, तरी कधीं कधीं ते असेंही म्हणत कीं. "मी सर्वशक्तिमान् व सर्वज्ञ आहें. जें ज्यास पाहिजे असेल तें त्यास तत्काल देण्याचें सामर्थ्य माझे अंगीं आहे, मी पूर्वीं राम झालों, कृष्ण झालों, ख्रिस्त झालों, बुद्ध झालों, आणि आतां रामकृष्ण झालों आहें." "मी स्वतः नित्य, शुद्ध, बुद्ध व मुक्त आहें; पण लोकांना तसें होण्याचा केवळ मार्ग दाखविण्यासाठींच मी धर्मज्ञानाचा प्रसार करण्याची खटपट करीत आहें," असे मथुरानाथाजवळ कधींच त्यांनीं उद्गार काढून ठेविले होते.

कल्पनातीत, अनिर्वचनीय, दिक्कालमर्यादातीत असें जें केवळ ब्रह्म त्यालाच ते 'आई' या गोड नांवानें संबोधीत असत. आईनें त्यांना एकदां असें सांगितलें कीं, "तूं आणि मी एकच. माझ्या ठिकाणीं अव्यभिचारी भक्ति ठेवणें हेंच तूं आपल्या जीवि-

तार्चे साफल्य मान. मनुष्यजातीचा उद्धार करण्याकरितां या जगांत तूं कांहीं दिवस राहा. तुझ्याभोंवतीं भक्तांचा मेळा जमेल. मग या जगांत संसाराच्या शृंखलांनीं बद्ध झालेलीं जशीं मनुष्यें आहेत, तशींच विषयपराङ्मुख, शुद्ध मनाचीं व केवळ माझीच भक्ति करणारीं अशींही आहेत, हें पाहून तुला फारच समाधान वाटेल."

सायंकाळीं देवीची आरती सुरू झाली व झांजा, तास, घंटा व मृदंग यांचा कर्णमधुर ध्वनि निघूं लागला म्हणजे रामकृष्ण कुठीच्या गच्चीवर उभे राहून मोठ्यानें ओरडून असें म्हणत कीं, " अहो ईश्वरावर प्रेम करणाऱ्या लोकांनो, या, या इकडे; वेळ गमावूं नका. तुमच्या दर्शनासाठीं मी अगदीं उत्कंठित झालों आहें. चला माझ्या लाडक्यांनो ! नाहीं तर माझा प्राण कांहीं या कुडींत राहणार नाहीं."

**ईश्वर दिसणें शक्य आहे, व सर्व धर्मांचें पर्यवसान एकच आहे,** या दोन गोष्टी सिद्ध करून दाखविणें, हें त्यांचें अवतार-कार्य होतें. वैष्णवांच्या भक्तिमार्गाचें रहस्य

सर्व धर्मांचा समन्वय.

जाणल्यानंतर रामकृष्ण इतर धर्मांच्या अभ्यासाकडे वळले. त्यांचा योगायोगच असा होता कीं, ज्या धर्माचा अभ्यास करावयाचा असें त्यांच्या मनांत येई, त्या धर्माचा कोणी तरी मोठा पंडित त्यांना आपला सहजासहजीं भेटे. बरें, कोणत्याही धर्माचें ज्ञान होण्यास त्यांना अगदींच अल्प अवधि लागे. इतका अल्प कीं, कोणास सांगितलें तर खरेंसुद्धां

वाटणार नाहीं. हिंदुधर्माच्या सर्व पंथांचा समन्वय जसा त्यांनीं अपरोक्षानुभवानें जाणला, तसेंच हिंदुधर्म, महमदी धर्म, ख्रिस्ती धर्म, इत्यादि अनेक धर्मांचें ऐक्यही आपल्या दिव्यदृष्टीनें त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें.

येशूचा साक्षात्कार.

इतर धर्मांचा अभ्यास करावयाचा असें मनांत आणल्यावर पहिल्यानें त्यांनीं महमदी धर्माचें ज्ञान करून घेतलें. एकांतांत बसून 'अल्ला' 'अल्ला' या नांवाचा ते सारखा जप करीत. नंतर ते ख्रिस्ती धर्माकडे वळले. त्याचेंही त्यांनीं चांगलें ज्ञान संपादन केलें. ते येशू ख्रिस्ताचें ध्यान करूं लागले. असें करितां करितां त्यांस येशूचा साक्षात्कारही झाला. तेव्हांपासून तीन दिवसपर्यंत त्यांना जे साक्षात्कार होत, त्यांची मौज ही होती कीं, राम, कृष्ण, काली, शिव, बुद्ध, किंवा ख्रिस्त यांपैकीं कोणाचेंही जरी त्यांस दर्शन झालें, तरी प्रथमतः त्यांच्या मूर्ति त्यांस भिन्न भिन्न दिसत, परंतु शेवटीं त्या जेव्हां अंतर्धान पावत तेव्हां अंतःकरणांतील एकाच मूर्तींत त्यांचा लय होई. आपल्या खोलींत त्यांनीं सर्व हिंदु देवतांचीं चित्रें लावून ठेविलीं होतीं इतकेंच नव्हे, तर बुद्ध व येशू ख्रिस्त यांचींही चित्रें त्यांनीं लाविलीं होतीं. येशूच्या चित्रांत असें दाखविलें होतें कीं, बुडत असलेल्या पीटरला येशू वांचवीत आहे व उठलेलें वादळ शांत करीत आहे. हें येशूचें चित्र अद्याप त्यांच्या खोलींत टांगलेलें आहे. अनेक इंग्रज व

अमेरिकन स्त्रीपुरुष त्याच खोलींत नुसत्या जमिनीवर बसून परमेश्वराच्या व रामकृष्णांच्या पायांचें चिंतन करीत असलेले आजही पाहण्यांत येतात.

एके दिवशीं श्रीरामकृष्ण **आईला** म्हणाले, 'आई, तुझे ख्रिस्ती भक्त तुझी उपासना कशी करतात, हें पहावें अशी माझी फार इच्छा आहे. तेव्हां त्यांच्या प्रार्थनामंदिरांत मला एक दिवस कृपा करून घेऊन चल.' कांहीं दिवसांनीं कलकत्त्यांतील एका ख्रिस्ती मंदिराच्या दारांत स्वारी आपली जाऊन उभी राहिली. आणि लक्षपूर्वक आंत त्यांची प्रार्थना कशी चालते, हें ते पाहूं लागले. तेथून दक्षिणेश्वरीं परत आल्यावर ते आपल्या शिष्यांना सांगूं लागले कीं, 'मी ख्रिस्ती देवळाला आज गेलों होतों, पण आंत नाहीं शिरलों. मला असें भय वाटलें कीं, तेथील उपाध्याय मला आंत जाऊन **आई**ची पूजा करूं देणार नाहीं.'

ख्रिस्ती मंदिरांत.

याप्रमाणें सर्व धर्मांचें परिशीलन करून शेवटीं त्यांचा असा सिद्धांत ठरला कीं, सर्व धर्मांचे अखेरचे सिद्धांत अगदीं एक आहेत. परमेश्वर निरनिराळीं स्वरूपें धारण करितो त्यामुळें हे सर्व धर्मभेद उत्पन्न झाले आहेत. हे सर्व धर्मभेद म्हणजे एकाच परब्रह्माला जाऊन मिळणारे केवळ अनेक मार्ग होत.

सर्व धर्म शेवटीं एकच.

रामकृष्णांचे अनेक स्त्रीशिष्यही होते. सर्व स्त्रिया म्हणजे कालीमातेच्या मूर्तिच आहेत असें ते मानीत. पण त्यांच्यासंबंधानें अशी दृढभावना उत्पन्न झाल्यावांचून व अंगीं भक्तीचें खरें पाणी मुरल्यावांचून त्यांच्याशीं संघटन ठेवणें कोणत्याही दृष्टीनें इष्ट नाही, असा ते पुरुषांना इषारा देत असत. पावित्र्य, शुद्धता व ईश्वर-निष्ठा यांसंबंधानें ज्या स्त्रिया अगदीं कसोटीला उतरल्या असतील त्यांच्याशीं साहचर्य करण्यासंबंधानेंसुद्धां वरील नियम पाळावा, असा त्यांचा मोठा कटाक्ष असे. एकदां ते आईला म्हणाले, ' आई, स्त्रियांसंबंधानें पापवासना जर कधीं माझ्या मनांत उत्पन्न झाली, तर तत्काल मी आपल्या मानेला सुरी लावीन. '

स्त्रियांचा सहवास अनिष्ट आहे.

स्त्रियांसंबंधानें रामकृष्णांचें असें मत होतें, की कांहीं स्त्रिया दैवी गुणांनीं युक्त व कांहीं आसुरी गुणांनीं युक्त असतात. पहिल्या जातीच्या स्त्रिया आपल्या पतीचा संसार अत्यंत सुखानें चालवून त्यास सदैव स्वर्गसुखांत ठेवितात व दुसऱ्या त्याच्या केवळ दुःखासमात्र कारण होतात. कोणाही स्त्रीस पाहिल्याबरोबर ती कोणत्या वर्गांतली आहे, हें ते सांगत असत. एके वेळीं तर एका स्त्रीचे अंगांत दैविक संचार करवून तिची त्यांनीं समाधि लावून दाखविली.

स्त्रियांच्या जाति.

जशी ते स्त्रियांची पाहिल्याबरोबर परीक्षा करीत तशीच पुरु-

षांचीही करीत. अमुक पुरुष धर्ममार्गाला योग्य आहे व अमुक अद्याप कांहीं दिवस संसारयात्रेंतच राहिला

उपदेशास पात्र कोण?

पाहिजे, असें ते तत्काल सांगत. उपदेश घेण्यास जे अनेक लोक येत, त्या सर्वांस ते विचार न करितां उपदेश देत नसत. कोणास उपदेश करीत व कोणास अद्याप कांहीं दिवस संसार करा, असें सांगून परत लावीत. ज्या पुरुषानें पूर्वजन्मी सुखविलास व राजविलास यथास्थित भोगिले असतील तोच पुरुष या जन्मीं भक्तिमार्गाला लागण्यास योग्य आहे, असें त्यांचें मत होतें.

श्रीरामकृष्णांचें लग्न फक्त नांवाला झालें होतें. योगसाधनाचा, ज्ञानमार्गाचा व भक्तिमार्गाचा अभ्यास चालू असतां आपलें लग्न झालें आहे, याचेंसुद्धां त्यांना स्मरण नव्हतें.

पत्नी.

आपल्या पत्नीला ते अगदीं विसरूनच गेले होते. ती सुमारें सतराअठरा वर्षांची झाल्यावर आपल्या पतीसंबंधाच्या अनेक परस्परविरोधी बातम्या ऐकून तिच्या मनाची स्थिति फार चमत्कारिक झाली. कोणी, तुझा पति अगदीं वेडा झाला आहे, असें तिला सांगत. तो महान् साधु आहे, असेंही कोणी म्हणत. तेव्हां खरी स्थिति काय आहे, हें स्वतः जाऊन पहावें, असा तिनें मनाचा निर्धार केला. तिच्या गांवापासून दक्षिणेश्वराचें देवालय वीस कोस लांब होतें. तरी तेथें पायांनीं स्वतः जाण्याचें तिनें ठरविलें; व आपल्या आईची परवा-

नगी घेऊन ती निघाली. तिची उत्कंठा एवढी दांडगी होती, कीं तितकें अंतर चालून जातांना तिला कांहीं श्रम वाटले नाहींत. तेथें गेल्यावर श्रीरामकृष्णांच्या सन्निध जेव्हां ती उभी राहिली, तेव्हां त्यांनीं तिला अगदीं प्रेमानें पण स्पष्टपणें सांगितलें कीं, "बाई, ज्याच्याशीं पूर्वीं तुझें लग्न झालें, तो रामकृष्ण हा नव्हे बरें! तो केव्हांच मरून गेला! हा तुला दिसतो आहे, हा रामकृष्ण निराळा! याला बायकोबियको कोणी नाहीं! तूं मला कालीस्वरूप दिसते आहेस!" असें म्हणूनच कांहीं स्वारी राहिली नाहीं; तर तिला फुलें वगैरे वाहून व धूपदीप दाखवून त्यांनीं तिची कालीभावानें पूजा केली. पूजा झाल्याबरोबर स्वारी समाधींत लीन झाली! तीही कांहीं सामान्य बायको नव्हती. तिचाही जीवात्मा सुसंस्कृत असल्यामुळें ती वृत्तीनें शुद्ध व मनानें उदात्त होती. आपल्या पतीची ही दिव्य भगवद्भक्ति पाहून तिला समाधान वाटलें. ती अत्यंत नम्रपणें आपल्या पतीला म्हणाली, 'महाराज, माझ्यामुळें आपण संसाराच्या जाळ्यांत पडावें, अशी माझी मुळींच इच्छा नाहीं. आपण आपल्या देहाचें सार्थक करण्याचे मार्गास लागलां, यांत मला उलटा आनंदच आहे. आपण आपल मार्ग असाच चालू ठेवावा. मात्र आपणांस एवढीच प्रार्थना आहे कीं, या चरणांची वेडीवांकडी सेवा करून निरंतर जवळ राहण्याची मला परवानगी असावी. आतां पतिभावानें जरी आपली सेवा मला करितां आली नाहीं, तरी गुरुभावानें ती करण्याची

माझी इच्छा आहे. तेवढी कृपा करून आपण पुरवावी. माझ्या-पासून आपल्याला थोडासुद्धां उपसर्ग पोंचणार नाहीं. आपल्या सत्सहवासापासून माझ्या मनालाही उपरति होऊन माझा देह तरी उजवेल." आपल्या नेत्रकटाक्षांनीं विद्ध करणारी, मंजुळ व मायावी भाषणांची मोहनी पसरणारी, आपल्या शृंगारचेष्टांनीं भार-वून टाकणारी, व 'नारीस्तनभरजघननिवेशं मिथ्या मायामोहावेशं, एतन्मांसवसादिविकारं, मनसि विचारय वारंवारम्,' असले तात्त्विक विचार मनांत उद्भवण्याला बुद्धि स्थितीवर न ठेवणारी. पण आपल्याला केवळ 'विषयदरीचा वऱ्हाडी' बनविणारी, अशी रंभातुल्य स्त्री आपल्या वांट्यास न घालितां देवानें आपल्याला 'कर्कशा बाईल' दिली, म्हणून श्रीतुकारामाला जशी धन्यता व समाधान वाटलें, तशीच धन्यता परमार्थरत्नाची किंमत जाण-णारी आपली स्त्री आहे. असें पाहून श्रीरामकृष्णांना वाटली असेल. नाहीं बरें? असो श्रीरामकृष्णांनीं, आपल्या ठिकाणची तिची निष्ठा व ज्ञानपिपासा पाहून, तिची विनंती मान्य केली; व तिनेंही पतीच्या ठिकाणीं ईश्वरभाव ठेवून व अखेरपर्यंत त्याची सेवाचाकरी करून आपल्या देहाचें सार्थक केलें. त्या दिवसापासून तिनें त्यांची संगति सोडली नाहीं. कोणी द्रव्याची मदत देऊं केल्यास ती ती मुळींच घेत नसे. एकदां तर मथुरानाथानें तिच्यापुढें १०,००० रुपये ठेविले. परंतु ते तत्काळ उचलून घेऊन जाण्यास तिनें त्यास सांगितलें. ती म्हणाली, 'हें पहा, तुमचें तें द्रव्य

घेऊन मला काय बरें करायचें आहे? माझ्या पतींनीं जर द्रव्यलोभ अगदीं सोडला आहे, तर मीच काय म्हणून तो धरावा?'

सिद्धीचे चमत्कार.

अभ्यासानें व विहितसाधनांनीं रामकृष्णांनीं ऋद्धिसिद्धि जरी आपल्याशा केल्या होत्या, तरी अनेक चमत्कार दाखवून लोकांना चकविण्याचें काम करण्याचें त्यांनीं केव्हांच मनांत आणलें नाहीं. ते उलट सर्वांना असें म्हणत कीं, "बाबांनो, परब्रह्माची प्राप्ति हाच सर्व साधनांचा हेतु आहे. लोकांना चमत्कार दाखवून भुलविणें हा नव्हे. सिद्धींचे चमत्कार दाखविण्याचा मोह एकदां उत्पन्न झाला, कीं मनुष्य पुन्हा गोत्यांत पडलाच. सिद्धि या नेहमीं मोक्षाच्या आड येणाऱ्या आहेत." असें जरी होतें, तरी जे लोक त्यांच्या दर्शनास येत, त्यांना कांहींच चमत्कार दिसत नसत असें नाहीं. हे कोणी लोकोत्तर पुरुष आहेत, असें पाहणाऱ्याच्या तत्काळ लक्षांत येई. दूरचा मनुष्य काय करीत असेल हें सांगणें, एखादा असाध्य रोगी बरा करणें, दुसऱ्याचे मनांतले विचार जाणणें, इत्यादि गोष्टी ते सहज करीत. इतकेंच नव्हे, तर कोणाच्याही अंगाला स्पर्श करून त्याचे विचार ते चटकन बदलीत. असा त्यांनीं स्पर्श केल्याबरोबर कित्येकांची तर समाधि लागे; व त्या समाधींत त्यांना ईश्वरी अवतार दिसत. कित्येकांची विषयलंपटता नाहींशी होऊन ते भक्तिमार्गाला लागत. कृपणांचा धनलोभ पार सुटे. इत्यादि त्यांनीं प्रसंगानुसार केलेले अनंत चमत्कार पुष्कळांनीं पाहिले व अनुभविले आहेत.

एकदा मथुरानाथ हा सहकुटुंब यात्रा करण्यास निघाला, तेव्हां त्यानें श्रीरामकृष्णांसही बरोबर नेलें. या यात्राप्रसंगीं त्यांना अनेक देवतांचीं व पवित्र स्थळांचीं दर्शनें तर घडलींच; पण नाना क्षेत्रांतील मोठमोठ्या साधूंचीं दर्शनें घडून त्यांच्याशीं संभाषणप्रसंगही त्यांना प्राप्त झाले. जागोजागच्या साधु पुरुषांनीं त्यांचा मोठा गौरव केला. काशीचे त्रैलंग स्वामी आणि वृंदावनची साध्वी गंगामाता यांनीं तर त्यांचा फारच सत्कार केला. हे ईश्वरी अवतार आहेत, हें त्यांनीं ओळखलें. गंगामातेला तर त्यांचा सहवास सोडावा, असें वाटेचना! वृंदावनची अपूर्व शोभा पाहून आपण येथें राहावें, असें त्यांना वाटलें. पण आपण येथें राहिलों तर आपल्या मातोश्रीला विनाकारण फार वाईट वाटेल, असें त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं तो विचार सोडून दिला. यात्रेहून परत येत असतां एका गांवच्या लोकांची दैन्यावस्था पाहून त्यांना इतकें वाईट वाटलें, कीं ते खळखळां रडूं लागले. या लोकांना सुखासमाधानांत पाहिल्याखेरीज आपण येथून हालूंच नये, असा त्यांच्या मनाचा निर्धार झाला. तेव्हां काय करणार? मथुरानाथानें त्या गांवांतील सर्व लोकांस कित्येक दिवस भोजन घातलें, पुष्कळ कपडेलत्ते दिले व प्रत्येकाला थोडथोडी द्रव्याचीही मदत केली. तेव्हां कोठें स्वारी पुढें जाण्यास तयार झाली.

यात्रा.

नंतर त्यांनीं लोकांना उपदेश करण्याचा मार्ग धरिला व तो

अखेरपर्यंत सारखा चालविला. बरोबरच आहे. आपल्या एकट्याच्याच देहाचें सार्थक करून चालतें होणें, स्वतः पुरताच मोक्ष मिळविणें, म्हणजे एक प्रकारचा आपलपोटेपणाच होय. संसारांत गटंगळ्या खात असलेल्या असंख्य जीवांना, संसाराचा प्रत्यक्ष त्याग न करितां जलकमलन्यायानें संसारांत राहून परमार्थ कसा साधावा, हें जो दाखवील, तोच महात्मा श्रेष्ठ कोटींतील होय.

गुरुत्व.

एकट्याच्या देहाचें सार्थक करणें, हें कार्य मोठें तर खरेंच; पण स्वतःला उद्धरून मोहांत गुंतलेल्या जगालाही बाहेर पडण्याची वाट दाखविणें, हें खऱ्या पुरुषार्थाचें लक्षण होय. असो. रामकृष्णांनीं आपल्या वयाच्या उत्तरार्धांत लोकोपदेशाचें कार्य हातीं घेतलें. पण स्वतः ज्ञानशिखर गांठलें तेव्हांच त्यांनीं दुसऱ्यांना हात देण्यास सुरवात केली. हल्लीं आपलेकडे गुरु फारच बोकाळले आहेत! शिष्यशिष्यिणींचा भरणाही जागोजाग फार दिसून येतो. पण ‘असे अडक्याचे तीन गुरु’ काय कामाचे? आंधळ्यानें आंधळ्याला अडचणीच्या मार्गांतून काढून चांगल्या मार्गावर नेण्याचा आव घालण्यासारखेंच हें आहे, असें कोणाच्याही कसें लक्षांत येत नाहीं कोण जाणे! अंधश्रद्धेनें भोंदू गुरूंच्या नादीं लागणाऱ्या लोकांनीं, समर्थांनीं व इतर साधुपुरुषांनीं जीं सद्गुरूचीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं नीट मननपूर्वक व डोळे उघडून वाचून तीं आपण गुरु म्हणून पसंत केलेल्या व्यक्तीला कितपत

लागू पडतात, हें पहिल्यानें पाहावें. म्हणजे आपण हातीं धरलेली वस्तु हिरा आहे, कीं खापरी आहे, याचा निकाल लागेल. नाहीं तर 'गुरुजी भांग तमाखु मागे. शिष्या वाण्याचें घर सांगे.' असाच प्रकार अखंड चालावयाचा! अनेक धंद्यांपैकीं हा एक गुरुपणाचा धंदा माजला आहे, दुसरें काय? 'दुनिया झुकती है,' झालें! असो. तात्पर्य काय? तर दुसऱ्याला उपदेश करूं लागण्यापूर्वीं गुरु स्वतः सिद्ध-कोटीला जावा लागतो. तरच तो गुरु! रामकृष्णांचें नेहमीचेंच असें म्हणणें असे, कीं पहिल्यानें स्वतःची तयारी झाली पाहिजे, मग सगळें कांहीं आपोआप होतें. मनुष्याचें शील तयार होणें, ही मुख्य बाब आहे, मग सगळे योग जुळतात. यासंबंधानें त्यांचा एक नेहमींचा अगदीं आवडता दृष्टांत असे. ते म्हणत, "कमलाला प्रफुल्लता आली, कीं मधुहरणार्थ भ्रमरांच्या झुंडीच्या झुंडी आपोआप येणारच! त्याप्रमाणेंच तुमच्या शीलाचें, तुमच्या विज्ञानाचें कमल एकदां प्रफुल्लित तर होऊं द्या, कीं मग कशाचीही काळजी नको."

हजारों ठिकाणचे लाखों लोक परमहंसांचें दर्शन घडावें, त्यांच्या वाक्सुधेचे चार घुटके आपल्याला मिळावे, म्हणून नेहमीं येऊं लागले. भक्त, साधक, मुमुक्षु, जिज्ञासु, विद्वान्, पंडित सर्व प्रकारचे लोक तेथें जमा होत. त्यांच्याशीं बोलण्यांत व त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यांत पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंत त्यांचा

सगळा वेळ जात असे. त्यांना विश्रांति म्हणून कशी ती नसे. अन्नग्रहण करण्यासमुद्धां फुरसत सांपडेना. आणखी काय?

इतकें सगळें जरी झालें, तरी खुद्द कलकत्त्यांतील लोकांत त्यांची तादृश प्रसिद्धि झाली नव्हती. बाबू केशव चंद्रसेन यांनीं त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्यासंबंधानें वर्तमानपत्रांत जेव्हां लेख लिहिले, तेव्हां कलकत्त्यांतील सर्व लोकांस त्यांची माहिती झाली. बाबू केशव चंद्रसेन मोठे तत्त्वशोधक व विचारी होते, व रामकृष्ण तर सिद्ध कोटीलाच पोहोंचले होते; तेव्हां या दोघांच्या भेटीचे प्रसंग मोठे बहारीचे असतील, हें काय सांगावयास पाहिजे? वाचकांना त्यांचा पुढें प्रत्यय येईलच.

बाबू केशव चंद्रसेन.

बाबू केशव चंद्रसेन यांनी सन १८७५ च्या उन्हाळ्यांत रामकृष्णांचें पहिल्यानें दर्शन घेतलें. दक्षिणेश्वरचे देवालयापासून सुमारें तीन मैलांवर बेलघारिया येथील बागेंत बाबू केशव चंद्रसेन हे त्या वेळीं आपल्या शिष्य-गणासह राहावयास आले होते. या भेटीच्या प्रसंगीं रामकृष्णांनीं जें ज्ञानपूर्ण संभाषण केलें, तें ऐकून केशवबाबूंच्या मनांत त्यांच्याविषयीं फारच आदरबुद्धि उत्पन्न झाली. त्यांची ईश्वरपरायणता, समाधिसिद्धि इत्यादि गोष्टी पाहून केशवबाबूंच्या मनावर असा कांहीं विलक्षण परिणाम झाला, कीं, ते रामकृष्णांच्या दर्शनास वारंवार येऊं लागले. एखादा निस्सीम शिष्य जसा अत्यंत नम्रपणानें गुरूच्या चरणाजवळ

बसता, त्याप्रमाणें रामकृष्णांच्या मुखांतून निघणाऱ्या वाक्सुधेचें आकंठ पान करीत केशवबाबू प्रहरानप्रहर बसत. होतां होतां रामकृष्णांची त्यांना इतकी भक्ति जडली, कीं त्यांची समाधि लागली, म्हणजे त्यांच्या चरणांस त्यांनीं मोठ्या मनोभावानें स्पर्श करावा. त्या स्पर्शानें आपला देह पुनीत होईल, असें त्यांस वाटे. कित्येक वेळा बोटींत घालून गंगानदींतून दूर एखाद्या एकांतस्थळीं केशवबाबू त्यांस फिरावयास नेत; तेथें त्यांनीं त्यांस अनेक गूढ विषयांवर प्रश्न विचारावे व त्यांचीं समाधानकारक उत्तरें त्यांच्या तोंडून ऐकलीं म्हणजे आपणांस धन्य मानावें.

श्रीरामकृष्णांचाही केशवबाबूंवर तसाच मोठा लोभ जडला होता. ते आपण होऊन त्यांना भेटण्याकरितां केशवबाबूंच्या घरी वारंवार जात. त्यांच्या व त्यांच्या शिष्यांच्या संगतींत त्यांना फार आनंद वाटे. केशवबाबूही कधी एकटे तर कधीं शिष्यगणासह नेहमीं दक्षिणेश्वरीं येत असत. या सर्व भेटींत रामकृष्ण ईश्वरमहिमा व ईश्वरस्वरूप यांसंबंधानें सारखे तासच्या तास बोलत असत. त्यांचें भाषण सुरू झालें म्हणजे श्रोतेमंडळी अगदी तल्लीन होऊन जाई. त्यांचा वाक्प्रवाह अखंड चालू असे. जसा कांहीं प्रत्यक्ष सरस्वतीनें येऊन त्यांच्या जिव्हाग्रीं वास केला आहे! बोलतां बोलतां एकदम त्यांची समाधि लागे! त्यांचें देहयंत्र निश्चल होई! श्वासोच्छ्वास थांबे! दृष्टि स्थिर होई! सर्व बाह्यज्ञान लोपून ते केवळ ब्रह्मानंदांत निमग्न होत!

नंतर कित्येक वर्षांनीं केशवबाबूंनीं नवसंहिता नांवाचा एक ग्रंथ लिहिला, तो केवळ श्रीरामकृष्ण परमहंसांच्या उपदेशाचेंच फळ होय. श्रीरामकृष्णांचें त्रोटक चरित्र व बोधवचनें हीं केशवबाबूंनीं एका पुस्तकांत प्रसिद्ध केलीं, त्यामुळें रामकृष्णांची कीर्ति सर्व बंगालभर पसरली. हजारों सुशिक्षित लोक त्यांच्या वचनामृताचा लाभ व्हावा, म्हणून त्यांचेकडे येऊं लागले. मोठमोठ्या कुटुंबांतल्या स्त्रिया भक्तिभावानें त्यांच्या दर्शनाला येत व दर्शन झालें म्हणजे आपणांस धन्य मानीत. 'जें मनाला पूर्णपणें पटलें तेंच बोलावयाचें व जें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलें त्याचीच ग्वाही द्यावयाची,' असा ज्यांचा बाणा त्यांच्याकडे ज्ञानतृष्णेच्या उपशमनार्थ हजारों लोकांची गर्दी लोटावी यांत कांहीं आश्चर्य नाहीं. अहोरात्रीच्या चोवीस तासांतून वीस तास ते लोकांशीं बोलण्यांत खर्च करीत. असा क्रम एक दिवस नव्हे, तर आठवडेच्या आठवडे व महिनेच्या महिने सुरू झाला. लहानथोर, गरीबश्रीमंत, जो जसा येईल त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें ते त्याला मार्ग दाखवीत. पण या अतिश्रमांचा अर्थात् त्यांच्या शरीरावरही परिणाम लवकरच होऊं लागला. शक्ति दिवसें दिवस क्षीण होत चालली. तथापि आपलें उपदेशाचें काम ते थोडेंही कमी करीतना. 'आपण आतां थोडी विश्रांति घ्यावी हें बरें,' असें कोणी सुचविल्यास त्यांनीं म्हणावें, 'माझ्या उपदेशानें जर निदान एक तरी

शेवटचें दुखणें.

प्राणी जन्ममरणापासून मुक्त होऊन सायुज्यपदाला जाईल, तर मला माझ्या शरीरपीडेचें कांहीं वाटणार नाहीं. ती कितीही झाली, तरी मी आनंदानें सोशीन. एवढेंच काय, मृत्यु आला तरीही पतकरीन.'

शेवटीं इ० स० १८८५ सालच्या आरंभीं त्यांच्या घशास एक प्रकारचा रोग झाला. व होतां होतां तो फारच बळावला; तेव्हां त्यांच्या भक्तांनीं त्यांना दक्षिणेश्वराहून कलकत्त्यास नेलें. तेथें बाबू महेन्द्रलाल सरकारासारखा अति नामांकित डाक्तर त्यांना औषध देऊं लागला. 'आतां आपण बोलणें बंद केलें पाहिजे,' असें सर्व वैद्यडाक्तरांनीं त्यांना निक्षून सांगितलें, पण त्याचा कांहीं-सुद्धां उपयोग झाला नाहीं. त्यांचें आपलें उत्तर ठरलेलें. 'जोंपर्यंत माझ्या तोंडांतून शब्दोच्चार होतो आहे, तोंपर्यंत लोकांना उपदेश करणें, हें माझें कर्तव्य आहे,' असें त्यांनीं सांगितलें. खरोखर, हें उत्तर ऐकून सहृदय माणसाच्या नेत्रांतून प्रेमाश्रु आल्याशिवाय राहतील असें वाटत नाहीं. त्याच व्याधीनें त्यांची प्रकृति अगदीं घसरत चालली. ते जसजसे क्षिण होऊं लागले तसतशी, त्यांचे अखेरचे चार शब्द ऐकावे, या हेतूनें लांबलांबून लोकांची गर्दीच्या गर्दी लोटूं लागली. माणसांची सारखी रीघ लागून राहिली. बोलतांना त्यांना अत्यंत वेदना होऊं लागल्या, तरी त्यांनीं बोलणें कांहीं सोडलें नाहीं. कित्येक वेळा ते समाधि लावून बसत. तेवढा वेळपर्यंत देह व त्याला जडलेला व्याधि

शेवट.

यांचा त्यांस विसर पडे. पण समाधि उतरली, कीं पुन्हा बोलण्याला आपली सुरवात. होतां होतां घशाची स्थिति इतकी विलक्षण झाली, कीं पातळ पदार्थही घशाखालीं उतरण्याची पंचाईत पडूं लागली. तरी पण बोलण्यासाठीं ते अगदीं दीर्घ प्रयत्न करीत. अखेरीस शेवटची वेळ येऊन ठेपली. शेवटपर्यंत त्यांची वृत्ति अगदीं आनंदी होती. एके दिवशीं सकाळीं 'मी आज देह ठेवणार,' असें त्यांनीं आपल्या शिष्यांना सांगितलें. ही तारीख १६ आगष्ट सन १८८६ सालची गोष्ट. त्या दिवशी रात्री १० वाजतां तोंडानें रामनामाचा घोष करीत करीत त्यांनीं समाधि लावली. तीच अखेरची. पण ती अखेरची आहे, असें त्यांच्या शिष्यांना प्रथमतः कांहीं वाटलें नाही. ती नेहमीप्रमाणेंच असावी, असें आपलें त्यांना वाटलें. कारण नेहमींच्या समाधीमध्येंसुद्धां त्यांची मृतवत् अवस्था होई. कसलाही डाक्तर असला, तरी त्यांच्या समाधीच्या वेळीं नाडीचे ठोके, हृदयाचें धडधडणें, वगैरे जिवंतपणाचीं कांहींही लक्षणें त्यास सांपडत नसत. यामुळें ही रोजची समाधि नव्हे, ही अखेरची आहे, हें समजून येण्यास बराच अवकाश लागला.

त्यांची प्रकृति जरी अत्यंत क्षीण झाली होती, तरी त्यांचें तेज कांही कमी झालें नव्हतें. त्यांचे पट्टशिष्य स्वामी विवेकानंद यांनीं त्यांच्या स्वरूपासंबंधानें असे उद्गार काढिले आहेतः—"त्यांचें शरीर कृश झालें आहे, तरी मूळची प्रफुल्लता, अर्भकाची कोमलता, अगाध नम्रता, एकंदर मुद्रेची अनिर्वचनीय मधुरता, हे त्यांच्या चेहऱ्याचे स्वाभाविक गुण

त्यांच्या शेवटच्या स्वरूपासंबंधाने विवेकानंदांचे उद्गार.

कायमच आहेत. त्यांच्या मुद्रेवर असें कांहीं स्मित झळकत आहे, कीं, तसें दुसऱ्या कोणाच्याही चेहऱ्यावर पाहिल्याचें मला स्मरत नाहीं"

प्रतापचंद्र मुजुमदार यांनीं त्यांच्यासंबंधानें असें म्हटलें आहे:—

प्रतापचंद्र मुजुमदार यांचे मत.

"त्यांचें उदाहरण प्रत्यक्ष पाहून माझी अशी खात्री झाली, कीं मनुष्याला याच जन्मांत जीवन्मुक्त होतां येतें. त्यांच्या मुखांतून कधीं शिव्याशाप ऐकूं आले नाहींत; त्यांच्या जिभेनें कधीं कोणाची निंदा केली नाहीं; किंवा त्यांच्या डोळ्यांना कधीं कांहीं वाईटही दिसलें नाहीं. वाईट विचारांचें त्यांच्या मनांत बीजच राहिलें नव्हतें. त्यांना सगळें चांगलेंच दिसे. ते स्वतः जरी निरक्षर होते तरी कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदव्यांचीं लांबलांब लोढणीं गळ्यांत अडकविलेल्या मोठमोठ्या माणसांच्या झुंडीच्या झुंडी त्यांच्या वाक्सुधेच्या प्राशनार्थ अगदीं तुटून पडत.''

भगवानदास बाबाजी म्हणून एक महान् वैष्णव साधु होते. त्यांची व रामकृष्णांची बरद्वानजवळ कल्ना येथें एकदां गांठ पडली.

भवानदास बाबाजी यांचें मत.

तेव्हां भगवानदासांनीं त्यांची निरंतर आनंदमग्नावस्था पाहून त्यांच्यासंबंधानें असे उद्गार काढिले:—"आपण खरोखरच ईश्वराचे अवतार आहां. स्वामी चैतन्यांकरितां राखून ठेवलेली जागा घेण्याला आपण पात्र आहां, यांत कांहीं शंका नाहीं."

परमहंसांची शिष्यशाखा एवढी विस्तृत आहे, कीं त्या सर्व शिष्यांचा नामनिर्देश करणें केवळ अशक्य आहे. त्यांच्या बहुतेक आवडत्या शिष्यांना त्यांचें प्रथम दर्शन इ० स० १८७९ व १८८२ या दोन सालांच्या दरम्यान झालें. त्या वेळीं त्यांचें देवपिसें कमी होऊन त्यांची वृत्ति एखाद्या लहान मुलाप्रमाणें सरळ, निर्व्याज, आनंदी व प्रफुल्लित असे. मात्र ते बहुतेक नेहमीं समाधीमध्यें मग्न असत. जरी समाधि उतरली तरी त्यांची वृत्ति आत्मविचारांतच रंगलेली असे. खरोखरच एखाद्या पांच वर्षांच्या बालकाप्रमाणें त्यांचें नेहमीं वर्तन असे. ‘ आई, हे आई, ’ हे उद्गार मात्र नेहमीं तोंडांत !

शिष्यशाखा.

सुशिक्षित-अशिक्षित, लहानथोर, स्त्रीपुरुष, हिंदु, मुसलमान, इंग्रज, अमेरिकन, आर्यसमाजवाले, ब्रह्मसमाजवाले, डाक्तर, वैद्य, हकीम, प्रोफेसर, तत्त्वज्ञानी, सावकार, जहागिरदार, व्यापारी, असे सर्व पंथांचे, दर्जांचे जातींचे व मतांचे लोक त्यांच्या शिष्यशाखेंत होते व आहेत. अद्यापिही ती शाखा वाढतच आहे. सुप्रसिद्ध स्वामी विवेकानंद हे परमहंसांच्या पट्ट शिष्यांपैकीं एक होते. त्यांनीं अमोरकेंत शिकॅगो शहरीं सन १८९३ सालीं भरलेल्या जगद्धर्मपरिषदेंत आर्यधर्माची ध्वजा उभारून आपल्या गुरूचा हेतु तडीस कसा नेला, ही गोड व अभिमानास्पद हकीगत बहुश्रुत वाचकांस विदित आहेच. पाश्चात्य देशांत आर्यधर्माचा प्रसार

करण्याकारितां त्यांनीं सुमारें आठ वर्षें अविश्रांत श्रम केले. पण परमेश्वराच्या दृष्टीनें त्यांचें अवतारकार्य संपल्यामुळें त्यांना मग स्वस्वरूपीं कायमचें लीन व्हावें लागलें. त्यांचें वेदान्तप्रसाराचें कार्य त्यांचे गुरुबंधु स्वामी अभेदानंद हे हल्लीं उत्तम तऱ्हेनें अमेरिकेंत करीत आहेत.

# रामकृष्ण-वाक्सुधा.

## प्रथम वृष्टि.

### बिंदु १.

**महाराजांचें प्रथम दर्शन, १८८२.**

इ० स० १८८२ सालचा मार्च महिना चालू होता. वसंत ऋतूचा प्रादुर्भाव झाल्यामुळें फुलझाडांना बहर आला होता व दक्षिणानिलाच्या मंद, मधुर व आरामकारक लहरी सुरू झाल्या होत्या. सर्व सृष्टि नवपल्लवपुष्पांनीं मंडित झाल्यामुळें आनंदित व प्रफुल्लित दिसत होती; जणूं काय आपल्याला वैभवसंपन्नता आल्यामुळें ती हासतच आहे! अशा रम्य ऋतुकालीं एके दिवशीं सायंकाळीं सहस्ररश्मि भगवान् सूर्यनारायण आपले शेवटचे किरण **जगदंबेच्या** सुंदर देवालयावर टाकीत असतां **एमला महाराजांचें** प्रथम दर्शन घडलें.

ज्या **जगदंबेच्या** देवालयांत रामकृष्णांनीं अनेक वर्षें वास केला, तें **दक्षिणेश्वर** नांवाच्या गांवीं गंगेच्या पूर्वतटाकीं आहे. दक्षिणेश्वर हें गांव कलकत्त्यापासून सुमारें चार मैलांवर आहे.

**महाराज** आपल्या खोलींत एका लहान पलंगडीवर बसले होते. तेथून पवित्र **गंगा** नदीचा सुंदर व रम्य प्रवाह चांगला दिसत होता. सर्व शिष्य व भक्तमंडळी जमिनीवर बसली होती. त्यांचें सारें लक्ष महाराजांच्या हास्ययुक्त आनंदी चेहऱ्याकडे लागलें असून ते त्यांच्या मुखांतून पडणाऱ्या वाक्सुधेचें आकंठ पान करण्यांत अगदीं गुंग होऊन गेले होते. महाराजांचें तोंड पूर्वेकडे असून ते हास्यमुखानें प्रभुमहिमा वर्णन करीत होते.

**एमनें** आंत पाहिलें आणि तो आ करून नुसता उभा राहिला! काय, ब्रह्मनिरूपण करितांना हा जो सत्पुरुष मला दिसत आहे, तो प्रत्यक्ष शुकाचार्य तर नव्हे? मी ज्या स्थानीं उभा आहें, त्या ठिकाणीं मजपुढें निरूपण करीत असलेल्या दिव्य पुरुषाच्या वागमृतानें पुनीत होण्याकारितां सर्व तीर्थें एकत्र तर झालीं नाहींत ना? **पुरीच्या** प्रसिद्ध देवालयांत बसून **रामानंद**, **स्वरूप**, इत्यादि आपल्या शिष्यवर्गाला **प्रभूच्या** लीला व नाममहिमा वर्णन करून सांगणारा गौरंगदेव ( चैतन्य ) तर या ठिकाणीं मजपुढें बसलेला मी पहात नाहींना? असे विचार **एमच्या** मनांत आले.

**महाराज** बोलूं लागले. ते म्हणाले:—समजा, कीं रामनाम उच्चारिल्याबरोबर तुमची सर्व तनु रोमांचित झाली किंवा तुमच्या नेत्रांतून आनंदाश्रूंचा पूर लोटला; तर मी असें तुम्हांला निश्चित सांगेन, कीं ईश्वरप्राप्ती कारितां कर्म ( उदाहरणार्थ द्विजांना सांगितलेली त्रिकालसंध्या ) करण्याचे तुमचे दिवस संपले.

प्रभूकारितां कर्माचा त्याग.

तेव्हांच कर्माचा त्याग करण्याचा अधिकार तुम्हांला येतो, तोंपर्यंत नाहीं. खरें म्हटलें म्हणजे त्या वेळीं तुमचीं कर्में आपोआप सुटतील. जीवात्म्याची इतकी तयारी झाली म्हणजे भक्तानें प्रभूचें ( राम, हरि किंवा नुसतें ॐ ) फक्त नामसंकीर्तन करावें. तेवढें पुरे आहे; दुसरें कोणतेंही कर्म करण्याची जरूर नाहीं.

कांहीं वेळानें **महाराज** पुन्हा म्हणाले: —संध्येचें पर्यवसान गायत्रींत; आणि गायत्रीचें नुसत्या ॐकारांत.

**एम्** वराहनगर ( दक्षिणेश्वराजवळच ) येथें रहात होता. तो व त्याचा **शिधू** नांवाचा एक मित्र असे दोघे सायंकाळीं सहल करावयास निघाले; फिरतां फिरतां ते दक्षिणेश्वराचे देवळापर्यंत आले. त्या दिवशीं रविवार असल्यामुळें **एमच्या** पाठीमागें कामाचा कांहीं लकडा नव्हता.

पहिल्यानें **एम्, पी० बानर्जीच्या** वाडींत हिंडावयास गेला. तेथें गेल्यावर **शिधू** त्याला म्हणाला, ' गंगेच्या किनारीं एक उत्तम बाग आहे. चला आपण तेथें जाऊं. **परमहंस** नांवाचे एक सत्पुरुष तेथें राहतात. '

**एम्** तर थक्कच झाला ! आश्चर्यानें त्याच्या तोंडांतून शब्दही फुटेना ! त्याच्या मनांत असे विचार उभे राहिले;—'अहाहा ! काय रम्य स्थान हें ! काय अद्भुत विभूति ही ! या पुरुषाचे शब्द किती मधुर आणि मोहक ! हें स्थान सोडून जाण्याचेंही किती जिवावर येतें ! पण पहिल्यानें आपण सभोंवतीं फिरून देऊळ

चांगलें पाहून ध्यावें; आणि मग परत येऊन या पुरुषाच्या पायांशीं बसावें.'

एम् खोलींतून बाहेर चौकांत आला. शिव, राधाकांत आणि काली यांच्या देवळांत जाऊन त्यानें त्या त्या देवतेचें दर्शन घेतलें.

तों सायंकाळ झाला. धुपारतीची वेळ झाली. निरनिराळ्या मूर्तीं-पुढें पुजारी पंचारती ओवाळूं लागले. घंटा, झांजा, मृदंग, तास, यांचा घोष सुरू झाला. कर्णा, सनई, चौघडा, नौबत, यांचा संमिश्रित मंजूळ ध्वनि दक्षिणेकडील वाऱ्याच्या झुळकांबरोबर बागेच्या दक्षिणेकडील टोंकापासून वहात येऊन सर्व जनांना रिझवूं लागला. तो गोड सूर गंगेच्या पृष्ठभागावरून लांबपर्यंत निनादत जाऊन शेवटीं दूर आकाशांत मिळून जात होता! त्या दक्षिणेकडून येणाऱ्या वाऱ्याच्या मंद मंद झुळुका तरी किती थंडगार होत्या म्हणून सांगावें! त्यांत आणखी वाटेंत भेटणाऱ्या हजारों फुल-झाडांपासून परिमळाचा जो त्यांनीं करभार घेतला, त्याचा सांठा त्यांनीं बरोबरच बाळगल्यामुळें तर फारच बहार उडाली होती! चंद्र नुकताच वर आला होता; व त्यानें आपल्या नयनमनोहर रुपेरी प्रकाशाची झिलई सर्व देवळांवर व उपवन प्रदेशावर चढ-वून दिली होती! एकंदर तो सर्व देखावा पाहून असें मनांत येई, कीं देवांच्या सायंपूजेची तयारी करण्याकरितां मनुष्याबरोबर सृष्टिही मोठ्या उल्हासानें कंबर बांधून सिद्ध झाली आहे!

तो रमणीय व प्रसन्न देखावा पाहून **एमच्या** आनंदाला तर पारावार नाहींसा झाला. **शिधू एमला** म्हणाला, ‘ हें **राणी रासमणीचें** देवालय. येथें रोज—सकाळपासून रात्रीपर्यंत—देवांची सेवा चालते. शिवाय साधुसंत, गोरगरीब, यांना देवीचा प्रसाद वांटून रोज केवढें तरी अन्नसंतर्पण करितात.’

ते दोघे मित्र परत त्या भव्य चौकांतून **श्रीरामकृष्णांच्या** खोलीकडे गेले. खोलीच्या दाराजवळ आले, तों तें ढकलेलें आहे, असें त्यांना दिसून आलें. **एमच्या** डोक्यांत इंग्रजी चालीरीति खिळल्या होत्या; तेव्हां एकदम आंत जावें, असें त्याला वाटेना. त्याला वाटलें, न विचारतां आंत जाणें, हें अगदीं रानटीपणाचें होईल !

थोड्या वेळापूर्वी खोलींत धूप जाळला होता.

दरवाजांत एक दासी उभी होती. तिचें नांव **वृंदा. एमनें** तिच्याशीं बोलण्याला सुरवात केली.

**एम्ः**—काय बाई, आहेत का आंत ते– साधुमहाराज ?

**वृंदाः** – होय, बाबा, ते या खोलींत आहेत.

**एम्ः** –आज किती दिवस बरें येथें राहतात ते ?

**वृंदा**ः—देवा माझ्या ! किती किती तरी वर्षे,—-

**एम्ः**—मला वाटतें पुष्कळच पुस्तकें वाचून त्यांचा त्यांना अभ्यास करावा लागतो.

**वृंदा**:—कायग बाई तरी! नाहीं बरें बाबा! त्यांना मुळींच पुस्तक ठाऊक नाहीं. सगळें त्यांच्या जिभेंत आहे. ती सर्व कांहीं बोलते,—मोठमोठीं शास्त्रेंसुद्धां! प्रत्यक्ष देवच त्यांच्या मुखानें बोलतो!

**एम्** कॉलेजांतून नुकताच बाहेर पडला होता. **रामकृष्ण** कांहीं मोठे विद्वान्, पंडित नाहींत, असें जेव्हां त्याला समजलें, तेव्हां तर त्याची अक्कल गुंगच होऊन गेली! तो नुसता तोंड वासून पाहात राहिला! तोंडांतून शब्द निघेना!

**एम्**: बरें, या वेळीं त्यांची सायंसंध्या चालली आहे का? आम्ही आंत जाऊं का?—त्यांचें दर्शन घेण्याची आम्हांला इच्छा आहे, एवढें कृपा करून त्यांना कळवित्येस का?

**वृंदा**:—कशाला? बाबांनो, तुम्ही खुशाल आंत जा, बेलाशक जा, आणि त्यांच्यासमोर बसा.

नंतर ते खोलींत गेले. तेथें दुसरें कोणी नव्हतें. तेथें दोन पलंगड्या होत्या; त्यांपैकीं धाकटीवर **महाराज** एकटेच बसले होते. धूप जळत होता आणि दरवाजे बंद होते. **एमनें** नुसते हात जोडून नमस्कार केला. जमिनीवर चटई टाकलेली होती. त्यांनीं सांगितल्यावर **एम्** व **शिधू** खालीं बसले.

महाराजांनीं प्रेमपुरःसर सगळी विचारपूस केलीः—"तुझें नांव काय? तूं राहतोस कोठें? तूं काय करतोस? वराहनगरला तूं कां आला आहेस?" असे अनेक प्रश्न त्यांनीं **एमला** विचारले.

**एम**नें सर्व प्रश्नांचीं यथास्थित उत्तरें दिलीं; पण संभाषण चालू असतां **महाराजां**चें मन दुसऱ्या कोठें तरी गुंतलेलें आहे—त्यांचें ध्यान कांहीं तरी वस्तूकडे लागलेलें आहे—हें **एम**च्या तेव्हांच लक्षांत आलें.

हीच का समाधि? अशी त्यांची अवस्था पाहून. हातांत गळाची काठी धरून मासा केव्हां सांपडतो, याची एकाग्रतेनें व स्वस्थ चित्तानें वाट पहात बसणाऱ्या मासेमाऱ्याचें चित्र आपलें **एम**च्या मनापुढें उभें राहिलें. माशानें आमिषाचा चावा घेतला, कीं पाण्यावर तरंगणाऱ्या गळाच्या दोरीला हिसका बसतो व ती हालूं लागते. त्या माणसाचे डोळे सारखे दोरीवर लागलेले असतात. लक्षपूर्वक तो ती काठी अगदीं घट्ट धरून ठेवितो. तो एक शब्दही कोणाशीं बोलत नाहीं. केवळ ध्यानस्थासारखा एक-चित्तानें बसलेला असतो.

पुढें कांहीं दिवसांनीं **एम**ला असें कळून आलें, कीं रोज दिवसांतून त्यांची किती वेळा तरी अशी समाधि लागते, व बाह्य जगाचें भानही त्यांना राहात नाहीं.

**एम्** ( श्रीरामकृष्णांना ):— मला वाटतें, **महाराज**, आपली संध्या व्हावयाची असेल. तेव्हां आतां आपल्याला उपाधि द्यावी, हे आम्हांला बरें दिसत नाहीं. पुन्हा केव्हांतरी आम्ही येऊं.

**श्रीराम**०:—छे! छे! तुम्हांला घाई करण्याचें कांहीं कारण नाहीं.

पुन्हा कांहीं वेळ ते स्वस्थ बसले. नंतर जेव्हां ते बोलूं लागले

तेव्हां त्यांच्या मुखांतून असे शब्द बाहेर पडलेः—संध्या. हां, असेंच नाहीं का?

कांहीं वेळानें **एमनें** महाराजांना प्रणाम केला. त्यांनींही त्याला आशीर्वाद देऊन म्हटलें, 'पुन्हा ये, बरें का!'

वराहनगरला परत जातांना **एमच्या** मनांत असे विचार चालू झालेः—'काय बरें या सत्पुरुषाचा चमत्कार म्हणावा? पुन्हा त्याचें दर्शन घ्यावें, अशी माझ्या जिवाला उत्कंठा कां लागावी? मनुष्य मोठा तर असावा पण तो विद्वान् नसावा, हें शक्य आहे काय? ... ..त्याच्याकरितां जिवाला इतकी तळमळ लागते, याचा काय बरें अर्थ?—त्यानेंही मला, पुन्हा ये असें सांगितलें आहे,—उद्यां किंवा निदान परवां तरी मी पुन्हा येणारच.

---

## बिंदु. २

दोन दिवसांनंतर सकाळीं आठ वाजतां **एम्** पुन्हा दर्शनाला आला. **महाराजांचा** श्मश्रूविधि चालला होता. हिंवाळ्यांतली थंडी अद्याप नाहींशी झाली नव्हती. त्यांच्या अंगावर मऊ शाल होती, व तिचे कांठ तांबडें अलवानी कापड लावून शिवलेले होते. **एमला** पाहिल्यावर **महाराज** म्हणालेः—'वा! तूं आलास, बरें झालें. बैस इथे.'

त्यांच्या खोलीच्या दक्षिणेकडील पडवींत ही भेट झाली. ते न्हाव्यापुढें बसलेले असून त्यांच्या पायांत चपाता होत्या

व वर वर्णन केलेली शाल अंगावर होती. एकीकडे न्हाव्याचें काम चाललें होतें, एकीकडे ते **एम**बरोबर बोलत होते. ते नेहमींप्रमाणें हास्यमुख होते. बोलतांना ते मधून मधून थोडे लागत होते.

**महाराज ( एमला )**:– तुझें घर कोठें?

**एम्**:–कलकत्त्याला, महाराज.

**महाराजः**–येथें ( वराहनगरांत ) तूं कुठे उतरला आहेस?

**एम्**:–माझ्या बहिणीकडे, महाराज, ईशान कविराज यांचे घरीं.

**महाराजः**–ईशानच्या घरीं? हां! अस्सें. हल्लीं केशवचें ( केशव चंद्रसेन ) कसें आहे, तुला ठाऊक आहे का? तो फार अजारी आहे, असें मीं ऐकलें.

**एम्**:–होय महाराज, मीही तसेंच ऐकलें. बहुधा त्यांचे आतां बरें असावें.

**महाराजः**–केशव बरा व्हावा म्हणून मीं आईला (कालीमाता) शाहाळ्यांचा व साखरेचा नवस केला आहे.–कधीं कधीं रात्रीं मी झोपेंतून एकदम जागा होतों आणि आईची अशी करुणा भाकतों:–आई, कृपा करून माझ्या केशवाला तेवढा बरा कर. माझा केशव जर वांचला नाहीं, तर आई, मीं कलकत्त्याला गेल्यावर कोणाशीं बरें बोलावें? बरें अलीकडे कलकत्त्याला कुक नांवाचा कोणी साहेब आला आहे, हें तुला ठाऊक आहे का? त्याचीं व्याख्यानें चाललीं आहेत का? त्या दिवशीं केशवनें मला एका आगबोटीवर नेलें तेव्हां तिथे तो ( कुक ) होता.

**एम्ः**—होय, महाराज, मीं त्याच्यासंबंधानें बरेंच ऐकलें आहे. पण त्याचें व्याख्यान ऐकण्याचा मला कधीं प्रसंग आला नाहीं; किंवा त्याच्यासंबंधानें मला कांहीं विशेष माहितीही नाहीं.

**महाराजः**—प्रतापचा भाऊ येथें येऊन थोडे दिवस राहिला होता. मी येथें राहण्यास आलों आहें, असें तो म्हणाला. त्याला उद्योगविद्योग कांहीं नव्हता आणि त्यानें आपलीं बायकोमुलें आपल्या सासऱ्याकडे पाठवून दिलीं होतीं. आंगीं स्वाभिमान नसल्याबद्दल आम्ही त्याला फार बोललों. अंगावर पोरांचें एवढें लेंढार असतांना, असें भटकत फिरणें त्याला अगदीं गैरशिस्त आहे, असें तुला नाहीं का वाटत? तिऱ्हाइतानें येऊन त्यांचें पालणपोषण करावें का? आपल्या कुटुंबाचें पोषण दुसरें कोणीतरी करितें आहे, आपलें ओझें आपण सासऱ्याचे डोकीवर लोटलें आहे, याची त्याला लाज वाटत नाहीं, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. मीं त्याचे चांगलेच कान उपटले आणि कांहींतरी उद्योग पाहा, असें सांगितलें. अशा रीतीनें त्याचा मूर्खपणा जेव्हां त्याच्या पदरांत टाकला, तेव्हां तो येथून चालता झाला. बरें, तुझें लग्न झालें आहे का?

पितृकर्तव्य.

**एम्ः**—होय, महाराज.

हें ऐकून श्रीरामकृष्णांना फार आश्चर्य वाटलें. ते म्हणालेः—अरे बापरे! हा इतक्यांत बायकोसुद्धां करून चुकला! प्रभु याचें बरें करो!

लग्न केल्याबद्दल महाराज एमला बोलतात.

हे शब्द ऐकून **एम्** तर गोंधळूनच गेला व एखादा भयंकर अपराध हातून घडलेल्या माणसाप्रमाणें खालीं मान घालून तो स्तब्ध बसला. नंतर तो आपल्याशींच म्हणाला, 'काय, लग्न करणें तर मग इतकें का वाईट आहे?'

**महाराजः**—कांहीं मुलें झालीं आहेत का?

**एम**च्या काळजाची धडधड त्याला स्पष्ट ऐकूं येऊं लागली! त्यानें हळूच 'होय, **महाराज**,' असें उत्तर दिलें.

**महाराज** थक्कच झाले, अरेरे! पोरांचें झोंबटसुद्धां मागें लागलें! असें म्हणून त्यांनीं **एम**ला अगदीं पाण्यापेक्षां पातळ केलें. आपल्या अभिमानावर जोराचा आघात झाल्यासारखें **एम**ला वाटलें. कांहीं वेळानें **महाराजांनीं एम**कडे सप्रेम पाहिलें, व मोठ्या ममतेनें ते त्याला म्हणालेः—हें पहा, बेटा, तुझ्या ठिकाणीं कांहीं चांगलीं लक्षणें आहेत. माणसाचे डोळे व कपाळ हीं पाहिलीं, कीं तीं मला समजतात. पूर्व अवतारांत ज्यांनीं आपला काळ समाधि-सुखांत घालविला असतो, अशा योग्यांच्या नेत्रांतील पाणी कांहीं निराळेंच असतें. कांहीं-कांहींसंबंधानें तर असें वाटतें, कीं ध्याना-सनावरून ते आत्तांच उठले आहेत. बरें, आतां तुझ्या बायको-कडे वळूं. तिच्यासंबंधानें तुझें काय मत आहे? ईश्वराची व ज्ञानाची सहज प्राप्ति करून देणारी जी सात्त्विक वृत्ति ती तिच्या ठिकाणीं आहे का? किंवा ईश्वरापासून दूर नेऊन अंधकारांत लोटून देणारी पहिलीच्या विरुद्ध वृत्ति तिच्या अंगीं आहे?

**एम्**:—ती आहे बरी, पण अडाणी (अज्ञानी).

**महाराज** (रागानें):—ती अडाणी आणि तूं शहाणा! आपल्याला ज्ञान लाधलें, असें तुला वाटतें! होय ना?

खरें ज्ञान कोणतें व खरें अज्ञान कोणतें, हें **एम**ला माहीत नव्हतें. त्याची समजूत अशी होती, कीं जो पुस्तकें वाचतो तो ज्ञानी. [ही त्याची समजूत पुढें (कांहीं दिवसांनीं) दूर होऊन त्याच्या मनाची अशी खात्री झाली, कीं परमेश्वराचें स्वरूप जाणणें हेंच खरें ज्ञान असून तें न जाणणें म्हणजेच अज्ञान होय].

'तूं ज्ञानाला पोंचलास असें तुला वाटतें का?' असें जेव्हां **महाराज** म्हणाले, तेव्हां एमच्या अभिमानावर दुसरा आघात झाला.

**महाराज**:—तुला साकार (सगुण) ईश्वराची भक्ति आवडते, कीं निराकार (निर्गुण)?

मूर्तिपूजाः-ईश्वर सगुण कीं निर्गुण?

या प्रश्नानें **एम्** पुन्हा गोंधळून जाऊन विचारांत पडला. ईश्वर निराकार आहे, असा एखाद्याचा विश्वास असून तो साकार आहे, हेंही त्याला खरें वाटत असावें, ही गोष्ट शक्य आहे काय? किंवा ईश्वर साकार आहे अशी एखाद्याची दृढ समजूत असतां तो निराकारही आहे, असें त्याला कसें वाटावें? एकाच वस्तूच्या ठिकाणीं दोन विरुद्ध गुण असतील का? दुधासारखे पदार्थ पांढरे असून त्याच वेळीं काळे असतील का? कांहीं वेळ विचार

केल्यानंतर **एम्** म्हणालाः—**महाराज**, सगुण ईश्वराचें ध्यान करण्यापेक्षां निर्गुण ईश्वराचेंच ध्यान करणें मला बरें वाटतें.

**महाराजः**—फार चांगलें. त्याला असा मानला किंवा तसा मानला तरी त्यांत कांहीं मोठेंसें नाहीं. हें पहा, त्याला निर्गुण मानणें, हें अगदीं वाजवी आहे; पण ही कल्पनामात्र बरोबर आहे, बाकी सर्व मिथ्या आहेत, अशीच एक आपल्या मनाची समजूत करून घेऊन चालूं नको. एवढेंमात्र संभाळ. ईश्वर साकार आहे, असें मानून त्याची भक्ति करणें, हेंसुद्धां तितकेंच बरोबर आहे. मात्र तुझी कशीही जरी समजूत असली, तरी ईश्वरी साक्षात्कार तुला घडेपर्यंत—ईश्वर प्रत्यक्ष तुला दिसेपर्यंत—तिची कास तुला सोडतां कामा नये. मग (ईश्वरदर्शन झाल्यावर) सगळा खुलासा आपोआप होईल.

**एम्** पुन्हा स्तब्ध. दोन विरुद्ध गोष्टी ईश्वरासंबंधानें खऱ्या आहेत, हें **महाराजांच्या** तोंडून तो पुनःपुन्हा ऐकत होता. असली विलक्षण गोष्ट त्याच्या पुस्तकांत त्याला कोठेंही आढळली नव्हती; आणि त्याच्या ज्ञानाची तर सर्व मदार त्यांवरच (पुस्तकांवर). त्याच्या अभिमानावर आणखी एक आघात बसला; पण तो जमीनदोस्त होऊन त्याचा पुरा चेंदामेंदा झाला नाहीं. म्हणून **महाराजांना** आणखी प्रश्न विचारून तो त्यांच्याशीं थोडा वादविवाद करूं लागला.

**एम्**:—हें पहा, महाराज, ईश्वर साकार आहे, हें कदाचित् खरें मानतां येईल; पण ज्या मृण्मय मूर्तींची पूजा कारितात त्या मूर्ति कांहीं परमेश्वर नव्हत, एवढें खचित!

**महाराज**:—बाबा, तिला मृण्मय मूर्ति कां म्हणतोस? ईश्वरी मूर्ति चैतन्याची केलेली असते.

**एमला** हें कांहीं समजेना. तो पुढें म्हणाला:—तुम्ही ज्या मूर्तींची पूजा कारितां त्या मूर्ति स्वतः परमेश्वर नाहींत, तेव्हां पूजा कारितांना तुम्ही आपलें चित्त मूर्तीवर न ठेवितां परमेश्वराचे ठिकाणीं लावून ठेवा, असा स्पष्ट उपदेश मूर्तिपूजकांना करणें, हें, महाराज, कोणाचेंही कर्तव्य नाहीं काय?

व्याख्यानें व श्रीरामकृष्ण.

**श्रीरामकृष्ण** (रागानें):—तुम्हांला—कलकत्त्यांतील लोकांना—अलीकडे एकच वेड लागून राहिलें आहे! बोलण्यांत, चालण्यांत, आचारांत, विचारांत, तेंच! व्याख्यानें द्यावयाचीं आणि सगळ्या लोकांच्या डोक्यांत उजेड पाडायचा! मी असें विचारतों, तुमच्या स्वतांच्या अंतःकरणांत तुम्ही उजेड कसा पाडणार? आणखी हें पहा, तुम्ही रे कोण दुसऱ्यांना उपदेश करणार? ज्या प्रभूनें सूर्य आणि चंद्र, मनुष्यें आणि पशु, इत्यादि निर्माण केलीं, ज्या प्रभूनें त्यांच्या निर्वाहाकरितां अनंत वस्तु उत्पन्न केल्या, ज्या प्रभूनें त्यांच्या लालनपालनाकरितां मातापितरांना जगांत आणलें, तो जगत्प्रभु जरूर पडल्यास मनुष्यांना

वाट दाखवील (उपदेश करील); ज्या प्रभूनें इतक्या गोष्टी केल्या, तो त्यांना अज्ञानांधकारांतून बाहेर पाडण्याकरितां कांहीं तरी करणार नाहीं काय? जरूर पडल्यास खचित करील! तो मानव-कुडीच्या देवळांत राहिला आहे. आपले सप्तपाताळांतले विचार त्याला समजतात. मूर्तिपूजेंत जर कांहीं चुकत असेल (गैरशिस्त असेल), तर ही सर्व पूजा आपणाकरितां आहे (आपलीच आहे), हें त्याला समजत नाहीं काय? ती पूजा आपलीच आहे, हें जाणून तो तिचा आनंदानें स्वीकार करील. ज्या गोष्टींत आपल्याला कांहीं समजत नाहीं, व ज्या आपल्याला अगम्य आहेत, त्यांच्या पंचायतींत तूं कां पडावें? परमेश्वराला जाणण्याचा आणि त्याला मस्तकीं धारण करण्याचा प्रयत्न कर. परमेश्वरावर भक्ति ठेव. हें तुझें अगदी जवळचें (पहिलें) कर्तव्य आहे.

**एमचा** अभिमान अगदीं चीत झाला—पक्का गळाला. त्याच्या मनांत असे विचार सुरू झाले:—हा महात्मा जें म्हणतो तें खरोखर अगदीं खरें आहे. उठून दुसऱ्यांना उपदेश करीत सुटण्याचें मला काय काम आहे? स्वतः मला ईश्वराचें ज्ञान झालें आहे काय? ईश्वरावर माझी भक्ति तरी आहे का? एकादशीनें शिवरात्रीला भोजनाचें आमंत्रण देण्यासारखें किंवा स्वतांच्या विहिरींत पाण्याचा थेंबही नसतां सर्व जगाला आपल्या विहिरीवर येऊन आपली तृषा भागवून घ्या, तहानेनें मरूं नका, अशी मोठ्या कळकळीची

विनंती करण्यासारखें हें आहे. ईश्वरासंबंधानें माझें ज्ञान शून्य आहे. असें असतां दुसऱ्याना शिकविण्याचें मीं मनांत आणणें म्हणजे मूर्खपणाचा व अडाणीपणाचा—खरोखर याबद्दल मला लज्जेनें मानच खालीं घातली पाहिजे—कळसच आहे. इथे कांहीं गणित, इतिहास, किंवा भाषाविषय शिकवावयाचा नाहीं. हें ईश्वरशास्त्र आहे. होय. या महात्म्याचे शब्द माझ्या मनावर अगदीं पक्के बिंबले.

कोणत्याही मुद्यावर महाराजांबरोबर वाद घालण्याचा हा एमचा पहिलाच प्रयत्न होता आणि सुदैवानें तोच शेवटचा.

**महाराजः**—मृण्मय मूर्तीसंबंधानें तूं म्हणत होतास. पण हें पहा, अशा मूर्तींचीसुद्धां पूजा करणें पुष्कळ प्रसंगीं योग्य असतें. पूजेचे हे नानाप्रकार स्वतः ईश्वरानेंच उत्पन्न केले आहेत. ज्ञानसोपानाच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर जाऊन बसलेल्या निरनिराळ्या माणसांच्या योग्यतेला उपयोगीं पडण्याकरितां त्यानें हे सर्व प्रकार योजिले आहेत. आई आपल्या मुलांकरितां असें अन्न तयार करिते, कीं ज्याला जें चालतें ( सोसतें ) तें त्याला मिळावें. समज, एका आईचीं पांच मुलें आहेत. घरांत मासे आणले, तर ती त्याचे अनेक प्रकार करिते. त्यामुळें जो प्रकार ज्याच्या प्रकृतीला मानवेल तो तिला त्याला देतां येतो. एकाला माशांचा मसालेदार रसा ती देते; पण ज्याची पचनशक्ति चांगली नसते त्याला नुसता त्यांचा काढा ( सूप ) ती करिते; तिसऱ्याकरितां आंत मरीच मिंच घालून ती माशांची कढी करिते; चवथ्याकरितां

ती मासे तळते. याप्रमाणें ज्याच्या पोटाला जें सोसेल तें देण्याची ती काळजीपूर्वक तजवीज करिते. समजलें का ?

**एम्**:—होय, महाराज, आतां समजलें. आरंभीं (पूर्वस्थितींत) मनुष्यानें मृण्मय मूर्ति म्हणजेच परमेश्वर असा दृढभाव धरून तिची पूजा ( भक्ति ) करावी. पुढें भक्ताच्या मनांत जेव्हां ज्ञानप्रकाश पडेल—पुढें भक्ताला परमेश्वराचें खरें स्वरूप जेव्हां कळेल—तेव्हां त्यानें भक्ति ( पूजा) करितांना मूर्ति पुढें ठेविली नाहीं तर चालेल.

**महाराज**:—खरें आहे. आणखी, एकदां त्याला परमेश्वर दिसला, एकदां त्याला परमेश्वराच्या खऱ्या स्वरूपाचें अपरोक्ष ज्ञान झालें, म्हणजे या विश्वांतील प्रत्येक वस्तु—मूर्ति, सर्व कांहीं—अव्यक्त चैतन्याचें व्यक्त रूपच आहे, असें त्याच्या अनुभवाला येईल. त्याला मूर्ति मृण्मय न दिसतां चिन्मयच दिसेल. ईश्वर म्हणजे चैतन्य होय.

**एम्**:—महाराज, काय केलें म्हणजे मनुष्याचें चित्त परमेश्वराचे ठिकाणीं दृढ होईल ?

**महाराज**:—तसें होण्याकरितां मनुष्यानें परमेश्वराच्या नामगुणांचें गायन मुखानें अखंड सुरू ठेविलें पाहिजे. साधुसमागमाचा लाभ निरंतर घेतला पाहिजे. ज्यांनीं परमेश्वराप्रीत्यर्थ ऐहिक वस्तूंवर पाणी सोडलें आहे, अशा भगवद्भक्तांत त्यानें सदैव बसलें-उठलें पाहिजे. संसारांतील अनेक काळज्या व चिंता सभोंवती थैमान

एकांताचें महत्त्व.

करीत असतां मनुष्याचें लक्ष परमेश्वराकडे लागणें फार कठिण आहे, यांत शंका नाहीं. म्हणून परमेश्वराचें ध्यान करण्याकरितां मनुष्यानें मधून मधून एकांतवासाचें सेवन केलें पाहिजे. परमात्म-साधनाचा नूतन अभ्यास चालू असतां कोणाचेंही एकांतवासाशिवाय चालावयाचें नाहीं. वृक्षाचीं रोपें जोंपर्यंत लहान असतात तोंपर्यंत त्यांच्या रक्षणार्थ त्यांच्याभोंवतीं कुंपण घालावें लागतें; नाहीं तर बकरीं व गाई खाऊन त्यांचा विध्वंस करितील.

मन, एकांतस्थल व अरण्य हीं तीन ध्यानाचीं स्थानें आहेत. सत् ( परमेश्वर ) व असत् ( जगदाभास ) यांच्या विचाराचा अभ्यासही मनुष्यानें ठेविला पाहिजे. याच मार्गानें ऐहिक वस्तूं-वरील—इंद्रियभोग, संपत्ति, कीर्ति, सत्ता, इत्यादींवरील—आसक्ति झुगारून देण्याचें सामर्थ्य मनुष्याचे अंगीं येईल.

**प्रश्नः**—महाराज, गृहस्थ या नात्यानें मनुष्यानें संसारांत कसें राहिलें पाहिजे?

**महाराजः**—चित्त निरंतर परमेश्वराचे पदकमलीं ठेवून आपलीं सर्व कर्तव्यें करीत राहा. मातापितरें आणि पत्नी आणि मुलें यांसंबंधानें जर म्हणशील, तर तीं सर्व आपलींच आहेत, असें समजून त्यांच्या सेवेला निरंतर सादर राहा; पण आपल्या मनां-तल्या मनांत अशी पक्की खूण-गांठ बांधून ठेव, कीं तीं कांहीं खरीं आपलीं नव्हत—मात्र त्यांचीसुद्धां प्रभूच्या ठिकाणीं तशी भक्ति असेल तर गोष्ट वेगळी. खरोखर एकटा ईश्वरमात्र तुझा आहे—आणि ज्यांची त्या ईश्वराचे ठिकाणीं दृढ भक्ति आहे ते.

श्रीमंताच्या घरची दासी (मोलकरीण) आपलीं सर्व कामें करिते, परंतु तिचें लक्ष असतें निरंतर स्वतःच्या घराकडे. तिच्या धन्याचें घर हें कांहीं तिचें घर नव्हे. आपल्या पोटच्या मुलां-प्रमाणें ती आपल्या धन्याच्या मुलांचे लाड करिते. 'माझा सोन्या तो,' 'माझा बाळ तो,' असें म्हणून त्यांना कुरवाळते. पण हें सर्व करीत असतांना हीं मुलें कांहीं आपलीं नव्हत, ही जाणीव तिच्या ठिकाणीं पूर्ण जागृत असते. त्याचप्रमाणें कांसवी भक्ष्य शोधार्थ पाण्यामध्यें संचार करीत असते; तिचें मन कोठें असतें असें तुला वाटतें? निःसंशय, किनाऱ्यावर ज्या ठिकाणीं तिनें आपलीं अंडीं घातलेलीं असतात त्या ठिकाणीं. याच न्यायानें संसारांतलीं आपलीं सर्व कामें तूं कर; पण मन प्रभुचरणारविंदीं रत होऊन राहील, अशी नीट खबरदारी राख.

समज, कीं, तूं साधनाचे द्वारें भक्तीचा ठेवा जोडल्यावांचून संसारांत पाऊल टाकलेंस, तर तूं गोत्यांत पडशील एवढें पक्कें लक्षांत ठेव. संकटें, दुःखें, देहाला स्वाभाविक जडणाऱ्या अनेक व्याधि, इत्यादींनीं तुझ्या मनाचा कांटा डळमळूं लागेल—मनाचा शांतिभंग होईल. संसारांत जितका तूं तादात्म्य पावशील, संसाराच्या भानगडी जितक्या तूं ज्यास्त करशील, तितकी तितकी संसारावर तुझी आसक्ति ज्यास्त जडेल.

तुला जर फणस फोडावयाचा असेल तर पहिल्यानें हाताला

तेल चोळ; नाहीं तर त्याचा चीक तुझ्या हाताला लागेल. पहिल्यानें भक्तीचें तेल आपल्या हाताला लाव आणि मग संसाराच्या कामाला हात घाल. पण तें साधण्याला एकांतवासाची अत्यंत जरूर आहे. समज, तुला लोणी करावयाचें आहे. तर कोणाच्याही हातीं लागणार नाहीं अशा ठिकाणींच तुला दहीं ठेविलें पाहिजे. विरजण जर हाताळलें तर तें नीट लागणार नाहीं. दहीं नासेल. मग पुढलें काम एकांत ठिकाणीं बसून मंथन करावयाचें.

एकांतवासांत ईश्वराचें चिंतन.

एकांत ठिकाणीं बसून जर तूं आपलें चित्त परमेश्वराकडे लावलेंस, तर तुझ्या ठिकाणीं भक्ति व त्याग यांचें पाणी मुरेल. तेंच चित्त जर तूं संसाराला वाहिलेंस, तर तें पाजी व बदमाष बनून एकट्या संसाराचाच छंद घेईल;—संसार हा शब्द केवळ ‘ कनक व कांता ’ यांचाच वाचक आहे.

संसाराला पाण्याची व मनाला दुधाची उपमा देतां येईल. चांगलें दूध एकदां पाण्यांत मिसळलें म्हणजे त्यांतून ते शुद्ध स्थितींत पुन्हा वेगळें काढून घेतां येत नाहीं. पण त्याचें (दुधाचें) रूपांतर केलें तर ( पाण्यांत मिसळूनसुद्धां ) त्याची शुद्धता कायम राखतां येते. म्हणजे पहिल्यानें त्याचें लोणी करून मग तें पाण्यांत घातलें, तर पाण्यांत असून तें पाण्यानें लिप्त होत नाहीं. तर मग एकांतांत साधनाच्या द्वारें तूं आपल्या मनाच्या दुधाचें भक्तीच्या लोण्यांत रूपांतर कर ( म्हणजे एकांतवासाचा आश्रय करून दृढ

अभ्यासानें मन भक्तिमय करून टाक). लोण्याचा पाण्याशीं कधींही एकजीव होत नाहीं, तें पाण्याच्या पृष्ठभागीं नुसतें तरंगत राहतें. त्याचप्रमाणें तुझें मनही संसारांत पडूनसुद्धां अलिप्त राहील. जरी तें संसारांत असलें, तरी तें संसारी होणार नाहीं. ज्ञानाच्या किंवा भक्तीच्या अमृताची गोडी लागल्यामुळें तें संसार-मद्याच्या भिटक्या मारण्यास केव्हांही तयार होणार नाहीं. तें संसारापासून अलग राहील—त्यांत आसक्त होऊन राहणार नाहीं.

याबरोबरच विवेकाचें साधन कर;—कनक व कांता (संसार) हीं मिथ्या आहेत, एक परमेश्वरच सत्य आहे. पैशाचा उपयोग काय? होय, त्याच्या साहाय्यानें अन्न, वस्त्र व निवासस्थान हीं प्राप्त होतात. त्याच्या उपयोगाची मर्यादा इतकीच, पुढें नाहीं. पैशाच्या बळावर तुला परमेश्वर कांहीं दिसणार नाहीं, एवढें खचित. किंवा पैसा म्हणजे कांहीं जीविताचें सार्थक नव्हे. विवेकाची दिशा अशी. ही तुला समजली का?

**एम्**:—होय, महाराज, समजली. नुकतेंच मी कांहीं प्रसंगानें ‘प्रबोधचंद्रोदय’ नांवाचें संस्कृत नाटक वाचलें, त्यावरून विवेकासंबंधानें थोडी माहिती मला झाली आहे.

**महाराज**:—हां, विवेक. विचार कर, पैशांत किंवा स्त्रीच्या लावण्यांत असें काय आहे? तूं आपल्या विवेकशक्तीचा जर उपयोग करशील, तर तुझें तुलाच असें आढळून येईल, कीं अत्यंत लावण्यवती स्त्रीचा देहसुद्धां नेहमींप्रमाणें (इतर प्राण्यांच्या देहा-

प्रमाणेंच ) केवळ मांस आणि रक्त, त्वचा आणि हाडें, मेद आणि वसा यांचाच—नव्हे इतर प्राण्यांच्या देहाप्रमाणेंच आंतडीं, मूत्र, विष्ठा इत्यादींचाच—बनलेला आहे. आश्चर्याची गोष्ट अशी आहे, कीं मनुष्य परमेश्वराला विसरतो आणि आपलें मन केवळ अशा प्रकारच्या वस्तूंना वाहून टाकतो!

**एम्**:—महाराज, परमेश्वर दिसणें शक्य आहे काय?

परमेश्वर कसा दिसेल ?

**महाराज**:—अलबत! परमेश्वर दिसण्याची कांहीं साधनें हीं आहेत:—( १ ) मधून मधून एकांतवासाचें सेवन, ( २ ) त्याच्या नामगुणांचें कीर्तन, ( ३ ) विवेक, ( ४ ) कळकळीची—प्रभूकरितां अगदीं तळमळ लागून केलेली—विनवणी ( प्रार्थना ).

**एम्**:—महाराज, मनाची कोणती अवस्था झाली कीं, परमेश्वराचें दर्शन घडतें?

**महाराज**:—**अंतःकरणाला पीळ पडून, अगदीं तळमळ लागून, वेडापिसा होऊन प्रभूकरितां टाहो फोड, कीं तो धांवत आलाच तुला दर्शन द्यायला.** लोक बायकोपोरांकरितां डोळ्यांतून घागरभर पाणी काढतात, ते पैशाकरितां आपल्याच अश्रूंच्या पुराबरोबर सुखानें वाहत जातात! पण ईश्वराकरितां कोणी चार आंसवें तरी टाकतो का! लोकांना दाखविण्याकरितां नव्हे, तर अंतःकरणाला त्याच्या भेटीचें वेड लागून, भगवंताचा धांवा कर.

सूर्योदय होण्यापूर्वी प्रभातकालचा रक्तिमा दिसूं लागतो. (प्रभातकालचा रक्तिमा दिसूं लागल्याबरोबर सूर्योदय होणार, हें खचित समजावें). तद्वत् अंतःकरणाची खरी तळमळ म्हणजे पुढें घडणाऱ्या ईश्वर-दर्शनाचें पूर्वचिन्हच होय.

संसारी माणसाचें संसारप्रेम, मातेचें संतानप्रेम आणि पतिव्रतेचें पतिप्रेम, या तीन संयुक्त प्रेमांइतकें जर तुझें ईश्वर-प्रेम बळकट असेल, तर तुला ईश्वर दिसेल.

तात्पर्य असें आहे, कीं, परमेश्वराचें दर्शन घडण्याला मनुष्यानें त्याच्या ठिकाणीं अनन्य किंवा अव्यभिचारी भक्ति ठेविली पाहिजे. जगन्मातेच्या कानावर जाऊन आदळेल असा तिचा धांवा माणसानें केला पाहिजे.

'म्यांव्' 'म्यांव्' करून आपल्या आईला हाका कशा माराव्या, एवढेंच मांजरीच्या पोराला समजतें. पुढें काय करायचें तें सर्व मांजरीला ठाऊक असतें. ती आपल्या पोरांना तिला वाटेल तेथें नेऊन ठेवते; घटकेंत स्वयंपाकघरांत, घटकेंत यजमानाच्या गुलगुलीत बिछान्यावर. हो, पण मांजरीच्या पोराला आपल्या आईला हाक कशी मारावी, एवढेंच समजतें. (याच न्यायानें परमेश्वराला माणसानें अनन्यगतिक होऊन हाक मारली, कीं तो धांवत येऊन त्याचें योगक्षेम पाहील. हाक मारणें इतकेंच त्याचें काम. तें मात्र त्यानें केलें पाहिजे.)

# बिंदु ३.

**एमचें** वास्तव्य वराहनगर येथें त्याच्या बहिणीच्या घरींच असून, तें गांव दक्षिणेश्वराचे देवालयापासून सुमारें एक मैलावर होतें. **श्रीरामकृष्णांचें** दर्शन झाल्यापासून त्यांचेच विचार त्याच्या मनांत खारखे घोळत होते. त्यांची हास्यमुख मूर्ति आपल्यापुढें निरंतर उभी आहे, त्यांचें अमृततुल्य भाषण आपण लक्षपूर्वक ऐकत आहों, असेंच त्याला नेहमीं वाटे. त्याला मनांतल्या मनांत असें वाटे, कीं हें जीवित व आत्मा यांचीं—आध्यात्मिक विषयाचीं—गहन प्रमेयें या भिकार ब्राह्मणाला विशद करून कशीं सांगतां येतात! बरें, याची सांगण्याची शैली तरी किती सुबोध! अगदीं बालबोध! **एमची** उत्कंठा इतकी जागृत झाली होती, कीं तिला पुढें जबरदस्त तळमळीचें स्वरूप प्राप्त झालें; त्याला रात्रंदिवस वेड हें, कीं होईल तितक्या लवकर त्यांच्या दर्शनाचा योग पुन्हा साधावयाचा. तेव्हां पुढल्याच रविवारीं तीन व चार यांच्या दरम्यान वराहनगर येथील **नेपालबाबूंना** बरोबर घेऊन तो पुन्हा देवळांत गेला.

**महाराज** त्याच खोलींत पलंगडीवर बसले होते. खोलींत भक्तमंडळीची गर्दी होती. हा रविवारचा दिवस असल्यामुळें सगळे मोकळे होते. **एमची** अद्याप कोणाशींही ओळख झाली नव्हती. **महाराजांना** हात जोडून नमस्कार केल्यानंतर **एम्** एका बाजूला जाऊन बसला. **महाराज** हास्यवदनानें भक्तमंडळीशीं बोलत होते.

**महाराजांच्या** बोलण्याचा मुख्य रोख **नरेंद्र** [ विवेकानंद ]

नांवाच्या एका तरुणाकडे आहे, हें एमच्या तेव्हांच लक्षांत आलें.

विवेकानंदः–वाईट लोकाशी कसें वागावें ?

**नरेंद्राचें** वय त्या वेळीं केवळ एकोणीस वर्षांचें होतें. तो कॉलेजांत विद्यार्थी असून **साधारण-ब्राह्मो समाजाचा** अनुयायी (मेंबर) होता. त्याच्या वाणींत तेज ओतप्रोत भरलेलें असे. त्याचे नेत्र विशाल असून काळेभोर होते. त्यांत बुद्धीचें तेज चमकत असून अंतरात्माच्या मोठेपणाची साक्ष त्यावरून सहज पटत होती. खऱ्या भक्ताची मुद्रा जशी असते तशीच त्याची होती.

संसारी जनांच्या वर्तनासंबंधानें बोलणें चाललें आहे, असें **एमला** समजलें. ईश्वरमार्गाला जे लागतात त्यांचा हे लोक (संसारी लोक) फार उपहास करितात. तेव्हां प्रश्न असा होता कीं, या लोकांशीं कसें वागावें ?

**महाराज** (हंसून, **नरेंद्राला**):—काय तुझें म्हणणें **नरेंद्र** ? संसारी लोक देवभक्तांना वाटेल तीं नांवें ठेवतील. हत्ती रस्त्यांतून जाऊं लागला, कीं खरोखर शेंकडों कुत्रीं भुंकत त्याच्यामागें लागतात, इतर प्राणीही हवी तशी कोल्हेकुई करितात; पण तो त्या ओरडीकडे लक्ष देतो का ? तो आपला रस्ता शांतपणें सुधारीतच असतो. (हाथी चालत अपने गति से कुतर भुंकत वां को भुंकवा दे -कबीर). बेटा, असें समज, कीं लोक तुझ्यामागें तुझी सारखी निंदा करीत आहेत; तर तूं त्या लोकांना काय म्हणशील ?

**नरेंद्र**:—माझ्यामागें कुत्रींच भुंकताहेत, असें मी त्यांना समजेन.

**महाराज** ( हांसून ):—छे, बेटा, इतक्या मजलेपर्यंत एकदम जाऊं नको ( हंशा ). लक्षांत ठेव, ईश्वराचें वास्तव्य सर्व वस्तूंत—सजीव आणि निर्जीव—आहे. तेव्हां प्रत्येक वस्तु पूजेला पात्र आहे, आपल्याला पूज्यच आहे—मग ती मनुष्य, पशु, पक्षी, वृक्ष, पाषाण कांहीं कां असेना.

सज्जनांचा सहवास धरावयाचा आणि दुर्जनांपासून चार पावलें दूर रहावयाचें, एवढीच खबरदारी जगांत वागतांना घेण्याचें आपल्या हातांत आहे. वाघसुद्धां ईश्वरस्वरूपच आहे, हें कांही खोटें नाहीं; पण त्याचा अर्थ असा नाहीं, कीं आपण एकदम त्याच्या गळ्यांत गळा घालून त्याला हृदयांशीं कवळून धरावें ( हंशा ). (सर्प विंचू नारायण, परि वंदावे दुरून.—तुकाराम.)

यावर कोणी कदाचित् असें म्हणेल, कीं वाघ म्हणजे ईश्वराचेंच एक स्वरूप जर आहे, तर त्याला पाहून मी पळून तरी कां जावें? त्याला उत्तर असें, कीं वाघापासून दूर पळून जा, असें जे तुला सांगतात ते अन्य स्वरूपांत ईश्वरच आहेत. आह्मी त्यांच्या शब्दाला तरी मान कां देऊं नये?

एका अरण्यांत एक महात्मा राहत असे. त्याचे पुष्कळ शिष्य होते. एक दिवस त्यानें त्यांना असा उपदेश केलाः—बाबांनो, ईश्वर चराचरीं भरून राहिला आहे, जगांतील अमुक वस्तूंत तो नाहीं, असें नाहीं; हें तत्त्व लक्षांत ठेवून सृष्टींतील प्रत्येक वस्तू-

पुढें नम्रतापूर्वक व भक्तिपुरःसर आपण मान वांकवावी." पुढें एके दिवशीं त्याचा एक शिष्य अग्निहोत्राला सरपण आणण्यासाठीं बाहेर गेला असतां त्याला एकाएकीं, 'रस्त्यांतून दूर व्हा, रस्त्यांतून दूर व्हा! हा पहा हत्ती उन्मत्त होऊन बेफामपणानें सैरावैरा धांवत सुटला आहे!" अशी आरोळी ऐकूं आली. ती आरोळी ऐकून त्या शिष्याशिवाय सर्व माणसें जीव घेऊन पळालीं. त्यानेंमात्र मनांतल्या मनांत असा विचार केला, कीं हत्ती झाला तरी ईश्वरस्वरूपच आहे; तेव्हां मला पळून जाण्याचें काय कारण आहे? झालें. तो जागच्या जागींच उभा राहिला; व हत्तीला देवाप्रमाणें वंदन करून तो त्याचें स्तवन करूं लागला. हत्तीचा महात 'पळा, पळा' असें ओरडतच होता. पण तो शिष्य पाऊलभरही हालेना. अखेरीस हत्तीनें त्याला सोंडेंत धरून एका बाजूला फेंकून दिलें. त्या धक्क्यानें तो बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला. त्याचें अंग खरचटलें; व त्याला पुष्कळ लागल्यामुळें त्याच्या अंगांतून रक्तही बरेंच वाहूं लागलें.

ही हकीगत जेव्हां गुरूच्या कानावर गेली, तेव्हां तो आपल्या इतर शिष्यांसहवर्तमान त्या ठिकाणीं आला, त्यांनी त्याला घरीं नेलें व औषधोपचार केले. जेव्हां तो शुद्धीवर आला तेव्हां त्यांनीं त्याला विचारलें कीं, "बेफाम झालेला हत्ती येत आहे, असें त्या माणसाला ओरडतांना जेव्हां तूं ऐकलेंस, तेव्हां तूं पळून दूर कां गेला नाहींस?" त्या मुलानें उत्तर केलें, "गुरुजींनीं आप-

त्याला एकदां सांगितलें नाहीं का, कीं मनुष्य व इतर प्राणी यांच्या रूपांनीं परमेश्वरच नटलेला आहे? गजरूपी देव येत आहे असें मीं पाहिलें (मानिलें) आणि म्हणून तेथून पळून जाण्याचें कांहीं कारण आहे, असें मला वाटलें नाहीं." त्यावर गुरूनें सांगितलें, "बाबा हत्तीच्या रूपानें येणारा तो देवच होता, हें खरें आहे; पण माहुत-देवानें तुला बाजूला होण्याचा इषारा दिला नाहीं काय? प्रत्येक वस्तु ईश्वरस्वरूपच आहे, यांत कांहीं संशय नाहीं. पण हत्तीच्या ठिकाणीं जर त्याचा वास आहे, तर माहुताच्या ठिकाणींही त्याचें ज्यास्त नसलें तरी निदान तितकेंच अस्तित्व नाहीं काय? तेव्हां आतां मला असें सांग, कीं तूं त्याच्या सूचनेकडे लक्ष कां दिलें नाहींस?"

पाणी हें ईश्वरच आहे, असें शास्त्रांत सांगितलें आहे. पण कांहीं पाणी देव-पूजेच्या उपयोगीं पडण्यासारखें असतें, कांहीं केवळ भांडीं विसळण्याच्या किंवा धुणीं धुण्याच्या किंवा आंचवण्याच्या उपयोगाकडे लावण्यासारखें असून त्याचा पिण्याच्या किंवा पूजेच्या कामीं उपयोग करितां येत नाहीं. याच न्यायानें जगांत चांगलीं माणसें आहेत, वाईटही आहेत, ईश्वरावर भक्ति ठेवणारीं आहेत, न ठेवणारींही आहेत. त्या सर्वांच्या अंतरंगीं ईश्वराची वसति आहे, हें सत्य आहे. पण जीं वाईट आहेत व ज्यांचीं ईश्वरावर भक्ति नाहीं त्यांच्याशीं कोणीही संबंध ठेवूं नये. आपला त्यांच्याशीं निकट संबंध असतां कामा नये. फार झालें

तर कांहींशीं नुसत्या नमस्कार-चमत्कारापुरती ओळख ठेवतां येईल. पण पुष्कळांबरोबर तितकीही ठेवणें चांगलें नसतें. असल्या लोकांचा विटाळ मानणें, हेंच योग्य.

**नरेंद्रः**—दुर्जन जर आपल्याला अपकार करूं लागले, किंवा त्यांनीं जर प्रत्यक्ष अपकार आपल्याला केला, तर आपण स्वस्थ बसावें कीं काय?

**महाराजः**—जगांत राहणाऱ्या माणसानें, विशेषेंकरून गृहस्थाश्रमी माणसानें, आत्म-संरक्षणार्थ अपकाराचा प्रतिकार करण्याची धमक आपल्या अंगांत आहे, तशीच वेळ पडली तर अपकाराची फेड आपण सव्याज करूं, असा आव तरी आणलाच पाहिजे. पण त्याच वेळीं अपकाराबद्दल उलट अपकार आपल्या हातून होणार नाहीं, अशी खबरदारी आपण ठेविली पाहिजे.

विवेकानंदः-अपकाराची फेड अपकारानें करू नये.

एका शेतामध्यें काही गुराखी आपलीं गुरें चारण्याकरितां दररोज जमत असत. त्याच शेतांत एका भयंकर सर्पाची वसति होती. एक दिवस तिकडून एक महात्मा जात होता; तेव्हां सर्व गुराखी त्याच्याकडे धांवत येऊन त्याला म्हणाले, "स्वामी महाराज, या रस्त्यानें न जाल तर बरें. पलीकडे एक मोठा भयंकर सर्प आहे." त्या महात्म्यानें उत्तर केलें, "बाळांनो, तुम्ही मला हें सांगितलें, हें ठीक आहे. तुमचे उपकार आहेत. पण त्या सर्पाची

मला कांहीं भीति वाटत नाहीं. मला मंत्राचें ज्ञान आहे, त्यामुळें मला कशाचेंही भय नाहीं." असें म्हणून तो त्या रस्त्यानें पुढें गेला. ते गुराखी त्याच्याबरोबर कांहीं गेले नाहींत;—त्यांना सर्पाची धास्तीच तशी वाटत होती. त्या महात्म्याला पाहिल्याबरोबर तो सर्प फणा उभारून त्याच्या अंगावर धांवून गेला. पण त्या महात्म्यानें कांहीं मंत्र म्हटल्याबरोबर तो सर्प अगदीं गांडुळासारखा गरीब व दीन होऊन त्याच्या पायांशीं पडला. तेव्हां तो महात्मा म्हणाला, "बाबा, तूं ज्याला त्याला नेहमीं अपाय कां करीत असतोस? मी तुला एक नाममंत्र सांगतों. याचा सारखा जप कर म्हणजे ईश्वरावर तुझी भक्ति बसेल; शेवटीं तुला त्याचें दर्शन घडेल; आणि तुझ्या ठिकाणची परपीडनाची इच्छाही समूळ नष्ट होईल." असें म्हणून त्यानें त्या सर्पाच्या कानांत हळूच नाममंत्र सांगितला. नंतर गुरूच्या पायांवर मस्तक ठेवून तो सर्प म्हणाला, "गुरुजी, मी आणखी काय केलें म्हणजे मला मुक्ति प्राप्त होईल?" गुरूनें उत्तर केलें, "या हरिनामाचा जप कर; आणि कोणत्याही प्राण्याला पीडा देऊं नको. मी कांहीं दिवसांनीं पुन्हा येऊन तुझी स्थिति पाहीन." असें सांगून तो चालता झाला.

सर्पाचा त्याप्रमाणें क्रम सुरू होऊन कांहीं दिवस लोटले. हा सर्प आतां कांहीं चावत नाहीं, ही गोष्ट त्या गुराख्यांच्या लक्षांत आली. ते त्याला हवे तसे दगड मारूं लागले. पण तो गांडुळा-

सारखा गरीब व निरुपद्रवी असे. एके दिवशीं त्यांतल्या एका पोरानें त्याची शेंपटी धरून व त्याला गरगर फिरवून त्याला जमिनीवर पुष्कळ वेळ खूप जोरानें आपटलें. त्या सर्पाला रक्ताच्या गुळण्या येऊन तो बेशुद्ध झाला. जाग्यावरून त्याला हालवेनाही. तो मेला, असें त्या मुलांना वाटून ते तेथून चालते झाले.

बरीच रात्र झाल्यावर तो सर्प पुन्हा भानावर आला. हळुहळू व मोठ्या कष्टानें तो सरपटत कसा तरी आपल्या बिळांत गेला. त्याचें सर्वांग खिळखिळें झालें होतें. थोड्याच दिवसांत त्याचें अस्थिचर्ममात्र राहिलें. अशा स्थितींत पुष्कळ दिवस गेले, तेव्हां कुठे भक्ष्य मिळविण्यासाठीं कसेंबसें बाहेर पडण्याची शक्ति त्याचे अंगीं आली. गुराखी मुलांच्या धास्तीनें तो फक्त रात्रींचाच बाहेर पडे. त्या ब्राह्मणानें त्याला गुरूपदेश दिल्यापासून कोणत्याही प्राण्याला इजा करण्याचें त्यानें अगदीं सोडून दिलें होतें. झाडपाला वगैरे खाऊन तो कसाबसा आपला निर्वाह करीत असे.

थोड्याच दिवसांनीं तो महात्मा पुन्हा परत आला. त्यानें त्या सर्पाचा पुष्कळ शोध केला, पण कोठें पत्ता लागेना. अखेरीस त्या गुराखी मुलांनीं तो मरून गेला, असें सांगितलें. त्या महात्म्याला तें खरें वाटेना; कारण त्याला असें ठाऊक होतें, कीं त्याच्या तोंडीं जें परमेश्वराचें नांव बसलें होतें त्याचें सामर्थ्य एवढें दिव्य आहे, कीं जन्ममरणाचें कोडें सुटल्यावांचून त्याला मरण येणेंच शक्य नाहीं. पुढें त्यानें पुन्हा शोध सुरू केला. त्याच्या

नांवानें तो त्याला हाका मारूं लागला. तेव्हां तो सर्प बिळांतून बाहेर आला व गुरुचरणीं नम्र झाला. त्यांचें मग असें भाषण झालें:—

**महात्मा**:—काय बाबा, तुझें कसें काय चाललें आहे?

**सर्प**:—गुरुमहाराज, ईशकृपेनें ठीक आहे.

**महात्मा**:—पण तुझीं अगदीं हाडें बाहेर कशानें पडलीं? काय होतें तुला?

**सर्प**:—गुरुजी, आपण आज्ञा केल्यावरून मी कोणत्याही जिवंत प्राण्याला इजा किंवा पीडा देण्याचा प्रयत्न करीत नाहीं. मी पानेंबिनें खाऊन आपला निर्वाह करितों. तेव्हां मी पूर्वींपेक्षां रोड होणें अगदीं साहजिक आहे.

**महात्मा**:—केवळ अन्नांतरानें तुझी अशी स्थिति झाली आहे, हें मला खरें वाटत नाहीं. याला दुसरें कांहीं तरी कारण असावें. तूंच थोडा विचार कर.

**सर्प**:—हां! आतां आलें माझ्या सगळें ध्यानांत. त्या गुराखी मुलांनीं एक दिवस माझा समाचार चांगलाच घेतला. त्यांनीं माझी शेंपटी धरली आणि जोरानें मला आपटलें-पुष्कळ वेळा आपटलें. माझ्यांत केवढा बदल झालेला आहे, हें त्या बिचाऱ्यांना काय ठाऊक! कोणालाही चावण्याचें किंवा यत्किंचित्‌ही इजा देण्याचें मी सोडून दिलें आहे, हें त्यांना कसें बरें कळावें?

**महात्मा**:—हा बेट्या! मोठ्या लांछनाची गोष्ट आहे! आपल्या शत्रूंपासून आपले असे होणारे हाल चुकवून आपलें रक्षण कसें करावें, हें जर तुला कळेना, तर तुला मूर्खच म्हटलें पाहिजे. कोणत्याही जिवंत प्राण्याला **चावूं नको**, इतकेंच मी तुला सांगितलें. जे तुझ्या जिवावर उठले त्यांना आपली दहशत घालण्याकरितां तूं त्यांच्या अंगावर भयंकर फूत्कार कां नाहीं केलास?

**श्रीरामकृष्ण** पुढें म्हणाले, याच न्यायानें फणा उभारून फूत्कार करा, पण चावामात्र घेऊं नका. दुर्जनांच्या—तुमच्या शत्रूंच्या—अंगावर फूत्कार करण्यांत कांहीं वावगें नाहीं. जशास तसें वागण्याला आपली तयारी आहे—अपकाराची फेड कशी करावी, 'अरे'-ला 'कांरे' कसें म्हणावें, हें आपल्याला समजतें आहे—असें **दाखवून** ते तुमच्यापासून दोन पावलें दूर राहातील, असें करा. शत्रूच्या रक्तांत विष न ओतण्याचीमात्र खबरदारी माणसानें घेतली पाहिजे, अपकाराचा प्रतिकार प्रत्यपकारानें करूं नका. केवळ आत्मसंरक्षण करण्याकरितां अपकाराचा प्रतिकार करण्याचा डौलमात्र आणण्याला कांहीं हरकत नाहीं.

---

## बिंदु ४.

**एक शिष्य**:—महाराज, परमेश्वरानें निर्माण केलेल्या या जगांत वाईट माणसें कां असतात? या जगांत **वाईट** मुळीं असावेंच कां?

**महाराजः**—परमेश्वरी सृष्टीचें 'वैचित्र्य' हेंच सामान्य लक्षण आहे. म्हणून तींत जसें वाईट आहे, तसेंच चांगलेंही आहे.

जगांत वाईट असावे का? सर्व माणसे सारखी आहेत का?

पहा, सृष्ट वस्तूंचेही प्राणी, वनस्पति, उद्भिज्ज वगैरे अनेक भेद आहेत. पुन्हा पशूंमध्यें गरीब आणि निरुपद्रवी जसे आहेत, तसेच वाघासारखे क्रूर व अन्य प्राण्यांची हिंसा करून आपली उपजीविका करणारे आहेत. कांहीं वृक्षांना चांगलीं—अगदीं अमृताप्रमाणें मधुर—अशी फळें येतात; आणि कांहींना प्राणघातक अशीं विषारी फळें येतात. त्याचप्रमाणें माणसें चांगलींही असतात, वाईटही असतात; पुण्यवान् असतात, पापी असतात; जशीं न्यायी आणि भक्तिमान् असतात, तशींच संसारांत पूर्णपणें रममाण झालेलींही असतात.

मनुष्यांचे चार वर्ग करितां येतील:—१ **बद्ध** (जे अगदीं संसारशृंखलांनीं निगडित झालेले आहेत असे), २ **मुमुक्षु**, **३ मुक्त, ४ नित्यमुक्त.**

(१) **नित्यमुक्त**—ब्रह्मर्षि नारद वगैरे; अशा विभूतींचा **अवतार** जगाच्या कल्याणासाठींच—**सत्यमार्ग** लोकांना उपदेशण्यासाठींच असतो.

(२) **बद्ध**—द्रव्य, मान, पदव्या, इंद्रियसुख, सत्ता इत्यादि जगांतील क्षुद्र व क्षणभंगुर अशा गोष्टींनाच हे वाहिलेले असतात. ते ईश्वराला विसरतात आणि त्याचा विचारही कधीं मनांत आणीत नाहींत.

( ३ ) **मुमुक्षु**—'कामिनी आणि कांचन' या जोडीवरच ज्याची उभारणी आहे, अशा या संसारांतून सुटण्याची हे आपल्याकडून शिकस्त करीत असतात. पण जें हातीं यावें म्हणून त्यांची खटपट असते तें—मुक्ति—प्राप्त होणें त्यांपैकी थोड्यांच्याच नशिबीं येतें. ( यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः—भगवद्गीता ).

( ४ ) **मुक्त**—'कामिनी आणि कांचन' यांपैकीं कशाच्याही ठिकाणीं हे आसक्ति ठेवीत नाहींत. महात्मे हे अशांचीं उदाहरणें आहेत. त्यांच्या मनांत ऐहिक वस्तूंसंबंधानें आसक्तीचा गंधही नसतो. परमेश्वराच्या निर्मल पदांचेंच ते निरंतर ध्यान करीत असतात.

समजा, एखाद्या तळ्यांत जाळें टाकलेलें आहे. कांहीं मासे कोळ्याच्या बारशाला जेवलेले असतात आणि म्हणून ते सावध राहून कधींही त्या जाळ्यांत सांपडत नाहींत. पण असे हाताबोटांवर मोजण्यासारखेच असतात. यांचें नित्यमुक्तांशीं साम्य आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पण बहुतेक मासे जाळ्यांत सांपडतात. त्यांपैकीं कांहीं मुक्ततेकरितां आपल्याकडून होईल तितकी धडपड करितात. हे मुमुक्षु होत. पण अशांपैकीं एकाद-दुसऱ्या माशालाच जाळ्यांतून निसटून परत पाण्यांत जाण्यांत यश येतें. असे मासे पुष्कळ वेळा दृष्टीस पडतात. 'अरे! अरे! तो पहा एक मोठा मासा निसटून चालला!' असें कोळी व इतर लोक ओरडतां ओरडतांच ते चटकन एका उसळीबरोबर उडी मारून जातात.

ज्यांना जाळ्यांतून निसटतां येत नाहीं, असेच मासे फार. आणि आश्चर्याची गोष्ट ही, कीं त्यांना बाहेरच पडावेंसें वाटत नाहीं! जाळ्यांत अडकलेले असतांनाच तळ्याच्या तळच्या चिखलांत जोराची मुसंडी मारून त्या ठिकाणीं डोकें खुपसून ते स्वस्थ पडून राहतात; पुन्हा, आपण अगदीं सुरक्षित व सुखरूप आहों, आपल्याला भय बाळगण्याचें आतां कांहीं कारण नाहीं, अशी त्यांची समजूत असते. भोळे बिचारे! थोड्याच वेळानें कोळी माशांनीं भरलेलें जाळें जमिनीवर ओढणार आहे, हें त्यांच्या स्वप्नींही नसतें. अशांना बद्धांची उपमा देतां येईल. आपल्या घरदाररूपी चिखलामध्यें--प्रपंचामध्यें--आपण अगदीं निर्भय आहों, असें त्यांना (बद्धांना) वाटत असतें; पण अरेरे! संसाराच्या जाळ्यांत ते पूर्णपणें अडकून पडलेले असतात; व त्यामुळें आयुष्यरूपी पाण्याला मुकण्याची त्यांच्यावर लवकरच पाळी येऊन ते केव्हांच जमिनीवर ओढले जातात, व त्यांचा प्राणनाश होतो.

'कामिनी आणि कांचन' या दोन गोष्टी संसारांत बद्धतेला कारण होतात. संसारी माणसांचे--बद्धांचे--हातपाय जखडलेले असतात, ते नखशिखान्त संसारकर्दमांत रुतलेले असतात. तळ्याचे तळचे चिखलांत--कामिनी आणि कांचन यांत--आपल्याला शांति, स्वास्थ्य आणि निर्भयता हीं लाभतील असें त्यांना वाटत असतें. पण आत्म्याच्या पतनाला हींच (कामिनी आणि कांचन) कारण होतात, याची त्यांना कल्पनाही नसते. असा एकादा बद्ध मरणाच्या

द्वारीं जाऊन बसला, म्हणजे त्याची भार्या त्याला असें म्हणतेः— "आपण चाललां, पण माझी वाट काय? आपण माझी पाठीमागें काय तजवीज करून ठेविली आहे?" पत्नी ईश्वराचें नांवही काढीत नाहीं. त्या आसन्नमरण झालेल्या बद्धाच्या मनालासुद्धां संसाराची अशी कांहीं जबरदस्त ओढ असते कीं, आपल्या खोलीं-तल्या दिव्याचा प्रकाश मोठा झालेला पाहून लागलाच त्याच्या आंतड्याला पीळ पडतो आणि आपलेकडून जोर करून तो असा ओरडतोः—"कोणी आहे का तिथे? समईत इतक्या वाती कशाला लावल्या? उगीच नका फाजील तेल जाळूं!"

बद्धाच्या मनांत ईश्वराचा विचारही येत नाहीं. त्याला रिकामा वेळ मिळाला आणि करायला कांहींच नसलें, तर तो एक रिकाम्या बाता तरी मारीत बसेल, किंवा 'रिकामा न्हावी आणि कुडा-(ल्या) ला तुंबड्या लावी," या न्यायानें कांहीं तरी निरुपयोगी गोष्टी करीत राहील. कोणीं प्रश्नच केला तर तो असें उत्तर देतोः— "रिकामें बसणें, तें कांहीं आपल्या हातून होत नाहीं. म्हणून बसलों आहे कुंपण घालीत झालें." वेळाचें त्यास ओझें झालेलें असतें; तेव्हां सोंगट्या किंवा पत्ते यांचा आश्रय त्याला करावाच लागतो. (या वेळीं खोलींत इतकी स्तब्धता होती कीं, टांचणी पडल्याचा आवाजसुद्धां ऐकूं आला असता.)

**एक शिष्यः**—महाराज संसारी माणसाचें तारण कसें होईल? त्याला कांहीं साधन आहे का?

**श्रीरामकृष्णः**—अलबत! त्यानें सत्समागमाच्या शोधांत असावें; कुटुंबाचा उपाधि सोडून परमेश्वराचें चिंतन करण्याकरितां मधून मधून त्यानें एकांतवासाचें सेवन करावें; विवेकाचा अभ्यास त्यानें करावा; जगज्जननीची अंतःकरणपूर्वक त्यानें अशी प्रार्थना करावीः—'हे आई. माझ्या हृदयांत भक्ति व श्रद्धा उत्पन्न कर.' एकदां श्रद्धा तुमच्या अंगीं बाणली, कीं तुमचें काम झालेंच, **अहाहा! श्रद्धेहून श्रेष्ठ असें कांहीं नाहीं.**

श्रद्धेचें बल.

(केदारला) श्रद्धेच्या सामर्थ्याच्या गोष्टी तूं ऐकल्या असशील. श्रीरामचंद्र हे ईश्वरी अवतार होते. पण (लंका आणि आर्यावर्त यांमधील) समुद्रावर त्यांना सेतु बांधावा लागला. आतां हनुमान् हा केवळ त्यांचा भक्त; पण त्यांच्या नाममहिम्यावर त्याची मोठी श्रद्धा. त्यानें फक्त त्यांच्या नांवाचा जप केला, आणि काय झालें पहा! एकदम त्याला त्या समुद्राचें उल्लंघन करितां आलें! श्रद्धेचें सामर्थ्य लोकांच्या प्रत्ययास यावें एवढ्याकरितां स्वतां प्रभूला सेतु बांधावा लागला; आणि त्याच्याच नांवाच्या महिम्यावर श्रद्धा असलेल्या त्याच्या भक्ताला समुद्राच्यापलीकडे जाण्याला सेतु-बितूची कांहीं गरज लागली नाहीं. (महाराज व सर्व शिष्य हसतात).

एकदां एका माणसाला समुद्राच्या पलीकडे जावयाचें होतें. तेव्हां एका रामभक्तानें एका पानावर रामनाम लिहिलें आणि तें

त्याला देऊन सांगितलें:—“ बाबा, भिण्याचें कांहीं कारण नाहीं; श्रद्धा ठेव आणि समुद्रावरून चालत पलीकडे जा; पण लक्षांत ठेव तुझ्या श्रद्धेंत थोडीसुद्धां चलबिचल होऊं देऊं नको. तसें झालें तर मात्र तूं बुडून मरशील. ” त्या मनुष्यानें तें पान आपल्या वस्त्रांत बांधून टाकलें आणि समुद्रावरून चालत तो आपला मार्ग क्रमूं लागला. चालतां चालतां त्या पानावर असें काय लिहिलें आहे, हें पाहण्याची त्याला उत्कंठा लागली. त्यानें तें पान बाहेर काढलें आणि 'राम' अशीं त्याच्यावर लिहिलेलीं मोठीं अक्षरें त्यानें वाचलीं. मग तो आपल्याशींच म्हणाला:—“ फक्त रामाचें नांव! इतकेंच?” पण असा श्रद्धेचा लोप झाल्याबरोबर तो गेला लागलाच पाण्याच्या तळीं!

परमेश्वराचे ठिकाणी मनुष्याची अचल श्रद्धामात्र असूं द्या, कीं मी खात्रीनें सांगतों, त्यानें मुक्ति गांठलीच; मग त्याच्या हातून ब्रह्महत्या, स्त्रीहत्या वगैरे महापातकें कां घडलेलीं असतना! 'देवा, मी पुन्हा असें नाहीं बरें करणार, एवढेंमात्र त्यानें म्हणावें आणि त्याचें पवित्र नांव घ्यावें.

मग महाराज गाऊं लागले:—

## अभंग.

( पापी आणि नाममहिमा ).

**घेतां माझी वाणी पावन तें नाम। येवो मज मरण ऐसें आई १**
**पाहीन मी मग मुक्ति लवलाहीं। देशी किंवा नाहीं मज अंतीं २**

**जरी तव नाम येई मम वाचे। ब्राह्मणहत्येचें मज काय ३**
**मज काय करी स्त्री-हत्या-पातक। भ्रूणहत्या देख तेवीं मज ४**
**काय मज करी मद्याचें प्राशन। मुखीं तव नाम जरी वसे ५**
**क्षण हीं न पापें भय मज देती। काळजी अल्प ती त्यांची वाटे ६**
**विश्वाच्या उत्पत्तीसाठीं जें निर्मिलें। स्थान तें थोरलें ब्रह्मपद ७**
**तुझें नाम घेतां पावेन त्या खास। ब्रह्याच्या पदास झडकरी ८**

नंतर आपल्यापुढें बसलेल्या **नरेन्द्रासंबंधानें महाराज** बोलूं लागले:—हा मुलगा तुम्ही पहा, किती गरीब, निरभिमानी आणि साधा आहे. खोडकर मुलगा आपल्या बापापुढें आला, कीं अगदीं हवा तसा गरीब असतो; पण चांदणीमध्यें तो इकडे तिकडे धांवूं आणि खेळूं लागला, कीं तो अगदीं निराळाच बनतो. असा मुलगा नित्यमुक्तांच्या वर्गांतला असतो. (महाराजांनीं वर ज्याला 'चांदणी' म्हणून म्हटलें आहे, तो दक्षिणेश्वराच्या देवळाचा बाहेरील ओसरीसारखा एक भाग असून तो तेथील गंगेच्या घाटापर्यंत लांब बांधलेला आहे.)

नरेन्द्र आणि नित्यमुक्तांचीं लक्षणें.

ते (नित्यमुक्त) संसारबंधनांत सांपडत नाहींत. ते थोडे वयानें मोठे झाले, कीं त्यांच्या अंतःकरणांत जागृति उत्पन्न होते, आणि ते एकदम ईश्वराकडे वळतात. मनुष्यांना सन्मार्ग दाखविण्याकरितांच त्यांचा जगांत अवतार असतो. ऐहिक गोष्टींवर त्यांचें प्रेमच नसतें,--कामिनी आणि कांचन, यांकडे त्यांचें लक्षच जात नाहीं.

'होम' नांवाच्या एका पक्ष्याचा वेदामध्यें उल्लेख आहे. तो

जगाच्या गडबडीपासून–उपसर्गापासून–दूर उंच आकाशांत अगदीं ढगांच्या पलीकडे राहतो. त्या ठिकाणीं त्याची मादी अंडें घालते; तें बाहेर आल्याबरोबर खालीं पृथ्वीकडे पडूं लागतें. किती तरी दिवस तें आपलें पडतच असतें; पडतां पडतांच तें फुटून त्यांतून पिलूं बाहेर येतें. तें अंतर इतकें दूर आहे, कीं अंड्यांतून बाहेर आल्याबरोबर तें पिलूं पुन्हा खालीं येत असतें; अखेरीस खालीं येतां येतांच त्या पिलाला पंख फुटून त्याचे डोळे पण उघडतात !

असे त्याचे डोळे उघडले, म्हणजे मग त्याला दिसून येतें, कीं आपलें भयंकर वेगानें पतन होत असून पृथ्वीचा स्पर्श झाल्याबरोबर आपला कपाळमोक्ष होणार. जमिनीवर आपटून आपला चेंदामेंदा होणार, हें मनांत येऊन भयभीत झाल्यामुळें उंच ढगांच्यापलीकडे असलेल्या आपल्या आईच्या शोधार्थ तें वेगानें वर जाऊं लागतें.

ती पक्ष्याची मादी म्हणजे जगज्जननीच होय. ती इंद्रियगम्य सृष्टीच्यापलीकडे अनंताजवळच राहते. (अनंताजवळ तिचें वास्तव्य आहे–अनंत व ती यांमध्यें भिन्नपणा नाहीं). तिच्या मुलांपैकीं असे जे महात्मे–पुण्यात्मे–असतात तेच तिच्या अगदी जवळ असतात. (त्यांनामात्र तिचा वियोग मुळींच सहन होत नाहीं); त्यांचे डोळे उघडून त्यांना आपल्या पंखांनीं उडतां येईपर्यंत त्यांना या जीविताचें मोठें कोडें वाटत असतें. त्यांचे एकदां डोळे उघडले, कीं आपल्यापुढें ‘ आ ’ पसरून उभा असलेला मृत्यु–संसारांत नुसतें

आपलें पाऊल पडलें, द्रव्य, मान, इंद्रियोपभोग इत्यादि विषयांचा नुसता आपल्याला विटाळ झाला, कीं पुढें ओढवणारा नाश —त्यांना अगदीं स्पष्टपणें दिसूं लागतो. डोळे उघडतां क्षणींच ते आपला वर्तनक्रम बदलतात आणि ईश्वराभिमुख होतात; कारण, जगन्मातेवांचून या जगांत सत्य असें कांहीं नाहीं, आपली उत्पत्ति, स्थिति आणि लय हीं केवळ तिच्याच स्वाधीन असून ज्ञानाचा व आपल्या जीवनाचा मुख्य आधार तीच आहे, हें ज्ञान त्यांच्या दृष्टीला होऊं लागतें. या वेळीं **नरेंद्र** खोलींतून बाहेर गेला.

**केदार, प्राणकृष्ण,** **एम्** आणि दुसरे पुष्कळ लोक **महाराजां**जवळ खोलींतच होते. **महाराजांचें नरेंद्रा**विषयीं सस्मित भाषण चालूच होतें.

**महाराज** ( शिष्यांना ):—तुम्हीच पहा, **नरेंद्राचें** पाऊल प्रत्येक गोष्टींत सगळ्यांचेपुढें आहे. गायन, वादन, लेखन, वाचन, वाटेल तें घ्या. त्या दिवशीं **केदार**बरोबर त्याचा वाद चालला होता. पण **केदार**च्या तोंडांतून शब्द बाहेर पडतात न पडतात तोंच तो ते जणूं काय छाटून टाकीत होता. ( महाराज व इतर सर्व हसतात ).

( **एमला** ) तर्कशास्त्रावर इंग्रजींत एखादें पुस्तक आहे का?

**एम्**:—होय, महाराज, त्याला **लॉजिक** असें म्हणतात.

**महाराजः**—बरें, त्या पुस्तकासंबंधानें मला थोडी माहिती करून दे पाहूं.

**एमला** तो जिवावरचाच प्रसंग वाटला. तथापि धैर्य धरून तो म्हणालाः—लॉजिकच्या ( तर्कशास्त्राच्या ) एका भागांत सर्व-सामान्य सिद्धांतावरून विशिष्ट वर्गासंबंधानें किंवा व्यक्तीसंबंधानें सिद्धांत कसे बांधावे, हें सांगितलेलें आहे. उदाहरणार्थः—

सर्व माणसें मरणाधीन आहेत;
पंडित माणसें आहेत;
तेव्हां पंडित मरणाधीन आहेत.

त्याच्या दुसऱ्या भागांत एकेक विशिष्ट व्यक्तीच्या लक्षणांवर तर्क बांधीत जातां जातां सामान्य सिद्धांत कसे ठरवावे, हें सांगितलेलें आहे. उदाहरणार्थः—

हा कावळा काळा आहे,
तो कावळा काळा आहे,
तो आणखी तिसरा कावळा काळा आहे, वगैरे, वगैरे;
तेव्हां सर्व कावळे काळे असतात.

केवळ एकेक व्यक्तीचीं लक्षणें पाहून त्यांवरून त्या वर्गासंबंधानें वरीलप्रमाणें सामान्य सिद्धांत बांधण्यांत पुष्कळ वेळा चूक होण्याचा संभव असतो; कारण दुसऱ्या कोणत्या तरी देशांत पांढरे कावळेही कदाचित् असतील.

*　　*　　*　　*

या भाषणाकडे **श्रीरामकृष्णांचें** फारसें लक्ष होतें, असें दिसलें नाहीं. तें जणूं काय त्यांच्या कानांत शिरतच नव्हतें. यामुळें त्या विषयावरील संभाषणाचा आपोआप शेवट झाला.

नंतर सभेचें विसर्जन झालें. शिष्यमंडळी बागेंत इकडेतिकडे फिरूं लागली; **एम्** एकटाच **पंचवटी**जवळ फिरत होता. ( **राम-कृष्णांनीं** दक्षिणेश्वर येथील देवळासभोंवतालच्या बागेंत वड, पिंपळ, लिंब, आंवळी व बेल अशीं पांच प्रकारचीं झाडें एकत्र मुद्दाम लावविलीं होतीं. व त्या स्थळाला त्यांनीं '**पंचवटी**' असें नांव दिलें होतें. या स्थळीं बसूनच त्यांनीं अनेक साधनें केलीं. पुढें पुढें पुष्कळ वेळा ते एकटेच किंवा आपल्या शिष्यवर्गासह या ठिकाणीं फिरावयास येत. वृंदावनची यात्रा करून जेव्हां ते आले, तेव्हां त्यांनीं तेथील पवित्र धूळ आणून ती या पंचवटींत टाकविली होती. )

संध्याकाळचे पांच वाजले; तेव्हां **महाराजांच्या** खोलीच्या उत्तरेकडील पडवींत आल्यावर **एमला** एक विलक्षण देखावा दिसला. महाराज स्वस्थ उभे असून **नरेंद्र** एक भक्तिपर पद म्हणत होता. तो व दुसरे तीनचार शिष्य भोंवतीं उभे असून **महाराज** मध्यभागीं होते.

त्या गाण्यानें **एमचें** भान अगदीं हरपून गेलें. इतका मधुर व गोड आवाज त्यानें आजन्मांत ऐकला नव्हता. **महाराजां**कडे पाहून तर **एम्** इतका आश्चर्यभरित झाला, कीं त्याच्या तोंडांतून शब्दच उमटेना. **महाराज** निश्चल उभे असून त्यांच्या डोळ्यांचें पातेंही लवत नव्हतें. त्यांचा श्वासोच्छ्वास चालला होता किंवा नव्हता, हें सांगणेंसुद्धां कठिण होतें.

ब्रह्मानंदाचा अनुभव घडविणाऱ्या या अवस्थेला समाधि असें म्हणतात, असें एका शिष्यानें ( **एमला** ) सांगितलें. **एमनें** अशी स्थिति कधीं प्रत्यक्ष पाहिली नव्हती किंवा ऐकलीही नव्हती. त्याच्या मनांत असे विचार सुरू झाले:—'ईश्वरी विचारानें मनुष्याला बाह्यसृष्टीचा विसर पडावा, हें शक्य आहे काय? ज्याची अशी अवस्था होते—ज्याची समाधि लागते—त्याची श्रद्धा, त्याची ईश्वरभक्ति केवढी असली पाहिजे बरें!' तें पद असें होतें:—

**पद.**

( चाल:—लग्नाला जातो मी०. )

**ध्याइं ध्याइं ध्याइं मना विश्वजीवना, रे ॥ ध्याइं ॥ धृ० ॥**
**अपगतमल, अतुलकीर्ति, सच्चिद्घनरम्यमूर्ति,**
**हृदयिं ज्यासि योगि धरिति, भक्तरंजना ॥ रे ॥ १ ॥**
**प्रीतिभरें कांति खुले, कोटिचंद्र ये न तुले,**
**रूपश्री हरि चपले, रोमहर्षणा ॥ रे ॥ २**

हें शेवटचें कडवें चाललें असतां **महाराजांची** वृत्ति अगदीं तन्मय होऊन गेली. त्यांची तनु खरोखर रोमांचित झाली. त्यांचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले. परमेश्वरी मनोहारी रूप पाहून त्यांच्या अंतःकरणांत आनंदाच्या कशा उकळ्या फुटत होत्या, हें त्यांच्या मुखावर ज्या मंदस्मिताच्या लहरी विलसत होत्या, त्यांवरून स्पष्ट दिसत होतें. होय, कोटिचंद्राच्या प्रभेलाही लाजविणाऱ्या अशा मनोहर व दिव्य रूपाचें दर्शनसुख ते खचित अनुभवीत असावे! ईश्वरी साक्षात्कार तो हाच का? हाच जर तो

असेल, तर ज्या मनुष्याला तो साध्य झाला त्याची भक्ति, त्याची श्रद्धा, त्याचा अभ्यास व त्याचें तप हीं केवढीं दांडगीं असलीं पाहिजेत बरें!

गाणें पुन्हा सुरू झालें:—

**हृत्कमलीं पूजिं चरण, मधुर रूपिं लाविं नयन,**
**होउनि आनन्दपूर्ण, चुकविं यातना ॥ रे ॥ ३ ॥**

त्यांचें तें मंद व मोहक स्मित मुखावर पुन्हा झळाळूं लागलें! त्यांचें शरीर अगदीं निश्चल झालें! त्यांचे नेत्र अर्धोन्मीलित असून दृष्टि अगदीं शून्य होती! त्यांना कांहीं तरी अद्भूत व दिव्य वस्तूचें—इंद्रियातीत अशा वस्तूचें—दर्शन होत असून त्या सुखानंदांत ते पोहत असावे, असें दिसत होतें.

पद संपत आलें. नरेंद्र शेवटच्या ओळी म्हणूं लागला:—

**होइं चिदानंदकन्द-मधुलोलुप भक्तितुंद,**
**सोडुनियां विषयछंद, नित्य सज्जना ॥ रे ॥ ४ ॥**

* * * *

एम् विचारमग्न होत्साता घरीं परत जाऊं लागला; हें समाधीचें व ब्रह्मानंदाचें चित्र त्याच्या मनांत सारखें खेळत होतें. त्यानें जें भक्तिरसपूर्ण असें गोड पद ऐकलें होतें, त्याच्या उकळ्या तो रस्त्यानें चालला असतां त्याच्या अंतःकरणांतून आपोआप बाहेर फुटत होत्या:—

**होइं चिदानन्दकन्द-मधुलोलुप भक्तितुंद,**
**सोडुनियां विषयछंद, नित्य सज्जना ॥ रे ॥ ४ ॥**

---

# बिंदु ५.

दुसऱ्या दिवशीं सुटी होती तेव्हां **एम्** दर्शनाकरितां पुन्हा त्या दिवशीं तीन वाजतां आला.

**महाराज** आपल्या खोलींत बसले होते. जमिनीवर चटई पसरून दिली होती. **नरेन्द्र, भवनाथ** व दुसरे एकदोन शिष्य जवळ बसले होते. ते सर्व अगदीं तरुण—फार तर एकोणीस किंवा वीस वर्षांचे—होते. पूर्वींप्रमाणें **महाराजांचे** मुद्रेवर मंदस्मित विलसत होतें. ते पलंगडीवर बसून त्या तरुणांबरोबर संभाषण करीत होते.

इतक्यांत **एमनें** खोलींत पाय ठेवला. त्याला पाहिल्याबरोबर **महाराज** एकसारखे इतके हांसूं लागले कीं, कांहीं सांगण्याची सोय नाहीं. हंसतां हंसतांच ते मोठ्यानें म्हणाले, 'पाहा! आला पुन्हा तो!' त्यांच्याबरोबर त्या तरुणांचाही खोः खोः खोः चालला होता.

**एमनें** त्यांना साष्टांग नमस्कार घातला. इंग्रजी शिक्षण मिळालेल्या तरुणांच्या सामान्य वहिवाटीप्रमाणें यापूर्वीं नुसते दोन हात जोडून तो **महाराजांना** नमस्कार करीत असे. पण त्यांच्या पायांचें वंदन कसें करावें, हें त्याला आज कळलें. पुढें तो एका जागेवर जाऊन बसला. आपल्याला हंसूं कां लोटलें, हें नंतर **महाराज** नरेन्द्रादि शिष्यांना सांगूं लागले. ते म्हणालेः—

" एकदां असें झालें कीं, एका गृहस्थानें एक दिवस सायंकाळीं चार वाजतां एका मोराला अफूची एक लहानशी गोळी

दिली. पुढें चमत्कार असा झाला, कीं दुसऱ्या दिवशीं बरोबर चार वाजतां त्याच मोरोपंताची स्वारी पुन्हा आपल्यावर तशीच मेहेरबानी व्हावी—अफूची दुसरी गोळी आपल्या तोंडांत पुन्हा पडावी—म्हणून आपली हजर"! ( हशा ).

**एम्** मनांतले मनांत असें म्हणूं लागला:—'यांचें म्हणणें किती पण खरें आहे. यांच्यासारखा लोकोत्तर पुरुष माझ्या तर कांहीं पाहण्यांत नाहीं. मी येथून घरीं जातों खरा, पण मन आपलें पाठीमागें या दिव्य पुरुषाजवळच रहातें. रात्रंदिवस मनांत विचार एक:—'पुन्हा त्याचें दर्शन केव्हां बरें घडेल?' असें वाटतें कीं, कोणी तरी मला या ठिकाणीं खेचून आणीत आहे. या ठिकाणीं न येतां दुसऱ्या कोणत्या तरी ठिकाणीं जावें, ही कल्पना माझ्या मनांत येणेंसुद्धां अशक्य झालें आहे.'

असे विचार मनांत घोळत असतां **एम्**ची दृष्टि सारखी **महाराजां**कडे होती. त्यांची त्या तरुण शिष्यांबरोबर आपली गंमत चालली होती. त्यांनीं खसखशीच्या पिकाला अगदीं ऊतच आणला होता. असें वाटे, कीं ते तरुण गृहस्थ त्यांना जणूं काय, समवयस्क असल्यामुळें ते त्यांच्याशीं खिदळताहेत. हशाच्या गर्जनेमागून विनोदाची चमक उडत होती. हास्यविनोदाचा हा थाट पाहिला, म्हणजे असें मनांत येई, कीं ब्रह्मानंदाची यांनीं जणूं काय पेठच वसविली आहे!

ही अद्भूत व्यक्ति पाहून—महाराजांच्या या विलक्षण वर्त-

नानें—एमला अत्यंत आश्चर्य वाटलें. त्याच्या मनांत असे विचार येऊं लागले:—'जे काल समाधिसुखांत मग्न होऊन गेले होते, आणि पूर्वीं कधीं न पाहिलेला असा दिव्य भक्तीचा मासला ज्यांनीं आम्हांला काल दाखविला तेच का हे ? मी लग्न केलें, म्हणून पहिल्या दिवशीं ज्यांनीं माझी चांगली खावडपट्टी काढली ते हेच का ? "आपण अगदीं ज्ञानाला जाऊन पोहोंचलों, असें तूं समजतोस का ?" असें म्हणून माझी कानउघाडणी केली ती यांनींच का ? ईश्वर जसा साकार आहे, तसाच निराकारही आहे, असें सांगणारे ते हेच ना ? एक ईश्वरमात्र सत्य आहे, बाकी सर्व क्षणिक—आतां आहे घटकेंत नाहीं असें—आहे, असें ज्यांनीं म्हटलें तेच का हे ? दासी—मोलकरीण—ज्याप्रमाणें आपलें काम करते—ती काम करिते खरी पण तिचें खरें लक्ष कामाकडे नसून ज्याप्रमाणें निरंतर स्वगृहाकडे असतें—त्याचप्रमाणें अनासक्त बुद्धीनें—निरंतर स्वगृहाकडे—आपल्या माहेराकडे—आईच्या—जगन्मातेच्या घराकडे—सदानंदाच्या स्थानाकडे दृष्टि ठेवून—तुम्ही कर्माचरण करा, असा त्या दिवशीं ज्यांनीं उपदेश केला तेच का हे खरोखर ?'

अशी ही मौज चालली असतां **महाराज** मधून मधून **एमकडे** पाहात होते. **एम्** स्वस्थ बसला होता. जसा काय एखादा पुतळाच ! शब्द नाहीं कीं हालचाल नाहीं ! दृष्टिमात्र सारखी त्यांच्या त्या मोहक चेहऱ्याकडे !

ते रामलालला म्हणाले, " हा तरुण गृहस्थ (एम्) या मुलांपेक्षां वयानें थोडा मोठा आहे; म्हणून याच्या अंगीं कांहींसा गंभीरपणा–भारदस्तपणा–आहे. तूंच पाहा बरें, हीं मुलें हंसताहेत, खिदळताहेत, मौज करिताहेत, पण हा कसा स्वस्थ बसला आहे!"

एमचें वय सुमारें २७ वर्षांचें होतें.

त्याग

रामायणांतील प्रसिद्ध भक्त जो हनुमान् त्यावर मग महाराजांच्या बोलण्याचा ओघ वळला. ते म्हणाले, " प्रभु रामचंद्राकरितां सर्वांवर–द्रव्य, मान, शरीरसुखें वगैरेवर–पाणी सोडण्याची हनुमंताची केवढी तयारी!"

नंतर ते गाऊं लागलेः—

**पद.**

(चालः—देरे हरि संतपदांची जोड.)

**मधुर फळ मजला। कशाला॥ ध्रु०॥**
**हृदयनिहितसुरतरुफल मुक्ति सफल करी मजला॥ १॥**
**रामकल्पतरुतलवासी जो काय उणें त्याला॥ २॥**
**संसृतिसंभवफलाभिकांक्षा तिळहि नसे मजला॥ ३॥**

हनुमंताचा त्याग–संसार व त्यांतील सुखें–यासंबंधीं पद्य ते म्हणूं लागले; आणि तें म्हणतां म्हणतांच त्यांचें देहभान नाहींसें झालें. त्यांची समाधि लागली! शरीर पुन्हा निश्चल झालें! दृष्टि स्थिर झाली! आरंभींच्या त्यांच्या छाया-चित्रांत जसे ते आहेत तसेच ते बसले होते.

ते तरुण शिष्य एका क्षणापूर्वींच हांसत-खेळत होते ना! पण या वेळीं त्यांच्या ठिकाणीं केवढा गंभीरपणा आला! त्यांचे डोळे सारखे **महाराजांच्या** मुद्रेकडे लागले होते. **महाराजांच्या** वृत्तींत बोल बोल करितां असा हा अश्रुतपूर्व व विलक्षण बदल झालेला पाहून ते विस्मयमूढ बनले. **महाराजांना** समाधिस्थितींत पाहण्याचा **एम**ला हा दुसरा प्रसंग.

बराच वेळपर्यंत त्यांची समाधि उतरली नाहीं. त्यांच्या अवयवांचा ताठपणा पुढें कमी होऊं लागला, त्यांचें एकेक ज्ञानेंद्रिय आपापल्या कामावर येऊन हजर होऊं लागलें. मंदस्मिताच्या लहरी त्यांच्या मुद्रेवर खेळत असल्यामुळें तिला प्रफुल्लितपणा आला होता! त्यांच्या डोळ्यांचे कोंपरे आनंदाश्रूंनीं भरून गेले होते. मुखानें **रामनामाचा** घोष चालला होता. **एमच्या** मनांत असा प्रश्न उभा राहिलाः—'थोड्या वेळापूर्वीं या तरुणांबरोबर एखाद्या पांच वर्षांच्या पोराप्रमाणें हाच का दिव्य पुरुष खिदळत होता?'

पहिल्याप्रमाणें अगदीं पूर्णपणें भानावर आल्यानंतर **महाराज एम्** व **नरेन्द्र** यांस म्हणाले, 'तुम्हां दोघांना इंग्रजी भाषेंत बोलतांना व वादविवाद करितांना ऐकावें, अशी माझी इच्छा आहे.' हें ऐकून **एम्** व **नरेन्द्र** हे दोघेही हांसूं लागले. ते एकमेकांशीं बोलूं लागले, पण इंग्रजींत नाहीं. **महाराजांसमक्ष** कोणत्याही **प्रकारचा** वादविवाद करणें—कोणत्याही वादविदांत शिरणें—

ही गोष्ट **एमच्या** संबंधानें तर अगदीं अशक्य होती; अशा प्रकारच्या वादविवादाला लागणारें साहित्य मनाच्या ज्या कप्प्यांत सांठविलेलें असतें, तो त्याच्या मनाचा कप्पा कायमचाच बंद झाला होता, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. **महाराजांनीं** त्यांना पुन्हा आग्रह केला, पण त्यांचें भाषण इंग्रजींत कांहीं झालें नाहीं.

काही निवडक-आवडत्या-मंडळी-बरोबर.

सायंकाळचे पांच वाजले. **नरेन्द्र** व **एम्** यांशिवाय सर्व शिष्य परत घरीं जाण्याचे हेतूनें देवळांतून निघाले. **नरेन्द्र** आज वसतीला **महाराजां**जवळच राहावयाचा होता. त्याला हात, पाय, तोंड हीं धुवावयाचीं होतीं, तेव्हां तो हातीं तांब्या घेऊन झाऊ (?) नांवाचे वृक्ष व **हंसपूकर** (एक तळें, संस्कृत-हंस-पुष्कर) यांच्या बाजूला गेला. तीं झाडें व तें तळें **दक्षिणेश्वराचे** देवळाचे आवारांत उत्तरेच्या बाजूला आहेत. बागेंतील सुंदर पदपथांवरून **एम्** फिरत होता; पूर्वजन्मार्जित पुण्याईनें ज्या सिद्ध पुरुषाचें (**रामकृष्णाचें**) दर्शन त्याला घडलें होतें त्याचेच विचार त्याचे मनांत घोळत होते. कुठीला वळसा घालून तो जेव्हां **हंस-पूकरकडे** आला, तेव्हां त्या तळ्याचे कांठीं **श्रीरामकृष्णांना नरेंद्राबरोबर** बोलतांना पाहून त्याला आश्चर्य वाटलें. (कुठी=कोठी; हें देवळाचे आवारांत एक दुमजली घर आहे. हें **दक्षिणेश्वराचे** देऊळ **राणी राशमणी** नांवाच्या एका

श्रीमान् बंगाली स्त्रीनें सन १८५५ सालीं बांधलें. जेव्हां जेव्हां ही पुण्यशील स्त्री किंवा तिचा जांवई यांपैकी कोणी दक्षिणेश्वर येथें राहण्यास येई तेव्हां तीं याच घरांत उतरत. जोंपर्यंत **राणी राशमणी** हयात होती, तोंपर्यंत **श्रीरामकृष्ण** याच घरांतील तळमजल्यावरील एका खोलींत राहात असत. या खोलींतून **गंगा**नदीचा देखावा फारच रमणीय दिसतो. ) ते दोघेही तळ्याचे घाटावर उभे होते. हात-पाय धुणें आटपून व हातांत तांब्या घेऊन **नरेन्द्र** बोलत होता.

**महाराज** स्मितपूर्वक म्हणाले, " हें पाहा, तूं नवीनच येथें येऊं लागला आहेस. कधीं यायचें, कधीं नाहीं, असें करूं नको. प्रणय-योगाचा अभ्यास चालू असतां प्रणयी जन एकमेकांना फारच वारंवार भेटतात. असें नाहीं का ? " ( **नरेन्द्र** आणि **एम्** हांसतात. )

**महाराज** पुन्हा सस्मित वदनानें म्हणाले, " तेव्हां काय, तूं येथें नेहमीं नेहमीं यावें. तुझें काय म्हणणें आहे ? "

**नरेन्द्रा**नें हांसून उत्तर केलें, " होय महाराज, मी येण्याचा प्रयत्न करीन. "

**महाराज** मागें वळून दक्षिणच्या बाजूला आपल्या खोलीकडे जाऊं लागले. **नरेन्द्र** व **एम्** त्यांच्या दोहों बाजूंना चालत होते. कुठीजवळ आल्यानंतर ते **एम**ला म्हणाले, " शेतकरी नांगराचे बैल विकत घेतांना ते कसे पारखून घेतात, हें तुला ठाऊक आहे का ?

वा ! असल्या कामांत ते मोठेच वाकबगार असतात; बैल चांगला आहे कीं वाईट आहे, हें त्यांना फार चांगलें समजतें. कोणत्याही बैलाचे अंगांत पाणी आहे कीं नाहीं, हें ते तत्काल ओळखतात. ते शेपटीला नुसता हात लावतात, आणि त्याचा परिणाम काय पण विलक्षण होतो ! ज्याच्यांत कांहींच पाणी नसतें, जे शिळपट असतात, ते कांहीं गडबड न करतां उलटे जमिनीवर लोळण घेतात; त्यांना कोणी कांहीं केलें, कसेंही वागविलें, तरी त्यांत आपला त्यांना आनंदच. उलट पक्षीं ज्यांच्या अंगांत खरें पाणी असतें, ते विनाकारण आपल्या आंगाशीं लगट केल्याबद्दल टुणकन उडी मारून तंगड्या झाडतात. शेतकरी या दुसऱ्या प्रकारचे बैल पसंत करितात. **नरेन्द्र** हा अशा जातीचा बैल आहे. त्याच्यांत खरें पाणी आहे. ”

**महाराज** हास्यपूर्वक आणखी म्हणाले, “ पुष्कळ माणसें अशीं असतात, कीं त्यांना कांहींच नाहीं. दुधांत भिजविलेल्या चुरमुऱ्यांसारखीं त्यांची स्थिति असते. शेणासारखीं नरम ! आंतील जोराच्या नावानें आंवळ्याएवढें ! दीर्घ प्रयत्न करण्याचें सामर्थ्य शून्य ! झालें, मनाला खंबीरपणा नाहीं ! ”

संध्याकाळ झाला. **महाराज** आपल्या खोलींत भगवंताचें ध्यान करीत बसले.

ते **एमला** म्हणाले, “ **नरेन्द्र** कुठे तरी बागेंत हिंडत आहे

त्याला पाहा; त्याच्याबरोबर संभाषण कर; आणि तो कसा काय मुलगा आहे, हें मला सांग. ”

संध्याकाळ झाल्यामुळें पुजारी देवीची सायंपूजा, धूप, दीप, आरती, वगैरे करूं लागले. **चांदणी**च्या पश्चिमेस नदीच्या घाटावर **एम्** व **नरेन्द्र** या दोघांची पुन्हा गांठ पडली. या परस्परांच्या भेटीनें परस्परांना फार आनंद झाला; व तसें त्यांनीं एकमेकांना बोलूनही दाखविलें. **नरेन्द्र** म्हणाला, ‘मी **साधारण ब्रह्मसमाजाचा** अनुयायी असून मी अद्याप कॉलेजांत शिकत आहें.’ वगैरे वगैरे.

उशीर होत चालल्यामुळें पुढें **एमनें** त्याचा निरोप घेतला; तथापि त्याचा पाय कांहीं तेथून निघेना. **नरेन्द्रा**ला सोडून तो **श्रीरामकृष्णां**चा शोध करूं लागला. त्यांनीं म्हटलेल्या पद्यांनीं त्याला अगदीं चटका लावून सोडला होता आणि त्यांच्या तोंडून आणखी गाणीं ऐकावीं, अशी त्याला उत्कंठा लागली होती. ते आपल्या खोलींत नाहींत, असें पाहून नट-मंदिराकडे जाण्याकरितां त्यानें आपलें तोंड फिरविलें. नट-मंदिर हें कालीमातेच्या देवळाच्या अगदीं समोर म्हणजे बरोबर दक्षिण दिशेला असून काली-पूजेच्या महोत्सवप्रसंगीं व इतर कांहीं विशेष प्रसंगीं या मंदिरांत ळळितें वगैरे होतात.

माझ्यासंबधाने तुला काय वाटते?

**महाराज** मंदिरांत एकटेच इकडून तिकडे फिरत होते. तेथें एका मंद जळणाऱ्या समईचा अंधुक उजेड पडला होता. देवळांत

जगन्मातेची मूर्ति असून तिच्या दोन्ही बाजूंला चकचकीत दिवे जळत होते. नट-मंदिरांत वर सांगितल्याप्रमाणें मंद दिवा जळत असल्यामुळें ईश-चिंतनाला अत्यंत अनुकूल असें प्रकाश व अंधकार यांचें कोमल मिश्रण त्या ठिकाणीं आपोआप तयार झालें होतें.

**श्रीरामकृष्णांना** काली-मातेच्या पवित्र नामाचें खडया सुरांत कीर्तन करितांना जेव्हां **एमनें** ऐकलें, तेव्हां तो आनंदानें केवळ वेडा झाला. जादूनें भारल्यासारखी—एखाद्यानें मोहनीमंत्रानें वश करून घेतल्यासारखी—त्याची अवस्था झाली.

कांहीं वेळानें तो **महाराजां**जवळ गेला आणि अत्यंत नम्रपणें व भीतभीत त्यांना म्हणाला, " महाराज, आज रात्रीं आणखी कांहीं पदें म्हणायचीं आहेत का ? "

**महाराजांनीं** क्षणमात्र विचार करून उत्तर केलें " छे, आतां आज कांहीं पदें म्हणावयाचीं नाहींत. पण हें पहा, मी थोडे दिवसांत कलकत्त्याला **बलराम**च्या घरीं येणार आहें. तेथें तूं ये, म्हणजे तुला ( माझीं ) पदें ऐकायला मिळतील. "

**एम्ः**—जशी **महाराजांची** इच्छा.

**महाराजः**—तुला तें घर ठाऊक आहे का ? **बलराम बसू** तुला ठाऊक आहे का ?

**एम्ः**—नाहीं **महाराज**, मला माहीत नाहीं.

**महाराजः**—अरे **बलराम बसू ! बसू**पाऱ्यांतला ?

**एम्ः**—ठीक आहे, **महाराज**; करीन मी तिथे चौकशी.

( **श्रीरामकृष्ण एम**सह मंदिरांत इकडून तिकडे येरझारा घालूं लागले. )

**महाराजः**—माझ्या मनांत तुला एक प्रश्न विचारावयाचा आहे. **माझ्यासंबंधानें तुला काय वाटतें** ?

**एम्** विचारांत मग्न होत्साता स्तब्ध राहिला.

**महाराजः**—माझ्यासंबंधानें तुला काय वाटतें ? मी असें विचारतों, खऱ्या ज्ञानापैकीं कितीसें. किती आणे ज्ञान माझ्या ठिकाणीं उतरलें आहे ?

**एम्ः**—' आणे ज्ञान ' म्हणजे काय, याचा मला कांहीं बोध होत नाही. पण मला एवढेंच म्हणतां येतें, कीं **असलें दिव्य ज्ञान, भक्ति, श्रद्धा, वैराग्य, ईश्वरैकतानता, विश्वबंधुत्व, इत्यादि सोज्ज्वळ गुण एकाच व्यक्तीमध्यें एकवटलेले पाहण्याचा सुयोग आजपर्यंत माझ्या नशिबीं नव्हता.** छे, **असा सुयोग मला कधीं, कुठेच आला नाहीं.**

**महाराज** नुसते हांसले.

**एम् महाराजांचे** चरणीं मस्तक ठेवून व त्यांचा निरोप घेऊन निघाला. उत्तरेकडच्या फाटकापर्यंत तो गेला, पण कांही तरी आठवण झाल्यामुळें पुन्हा परत फिरला. तो **महाराजांकडे** पुन्हा आला. ते मंदिरांत पूर्वींप्रमाणें एकटेच फिरत होते.

हो, त्या अर्धवट काळोखांत, त्या अंधुक प्रकाशांत ते येरझारा घालीत होते. एकटे—केवळ एकटे; दुसरें कोणीही नव्हतें ! मृग-राज—केसरी—निबिड अरण्याचे मध्यभार्गी असाच एकटा फिरत असतो. त्या भयंकर एकांतवासांत स्वतःशिवाय त्याला कोणा-च्याही सोबतीचा आधार नसतो. पण त्या आत्मसहवासांतच त्याला खरा आनंद होत असतो ! खरोखर त्या **नरसिंहाला** या जगदरण्यामध्यें एकटा—केवळ आत्मारामाच्या सहवासांत—फिर-ण्यांतच आनंद वाटत होता !

**एम्** **महाराजां**कडे विस्मयानें पाहातच उभा राहिला. त्याच्या तोंडांतून शब्दही फुटेना ! त्याच्या मनांतमात्र असा विचार आलाः—"ऐहिक सुखें वमनवत् मानून **अनंताशीं** हितगुज करीत बसणें—अनंताशीं तादात्म्यवृत्तीनें राहणें—ही मनुष्य-जन्माची खरी इतिकर्तव्यता ! आणि त्या इतिकर्तव्यतेची ही पाहा प्रत्यक्ष सिद्धि !"

**महाराजः**—अरे तूं परत कसा आलास ?

**एम्ः**—**महाराज**, तुम्हीं मला जेथें यायला सांगितलें, तें कोणा तरी श्रीमंताचें घर असावें, अशी मला शंका आली. तिथे कदाचित् चौक्यापाहारे असतील ! मला कोण तिथे येऊं देणार ? मला वाटतें आपण जाऊं नये, हेंच चांगलें. मी आपला **महारा-जांचे** दर्शनाला इथेच नेहमीं येत जाईन, म्हणजे बरें.

**महाराजः**—कां बरें, बाबा ? तूं माझें नांव सांग. सांग, कीं

मला भेटण्याची तुझी इच्छा आहे. असें सांगितल्यावर कोणी ना कोणी तरी तुला माझ्याकडे खचित घेऊन येईल.

**एम्:**— जशी महाराजांची इच्छा!

असें म्हणून व पुन्हा वंदन करून एम् निघून गेला.

---

## बिंदू ६.

### श्रीरामकृष्ण पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या भेटीस जातात.

मंडळी:—विद्यासागर, भवनाथ, एम्, हज्रा व इतर बरेच लोक.

पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांना एकदा भेटावें, असें महाराजांचे मनांत फार होतें. त्याप्रमाणें एके दिवशीं सायंकाळीं स्वारी आपली गाडींत बसून आपल्या शिष्यगणासह पंडितजींच्या घरीं जाण्याकरितां मुद्दाम निघाली. कलकत्त्याचा बादरबागन म्हणून एक भाग आहे; त्या भागांत पंडितजींचें घर होतें; व तें ठिकाण दक्षिणेश्वराहून सहा मैल दूर होतें.

तो शनिवारचा दिवस असून त्या दिवशी श्रावण कृष्ण सप्तमी होती; व इंग्रजी तारीख ५ आगष्ट सन १८८२ होती. निघाले तेव्हां सायंकाळचे सुमारें पांच वाजले होते.

अखेर पंडितजींच्या घरापुढें गाडी येऊन थडकली. महाराज एमचा हात धरून खालीं उतरले. दिवाणखान्याच्या—येथेंच

**पंडितजीं**चा पुस्तकसंग्रहही होता—जिन्याकडे वळण्यापूर्वीं कांहींसे सचिंतपणें **महाराज एम**ला म्हणाले, "काय रे, तुला काय वाटतें ? मला आपल्या कोटाचीं बटणें का लावलीं पाहिजेत?"

**एम**नें उत्तर केलें, " त्याचें नको **महाराज**, आपल्याला कांहीं वाटायला. तशा गोष्टी आपल्याला नाहींत लागू."

एखाद्या लहान मुलाप्रमाणें चटकन **महाराजां**ची समजूत पटलीसें दिसलें. कारण ती गोष्ट मग त्यांनीं सोडूनच दिली. हें ऐकण्याचे कामीं एखाद्या पांच वर्षांचे पोराप्रमाणें त्यांची स्थिति दिसली!

या मंडळीला नंतर जिन्याला लागून असलेल्या खोलींत नेण्यांत आलें; खोलीचा दरवाजा दक्षिणाभिमुख होता. या खोलींत **पंडित**जी दक्षिणेकडे तोंड करून खुर्चीवर बसले होते. नेहमींप्रमाणें इंग्रजी रिवाजानुसार त्यांच्यापुढें टेबल असून त्यावर कागद. पुस्तकें वगैरे पडलेलीं होती.

**एम**नें **महाराज** आल्याचें सांगितलें व **पंडितजीं**शीं त्यांची ओळख करून दिली; व **पंडितजीं**नींही उठून त्यांचें स्वागत केलें. एक हात टेबलावर ठेवून व पश्चिमेकडे तोंड करून **महाराज** उभे राहिले. मुकाटपणीं **पंडितजीं**कडे ते पाहात होते; त्यांच्या त्या गोड, एखाद्या बालाप्रमाणें साध्या व तेजस्वी मुद्रेवर स्मिताच्या नाजूक लहरींनीं अगदीं गर्दी करून सोडली होती.

तेथें कांहीं मंडळी होती; **पंडितजीं**च्या अनेक शाळांपैकीं

एका शाळेंतील एक विद्यार्थी आपल्याला नादारी मिळावी म्हणून विनंती करण्याकरितां आला होता, तोही त्या मंडळींत होता.

महाराजांची समाधि लागते.

वर सांगितल्याप्रमाणें उभे राहून **पंडितजीं**कडे पाहत असतां असतांच नेहमींप्रमाणें **महाराजांचें** देहभान नाहींसें झालें. त्यांची समाधि लागली. थोड्या वेळानें खालीं बसून ते आपल्या नेहमींच्या संवयीप्रमाणें म्हणाले, “ मला प्यायला थोडें पाणी हवें. ” त्यावर **पंडितजींनीं एम**ला विचारलें, “ बरद्वानहून आतांच मिठाई आली आहे, त्यांतली थोडी **महाराज** ग्रहण करतील का ? ” ‘ करतील ’ असें कळल्यावर **पंडितजी** आंतल्या खोलींत गेले आणि पाणी व मिठाई घेऊन लागलेच परत आले. त्यांनीं तीं **महाराजांपुढें** ठेविलीं. शिष्यमंडळानेंही त्यांचा थोडा स्वीकार केला.

तेथल्या एका शिष्याला जेव्हां ते मिठाई देऊं लागले, तेव्हां **पंडितजी** म्हणाले, “ अं ! तें घरचेंच मूल आहे. त्याला नको आपण द्यायला.” त्यावर **महाराज** म्हणाले, “ हां ! हा चांगला मुलगा आहे. **फल्गू** नदीसारखी याची अवस्था आहे. तिचें पात्र बाह्यात्कारीं कोरडें ठणठणीत असतें; पण तिच्या अधोभागीं जोराचा अदृश्य प्रवाह सुरूच असतो. याचें अंतरंग सत्त्वानें ओथंबलेलें आहे—याच्यांत अंतस्सार आहे. ”

**महाराज** ( विद्यासागरांना ):—आज अखेरीस सुदैवानें मला एकदांचें सागराचें दर्शन झालें. आजपर्यंत मीं पुष्कळ डबकीं, कालवे, नाले, ओढे किंबहुना नद्याही पाहिल्या. (हशा). ( **विद्यासागर** या शब्दाच्या मूळ अर्थावर ही **महाराजांनीं** कोटी केली, हें चतुर वाचकांच्या लक्षांत येईलच).

विद्या.

**विद्यासागर**:—तर मग महाराज, आपल्या त्या सागरांतून कांहीं खारें पाणी खुशाल आपण घरीं घेऊन जावें. ( हशा ).

**महाराज**:—नाहीं बरें, **पंडितजी**. आपण खारा समुद्र खचित नाहीं. आपण अविद्यासागर नाहीं; आपण क्षीरसागर आहां, विद्यासागर आहां. ( हशा ).

**विद्यासागर**:—आपण पाहिजे तर म्हणा तसें. (हशा ).

**महाराज**:—आपला स्वभाव सत्त्वगुणप्रधान आहे, व सत्त्वगुण खऱ्या ज्ञानाकडे नेऊन पोहोंचविणारा आहे. मात्र आपल्या ठिकाणच्या सत्त्वगुणाचें स्वरूप असें आहे, कीं तो आपल्याला स्वस्थ बसूं देत नाहीं, नेहमीं उद्योगांत ठेवतो; व त्याच्याच योगानें आपण सत्कृत्यांना वाहिलेले आहां. दातृत्व, दया या गुणांचें आचरण निष्काम बुद्धीनें घडलें, तर ते चांगले आहेत. अशा मनानें त्यांचें आचरण झालें, आणि त्याला भक्तीची पुष्टि मिळाली, तर मग ईश्वरप्राप्तीला आणखी काय पाहिजे? ( दया, क्षमा, शांती। तेथें देवाची वसती— तुकाराम ).

निष्काम कर्म.

आणखी मी असें म्हणतों, कीं आपल्याला सिद्ध पुरुषच म्हटलें पाहिजे; कारण आपल्या दयाशीलत्वानें आपलें अंतःकरण अगदीं मृदु व कोमल नाहीं बरें बनलें? लक्षांत आणा, बटाटे व दुसऱ्या शाकभाज्या या सिद्ध होतपर्यंत मृदु होत नसतात. (हशा). (सिद्ध शब्दाचे अर्थ दोनः—१ पूर्णत्वास गेलेला मनुष्य; व २ पक्व, चांगला शिजलेला. या दोन अर्थांवरून महाराजांची कोटी).

सिद्ध.

**विद्यासागरः**—पण कलैची (?) डाळ सिद्ध झाल्यावर घांटली म्हणजे कठिण बनते, मुळींच मृदु राहात नाहीं. नाहीं का असें? (हशा).

**महाराजः** (हांसून):—पण **पंडितजी** आपली तशी स्थिति नाहीं. माझ्या म्हणण्याचा हेतु असा, कीं आपण नुसते पांडित नाहीं —कोरडे ठणठणीत आणि फुसके. आपल्या पंचांगांत अमुक अमुक दिवशीं इतकी इतकी पर्जन्यवृष्टि होईल असें सांगितलेलें असतें. पण पंचांग पिळलें तर त्यांतून एक थेंब तरी आपल्याला लाभेल का? आपल्यांतलीं पंडित म्हणविणारीं माणसें बोलतात गोष्टी मोठमोठ्या. ब्रह्म, माया, मीमांसा, ज्ञानयोग, तत्त्वज्ञान, आध्यात्मिक शास्त्र, वगैरे विषयांवर वाक्पांडित्य करितांना ते प्रत्यक्ष बृहस्पतीलाही लाजवितील. पण स्वानुभवपूर्वक बोलणारे थोडेच. बहुतेकांचें ज्ञान शब्दांतच गुरफटलेलें असतें. त्यांपैकी ज्ञानसंस्कृत अगदींच थोडे.

केवळ पुस्तकी ज्ञानाविषयीं महाराजाचे मत.

जिच्या योगानें आपल्याला ईश्वराची ओळख होते ती **पराविद्या.** बाकी सर्व–शास्त्रें, मीमांसा, तर्क, न्याय, व्याकरण, वगैरे वगैरे–केवळ बुद्धीलामात्र भार ! त्यांच्या योगानें बुद्धीचा गोंधळ होऊन ती बावरून जाते. तीं सर्व जर पराविद्येच्या प्राप्तीला साहाय्यभूत होतील तर त्यांचा उपयोग.

एका अर्थीं पाहिलें, तर सर्व भगवद्गीतेचें पारायण करून कांहीं उपयोग नाहीं. "गीता," "गीता," असें नुसतें दहा वेळा म्हणा, म्हणजे झालें. दहा वेळा म्हटलें, कीं "त्यागी," "त्यागी," असें येऊं लागतें. बरें, त्यागी म्हणजे परमेश्वराकरितां ज्यानें संसारावर–संपत्ति, मान, सकाम कर्मे, इंद्रियसुखें इत्यादीवर–पाणी सोडलें आहे, असा पुरुष.

भगवद्गीतेचे सार.

सारांश काय ? तर गीता "त्याग कर" असें सांगते. खरा संन्यासी जसें डोक्याचें तसेंच मनाचेंही मुंडण करितो–तो जसा बाह्यतः संसाराचा त्याग करतो तसा मनानेंही करितो. तो जशीं सर्व सांसारिक कर्मे टाकतो, तसाच प्रत्येक कर्मफलाचाही त्याग करितो.

खरा गृहस्थ संसाराचा त्याग मनानेंमात्र करितो; म्हणजे ईश्वर-भक्तीसाठीं सर्व कर्मांचीं फळें सोडून देण्याला तो तयार असतो.

तेव्हां गीतेचें सार हें:—**बा मानवा, ईश्वराच्या ठिकाणींमात्र तुझी भक्ति असूं दे–ईश्वरप्रीत्यर्थ सर्वस्वाचा त्याग कर.**

एका माणसाजवळ एक हस्तलिखित पोथी होती. ती कसली पोथी आहे, असा कोणींसा त्याला प्रश्न केला. नंतर त्यानें ती उघडून त्याचे पुढें धरली. तेव्हां प्रत्येक पानावर केवळ ईश्वराचें नांव, 'ॐ राम' एवढेच शब्द लिहिलेले आहेत, हें पाहून त्याला किती तरी आश्चर्य वाटलें.

**चैतन्य देव** दक्षिणभागीं यात्रेनिमित्त फिरत असतां कोणी एक भगवद्भक्त त्यांना भेटला; एक पंडित भगवद्गीता वाचीत असतां या भक्ताच्या डोळ्यांतून सारखा अश्रूंचा पूर चालला होता. बरें, या भक्ताला विद्येचा गंधही नव्हता. गीतेचें एक अक्षरही त्याला समजत नव्हतें. तुझ्या डोळ्यांतून अश्रू कां चालले आहेत, असा त्याला प्रश्न करितां त्यानें उत्तर केलें, 'मला गीतेचा शब्दही समजत नाहीं, हें खरें आहे. पण तिचें वाचन चालू असतां कुरुक्षेत्राच्या रणांगणावर **अर्जुनाच्या**पुढें **श्रीकृष्ण परमात्म्याची** मनोहर मूर्ति बसलेली आहे व तो त्याला गीतेचा उपदेश करीत आहे, अशा देखाव्याचें आपलें प्रत्यक्ष चित्र माझ्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. व तें चित्र पाहून माझे डोळे भक्ति व आनंद यांच्या अश्रूंनीं भरून आले.'

हा मनुष्य अक्षरशत्रु असूनही पराविद्येला पोहोंचला होता; कारण त्याच्या अंगीं ईश्वरासंबंधानें शुद्ध भक्ति असून त्याची मूर्ति त्याच्या हृदयांत ठसली होती.

## ज्ञानयोग, वेदान्त किंवा अद्वैतमीमांसा यांचें निरूपण.

*वेदान्तांतील शुद्ध, बुद्ध, नित्य असें ब्रह्म.*

**महाराजः**—बरें, विद्येसंबंधानें मी बोलत होतों, नाहीं का? पण ब्रह्म हें विद्या व अविद्या या दोहोंच्याही पलीकडे आहे. ब्रह्मगिरीवर जाण्याकरितां जी सोपानपरंपरा आहे तिची विद्या ही अगदीं वरची—अखेरची—पायरी होय. ब्रह्म हें शिखर. माया—हें सर्व भासमान होणारें जगत्—म्हणजे विद्या व अविद्या यांचें मिश्रण होय. अर्थात् तें मायेहून पर—मायेच्यापलीकडे—आहे.

*ब्रह्म अगदीं अलिप्त आहे; पापपुण्याचा—सुखदुःखाचा—उलगडा.*

ब्रह्म हें पाप व पुण्य—सुख व दुःख—यांनीं अलिप्त आहे;—यांचा केवळ साक्षी आहे. तें दीपासारखें आहे. दीपाच्या प्रकाशांत आपल्याला श्रीमद्भागवतासारखे पवित्र ग्रंथ वाचतां येतात. त्याचप्रमाणें त्याच दीपाच्या प्रकाशांत दुष्ट हेतूनें आपल्याला खोटे दस्ताऐवजही तयार करितां येतात. किंवा ब्रह्म हें सर्पासारखें आहे. सर्पाच्या दांतांत विष भरलेलें असतें. त्या विषाची उपाधि त्याला होत नाहीं. त्या विषाची बाधा त्याला होत नाहीं;-त्यापासून त्याला मृत्यु येत नाहीं. तें खरें विष असून स्वतां सर्पासंबंधानें निर्विषच असतें. ज्याला तो दंश करील त्या प्राण्यासंबंधानेंमात्र पाहिलें, तर तें विष असतें.

संसारांतील कोणतीही विपत्ति, कोणतेंही पाप, कोणतेंही दुःख घ्या ना; ती विपत्ति, तें पाप, तें दुःख फक्त आपल्यासंबंधानेंमात्र

खरें असतें.--परमेश्वराला, ब्रह्माला त्याचा लेपही नसतो. ब्रह्म त्याहून पर--त्याच्या पलीकडे--आहे. स्वतांच्या दांताच्या ठिकाणीं असलेलें विष जसें सर्पासंबंधानें पाहिलें तर विष नव्हे, तसेंच संसारांतील दुःख हें शुद्ध अशा ब्रह्मासंबंधानें पाहिलें, तर दुःखच नव्हे. ब्रह्म हें पापपुण्यातीत--सुखदुःखातीत--आहे.

होय, ब्रह्म हें सर्वांशीं अलिप्त आहे. त्या ब्रह्माची परीक्षा मानवी सुखदुःखांच्या कसोटीवर करावयाची नाहीं;--मानवी सुख-दुःखांच्या चष्म्यांतून आपल्याला ब्रह्माकडे पाहतां उपयोगी नाही. त्याचा सूर्य सुखदुःखांवर सारखाच प्रकाशत असतो.

ब्रह्म अव्यपदेश्य किंवा अनिर्वचनीय आहे.

उच्छिष्टान्न जसें भ्रष्ट होय तसेंच सर्व कांहीं--फार कशाला, अपौरुष असे वेद, पुराणें, तंत्रें व सर्व धर्मग्रंथ हीं, त्यांना मानवी मुखाचा स्पर्श घडल्या कारणानें--मानवी वाणींतून त्यांचा उच्चार झाल्यामुळें--जणूं काय भ्रष्टच झालीं आहेत. या नियमाला अपवादात्मक अशी केवळ एकच वस्तु आहे. ती अपवादात्मक वस्तु म्हणजे ब्रह्म होय. कारण जेव्हां आपण वेद किंवा इतर धर्मग्रंथ वाचतों, तेव्हां वागिंद्रियाचा उपयोग आपल्याला करावा लागतो; आणि अशा रीतीनें त्यांना (धर्मग्रंथांना) आपण आपल्या मुखाचा स्पर्श घडवितों, यांत कांहीं शंका नाहीं. यामुळें उच्छिष्टान्नाप्रमाणें तीं सर्व भ्रष्ट झालेलीं आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु आजपर्यंत सृष्टींत कोणत्याही प्राण्याला

ब्रह्माचें यथार्थ वर्णन कांहीं करितां आलेलें नाहीं, तें अनिर्वचनीय, अचिंतनीय, अकल्पनीय असें आहे !

**विद्यासागर**:—मला असें कबूल केलें पाहिजे, कीं खरोखर अगदीं नवीन अशी कांहीं तरी एक गोष्ट आज मला कळली. आजपर्यंत मुखानें जी भ्रष्ट झालेली नाहीं अशी ब्रह्म ही एकच वस्तु आहे !

**महाराज**:—हो, असें खरें. तें कशानेंही—कालदेशनिमित्तादींनीं—मर्यादित झालेलें नाहीं. मग कोणालाही त्याचें शब्दानें —मुखानें—यथार्थ वर्णन कसें बरें करितां येणार?

बरें, ब्रह्म हें अगाध सागरासारखें आहे. तें निरुपाधिक, षड्‌विकारातीत व मर्यादातीत असल्यामुळें त्याचें कोणतेंही लक्षण सांगतां येत नाहीं ! प्रत्यक्ष वेदांनासुद्धां त्याचें वर्णन करितांना हात टेंकावे लागले आहेत; त्याचें वर्णन करितां करितां शेवटीं थकून जाऊन तें म्हणजे 'केवल आनंद' असें म्हणून शेवटीं त्यांना ( वेदांना ) मूकव्रत धरावें लागलें !

तुम्हांला जर महासागराचें यथार्थ वर्णन करण्यास सांगितलें, तर तुमची अगदीं फेंफें उडेल ! कदाचित् तुमच्या मुखांतून अडखळत अडखळत एवढेच उद्गार बाहेर पडतील, "अबबब ! काय विस्तार हा ! लाटा तरी किती ! कोण सारखी गर्जना चालली आहे ही !" झालें.

**शुकदेवादि** महान् महान् ऋषींना भगीरथ प्रयत्नान्तीं जें कांहीं साधतां आलें, तें इतकेंच कीं, या **शाश्वत सागराचें** त्यांना दर्शन घडून त्याच्या पाण्याचा स्पर्शानुभव व थोडासा आस्वादमात्र त्यांना घेतां आला ! त्यांनीं जर त्या **सागरांत** पाय टाकला असता, तर त्यांतच कायमचे निमग्न होऊन ते पुन्हा या जगांत दिसलेही नसते !

त्या परम गुह्याचा—ब्रह्माचा ठाव मर्यादित ज्ञानाला लागणार नाहीं. मुंग्या आणि साखरेचा पर्वत—एक दृष्टांत.

एकदां कांहीं मुंग्या एका साखरेच्या पर्वतावर आल्या. तो पर्वत फारच अवाढव्य आहे, ही कांहीं खरोखर त्यांना कल्पना नव्हती. साखरेचे कांहीं कण खाल्ल्याबरोबर त्यांचीं पोटें अगदीं भरून गेलीं. एकेक कण तोंडांत घेऊन नंतर त्या चालत्या झाल्या. जातां जातां त्यांच्या मनांत असें आलें, कीं, पुढल्या खेपेला सर्व पर्वतच्या पर्वत आपल्याला आपल्या वारुळांत घेऊन जातां येईल !

अरेरे ! मनुष्याची अवस्था हीच ! त्याला असाच भ्रम पडतो! खरें पाहूं जातां ब्रह्म-साक्षात्कार होणें—अपरोक्षानुभव येणें—हें फार थोड्यांच्या वांट्यास येतें. पण दुर्दैवानें पुष्कळांची समजूत-मात्र अशी ठाम झालेली असते, कीं ब्रह्माचा अस्सल गड्डा आपल्या हातीं लागला आहे, ब्रह्मसाक्षात्कार आपल्याला झाला आहे, ब्रह्मानंदाची अनुपम माधुरी आपण चाखली आहे.

आपण बहुतेक साखरेचा सर्व पर्वत आणून आपल्या घरांत भरला आहे, अशी मुंगीची समजूत असते; कारण तिचें पोट भरून तिचें समाधान झालेलें नसतें का? आमच्या आपल्याच तर्कटाच्या जाळ्यांत गुरफटलेल्या तार्किकांची अवस्था हीच! आपल्या छटाकभर ज्ञानानें ते ढेंकर देत असतात, आपल्या तुटपुंज्या ज्ञानानें ते समाधान पावलेले असतात. तेव्हां त्यांना ब्रह्माचें आकलन होतें!—अर्थात् ब्रह्म आहे कसें आणि नाहीं कसें, याचें ज्ञान त्यांना असतें!!!

अनंत, शुद्ध, बुद्ध, नित्य व मुक्त अशा ब्रह्माचें स्वरूप आपल्याला पूर्णपणें कळलें, अशा समजुतीनें वाक्पांडित्य लोक करीत असतात!

शुकदेवादि महान् महान् ऋषि यांना फार झालें, तर मुंगळे (मोठ्या मुंग्या) म्हणतां येईल. आठदहा कण खाण्याचें त्यांचे अंगीं सामर्थ्य होतें, असें जर आपण म्हटलें, तर त्यांच्यासंबंधानें आपण यथार्थ बोललों असें होईल.

साखरेचा सर्व पर्वत खाण्याकरितां कांहीं मुंग्या आपल्या बिळांत घेऊन गेल्या, असें म्हणणें जितकें वेडेपणाचें आहे, तितकेंच आपल्याला ब्रह्माचें पूर्ण ज्ञान झालें, असें म्हणणेंही वेडेपणाचें आहे.

# बिंदु ७.

( ब्रह्मनिरूपण—पुढे चालू. )

वेदान्ती किंवा ज्ञानी याचें साध्य.

जीवात्मा व परमात्मा किंवा जीव व शिव यांचे ऐक्य हेंच वेदान्त्याचें किंवा ज्ञानी पुरुषाचें साध्य होय. वेदान्ती जी घटपटादि खटपट करीत असतो, तिचा अंतिम हेतु पाहूं जातां तो ‘ जीवो ब्रह्मैव नापरः’ या महावाक्याचा अनुभव घेणें हाच असतो.

मिठाच्या बाहुलीची दृष्टान्तपर गोष्ट.

एकदां एका मिठाच्या बाहुलीच्या मनांत समुद्राचा ठाव पहावा असें आलें. त्या हेतूनें ती समुद्रावर तर गेली. पाण्याचा बरोबर मोज काढण्याकरितां तिनें हातांत मापाची दोरीही घेतली होती. ती समुद्राच्या कांठावर आली आणि आपल्यापुढें पसरलेल्या त्याच्या अफाट विस्ताराकडे तिनें एकदां नजर टाकली. इतकी गोष्ट होईपर्यंत ती जशी खरोखर मिठाची बाहुली होती तशीच कायम होती; म्हणजे तिचें स्वत्व कायम होतें, त्याला अगदीं धक्का पोहोंचला नव्हता; पण तिनें आणखी एक पाऊल पुढें टाकून पाण्यांत पाय ठेवल्याबरोबर ती सागरांत मिळून गेली—नाहींशी झाली—अगदीं दिसेनाशी झाली! त्या मिठाच्या बाहुलीचा प्रत्येक परमाणु सागराच्या पाण्यांत विरघळून गेला, ज्या मिठाची ती बनली होती तें मीठ समुद्रांतूनच आलें होतें; आणि काय चमत्कार

पाहा! सागराच्या मूळच्या मिठांत पुन्हा मिळून जाण्याकरितां ती आपली तेथें परत आली!

जीवात्मा परमात्म्यांत पुन्हा मिळून गेला!

मानवी देहाचा आश्रय करून राहणारा आत्मा-जीवात्मा-म्हणजेच मिठाची बाहुली होय. केवल व शुद्ध असा परमात्मा म्हणजे अनंत असा महासागर होय.

त्या मिठाच्या बाहुलीला परत येऊन सागराची खोली किती आहे, हें कांहीं सांगतां आलें नाहीं. निर्विकल्प समाधि ज्याला सुदैवानें साधली त्याचें असेंच होतें; त्या समाधीमध्यें द्वैत अगदीं मावळून जाऊन शुद्ध अद्वैताचा--केवल ब्रह्माचा-अनुभव घडतो. तो ब्रह्मच होऊन राहिल्यामुळें ब्रह्म कसें व केवढें आहे, हें जगाला सांगण्याला सागराच्या बाहेर पुन्हा तो येतच नाहीं. बरें, **आईची -परमेश्वराची**-कृपा होऊन ती मिठाची बाहुली जरी कदाचित् पुन्हा द्वैतरूपानें परत आली, तरी ती बोलणार जीवाचीच भाषा! अर्थात् तिचे सर्व शब्द समर्याद असणार! मायेच्या कक्षेंत सांपडलेल्या जीवाप्रमाणेंच तिच्या कृति व्हावयाच्या.

ब्रह्माचें निरूपण करितांना शब्द लुले पडतात याचें कारण हेंच. सोपाधिक व मर्यादित अशा जीवांच्या भाषेंत केवल व अपार अशा ब्रह्माचें यथार्थ विवेचन कदापि व्हावयाचें नाहीं. अनंतासंबंधानें बोलण्याला सान्त शब्द किती पुरे पडणार!

ब्रह्म शब्दातीत आहे. पिता व त्याचे दोन पुत्र यांची वेदांतील दृष्टांत-पर गोष्ट.

एका गृहस्थाला दोन पुत्र होते. ते योग्य वयाचे झाल्यावर त्यांना ब्रह्मचर्याश्रमांत ठेवून त्यांच्याकडून विद्याभ्यास करवावा, असें पित्याला वाटलें. या हेतूनें त्यानें त्यांना एका गुरूच्या स्वाधीन केलें. तेथें ते वेद व शास्त्र यांचें अध्ययन करूं लागले. कांहीं दिवस तसेच गेले. पुढें मुलांचें अध्ययन कसें काय चाललें आहे तें पहावें, असें बापाला वाटलें. त्यानें त्यांना बोलावून आणलें व जिज्ञासूंना ज्ञान प्राप्त करून देणारें जें वेदान्तशास्त्र त्याचें तुम्हीं अध्ययन केलें काय, असा त्यानें त्यांना प्रश्न केला. 'केलें' असें मुलांनीं उत्तर दिलें.

**बापः**—बरें, मुलांनो, तुम्हीं वेदान्ताचें अध्ययन केलेंच आहे. तेव्हां ब्रह्म ही कशी वस्तु आहे, एवढें मला सांगा.

**वडील मुलगाः**—( वेदांतील व शास्त्रांतील अनेक प्रमाणवाक्यें सांगून )-बाबा, तें अवाङ्मानसगोचर आहे-तें शब्दांनीं सांगतां येण्यासारखें किंवा मनानें जाणतां येण्यासारखें नाहीं. पण तें असें असें आहे; तें सगळें मला समजलें आहे. ( पुन्हा त्यानें वेदान्तांतील अनेक आधारभूत वाक्यें सांगितलीं. )

**बापः**—बरें; पुरे कर. तेव्हां तुला ब्रह्मज्ञान झालें. ठीक आहे. जा तूं आपल्या कामाला. आतां, बाळ, तुझें काय म्हणणें आहे तें ऐकूं दे. ब्रह्म ही वस्तु कशी आहे?

हा शेवटचा प्रश्न त्यानें आपल्या दुसऱ्या मुलाला केला होता. तो मुलगा कांहीं उत्तर न देतां मुकाट्यानें खालीं मान घालून नुसता उभा राहिला. त्याच्या तोंडांतून एकही शब्द बाहेर पडला नाहीं. किंवा त्यानें बोलण्याचा प्रयत्नही केला नाहीं. तो किती तरी वेळ तसाच उभा होता.

तेव्हां त्याचा बाप म्हणाला, "होय, बाळ, तुझेंच बरोबर आहे. ब्रह्मासंबंधानें कांहींच बोलतां यावयाचें नाहीं. तें असें किंवा तसें आहे, असें कांहीं तरी त्याच्यासंबंधानें बोलण्याला आपण सुरुवात केली रे केली, कीं आपण त्याचें अनंतत्व नाहींसें करून त्याला सान्तत्व आणलें, त्याचें केवलत्व किंवा निरुपाधिकत्व घालवून त्याला सोपाधिकत्व दिलें, त्याचें अमर्यादितत्व हिसकावून घेऊन मर्यादित्व त्याचे माथीं मारलें, असें होतें. वेदान्तांतील शेंकडों श्लोक किंवा वचनें आधाराला पुढें करून जें कार्य व्हावयाचें नाहीं, तें तुझ्या मूकव्रतानें केलें आहे."

कढईत तूप घालून तें विस्तवावर उकळत ठेविलें, म्हणजे तें कोठपर्यंत बरें आवाज करतें? अर्थात् त्यांतील जलांश जळून जाईल, त्यांत पाण्याचा थोडासुद्धां अंश शिल्लक राहणार नाहीं, इतकी उष्णता त्याचे अंगीं जोंपर्यंत आली नाहीं तोंपर्यंत. तूप जोंपर्यंत चांगलें—पुरें—तापलें नाहीं, तोंपर्यंत तें वर उकळतें व आपला कळ्-कळ् असा आवाज करीत असतें.

चांगलें कडकडीत तापून निःशब्द झालेलें तूप म्हणजेच ब्रह्मसाक्षात्कार झालेला खरा ज्ञानी पुरुष.

मुळींच न कढलेलें किंवा तापलेलें तूप म्हणजे जिज्ञासु होय. त्यांत मिसळून राहिलेला पाण्याचा अंश अग्नीच्या संस्कारानें घालवून टाकला पाहिजे. हा पाण्याचा अंश म्हणजे अहंकार. हा अहंकार निघून जातां जातां कोण थैमान करितो! पण एकदां तो अहंकार- जलांश--समूळ सोडून गेला, कीं तूप पक्कें झालें. मग गडबड नाहीं कीं सडबड नाहीं. (हशा).

जलांश--अहंकार--निघून जात असतो त्याच वेळीं तुपांतील सर्व मळ पातेल्याच्या तळीं जाऊन बसतो. हा मळ म्हणजे विषय --कामिनी आणि कांचन. आणि त्यांचे दुष्ट संवगडी--इंद्रियलौल्य, सकाम कर्मे वगैरे--होत.

बरें, सिद्ध पुरुष हा कांठोकांठ भरलेल्या भांड्यासारखा असतो. भांडें भरत असतां तें भक्-भक् असा आवाज करीत असतें; पण तें भरतां क्षणींच आवाज अगदीं बंद होतो. हा आवाज म्हणजे विवेक किंवा विचार होय. याच विचाराच्या साहाय्यानें, आईची कृपा झाल्यास, ज्ञानाची प्राप्ति होते. भांड्यांतून निघणाऱ्या आवाजावरून तें भांडें भरलें नाहीं, असें समजतें. त्याचप्रमाणें विवेक किंवा विचार ज्या अर्थीं चालू आहे, त्या अर्थीं ब्रह्मसाक्षात्कार झाला नाहीं, असें सिद्ध होतें.

फुलावर स्वस्थ बसून भ्रमरानें जोंपर्यंत मधुपानाला सुरुवात केली नाहीं, तोंपर्यंत त्याचें गूँऽउँऽऊँ चालू असतें. मधाला तोंड लागलें, कीं त्याचा गुंजारव थांबला.

येथें एक प्रश्न उत्पन्न होतो.—गुरु हा ज्ञानी असतो; पण शिष्या-संबंधानें आपलें कर्तव्य करितांना त्याला विवेकाची कास धरावी लागते—शब्द काढीत रहावें लागतें. हें कसें ?

ज्ञानप्राप्तीनंतर विवेक चालू असेल का ?

शिष्याचें अज्ञान दूर करण्याकरितां गुरूला बोल-लेंच पाहिजे. हा विवेक होतो खरा; तथापि तो बाधक होत नाहीं.

पातेल्यांत घालून चुलीवर ठेवलेलें तूप चागलें कडकडीत झालें, म्हणजे आवाज करीत नाहीं, हें खरें आहे. यांत कांहीं शंका नाहीं. पण त्या तापलेल्या तुपांत कच्ची पुरी टाकून पहा कीं, लागलाच आवाज निघूं लागतो. त्या तापलेल्या तुपाचा पुरींतिल पाण्याशीं संयोग झाल्याबरोबर पुन्हा आवाजाला सुरुवात होते. ती पुरी खाण्या-सारखी पक्की होईपर्यंत आवाज चालू असतो.

पुरी म्हणजे शिष्य. तापलेलें तूप जो पुन्हा आवाज करूं लागतें —गुरु पुन्हा जो विवेकाचा अवलंब करितो—तो केवळ पुरींतील कच्चे-पणा—शिष्यांतील अज्ञान—घालविण्याकरितां असतो. आवाज बंद झाल्याबरोबर शिष्याचे ठिकाणीं पक्केपणा आल्यामुळें गुरूनें बोलणें थांबविलें आहे, असें समजावें.

आतांपर्यंत केलेल्या निरूपणाचा निष्कर्ष असा निघतो, कीं आत्म्याचें ज्ञान फक्त आत्म्याला व्हावयाचें. जो बोधस्वरूप आहे त्याची ओळख जो केवल बोधस्वरूप असेल त्यालाच पटावयाची. जीवात्म्याचा जोंपर्यंत भिन्नपणा कायम आहे, त्यानें जोंपर्यंत मायेची मिठी सोडली नाहीं, तोंपर्यंत त्यानें अपरोक्षनुभवाची आशा धरणें व्यर्थ आहे. **ब्रह्मपदाचें सुख ब्रह्म होऊनच अनुभविलें पाहिजे.**

आत्म्याचे ज्ञान फक्त आत्म्यालाच व्हावयाचें.

**'ईश्वर अज्ञात व अज्ञेय आहे,' असें जें म्हणतात त्याचा अर्थ हाच.**—( वरील निष्कर्ष. )

सर्व भेद मायेच्या राज्यांत नांदतात. म्हणजे मायेमुळें सर्व भेद उत्पन्न होतात. मायेचा निरास झाला, कीं भेद संपले. ब्रह्मांडांतील एकंदर गोष्टी—प्रत्येक पदार्थ, प्रत्येक कार्य, प्रत्येक अवस्था—उत्पत्ति, स्थिति, लय—देह, मन व आत्मा यांचीं कर्में व अवस्था—जागृति, स्वप्न सुषुप्ति, ध्यान वगैरे अवस्था—हीं सर्व केवळ मायेचे खेळ आहेत. शंकरादिकांच्या मतांचे जे अनुयायी आहेत—जे वेदान्ती किंवा ज्ञानी आहेत—त्यांच्या दृष्टीनें या सर्व गोष्टी मायिक किंवा मिथ्या आहेत.

माया मिथ्या आहे. शांकरमत.

**यांच्या मताप्रमाणें एक ब्रह्मच काय तें सत्य आहे; जग हें मिथ्या आहे,** म्हणजे **ब्रह्माच्या दृष्टीनें पाहिलें तर ब्रह्मासंबंधानें ही सृष्टि, मनुष्य,** जीवमात्र हीं मिथ्या **आहेत; कारण एक ब्रह्म मात्र**

सत्य आहे. मायेचें मिथ्यात्व अनुभवास आलें, कीं अहंभाव उडून जातो किंवा पाहिजे तर मावळतो किंवा पुसून जातो ह्मणा. या अहंकाराचा मागमूसही मागें उरत नाहीं. हीच निर्विकल्प समाधि.

**मी ( देह ) सत्य आहें, अशी जोंपर्यंत आपली दृढ भावना आहे, तोंपर्यंत ‘ जग मिथ्या आहे, ’ असें म्हणणें म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे!** ज्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला नाहीं—ज्याला अपरोक्षानुभव घडला नाहीं—त्याला जगाचें मिथ्यात्वही कळावयाचें नाहीं—जग मिथ्या कसें आहे, याचा अनुभव त्याला यावयाचा नाहीं.

आतां जो सत्पुरुष समाधिपद सोडून खालच्या अंगाला किंवा अवस्थेला, **आईच्याच इच्छेवरून**, परत येतो, त्याचा अहंकार पुन्हा त्याच्या ठिकाणीं उदित होतो. मात्र तो भिन्न, मर्यादित, पण निर्मल व विशुद्ध असतो. अहंकाराचा पुन्हा उदय झाल्याबरोबर तो योगी पुन्हा कर्मभूमींत—या मायिक जगांत—वावरूं लागतो. जोंपर्यंत त्याचा अहंकार ( स्वत्व, अस्तित्व, देह ) त्याला सत्य ( अर्थात् सापेक्षेंकरून ) वाटत असतो, तोंपर्यंत जगही सत्य असतें आणि ब्रह्म मिथ्या ( अर्थात् सापेक्षपणें ) असतें!

त्याच्या अहंवृत्तीनें—मीपणानें—पुन्हा त्याच्या ठिकाणीं येऊन ठाणें दिल्याबरोबर त्याला ही मायानिर्मित—प्रकृतिनिर्मित—सृष्टि सत्य वाटूं लागते. मात्र त्याची अहंवृत्ति ब्रह्मसाक्षात्कारानें निर्मल, निर्लेप किंवा पुनीत झाली असल्यामुळें त्याला ही सृष्टि म्हणजे

अव्यक्ताचेंच व्यक्तरूप आहे—जिकडेतिकडे विश्वरूपानें ब्रह्मच पसरलें आहे—या सृष्टिरूपानें ब्रह्मच नटलें आहे—असें दिसूं लागतें. या विश्वांत त्याला जिकडेतिकडे ब्रह्मच दिसूं लागतें व या दृष्टीनें त्याला सत्यत्व येतें.

तसेंच माया ही विद्यारूप किंवा अविद्यारूप आहे, हें त्याला दिसतें. या मायेंत—या विश्वांत—जशी त्याला विद्या दिसते, तशीच अविद्याही दिसते. म्हणजे या दोहोंचेंही अस्तित्व त्याला दिसतें.

विद्या ही ईश्वराभिमुख करणारी—ईश्वराला साधक अशी—आहे. विवेक, वैराग्य, भक्ति, इत्यादि तिचीं अंगें आहेत. अविद्या ही ईश्वरपराङ्मुख करणारी—ईश्वरापासून दूर दूर नेणारी—आहे. कामिनी, कांचन, महत्त्व, संमान, कर्मासक्ति, इत्यादि हिचीं अंगें आहेत.

अपरोक्षानुभवः-द्वैत व अद्वैत यांचा समन्वय.

परमेश्वराचें सगुणत्व व परमेश्वराचें निर्गुणत्व हीं दोन्ही ज्यांनीं समाधीमध्यें अनुभविलीं असतात—प्रकृति व पुरुष या परमेश्वराच्या दोन्ही रूपांचें अपरोक्ष ज्ञान ज्यांना समाधीमध्यें झालेलें असतें—त्यांनाच **विज्ञानी** म्हणतात. ( परमेश्वराचें ज्याला विशेष ज्ञान झालें—परमेश्वराला ज्यानें प्रत्यक्ष किंवा अनुभवानें जाणलें—तो विज्ञानी. हा विज्ञानी शब्दाचा धात्वर्थ किंवा मूलार्थ आहे.)

ईश्वर, माया, आत्मा, जगत्, इत्यादि भेदांना आदिमायेच्या —प्रकृतीच्या—रूपानें ब्रह्मच कारण होतें—हे भेद प्रकृतीच्या रूपानें

पुरुषच निर्माण करितो—ही गोष्ट विज्ञानी पुरुषांच्या प्रत्ययास आलेली असते. आंत-बाहेर ( अंतरंगीं व बाह्य जगांत ) त्यांना परमेश्वर दिसलेला असतो आणि त्यांना हा साक्षात्कार प्रत्यक्ष त्यानेंच दिलेला असतो. परमेश्वरानें ( सगुण ) त्यांना असें सांगितलें आहे कीं, "समाधीमध्यें निर्गुण ब्रह्माचे रूपानें मीच भासमान होतों. हे भेद मींच निर्माण केले आहेत. चोवीस पदार्थांचें किंवा तत्त्वांचें—जीवात्मे आणि जगत् यांचें—आदिकारण मीच आहें."

सगुण ब्रह्म ( प्रकृति ) हेंच एकंदर नामरूपात्मक भेदांचें—उत्पत्ति, स्थिति, लय, यांचें—कारण असतें; जे परमेश्वराच्या फक्त सगुण रूपाचेच भुकेले असतात—अर्थात् जे भक्तिमार्गी असतात—त्यांना तें ( सगुण ब्रह्म ) अनेक रूपांनीं प्रकट होतें; भक्तांचा सगळा जीव काय तो परमेश्वराचे सगुण रूपावर आणि हें सगुण रूप तर या भेद-प्रपंचाचें मूळ कारण, तेव्हां तो ( सगुण ईश्वर ) त्यांना नानारूपात्मक दिसतो. विज्ञानी पुरुषाला तो ( सगुण परमेश्वर ) फक्त एकाच त्रिगुणात्मक रूपानें प्रकट होतो. विज्ञान्याला त्याचें जिकडेतिकडे फक्त एक त्रिगुणात्मक रूप दिसतें; भक्तांना तोच बहुरूपी दिसतो.

परमेश्वर ( सगुण ) आपल्या सत्त्वगुणानें पालन करितो, रजोगुणानें उत्पत्ति करितो, आणि तमोगुणानें संहार किंवा लय करितो. या गुणांची वसति परमेश्वराचे ठिकाणीं असते; हे गुण परमेश्वरांत असतात; पण तो त्यांत नसतो. तो अगदीं अलिप्त असतो.

परमेश्वराला–सगुण किंवा निर्गुण–प्रमाण एकचः साक्षात्कार.

विज्ञान्याचा आत्मा ( अहंवृत्ति ) निर्मल, पुनीत असल्यामुळें त्याला परमेश्वर दिसलेला असतो; त्यानें त्याचें सगुण त्याचप्रमाणें निर्गुण अंगही पाहिलेलें असतें. आपल्या आंत व आपल्या बाहेर त्यानें **त्याची** वाणी ऐकलेली असते. इतकेंच नाहीं. त्यानें **त्याच्याशीं** हितगुज केलेलें असतें. त्याला पिता, माता, पुत्र, बंधु, पत्नी, दास, वगैरे मानून त्यानें त्याला आळविलें असतें; तेव्हां अशा या अधिकारी विज्ञानी पुरुषांचें वचन प्रमाणच आहे. त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें माया (सृष्टी) ही कांहीं मिथ्या नाहीं. **विज्ञान्यांच्या अनुभवाप्रमाणें माया म्हणजे अव्यक्ताचीच व्यक्तावस्था किंवा निर्गुण ब्रह्माचेंच सगुण रूप आहे.** निर्गुण ब्रह्माच्या सगुण अंगाचा माया हा केवळ बाह्य पसारा किंवा विस्तार आहे. मानवी योनींतील किंवा तिर्यग्योनींतील जीवात्मे, त्याचप्रमाणें ब्रह्मांडांतील एकंदर वस्तुजात, हीं त्याच सगुण रूपानें उत्पन्न केलीं आहेत. ( किंवा हीं सर्व त्या सगुण रूपापासून उत्क्रांत झालीं आहेत हें, ह्मणणें ज्यास्त शोभेल).

विज्ञान्यांचा हा आधार किंवा पुरावा अगदीं बिनतोड किंवा अमोघ आहे; कारण **त्याला पाठिंबा आहे साक्षात्काराचा.**

परमात्म्यानें आपल्या सगुण व निर्गुण अशा दोन्ही रूपांनीं किंवा अंगांनीं ऋषींना साक्षात्कार दिलेला आहे. मनुष्याच्या उद्धाराकरितां त्याप्रमाणेंच भक्तांच्या संतोषाकरितां वेळोवेळीं असा साक्षात्कार होतो.

परमात्मा निष्क्रिय, अकर्मक आहे,—तो उत्पत्तिस्थितिलयादि कांहीं कार्य करीत नाहीं,—असें मानलें, अशी त्याच्यासंबंधानें भावना केली, ह्मणजे मी त्याला ब्रह्म किंवा पुरुष किंवा निर्गुण परमात्मा असें म्हणतों; तोच सक्रिय किंवा सकर्मक आहे,—उत्पत्तिस्थितिलयादि कार्यें तो करीत आहे,—असें मीं मानिलें किंवा अशी त्याच्यासंबंधानें भावना केली, ह्मणजे मी त्याला शक्ति, माया, प्रकृति, किंवा सगुण परमात्मा असें नांव देतों.

सगुण व निर्गुण परमात्मा.

उपमान व उपमेय यांचें सर्व बाजूंनीं अगदीं तंतोतंत साम्य कधींच नसतें. उपमा या नेहमीं एकांगी किंवा एकदेशी असतात.

उपमांचा उपयोग.

अज्ञात वस्तूचा विशेष गुण किंवा लक्षण ढळढळीतपणें नजरेपुढें आणून तिच्या संबंधानें सामान्य कल्पना श्रोत्याच्या मनापुढें उभी करण्याकरितां—तिचें साधारण ज्ञान करून देण्याकरितां—उपमांची योजना असते.

**उदाहरणार्थः**—'तो वाघ आहे' असें आपण म्हटलें, तर तो सर्व बाबतींत—डोकें, दांत, नखें, शेंपटी, इत्यादींत—वाघासारखा आहे, असें समजावयाचें नाहीं. वाघासारखी त्याला शेंपटी आहे किंवा वाघासारखीं त्याला नखें आहेत, असें ह्मणण्याचा उद्देश नसतो. 'त्याची मुद्रा उग्र आहे,' किंवा 'तो वाघासारखा पराक्रमी व धाडसी असून पाहिजे तें काम करण्याला उडी घालील, कोणत्याही कामांत भिऊन मागें पाय घेणार नाहीं.' एवढाच त्या वाक्याचा अर्थ घ्यावयाचा.

तेव्हां परमेश्वराच्या सगुण व निर्गुण रूपांमधील संबंध लक्षांत आणून देण्याकरितां कितीही चांगल्या उपमांची योजना केली, तरी त्यांनीं पुरें समाधान व्हावयाचें नाहीं. तें **अनुभवाचेंच काम** आहे.

तथापि त्यांचा अगदीं उपयोग नाहीं, असेंमात्र नाहीं. आध्यात्मिक ज्ञान इंद्रियातीत असतें. तेव्हां त्याच्या खऱ्या स्वरूपाची रूपरेषा, अगदीं अंधुक अंधुक कां होईना, मनश्चक्षूपुढें उभी राहण्याला त्यांचें बरेंच साहाय्य होतें.

पण खरें पाहूं जातां ब्रह्म किंवा निर्गुण परमात्मा आणि शक्ति किंवा सगुण परमात्मा यांच्यामधील अंतर शून्य आहे. यांत मुळींच अंतर नाहीं. दोन्ही एकच.

दोन्ही एकच.

अग्नि आणि दाहकता हीं जशीं एक, तशींच सगुण ब्रह्म आणि निर्गुण ब्रह्म हीं एकच. दाहकशक्तीविरहित अग्नीची कल्पना आपल्याला कांहीं करितां येत नाहीं.

दूध आणि त्याची शुभ्रता हीं जशीं एक, तशींच तींही एक. शुभ्रतेवांचून दुधाची कल्पना मनांत येत नाहीं.

रत्न व तेज हीं जशीं एक, तशीं तींही एक. तेज सोडून नुसत्या रत्नाची कल्पना आपल्याला होत नाहीं.

सर्प व त्याची वक्रगति हीं जशीं अभिन्न, तशींच तीं अभिन्न, वक्रगतीवांचून सर्पाची कल्पना करितांच येत नाहीं.

# बिंदु ८.

( ब्रह्मनिरूपण—पुढे चालू. )

ईश्वर पक्षपाती आहे काय?
सर्व माणसे सारखी असतात का?

**महाराजः**—उत्पत्ति, स्थिति आणि लय यांचें काम शक्ति (माया, प्रकृति, सगुण ब्रह्म) करिते, हें मीं पूर्वीं सांगितलेंच आहे. तिचीं स्वरूपें दोन—विद्याशक्ति व अविद्याशक्ति. घटा-घटाच्या ठिकाणी ही सारखी प्रकाशित होत नाहीं,—प्रत्येक घटाच्या ठिकाणीं ही सारख्या प्रमाणांत व्यक्त असत नाहीं. हें प्रमाण नेहमीं भिन्न असतें. माणसांत काय, इतर प्राण्यांत काय, तें भिन्नभिन्नच असतें, कारण भिन्नत्व, वैचित्र्य, किंवा विषमता हाच सृष्टीचा सामान्य नियम आहे, एकत्व किंवा समता हा नव्हे.

**विद्यासागरः**—तर मग, महाराज, आपण जेव्हां जगांत येतों, तेव्हां आपणां सर्वांना ईश्वरी देणग्यांची (बुद्धि, रूप, गुण, लक्षणें वगैरेंची) खैरात सारखी मिळत नाहीं, असें का म्हणायचें? कांहीं थोड्या निवडक—लाडक्या—लोकांसंबंधानें ईश्वर पक्षपात करितो का?

**महाराजः**—हां, हें पाहा, जगाची स्थिति जशी आहे, तशी घेऊन आपल्याला चाललें पाहिजे, असें मला वाटतें. ईश्वराच्या कृतींचें ज्ञान मनुष्याला केव्हांही होणें नाहीं, त्याचे हेतु कधींही मनुष्याला समजावयाचे नाहींत.

तो विभु (सर्वव्यापक) आहे; तेव्हां सर्व प्राण्यांत—मुंगी-सारख्या क्षुद्र प्राण्यांतसुद्धां—नव्हे प्रत्येक वस्तूमध्यें—तो भरून राहिला आहे. ईश्वर आपल्या सर्व प्राण्यांत अधिष्ठित—व्याप्त—असतो, हें खरें आहे. तथापि सर्व प्राणी सामर्थ्यानें व गुण-लक्षणांनीं भिन्न भिन्न असतात, हें कांहीं खोटें नाहीं.

तसें जर नसतें, तर पुष्कळ वेळा एक इसम दहा असामींना भारी होऊन त्यांचा पाडाव करितो, हें कसें होतें? एकादा इसम शक्तीनें भारी असला म्हणजे त्याचेपुढें एकटा-दुकटा इसम पळ काढतो—त्याच्यापुढें एकट्या—दुकट्या सामान्य इसमाचा टिकाव लागत नाहीं, हें सर्वांना ठाऊक आहे.

हें जसें शरीरबलाचें आहे, तसेंच नैतिकबलाचेंही आहे. धार्मिकतेचा किंवा आध्यात्मिकतेचाही प्रकार तोच. नीतिमत्ता भिन्न-भिन्न असते. आध्यात्मिकतेचेंही प्रमाण सर्वत्र एकच नसतें.

मी आपल्यालाच असें विचारतों, कीं इतर अनेक लोकां-पेक्षां आपल्याला सगळे लोक किती तरी अधिक आदर देतात, तो कां? आपण एक विलक्षण मनुष्य आहां—आपल्या डोक्यावर दोन शिंगें आहेत—आणि म्हणून आपल्याला पाहण्याकरितां पुष्कळ लोक लोटतात, असें तर कांहीं नाहींना? (हशा.)

नाहीं. सृष्टीच्या कायद्याप्रमाणें तींत भिन्नत्व हें असावयाचेंच; आणि माझी आई—शक्ति—हीच या अनेक रूपांनीं व्यक्त झालेली

आहे. तिचें स्वतांचें सामर्थ्य अनंत असून तीच जगत् व जीव या रूपांनीं—शारीरिक, बौद्धिक, नैतिक, किंवा आध्यात्मिक बाबतींत भिन्न अशा अनेक वस्तूंच्या किंवा प्राण्यांच्या रूपांनीं—विनटली आहे.

आणि ही माझी आई म्हणजे ब्रह्माशिवाय कोणी नव्हे. असें म्हणून महाराज गाऊं लागले:—

**पद.**

(चालः—उत्तम जन्मा येउनि॰)

**(सर्वसमर्थ, अज्ञात आणि अज्ञेय अशी माझी आई.)**
**प्रणवरूपिणी कालीचें त्या ज्ञान असे कवणा? ।**
**रूप नेणवे चार सहांची जरि थकली रसना ॥ धृ॰ ॥**
**योगी ध्याती मूलाधारीं[1] सहस्रारकमलीं[2] ।**
**ब्रह्मासंगें पद्मवनीं ती हंसी करि केली ।**
**आत्मारामप्रभुचा आत्मा केवळ ही काली ।**
**लीलेनें प्रतिघटीं विराजे ती स्वेच्छानिपुणा ॥ १ ॥**
**मायाजठरीं ब्रह्मांडभांड हें सामावत कैसें ।**
**कोण जाणतो मर्म तिचें तें महाकाल जैसें? ।**
**सहज़सुलभ ती जाणायातें वदलें जरि कोणीं ।**
**लोक हासती अननभूत हें केवल परिसोनी ।**

---

१ मूलाधार हें अंतरंगांतील पहिले कमल. हें सुषुम्नेच्या मुळाशीं असून याला चार पाकळ्या आहेत. या ठिकाणी मनाची एकाग्रता करून योगी देदीप्यमान अशा शिवशक्तीचें ध्यान करितात.

२ हें हजार पाकळ्यांचें कमल आहे. मूलाधारी योग्यानें जागृत केलेल्या **शक्तीचें** हें आत्यंतिक साध्य. **शक्तीनें** सहस्रार गांठलें व ती शिवांत किंवा ब्रह्मांत मिळून गेली, कीं ब्रह्मानुभवानें समाधि लागते.

'प्रसाद' बोले परी निश्चयें, सुतर सिंधुतरण।
बाहुबलानें, जरी घडे तें सहज तिचें ज्ञान।
मन जाणे ती प्रत्यय नच ये परि अंतःकरणा।
ज्ञान तिचें हो तरी चंद्रही करगत तो शिशुंना ॥ २ ॥

हें स्तोत्रमय पद्य संपल्याबरोबर **महाराजांनीं** आणखी एकदां समाधीच्या अवर्णनीय प्रदेशांत प्रवेश केला. त्यांचा तो दिव्य व कर्णमधुर शब्द–आवाज–बंद पडला. बाह्यचक्षु–चर्मचक्षु–निश्चल व स्थिर झाले. अंतश्चक्षूचा रोंख आंत वळून तो दिव्य दर्शनाचें सुख अनभवूं लागला. थोडा वेळ ब्रह्मसाक्षात्कारामृतीं **महाराजांनीं** मज्जन केलें. त्यांच्या मुखावर दिव्य तेज झळाळूं लागलें व शेवटीं मंदस्मिताच्या लहरी त्यावर उचंबळूं लागल्या.

महाराजांची समाधि लागते:–समाधीमधील साक्षात्कार.

अर्धवट जागृतावस्थेंत येऊन ते म्हणाले:—होय, **माझी आई–काली**–म्हणजे **केवल ब्रह्मच**[१] आहे. षड्दर्शनांनीं इतकें उत्कृष्ट विवेचन केलें आहे, तरीसुद्धां त्यांना ज्या वस्तूचा थांग देतां आला नाहीं, **ती माझी आईच** होय.

**आईच्या कृपेनें** अहंवृत्ति मावळली, कीं समाधिमध्यें ब्रह्माचा साक्षात्कार घडतो आणि मग तो परमात्मा–जीवात्मा नव्हे हो–ब्रह्मत्वाचा उपभोग घेतो. अहंकार किंवा जीवात्मा निर्मल होऊन तो तसाच राहिला म्हणजे **सगुण परमात्म्याचें** किंवा त्याच्या

सर्वसमर्थ आई.

---

१ आत्मनि चैवं विचित्राश्च हि—ब्रह्मसूत्रें.

कोणत्याही स्वरूपाचें—श्रीकृष्ण, चैतन्य देव, वगैरे अवतारी पुरुषांच्या रूपानें, किंवा पुरुष, स्त्रिया, मुलें व एकंदर सजीव प्राणी यांच्या रूपानें, नव्हे सर्व चोवीस तत्त्वांच्या किंवा पदार्थांच्या रूपानें व्यक्त होणाऱ्या त्याच्या स्वरूपाचें—दर्शन किंवा अपरोक्षानुभव घडणें हें त्याच्याच कृपेनें शक्य होतें.

माझी आई ( सगुण परमात्मा ) निर्विकल्प समाधीमध्यें अहंवृत्ति आपण होऊन पुसून टाकते—तिचा लय करिते. याचा परिणाम असा होतो, कीं समाधीमध्यें ब्रह्मरस लुटायला मिळतो.

कधीं कधीं आपल्या इच्छेप्रमाणें ती आपल्या भक्ताच्या ठिकाणीं अहंवृत्ति कायम ठेविते, त्यांना दर्शन (साकार किंवा सगुण रूपानें ) देते आणि त्यांच्याशीं बोलते.

ब्रह्मभांडाराची किल्ली फक्त शक्तीजवळच—उपनिषदांनीं वर्णिलेल्या सगुण ब्रह्माजवळच, किंवा भक्तांच्या साकार देवाजवळच—असते.

साक्षात्कार आणि तर्क किंवा अनुमान: ईश्वराच्या सगुणत्वाचे प्रमाण: ईश्वराच्या निर्गुणत्वाचे प्रमाण.

तत्त्वज्ञ किंवा मीमांसक जिच्यावर आपली सारी भिस्त ठेवितात, ती त्यांची विचारशक्ति किंवा तर्कशक्ति तिच्यापासूनच—माझ्या आईपासूनच—सगुण परमेश्वरापासूनच—त्यांना प्राप्त झालेली असते.

उलटपक्षीं प्रार्थना, ध्यान, भक्ति, आत्मसमर्पण यांचा उगम माझ्या सर्वसमर्थ आईपासूनच आहे.

पुन्हा विज्ञानी पुरुषाची समाधिस्थिति कधीं कधीं तशीच कायम राहते, कधीं कधीं राहत नाहीं. त्या परमानंदस्थितींत त्याला कोण

बरें कायम ठेवितें? त्याला जागृतावस्थेंत तरी कोण बरें आणितें? सगुण ईश्वर—**माझी आईच**. दुसरें कोण?

अशी ही **माझी आई** मिथ्या कशी असणार? कदापि असणार नाहीं. **एकाच सत्याचें—ब्रह्माचें**—ती केवळ सगुण अंग आहे. होय, याच **माझ्या आईनें** आपल्या मुलांना असें आश्वासन दिलें आहे:—**'मी आहें;' 'मी जगज्जननी आहें;' 'वेदान्तांतील ब्रह्म मीच आहें;' 'उपनिषदांतील आत्मा मीच.'**

अशा रीतीनें सगुण ईश्वर साक्षात्कार देतो. **साक्षात्कार हेंच त्याच्या अस्तित्वाचें प्रमाण होय.**

बरें. ब्रह्माचा साक्षादनुभव कालीच (म्हणजे महाकालाचें सगुणांग) आणून देते. समाधीमध्यें असलेल्या योग्याला ब्रह्मासंबंधानें कांहींच बोलतां येत नाहीं. सागरांत विरून गेलेल्या मिठाच्या बाहुलीप्रमाणें तो नाहीसा झालेला असतो—त्याचें स्वत्व नाहींसें झालेलें असतें—तो अद्वैतावस्थेंत असतो. बरें, समाधि उतरल्यावरही त्याला ब्रह्मासंबंधानें कांहींच म्हणतां येत नाहीं. द्वैतांत आला, कीं तो अद्वैतासंबंधानें—ब्रह्मासंबंधानें—निःशब्द—मुका—होतो. एकदां तो सापेक्ष किंवा दिक्कालादिमर्यादित अशा जगांत येऊन पडला कीं, केवल व मुक्त अशा ब्रह्मासंबंधानें त्याचें तोंड बंद होतें.

**माझी आई** (ब्रह्माचें सगुणांग) असें म्हणते:—'मी ब्रह्म (उपनिषदांत वर्णिलेलें निर्गुण ब्रह्म) आहें.'

यामुळेंही साक्षात्कार हेंच निर्गुण ब्रह्माला प्रमाण आहे. कोणीही ब्रह्माचें किती जरी वर्णन केलें, तरी त्या वर्णनाला त्याच्या अहंकाराचा वास लागल्याशिवाय कधींही राहावयाचा नाहीं,—त्या वर्णनांत त्याचा अहंकार—त्याचा द्वैतपणा—प्रतिबिंबित व्हावयाचाच. निदान त्या त्याच्या ब्रह्मावर या अहंभावाची छाया तरी पडलेली असणार; किंवा त्या त्याच्या ब्रह्माला या अहंभावाचें अवगुंठन पडणार, असेंही म्हटलें तरी चालेल.

आपली विचारशक्ति आणि आपली तर्कशक्ति या बोलूनचालून आहेत पंगू; तेव्हां त्यांच्या जोरावर आपल्याला ब्रह्म गांठतां येणार नाहीं, हें अगदीं निःसंशय आहे. म्हणून साक्षात्कार पाहिजे, तर्काचें येथें काम नाहीं! विचार नको, प्रेरणा पाहिजे.

पुष्कळ वेळा सगुण परमेश्वर दिव्यरूपानें किंवा देहानें (हें रूप किंवा देह चर्मचक्षूंना दिसत नाहीं) प्रकट होतो. त्या रूपाचें दर्शन निष्पाप किंवा पावन झालेल्या जीवांनामात्र होतें.

देवाची दिव्य रूपें. किंवा दुसऱ्या शब्दांनीं हें अधिक स्पष्ट करून सांगायचें म्हटलें, म्हणजे असें म्हणतां येईल, कीं प्रभुकृपेनें ज्याला भागवती तनु प्राप्त झाली, त्याला त्या तनूच्या दिव्य दृष्टीनें त्या रूपांचा प्रत्यय घडतो.

हीं रूपें वाटेल त्या माणसाला दिसावयाचीं नाहींत; फक्त सिद्धांना—ज्ञानी पुरुषांना—आईच्या कृपेनें त्यांचें दर्शन व्हावयाचें.

एकदां श्रीरामचंद्र आपल्या परमभक्त हनुमंताला म्हणाले:— 'वत्सा, तूं माझ्याकडे कोणच्या नात्यानें पाहातोस, आणि तूं माझें ध्यान कसें करतोस, हें मला सांग.' भक्त हनुमंतानें उत्तर केलें, 'रामा, देहात्मबुद्धि मला चिकटून असली, देहात्मबुद्धीचें माझ्या मनावर वर्चस्व असलें, म्हणजे तूं **पूर्ण** आहेस अशी भावना ठेवून मी तुझी पूजा करितों; अशा वेळी मी आपल्याला तुझा एक अंश—ईश्वराचा एक विभाग—मानितों! कधीं तूं सेव्य व मी सेवक या दृष्टीनें—सेव्यसेवकभावानें—मी तुझें ध्यान करितों. पण रामा, तुझ्या कृपेनें माझ्या मनाची तंद्री **तत्त्वज्ञानाकडे-ब्रह्मज्ञानाकडे**—जेव्हां वळते, तेव्हां **मी तो तूं** आणि **तूं तोच मी**, असें मला दिसूं लागतें—असा मला प्रत्यय येतो.'

ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग हे दोन्ही अपरोक्षानुभवाला—ब्रह्मपदाला—जातात.

हनुमंताच्या सांगण्याचा हेतु असा, कीं समाधि लागल्यानंतर त्याचा ' मी ' रामांत—परमात्म्यांत—ब्रह्मांत—विरघळून जाई—विलीन होई. **ब्रह्मज्ञान तें हेंच.**

समजा, अमर्याद, अफाट असा एक पाण्याचा विस्तार आहे; —वर पाणी, खालीं पाणी, जिकडे तिकडे पाणीच पाणी आहे. आणखी अशी कल्पना करा, कीं थंडीच्या योगानें त्यांतल्या कांहीं पाण्याचें बर्फ होऊन त्याला घनत्व प्राप्त झालें आहे. पुढें असेंही

समजा, कीं त्या बर्फाला उष्णता लाविली; मग तें बर्फ पातळ होईल. पुनः त्याचें पाणी होईल.

तो पाण्याचा अनंत विस्तार म्हणजेच ब्रह्म. बर्फाचें घन रूप पावलेले या पाण्याचे अंश म्हणजे परमात्म्याचीं भक्तांना दिसणारीं दिव्य सगुण रूपें. थंडी म्हणजे भक्ताची निष्ठा, प्रीति, भक्ति, आत्मसमर्पण होय. बरें, उष्णता म्हणजे शेवटीं निर्विकल्प समाधीला साहाय्यभूत किंवा कारण होणारा सत् ( ब्रह्म ) आणि असत् ( जगत् ) यांचा विचार आणि 'मी' 'मी' असें बडबडत राहणाऱ्या अहंकाराचा निःशेष लय होय.

भक्ताला ( द्वैती उपासकाला ) प्रभु कदाचित् आपलीं अनंतरूपें दाखवील, भक्तापुढें तो अनेक रूपांनीं कदाचित् प्रकट होईल. पण **आईच्या कृपेनें** समाधीमध्यें जो ब्रह्मपदारूढ झाला, त्याला आपला तो पुन्हा निराकार, अव्यय व केवल असा परमात्माच रहावयाचा.

**भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग यांचीं टोंकें अशीं हीं शेवटीं मिळतात—भक्तियोग व ज्ञानयोग यांचा हा समन्वय.**

ज्याला सुदैवानें सगुण-निर्गुण ईश्वराचा अपरोक्षानुभव आला त्याच्या असें प्रत्ययास येतें, कीं चोवीस पदार्थ किंवा तत्त्वें* (जगत्प्रपंच धरून) हीं सर्व **आईपासून** उत्पन्न झालीं आहेत.

जगत् हे काय आहे? ईश्वर, आत्मा ( जीवात्मा ) आणि सृष्टि यांचें ऐक्य.

---

* पांच स्थूल महातत्त्वें, पांच सूक्ष्म महातत्त्वे, पंच कर्मेंद्रियें, पंच ज्ञानेंद्रियें, मन, बुद्धि आणि अहंकार.

लक्षांत ठेवा, कीं **माझी आई** जशी एक असून अनेक आहे, तशीच ती एक व अनेकातीत असें ब्रह्मही आहे; म्हणजे एक असून अनेक रूपांनीं नटणारी किंवा अनेक रूपें धारण करणारी प्रकृति व एकच पण निर्विकारी ब्रह्म या दोहोंचाही अंतर्भाव **माझ्या आईं**तच होतो. तिनें आत्म्याच्या (जीवात्म्याच्या) रूपानें प्रत्येक मानवी तनूचा आश्रय केला आहे इतकेंच नव्हे, तर अनेक पदार्थांच्या रूपांनीं तीच नटली आहे.

नवीन तत्त्व.

अद्वैत मत–ब्रह्म म्हणजे केवल व निरुपाधिक असा ईश्वर आहे हें मत–निःशेष खरें आहे, असें धरलें पाहिजे. याचें पहिलें कारण असें कीं, ब्रह्माचा (निर्गुण) समाधीमध्यें अनुभव येतो; आणि दुसरें कारण असे कीं, ब्रह्म हें केवल असून त्याचा अनुभव फक्त समाधींतच यावयाचा व तें म्हणजे फक्त माझेंच निर्गुण अंग आहे, असा **आई** साक्षात्कार देते. तथापि असेंमात्र कोणालाही व केव्हांही म्हणतां येणार नाहीं कीं, ‘ माझेंच मत (ईश्वरासंबंधानें) तेवढें निर्दोष, खरें, सयुक्तिक, ग्राह्य व निर्बाध आहे; जे ईश्वराला सगुण मानतात ते खोटे आहेत. सगुण ईश्वर म्हणजे निवळ थोतांड आहे. सगुण ईश्वराच्या हातांत मोक्षाच्या किल्लयाच नाहींत; वगैरे वगैरे.’

शाब्दिक अद्वैती–घटाकाश, पटतंतु, सुवर्णालंकार, सर्परज्जु इत्यादि न्यायावडंबरांवर अद्वैताला खेळवूनच धन्यता मानणारे–

शाब्दिक अद्वैत्यांचे कोडें:—पूर्ण अशा आत्म्याला—परमात्म्याला—आपण अपूर्ण आहों-पंगू आहों, ही भावना प्राप्त होते कशी?

किंवा नुसते कोरडे तत्त्वज्ञानी—जोंपर्यंत केवळ आपल्या बुद्धिशक्तीवर किंवा तर्कशक्तीवर सर्व उड्या मारीत असतात, तोंपर्यंत ते या कोड्याचें किंवा प्रश्नाचें असें उत्तर देतात,—'ही भ्रांति (म्हणजे परमात्म्याला जीवात्मपणा येणें ही गोष्ट) आली कशी, हें कांहीं आम्हांला समजत नाहीं.'

साक्षात्कारानें किंवा अपरोक्षानुभवानें जें उत्तर मिळतें, तेंमात्र अगदीं बिनतोड असतें. **माझी आई** (ब्रह्माचें सगुण अंग) असें सांगते, 'मीच, वेदान्तांतील ब्रह्मानेंच, हा सर्व पसारा निर्माण केला आहे. या प्रपंचाचें कारण मीच आहें.' 'मला समजतें,' किंवा 'मला समजत नाहीं,' असें जोंपर्यंत तुम्ही म्हणत असतां, तोंपर्यंत आपण एक व्यक्ति आहों, ही तुमची भावना कायम असते. अशा रीतीनें तुमचें व्यक्तित्व जोंपर्यंत अबाधित आहे, तोंपर्यंत हा सर्व पसारा तुम्हांला खराच धरिला पाहिजे, मिथ्या धरतां कामा नये.

**माझी आई** पुन्हा असें म्हणते, 'व्यक्तित्व, स्वत्व, अहंकार जेव्हां मी अगदीं पुसून टाकत्यें, अहंकाराचा जेव्हां मी अगदी लय कारित्यें, तेव्हांच **परमात्म्याचा** (माझ्या निर्गुण अंगाचा) समाधीमध्यें अनुभव लाभतो.' आणि मग अशा वेळीं मिथ्या कीं अमिथ्या, सत्य कीं असत्य, ज्ञान कीं अज्ञान, हा वादच उरत नाहीं, हे प्रश्नच मुळीं मावळून जातात. **यालाच म्हणतात ब्रह्माचें ज्ञान.**

# बिंदु ९.

## साक्षात्कार आणि नवीन तत्त्व.

( ब्रह्मनिरूपण—पुढे चालू. )

तोंपर्यंत ( आईच्या कृपेनें अहंकार पुसून जाऊन ब्रह्मज्ञानाचा सम्यक्प्रत्यय येईपर्यंत ) माझा 'मी' कायमच असतो; आणि आपल्या मुलांना—भक्तांना—नाना दिव्य रूपांनीं दर्शन देणाऱ्या, श्रीकृष्ण, चैतन्यदेव इत्यादि अवतारी पुरुषांच्या रूपांनीं प्रकट होणाऱ्या, व चोवीस तत्त्वांच्या—जीव व जगत् यांच्या-रूपांनीं नटणाऱ्या माझ्या सर्वसमर्थ आईचें ( सगुण परमेश्वराचें ) साक्षात्स्वरूपही माझ्यापुढें मला दिसत असतें. त्या सगुण स्वरूपाची जाणीवही मला सोडीत नाहीं. होय, सर्व जीवांच्या ठिकाणी 'मी' 'मी' म्हणणाऱ्या व जीवाला संसारपाशांत धडपडत ठेवणाऱ्या अहंकाराचें जूं झुगारून देतां येत नाहीं, तें तरी तिच्याच ( आईच्याच ) प्रभावानें.

उपाग पहिले:— सगुण ईश्वराची आवश्यकता.

दुसरें, माझी आईच भक्ताला भक्तिमार्ग दाखविते, व अविद्येच्या कचाट्यांतून त्याच्या अहंकाराला सोडवून विद्येच्या सुखमय प्रदेशांत आणून सोडते. अशा रीतीनें ती त्या अहंकाराला रेषेचें सूक्ष्मत्व आणिते. शिवाय, तिचें अनन्यसामर्थ्य तर पाहा!

तिच्या मर्जीस आल्यास जीवाच्या ठिकाणचा अहंकार निःशेष पुसून टाकून त्याच्या ठिकाणीं ती ब्रह्मज्ञान उदित करिते. अशी

स्थिति येण्याला तिच्या कृपेनें जीवात्मा व परमात्मा यांची समरसता झाली पाहिजे, जीवात्म्याचा परमात्म्यांत लय झाला पाहिजे.

अहंकाराला झुगारून देण्याचें सामर्थ्य तुमच्या अंगीं नाहीं. ज्यांनीं समाधीमध्यें ब्रह्मरस चाखला, तेसुद्धां आईच्या इच्छेनें, पुन्हा खालच्या पायरीवर उतरतात—पुन्हा जगताची जाणीव त्यांच्या ठिकाणी उत्पन्न होते. व मग सगुण ईश्वराचें अनन्यभावानें ध्यान किंवा चिंतन करण्याइतकी अहंवृत्ति त्यांच्या ठिकाणीं पुन्हा जागृत होते. सप्तसुरांपैकीं 'नी' या सुरावर सारखा स्वर लावून ठेवणें कठिण नाहीं बरें?

जोंपर्यंत व्यक्ति या नात्यानें तुमचें स्वत्व कायम आहे, तोंपर्यंत, परमेश्वराला वाटल्यास, तो तुम्हांला सगुण रूपानें दर्शन देईल. किंवा जोंपर्यंत तुमचें व्यक्तित्व लयाला गेलें नाहीं, तोंपर्यंत सगुणाशिवाय परमेश्वराच्या दुसऱ्या कोणत्याही स्वरूपाची कल्पना, मनन, चिंतन किंवा आकलनही तुम्हांला व्हावयाचें नाहीं. असेंच कांहीं तुमच्या अहंकाराचें स्वरूप आहे. तुमच्या अहंकाराची रचना ही अशी आहे.

सोपाधिक अहंकाराचा—जीवात्म्याचा—परमात्म्यांत लय करणें, हें अद्वैत्याचें साध्य आहे. पण या साध्याची योजना आईनें सामान्य जनांकरितां केलेली नाहीं. कारण, अहंकाराची ही शृंखलाच अशी आहे कीं, ती बहुतेक माणसांना या जन्मांत किंवा पुढेंही कांहीं थोड्याशा जन्मांत तोडतां यावयाची नाहीं.

अद्वैतीं आणि सामान्य जन.

तेव्हां जोंपर्यंत त्यांना ( सामान्य जनांना ) समाधि गांठतां आली नाहीं, तोंपर्यंत सगुण ईश्वराचेंच त्यांनीं एकभावानें भजन व चिंतन केलें पाहिजे. कारण, सत्पुरुष, शास्त्रें व साक्षात्कार हीं एकमतानें आम्हांला अशी ग्वाही देत आहेत, कीं निरुपाधिक ईश्वरच सोपाधिक होऊन—निर्गुण ब्रह्मच सगुण होऊन—मनुष्याला, अंतरंगीं व बाह्यांगीं, प्रतीत होतो. हीं सगुण रूपें कांहीं कमी सत्य नाहींत; उलट शरीर, किंवा मन, किंवा जगत्पसारा यापेक्षां तीं कितीतरी खरीं आहेत. यासाठींच 'सगुण ईश्वराची आवश्यकता आहे,' असें ज्ञानी पुरुष सांगतात.

या सृष्टीच्या ( किंवा उत्क्रांतीच्या ) कार्यांत माझ्या आईनें स्वेच्छेनें माझ्या आत्म्याची ( सोपाधिक आत्म्याची—जीवात्म्याची ) भूमिका घेतली आहे; इतकेंच नव्हे, तर बाह्य सृष्टीच्या किंवा जगताच्या रूपानें तीच अवतरली आहे. एकदां निर्विकल्प समाधीचा अनुभव घेऊन जो जागृतींत येतो, त्याच्या ठिकाणीं अगदीं सूक्ष्म ( केवळ रेषेसारखा सूक्ष्म ) अहंकार शिल्लक राहतो. खरोखर त्याचा अहंकार ( स्वत्व ) इतका दुर्बल असतो, कीं त्याचे दिव्य चक्षु मात्र शाबूद असतात. या दिव्य चक्षूंच्या योगानें त्याला असा प्रत्यय येतो कीं, **माझी आईच** या नाना रूपांनीं—मी स्वतः, इतर जीव व जगत् यांच्या रूपांनीं—नटली आहे.

उपांग दुसरें:— आईचें ( सगुण परमेश्वराचे ) जीव व जगत् यांच्याशीं ऐक्य.

उत्क्रांतिमालिकेंत आंतरबाह्य जगामध्यें चोवीस तत्त्वांच्या किंवा पदार्थांच्या रूपांनीं नटून राहणाऱ्या **माझ्या आईच्या** दिव्य मुखाचें दर्शन प्रत्येकाला घडावयाचें नाहीं; तें दर्शनसुख सर्वांना प्राप्त होणारें नाहीं. निर्विकल्प समाधीमध्यें निर्गुण ब्रह्माचा साक्षादनुभव ज्यानें घेतला, आणि सविकल्प समाधी-मध्यें सगुण व साकार ब्रह्माचा ज्याला प्रत्यय आला, त्यालाच केवळ त्या दिव्य रूपाचें दर्शन व्हावयाचें.

**उपांग तिसरें:—सर्वसमर्थ आई व कर्म; सगुण परमेश्वराच्या द्वारे ब्रह्मज्ञान होईल काय?**

खरें आहे, समाधीमध्यें ज्याची अहंवृत्ति मावळते व ब्रह्माशीं तादात्म्य होऊन त्याचा सम्यक्प्रत्यय ज्याला घडतो, त्याला कोणी तरी **अदृश्य शक्ति** खेंचून पुन्हा खालीं जगांत—जागृतींत—आणिते. कोण बरें ती **अदृश्य शक्ति**? या प्रश्नाच्या उत्तराकरितां आपल्याला पुन्हा **माझ्या सर्वसमर्थ आई-कडेच** वळलें पाहिजे. समाधीमध्यें अहंकार कायम ठेवणें व तो पुसून टाकणें, या दोन्ही गोष्टी केवळ एक तिच्याच हातांत आहेत.

तत्त्वज्ञानी किंवा तार्किक असें म्हणतो, कीं समाधीला पोहों-चलेला योगी त्याच्या कर्मामुळेंच—पूर्वजन्मार्जित कर्मामुळेंच—पुन्हा जगतांत येऊन पडतो; त्याचें कर्मच त्याला जागृतीवर आण-ण्याला कारण होतें.

अर्थात् जोंपर्यंत अहंवृत्ति कायम असते, तोंपर्यंत कर्ता व कर्म ही दुक्कल सुटत नाहीं. त्याचप्रमाणें कार्य व कारण यांचाही लय

होत नाहीं. इतकेंच केवळ नाहीं, तर कोट्यवधि जीव, चोवीस तत्वांनीं युक्त असें हें जगत्, वर्तमानभूतभविष्यादि काल, पूर्व-जन्म, पुनर्जन्म, इत्यादि सर्व भेदाभेद अगदीं सत्य असतात. पण हे भेदाभेद जसे अगदीं सत्य असतात, तसाच या सर्व भेदांना कारण होणारा **सर्वशक्तिमान् ईश्वर–माझी आई—सगुण पर-मात्मा**—हाही अगदीं सत्यच असतो.

साक्षात्कारानें या म्हणण्याला पुष्टि येते. कारण, **आई** असें सांगते, कीं ' या सर्व भेदांना मीच कारण आहें. सत्कर्मे किंवा दुष्कर्मे हीं माझ्याच तंत्रानें चालणारीं आहेत. कर्मांचें बंधन आहे खरें, पण त्या बंधनाला कारण आहें मीच. बंधनें घालणें व तोडणें या दोन्ही गोष्टी माझ्या हातच्या आहेत. सर्व कर्मांवर —सत् किंवा असत् कर्मांवर—सत्ता चालते माझी. तेव्हां तुम्ही सगळे मजकडे या; म्हणजे मी तुम्हांला या संसाराच्या पैलतीराला, या कर्मसागराच्या पैलतीराला घेऊन जाईन. मग तुम्ही कोणत्याही मार्गानें कां मजकडे या ना. भक्तिमार्गानें या; वाटेल तर ज्ञान-मार्गानें या; किंवा कर्ममार्गानें या. तुमची इच्छा असेल, तर मी तुम्हांला ब्रह्माचें ज्ञान करून देईन. समाधीला पोहोंचल्यानंतरसुद्धां जर कर्म शिल्लक असेल, तसेंच शरीर व अहंकार हीं जर कायम असतील, तर असें समजा कीं, तें कर्म, तें शरीर व तो अहंकार हीं कायम राहावीं, अशी व्यवस्था कांहीं विशेष हेतूनें मींच केलेली असते.'

आपल्या मुलांना—आपल्या भक्तांना—या सर्व गोष्टींचें ज्ञान साक्षात्काराच्या द्वारें तिनें (आईनें) करून दिलेलें आहे.

तेव्हां आपल्याला ब्रह्मज्ञान व्हावें, असा जर कोणाचा हेतु असेल, तर तसें ज्ञान आपल्याला करून देण्याबद्दल त्यानें मोठ्या कळवळ्यानें आईची करुणा भाकावी, व आपला भार सर्वस्वीं तिच्यावर टाकून द्यावा—अनन्यगतिक होऊन तिला शरण जावें—कीं, शेवटीं तें त्याला प्राप्त झाल्याशिवाय राहावयाचें नाहीं.

भक्ताला ब्रह्मज्ञान होईल काय ?

ब्रह्मज्ञानाबद्दल असा आतुर होऊन भक्त जेव्हां **माझ्या आई-कडे** (तिच्या कोणत्याही रूपाकडे) येतो, तेव्हां त्याच्या भक्तींत अहंकाराचें मिश्रण असतें, पण शेवटीं, **आईच्या कृपेनें**, समाधी-मध्यें त्याच्या अहंकाराचा पूर्णपणें अस्त होतो.

कर्ता आणि कर्म या भेदाला सगुण ईश्वर (सगुण ब्रह्म)—**माझी आईच** कारण आहे. हा अहंकार समाधीमध्यें नाहींसा करून ब्रह्माचें ज्ञान **तीच** (माझी आईच) करून देते.

**तीच** असें करिते व हें ज्ञान (तीच असें करिते हें ज्ञान) आपल्याला साक्षात्कारानें होतें.

ज्या तत्त्वज्ञाचा साक्षात्कारावर त्याचप्रमाणें तर्कबुद्धीवरही भरंवसा नसतो, तो असें म्हणतो कीं, ‘सगुण ईश्वराच्या द्वारें जीवात्म्याला मुक्तीचा किंवा ब्रह्मज्ञानाचा लाभ कधींही व्हावयाचा नाहीं.’

'ब्रह्माचें ज्ञान माझें मलाच करून घेतां येण्यासारखें आहे,' असें जेव्हां तत्त्वज्ञ किंवा ज्ञानी पुरुष म्हणतो, तेव्हां तो खालच्या स्थितींतच (सापेक्ष किंवा दृश्य जगतांत)—मी आणि तूं हा भेद जेथें कायम असतो अशा स्थितींतच—असतो. त्या स्थितींत तुम्हांला स्वभावतःच **सगुण ईश्वराचें—माझ्या सर्वसमर्थ आईचें**—अस्तित्व मान्य केलेंच पाहिजे.

जीवाला आपल्या संकुचित बुद्धीच्या जोरावर ब्रह्माचें ज्ञान स्वतांच करून घेतां येतें, आणि **माझ्या आईलामात्र** तें ज्ञान करून देण्याचें सामर्थ्य नाहीं, किंवा जीवाचे अंगीं स्वतः मुक्तिपद गांठण्याचें सामर्थ्य आहे व त्या मुक्तिपदावर जीवाला नेऊन बसविण्याचें सामर्थ्य **माझ्या सर्वसमर्थ आईच्या** अंगीं-मात्र नाहीं, हें म्हणणें अगदीं विलक्षण दिसतें.

सगुण व निर्गुण हीं एकाच व्यक्तीचीं अंगें आहेत, ही गोष्ट ते तत्त्वज्ञ विसरून जातात. जोंपर्यंत आम्हांला आमच्या व्यक्तित्वाची—स्वत्वाची किंवा अहंकाराची—जाणीव असते, तोंपर्यंत परमेश्वर आम्हांला आपलें अनंतशक्ति सगुण रूपच दाखविणार. अर्थात् त्याच्या त्या अनंतशक्तींत ब्रह्माचें ज्ञान करून देण्याच्या शक्तीचाही अंतर्भाव होतो.

पण केवळ तर्कबुद्धि हा किती तरी लेचापेचा वाटाड्या आहे! एकट्या तर्कबुद्धीची कास धरून चालणें, हें किती तरी अनिश्चितपणाचें किंवा बेभरंवशाचें आहे!

शिवाय ज्या तर्कबुद्धीवर तत्त्वज्ञाची सारी भिस्त किंवा मदार असते, ती त्याची तर्कबुद्धि तरी प्राप्त होते सगुण ईश्वरापासूनच.

तेव्हां केवळ अद्वैतवादी जे आहेत त्यांच्या मतांत **एका नवीन तत्त्वाची भर पडली. तें नवीन तत्त्व म्हणजे हेंच कीं, ब्रह्माचें ज्ञान सगुण ईश्वराचे द्वारें होतें;** किंवा **ब्रह्माचें ज्ञान करून देण्याचें सामर्थ्य सगुण ईश्वराचे अंगीं आहे.**

उपांग चवथें:—मनुष्यानें ब्रह्माचें नांव काढलें की त्याला सापेक्षत्व आलेंच.

अहंभाव पूर्णपणें विरून जाऊन समाधीमध्यें ब्रह्मसाक्षात्कार झाला आणि ब्रह्माचें अस्तित्व किंवा नास्तित्व यासंबंधानें कांहीं प्रतिपादन न करितां तुम्ही निःशब्द झालां, कीं तेंच शुद्ध ज्ञान. अद्वैता-संबंधानें बोलण्याला तुम्हीं सुरुवात केली रे केली, कीं द्वैत डोकावलेंच. कारण, **एक** आला कीं **दुसराही** आलाच. **एक** असें म्हटल्याबरोबर **दुसऱ्याचें** अस्तित्व आपो-आपच शाबीत होतें. अद्वैताविषयीं शब्द निघाला, कीं द्वैत गृहीत झालें.

ब्रह्म बोलण्यांत आलें, कीं त्याच्यामागें सापेक्षत्व लागलेंच. कारण निरुपाधिक अशा शुद्ध ब्रह्माचा समाधीमध्यें जोंपर्यंत तुम्हांला प्रत्यय आला नाहीं, तोंपर्यंत तें तुमचें निरुपाधिक ब्रह्म (शब्दांतलें) म्हणजे फार झालें तर 'सोपाधिक' याच्या उलट अर्थाची एक वस्तु होईल; किंवा मुळाक्षरांतील कांहीं अक्षरें एकत्र येऊन बनलेला नुसता एक शब्द होईल, इतकेंच!

नित्याविषयीं आपण बोलूं लागलों, कीं हें लीलामय जग पुढें उभें राहणार. अव्यक्त शब्द उच्चारल्याबरोबर व्यक्ताची भावना सुटणार नाहीं. उदाहरणार्थ, प्रकाश आला, कीं त्याच्या उलट जो अंधकार त्याची कल्पना यावयाचीच; किंवा सुख म्हटलें, कीं दुःखाची आठवण ही आपली व्हावयाचीच.

जगताचा अनित्य किंवा लीलामय भाग ज्याचा आहे, त्याचाच नित्य भागही आहे. नित्य भाग ज्याचा आहे, त्याचाच अनित्यही आहे. ( नित्य व अनित्य हीं एकाच व्यक्तीचीं दोन अंगें आहेत.)

नित्याकडे आपल्याला जावयाचें झालें, तर अनित्यांतून—या दृश्य जगांतून—मार्ग काढीत काढीतच आपल्याला गेलें पाहिजे. बरें, नित्यापासून आपण निघालों, कीं मार्ग काढीत काढीत परत अनित्यांतच—दृश्य जगतांतच—येणार. ( मात्र नित्याकडे एकदां आपण जाऊन आलों, कीं हें दृश्य जगत् पूर्वींप्रमाणें मिथ्या न वाटतां, तें **नित्याचें** किंवा **अव्यक्ताचें** केवळ व्यक्त रूप आहे, असें आपल्या दृष्टीला दिसूं लागतें. )

ब्रह्माचें स्वरूप कसें आहे, हें तुम्ही सांगूं लागलां, कीं त्याचें यथार्थ निरूपण किंवा प्रतिपादन बहुधा तुम्हांला करितां येणार नाहीं. तुमच्या हातून त्याच्यावर भलत्याच गोष्टीचा—तुमच्या स्वत्वाचा किंवा अहंकाराचा—अध्यास होणारच. तुमच्या स्वत्वाचीं पुटें किंवा रंग त्याच्यावर चढल्याशिवाय राहणार नाहींत.

तात्पर्य एवढेंच, कीं आपल्याला सगळी भिस्त पुन्हा साक्षा-

त्कारावर टाकली पाहिजे. परमेश्वरच ( माझी आईच ) असें म्हणतो, कीं, ' सगुण ईश्वर तो मीच, समाधीमध्यें अनुभवास येणारा निर्गुण ईश्वर ( ब्रह्म ) तोही मीच .'

असें पाहा, कीं ताकाचें अस्तित्व कबूल केल्यावांचून आपल्याला लोण्याची कल्पना करितां येणार नाहीं, किंवा लोण्याचें नांवही काढतां येणार नाहीं. लोणी हें जसा ताकाचा भाग आहे, तसेंच ताक हें लोण्याचा भाग आहे. लोणी म्हटलें, कीं सापेक्षपणें ताकाची कल्पना जशी येणारच, तसेंच ताक म्हटलें, कीं सापेक्षपणें लोण्याची कल्पना आल्यावांचून राहावयाची नाहीं.

शांकरमतानुयायांचा मायावाद आणि कपिलप्रणीत सांख्यमतानुयायाचा परिणामवाद किंवा उत्क्रांतिवाद यांचा, व अद्वैत आणि विशिष्टाद्वैत यांचा समन्वय.

व्यक्तित्व जोंपर्यंत कायम आहे—भावना जोंपर्यंत जिवंत आहे आणि थोडा तरी विकल्प जोंपर्यंत शिल्लक आहे—तोंपर्यंत लोणी व ताक या दोहोंचेंही अस्तित्व तुम्हांला कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

जोंपर्यंत तुमचें व्यक्तित्व सुटलें नाहीं, जोंपर्यंत आईच्या इच्छेनें तुमचा अहंकार शाबूद आहे, तोंपर्यंत तुम्हीं ' निरुपाधिक ' असें म्हटलें, कीं ' सोपाधिक ' पुढें येणार; ' नित्य ' म्हटलें, कीं ' अनित्य ' पुढें उभें राहणार; तुम्हीं ' वस्तु ' असें म्हटल्याबरोबर तिचे गुण लागलेच पुढें सरसावणार; तुम्हीं ' निर्गुण ' आणलें, कीं ' सगुण ' तुमच्या पाठीस लागणार; ' एक ' म्हटलें, कीं ' अनेक ' जोडीला उभें राहणार.

आईनें समाधीमध्यें तुमचा अहंकार (व्यक्तित्व) नाहींसा करून टाकला, कीं ब्रह्माचा सम्यक्प्रत्यय आलाच. मग सगळे शब्द बंद; आणि तेथें जें कांहीं असेल, तें तेथल्या तेथेंच. कारण समुद्राचा ठाव काढण्याकरितां गेलेली मिठाची बाहुली अनंत महासागराशीं तद्रूप झाली, कीं मग (त्या समुद्रासंबंधानें) कांहींच बोलत नाहीं.

ही स्थिति दृष्टन्तानें वर्णन करणें जर शक्य झालें, तर आपल्याला असें म्हणतां येईल, कीं मूळ दूध म्हणजे समाधीमध्यें अनुभवास येणारें ब्रह्म, लोणी म्हणजे त्या अव्यक्त ब्रह्माचें व्यक्त किंवा सगुण रूप आणि ताक म्हणजे चोवीस तत्त्वांनीं युक्त असें हें जगत्.

उपाग पांचवेः-भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग हे दोन्हीं ब्रह्मज्ञानाला पोंचवितात.

श्रद्धा व प्रार्थना यांचा परिणाम किंवा जोर.

माझ्या आईनें (ब्रह्माच्या सगुण अंगानें) असें सांगितलें आहे कीं, ' मी वेदान्तांतील ब्रह्म आहें. ब्रह्मज्ञान देणें माझ्या हातीं आहे. अहंकार पुसून टाकून व समाधीमध्यें ब्रह्मसाक्षात्कार घडवून मी तें ज्ञान करून देत्यें. ' एवंच, पहिलें असें आहे, कीं, आईची कृपा झाल्यास, ज्ञानमार्गानें तुम्हांला ब्रह्मपद गांठतां येईल. पण या मार्गानें जाणें, विशेषेंकरून या कलियुगांत, फारच थोड्यांना साधतें. कारण आपल्या अंगीं भिनून राहिलेल्या देहात्मबुद्धीला सोडणें हें तसेंच [१] कठिण आहे.

---

१ क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ १ ॥ (भगवद्गीता.)

किंवा, ' आम्हांला भक्ति व ज्ञान दे, ' अशी ( **आईची** ) **प्रार्थना** करून—करुणा भाकून—तुम्हांला ( ब्रह्माकडे) जातां येईल. आत्मसमर्पण, शुद्ध प्रेम, इत्यादि भक्तीचीं अनेक आंगें आहेत. पहिल्यानें त्यांच्या ( भक्तीच्या अंगांच्या—नवविधा भक्तीच्या ) द्वारानें **माझ्या आईकडे** ( सगुण परमेश्वराकडे ) जा.

मी अशी तुम्हांला खात्री देतों, कीं तुमची प्रार्थना शुद्ध भावाची जर असेल, तर **माझी आई** तिकडे कान दिल्याशिवाय—ती मान्य केल्याशिवाय—कदापि राहणार नाहीं. **तुम्हीं धीरमात्र धरला पाहिजे**. कारण, आपल्या मुलांना—भक्तांना—तिनें तसा साक्षात्कारच दिला आहे.

बरें, तिच्या निर्गुण अंगाचा जर तुम्हांला साक्षात्कार हवा असेल, तरीही तिचीच मनधरणी करा. जर कां ती वळली, जर कां तुमच्यावर कृपा करण्याचें तिनें मनांत आणलें—कारण, ती आहे सर्वसमर्थ—तर तिचें निर्गुण अंगही समाधीमध्यें तुह्मांला अनुभवितां येईल. बरें, हा अनुभव म्हणजेच ब्रह्मज्ञान.

मात्र, मला येथें हें सांगितलें पाहिजे, कीं भक्त जो आहे तो ईश्वराचें—**माझ्या आईचें**, किंवा श्रीकृष्ण, चैतन्यदेव वगैरे तिच्या अवतारांपैकीं एकाद्याचें, किंवा तिच्या अनंत दिव्य रूपांपैकीं एकाद्या रूपाचें—केवळ दर्शन झालें, कीं सामान्यपणें अगदीं संतुष्ट असतो. निर्गुणाचा अनुभव यावा, असें भक्ताला कांहीं साधारणपणें वाटत नाहीं.

भक्ताची इच्छा.

समाधीमध्यें आपला अहंकार सर्वस्वीं लुप्त होऊं नये, ही त्याची अगदीं मोठी इच्छा असते. आपल्या उपास्याच्या मूर्तीचें सानंद होऊन दर्शनसुख अनुभवण्याइतका आपला अहंभाव कायम राहावा, यांतच त्याला संतोष असतो. साखरेशीं एक-रूपता पावण्यापेक्षां—साखरेंत मिळून जाण्यापेक्षां—निराळेपणानें साखरेची गोडी घेत बसणें, हें त्याला बरें वाटतें.

अशा भक्ताला **माझी आई** सगुण रूपानें—साकार होऊन—दर्शन देते; कारण भक्तांवर—आपल्या मुलांवर—तिचा फार जीव असतो. ( देव भावाचा भुकेला । भक्तासाठीं वेडा झाला ॥—तुकाराम. )

उपांग सहावे.—अपरोक्षानुभव: दिव्य दृष्टीचीं लक्षणें.

देवतेच्या रूपाचें ज्याला पूर्णपणें आकलन झालें—देवतेच्या प्रत्यक्ष दर्शनाचें सुख ज्यानें अनुभविलें—त्यानें अपरोक्षानुभूतीचा हट्ट धरलाच पाहिजे; कारण परमार्थांत महत्त्वाची बाब काय ती तीच.

‘मला ईश्वराचें स्वरूप समजलें—सबाह्याभ्यंतरीं व्यापून असणारें ब्रह्म मीं जाणलें. होय, मला दिसणारी प्रत्येक वस्तु—पुरुष, स्त्री, पशु, पक्षी, वृक्ष, फूल, पाषाण, सर्व कांहीं—ईश्वरस्वरूपच आहे! मी केवळ आनंदाची—सुखाची—मूर्ति आहें. मी सुखदु:खातीत आहें. सोऽहम्! सोऽहम्!’ वगैरे. अशीं वाक्यें प्रथमपासून बोलत सुटण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

**पहिल्यानें हातून साधन** झालें पाहिजे. त्याशिवाय गत्यन्तर नाहीं. त्यावांचून खरी भक्ति अंगीं मुरणार नाहीं. जोंपर्यंत साध-

नाचें संपादन झालें नाहीं, तोंपर्यंत कितीही आपण ओरड केली, तरी ब्रह्मज्ञानाचा गंधही लागावयाचा नाहीं. तोंपर्यंत सर्व बोलणें फोल होईल व डोलणें वायां जाईल.

कारण, तो ब्रह्मज्ञानाचा ठेवा सुरक्षितपणें जामदारखांन्यात ठेवलेला आहे व त्याला मजबूद कुलूपही घातलें आहे. त्या जामदारखान्याचें कुलूप तुम्हीं खोंललें नाहीं. 'मीं तें कुलूप उघडून जामदारखान्यांत पाऊल टाकलें. पाहा, टाकला मीं त्या ठेव्यावर हात! किती तरी तेजदार रत्नें, हिरे, माणकें हीं! हीं पाहा, लागलीं तीं सर्व माझ्या हातीं!' असे उद्गार तुम्हांला मुखानें (जोंपर्यंत हातून साधन घडलें नाहीं तोंपर्यंत) काढतां येणार नाहींत.

ज्या पुण्यात्म्याला परमेश्वराच्या दिव्य मूर्तीचें साक्षाद्दर्शन झालें, त्याची वृत्ति बालाप्रमाणें सरळ व साधी बनते. त्याला जग निराळ्याच स्वरूपाचें दिसूं लागतें. या जगाची नामरूपात्मक भिन्नता त्याला भासेनाशी होते. पुढें प्रकट झालेलें दिव्य रूप पाहून भक्तीच्या मद्यानें तो बहुधा बेभान होतो. **पावित्र्याच्या जिवंत झऱ्याशीं** त्याचें तादात्म्य होऊन जातें. यामुळें बहुधा 'शुचि' व 'अशुचि' यांतील भेदाची बुद्धि त्याची मावळून जाते.

अखेरीस, त्याची जागृति मधून मधून जाऊं लागते व समाधीमध्यें त्याची जडासारखी अवस्था होते.

अपरोक्षानुभव येईपर्यंत मनुष्यानें शुद्ध राहिलें पाहिजे व जगाचा—कामिनी व कांचन यांचा—त्याग केला पाहिजे.

# बिंदु १०.

## श्रीरामकृष्ण व भक्तियोग.

सगुण परमेश्वराची आवश्यकता:—जीविताचा प्रश्न सोडविण्याचा मार्ग.

ब्रह्मज्ञानाचा मार्ग रुद्ध करणारा जो हा 'मी' त्याची भावना सुटणें किती तरी कठिण आहे! विज्ञानाला पोहोंचून आत्मा जरी मुक्त झाला, तरी त्याला कोणी **अदृश्य शक्ति—माझी आई—खेंचून** परत जागृतींत आणते. व अशा वेळींसुद्धां त्याला ही 'मी'-ची भावना बिलगलेली असते—मग ती अगदीं सूक्ष्मावस्थेंत कां असेना —हें मीं पूर्वीं सांगितलेंच आहे.

समजा, स्वप्नांत तुम्हीं वाघ पाहिला, तर तुमची काय अवस्था होते? तुम्ही नखशिखान्त कांपूं लागतां. तुमची छाती जोरानें धडधडूं लागते. पुढें जागृतींत आल्यावर आपण पाहिलें तें केवळ स्वप्न, अशी तुमची खात्री होते. पण अशी खात्री झाल्यानंतरसुद्धां अगदीं जागेपणीं तुमची छाती धडधडतच असते.

पक्का 'मी.'

असें जर आहे,—जर ही 'मी'-ची भावना कांहीं केल्या आपल्याला सोडीत नाहीं,—तर पुढें करावें काय? कां बरें? त्याच्या पाठीमागें एकच उपाधि लावून द्यावी. कोणती? तर **त्याला राम-दास बनवून** ठेवून द्यावें. संसारी जनांना 'मी आणि माझें' याचा जो छंद लागलेला असतो, तो अविद्यामूलक किंवा अज्ञानमूलक

आहे. सर्व कांहीं ईश्वराच्या इच्छेनें चालतें. 'मी भूपति आहें,' 'मी धनी आहें,' 'या सर्व वस्तु माझ्या आहेत,' असें मनुष्यानें म्हणणें केवळ हास्यास्पद आहे.

पुढील दोन प्रसंगीं तर परमेश्वराला हसूंच येतें:—

एकादा मनुष्य अजारी पडून अगदीं मरणोन्मुख व्हावा. त्याची आई अगदीं शोकाकुल झालेली असावी. अशा वेळीं वैद्यराज पुढें होऊन तिला काय बरें सांगतात? ते म्हणतात, 'बाई, यांत काळजी करण्यासारखें कांहीं नाहीं. तुमच्या मुलाला उठविण्याचें काम **माझ्याकडे** लागलें.' त्या मुलाभोंवतीं मृत्यूचें जाळें परमेश्वर पसरीत आहे, ही कल्पना त्या बिचाऱ्या वैद्याच्या स्वप्नींही येत नाहीं. त्या वैद्याच्या दर्पोक्तीला हासून परमेश्वर असें म्हणतो, 'या मनुष्याला मृत्यूच्या मुखांत लोटीत आहें मी; आणि '**मी** तुमच्या मुलाला उठविणार,' असें हा मूर्ख बेटा वैद्य सांगत आहे.'

दुसरें, दोन भाऊ आपल्या स्थावर मिळकतीची वांटणी करीत असतात. ते सांखळी घेऊन सर्व जमीन मोजतात. तिचे दोन विभाग पाडतात; आणि 'हा भाग माझा, आणि तो तुझा,' असें म्हणतात. पण परमेश्वर हासून म्हणत असतो कीं, 'काय या मूर्खांना सांगावें तरी! ही जमीन आमची, असें हे म्हणतात! जमिनीचा प्रत्येक तुकडा **माझा** आहे, हें कांहीं यांच्या लक्षांत येत नाहीं.'

श्रीमंत माणसाचे बाग असतात; व त्या बागांवर माळी नेमिलेला असतो. बाग पाहण्याकारितां कोणी मोठा मनुष्य आला म्हणजे तो माळी त्याच्या मागें मागें फिरून मोठ्या डौलानें व अभिमानानें बागाचे निरानिराळे भाग व तेथील बंगला त्याला दाखवितो. व तोंडानें असें सांगत असतो, 'हें पहा, महाराज, हीं **आमचीं** हपूसचीं कलमें. इकडे हीं **आमचीं** पायरीचीं आहेत. तीं तिकडे **आमचीं** पेरूचीं, डाळिंबाचीं, पपनसाचीं, जांबाचीं वगैरे अनेक झाडें आहेत. हा **आमचा** दिवाणखाना,–या पहा **आमच्या** तसबिरी. किती तरी चांगल्या आहेत या!' वगैरे वगैरे.

श्रीमंत मनुष्य व त्याचा माळी–एक दृष्टांत.

समजा, पुढें कांहीं कारणानें त्या माळ्यावर धन्याची गैरमर्जी झाली. पुढें तो त्याचें काय बरें करितो? दुसरें काय? लाथ मारून तो त्याला बागांतून घालवून देतो. त्याची गाडगींमडकीं उचलण्यालासुद्धां तो त्याला अवकाश देत नाहीं!

जो माळी 'आमचें हें' आणि 'आमचें तें' असें मोठ्या हौसेनें व अभिमानानें सांगत होता, त्याची ही अवस्था बरें, लक्षांत ठेवा!

त्या माळ्याचें हें 'माझें' (किंवा 'आमचें') अज्ञानमूलक नव्हे काय?

**बुद्धि ही पंगू आहे. श्रद्धा सर्वसमर्थ आहे. बुद्धि फारशी चालत नाहीं. ती थकून कुठेतरी थांबणार. श्रद्धा अघटित कार्यें घडवून आणते.**

होय, श्रद्धेच्या जोरावर माणसाला अपार महोदधि लीलेनें तरून जातां येईल.

श्रद्धेचे कर्तुमकर्तु सामर्थ्य.

रामचंद्राला लंकेला जाण्याकरितां समुद्रावर सेतु बांधण्याचे प्रयास करावे लागले. पण जणूं काय, श्रद्धेचें अपार सामर्थ्य जगाच्या दृष्टोत्पत्तीला आणून देण्याकरितां त्यानें आपल्या भक्ताला—हनुमंताला—केवळ श्रद्धेच्या जोरावर तो समुद्र उल्लंघून जाण्यांत यशस्वी केलें !

एक भक्त होता. तो बिभीषणाचा मोठा दोस्त. त्याला समुद्र तरून जावयाचें होतें. तेव्हां त्यानें बिभीषणाकडे साहाय्यार्थ याचना केली. बिभीषणानें काय केलें? त्यानें एक पान घेऊन आपल्या मित्राला न कळत त्यावर **राम-नाम** लिहिलें. नंतर तो त्या भक्ताला—आपल्या मित्राला—म्हणाला. 'हें घे. हें घट्ट आपल्या पदराला बांध. याच्यायोगानें तुला निर्धास्तपणें समुद्रावरून चालत जातां येईल. पण, संभाळ हो ! तें पान उघडून पाहण्याचा प्रयत्नमात्र करूं नको बाबा. कारण तूं तें उघडलेंस रे उघडलेंस, कीं तत्काळ खालीं जाशील.'

त्या भक्तानें आपल्या मित्राच्या शब्दांवर विश्वास (श्रद्धा) ठेविला. व तो सुरक्षितपणें कांहीं वेळपर्यंत समुद्रावरून चालत गेला. पण पुढें त्याच्या दुर्दैवानें त्याला दुर्बुद्धि आठवली ! जिच्या सामर्थ्यावर आपल्याला एवढा मोठा सागर सहज चालून जातां

येतो, अशी ही आपल्या पदराला बांधलेली अद्भुत चीज आहे तरी काय, हें पाहावें, अशी कल्पना त्याचे डोक्यांत आली. त्यानें तें पान उघडलें; आणि लागलीच स्वारी पाण्याच्या खालीं!

तेव्हां, श्रद्धा ही कर्तुमकर्तुंसमर्थ आहे. तिच्यापुढें सृष्टीचे सर्व जोर लटपटून लुले पडतात! तिच्या बळावर तुम्हांला अगदीं बिनधास्त व सुरक्षितपणें मेरूचें उल्लंघन करितां येईल, समुद्र तरून जातां येईल. इतकेंच नव्हे; तर पाप, अन्याय, अज्ञान, संसारासक्ति वगैरे सर्व तिच्यापुढें बारा वाटांनी पळून जातात. नंतर महाराज गाऊं लागले:—

## पद.

### नाममहिमा.

(चालः—लग्नाला जातो मी०.)

**दुर्गे मृतिसमयीं नाम घेइ वैखरी।**
**मृत्यु न दे भीति मला, सत्य शांकरी ॥ ध्रु० ॥**
**भवसागरपैलतीर, दाव, न वा मज सत्वर।**
**पाहिन किति तें विदूर, देवि शांकरी ॥ १ ॥**
**धेनुस्त्रीगर्भवध, मधुपान, ब्रह्मवध।**
**पापं नच करिति रोध, मजसि शांकरी ॥ २ ॥**
**नाम जरी मुखिं निवसे, पापांची भीति नसे।**
**ब्रह्मपदप्राप्ति असे, सत्य शांकरी ॥ ३ ॥**

पहा, धर्ममार्गाचें आक्रमण श्रद्धेच्या जोराचा पाठिंबा असल्यावांचून कदापि व्हावयाचें नाहीं. बाकी कांहीं नसलें तरी चालेल; **फक्त अंगीं श्रद्धा पाहिजे.**

ईश्वरावर श्रद्धामात्र ठेवा, कीं कितीही घोर पापें तुम्हीं आचरलीं असलीं, तरी तीं तत्काळ भस्म होऊन जातील.

## पद.

### श्रद्धामहात्म्य.

( **चाल**:—सगुण गुणमाया । आली कोल्हाटिण खेळाया. )

**चिंति मन जेवीं । भावही प्रकट हो तेवीं ॥ ध्रु.॥**
**मूलारंभीं प्रत्यय ज्याला,**
**भावसदृश हो लाभ तयाला,**
**कालिपदसुधान्हदिं जो न्हाला,**
**व्यर्थ तयाला । यागादिक भासे मजला ॥ १ ॥**

माझ्या आईचा–विश्वेश्वरीचा–भक्त या लोकींच भवबंधनांतून सुटतो–जीवन्मुक्त होतो. तो केवळ आनंदस्वरूपच असतो.

मुख्य श्रद्धा पाहिजे. तशीच भक्तिही. ईश्वराच्या साहाय्यावांचून–साक्षात्कारावांचून–नुसत्या विचाराच्या–सदसद्विवेकाच्या––जोरावर आईची प्राप्ति होणें, विशेषतः या कलियुगांत, अत्यंत कठिण आहे.

रामप्रसादानें (प्रसिद्ध बंगाली स्तोत्रकार) 'काय तत्त्व अनुसरुनि मना तूं'–या आपल्या लोकप्रसिद्ध पद्यांत या मुद्यावर जो विशेष जोर दिला आहे, तो उगीच नाहीं. असें म्हणून महाराज गाऊं लागले:—

## पद.

### सगुण व निर्गुण यांचें ऐक्य; ज्ञानयोगाचें काठिण्य.

( चालः—अर्धतनु वारुळीं बुडाली०. )

काय तत्त्व अनुसरुनि मना तूं उन्मत्ताचे परी,
विहरसी तमोगृहाभ्यंतरीं ॥ ध्रु० ॥
भावविषय काली ती, तिजला पामर नर हा धरी,
नाहीं भाव मनोभ्यन्तरीं ।
द्वारपाल शशि वशीभूत कर, वेंचुनि शक्ति बरी,
तरिच हो प्रवेश तव अंतरीं ।
तेथें गुप्तकपाटीं वसे,
काली साध्य न निगमा दिसे,
थकती आगम तेथें तसे,
दर्शनतंत्रां लाभ तियेचा अशक्य वाटे मना,
सोडुनि दे तूं त्या कल्पना ॥ काय० ॥
भक्तिरसाचा रसिक पुरा जो, निवसे देहामधीं,
जयाच्या आनंदाचा निधी ।
भाव साध्य करण्या तो योगी निमग्न योगामधीं,
युगिं युगीं ध्यान न सोडी कधीं ।
होतां भावोदय मानसीं,
लोहा चुंबक काली तशी,
कां सांगूं माता कशी ?
'प्रसाद' बोले, उघडुं मूठ कां मिटलेली जी असे,
विचारीं, तत्त्वचि शोधीं कसें ॥ काय० ॥

हें पद्य सर्व कसे अगदीं तटस्थ वृत्तीनें ऐकत होते. प्रत्येकाचें अंतःकरण ; अगदीं हालून गेलें. पद्य संपल्यावर कोणीच कांहीं

बोलले नाहीं. सर्वत्र कशी स्तब्धता नांदत होती. **महाराजांचें** मन बराच वेळपर्यंत आईच्या पदकमलीं गुंगून राहिलें होतें.

*    *    *    *    *

**महाराज** ( विद्यासागरांना ):—बरें, देवतेसंबंधानें आपली काय कल्पना आहे ?

**विद्यासागर** ( सर्व मंडळीकडे एकवार दृष्टि फेंकून ):—माफ करा, महाराज, याविषयीं आपल्याजवळ बोलण्याला मला एकट्यालाच केव्हां तरी दुसरा एखादा प्रसंग साधला पाहिजे! ( हशा ).

**महाराजः**—आपल्याला तें सगळें ठाऊक हें असलेंच पाहिजे. फक्त, आपल्याला त्याची मोठीशी किंमत वाटत नाहीं. सागराधिपति जो वरुण त्याची अगणित संपत्ति असते;–किती तरी सोनें, हिरे, माणकें. पण आपल्या साम्राज्यांतील–आपल्या रत्नाकरांतील–सर्व रत्नांची माहिती सागराधिपतीला असावी, असें थोडेंच आहे !( हशा ).

बरें, एकादा श्रीमान् जमीनदार असला, तर पुष्कळ वेळा त्याला त्याच्या नोकरांचीं नांवेंही धड ठाऊक नसतात ! ( हशा ).

असल्या हलक्या लोकांचा परिचय करून घेणें म्हणजे आपल्या मोठेपणाला बट्टा आणणें आहे, असें त्या जमीनदाराला वाटतें ! ( हशा ).

*    *    *    *    *

**महाराज** ( विद्यासागरांना ):—आपण एकदां ( दक्षिणेश्व-

रच्या ) बागेंत नाहीं का येणार ? तें रम्य स्थान आहे, फारच भव्य आणि सुंदर.

**विद्यासागरः**—अवश्य. आपण येण्याचा मजवर अनुग्रह केला; तेव्हां आपल्या भेटीला येणें, हें माझें कर्तव्यच नाहीं का ?

**महाराज** ( हासून ):—माझ्या भेटीला ! केवळ लाजवितां आपण मला !

**विद्यासागरः**—महाराज, काय हें ! आपण असें बोलावें ! याचें कारण विचारणें मला जरूरच आहे.

**महाराजः**—हें पाहा, पंडितजी, मी सांगतोंच आपल्याला काय तें. आम्ही म्हणजे केवळ मच्छीमाऱ्यांच्या होड्या, लहान आणि हलक्या, वाटेल तेथें जाण्याला तयार ! ( हशा ). आपण आहांत मोठ्या कोठ्यांसारखे[1] ! आपण जर नदींत भलतीकडे गेलां, तर एकाद्या वाळूच्या ताऱ्यांत[2] रुतून पडाल कदाचित्, कोणी सांगावें ! ( हशा ). बाकी आजच्या प्रसंगाची गोष्ट कांहींशी वेगळी आहे. नाहीं का ? ( हशा ).

**विद्यासागर** ( हांसून ):—हो, बरोबरच आहे. आलें माझ्या ध्यानांत. पर्जन्यवृष्टि नुकतीच झाली आहे ! ( हशा ).

---

१ कोठ्या=व्यापारी मालाची ने-आण करणारे मोठें गलबत.

२ तारा=पाण्यांत कुठे कुठे मध्येंच जमिनीचा भाग वर आलेला असतो; व त्यामुळें तेथें पाणी उथळ असतें. नावाडी गैरमाहीत असले म्हणजे त्या ठिकाणीं त्यांची गलबतें लागून पडतात. अशा भागाला ‘ तारा ’ असें पारिभाषिक नांव आहे.

## प्रयाण.

रात्रीचे आठ वाजण्याचा सुमार झाला. दक्षिणेश्वर येथील ठाकूरवाडींत **महाराजांना** परत घेऊन जाण्याकारितां गाडी तयार झाली. **महाराज** कांहीं वेळ ध्यानस्थ झाले. त्यांनीं **आईचें** ध्यान केलें असावें. आपल्या यजमानांवर (पंडितजींवर) कृपादृष्टि ठेवण्याबद्दल त्यांनीं **तिची** प्रार्थना तर केली नसेलना?

तो श्रावण महिन्याचा कृष्णपक्ष होता. **महाराज** जाण्याकारितां उठले. विद्यासागर हातांत कंदील घेऊन व पुढें होऊन जिन्यावरून, आपल्या परसूंमधून फाटकापर्यंत आले. तेथें **महाराजांना** व त्यांच्या शिष्यमंडळीला ठाकूरवाडीला घेऊन जाण्याकारितां गाडी उभी होती.

मंडळी जेव्हां फाटकाशीं आली तेव्हां त्यांच्या डोळ्यांना एक विलक्षण देखावा दिसला. सुमारें चाळिशीच्या घरांतला एक मनुष्य तेथें उभा होता. त्याचे दोन्ही हात जोडलेले होते. त्याचा सर्व पोषाख पांढरा शुभ्र असून डोक्याला पांढराच पण शिखी (शीख तऱ्हेचा) फेटा होता. त्याचा चेहरा हास्ययुक्त, वर्ण गोरा व डोळे पाणीदार होते. **महाराजांना** पाहिल्याबरोबर अगडबंब फेटा धारण केलेलें तें आपलें शिर जमिनीला लावून तो त्यांच्या चरणीं लीन झाला.

**महाराजः—कोण? बलराम, तूं का हा? अरे, तूं इथे कसा?**

**बलराम** (हासून):—महाराज, आपल्याच पायांच्या दर्शना-कारितां मी या फाटकापाशीं बराच वेळ उभा आहें.

**महाराजः**—अरे! मग आंत कां नाहीं आलास?

**बलराम** (हासून):—मी उशिरां आलों; तेव्हां मध्येंच येऊन आपल्याला त्रास द्यावा, हें मला बरें वाटलें नाहीं; म्हणून इथेंच उभा राहिलों झालें.

महाराज शिष्यवर्गासह गाडींत बसले.

**विद्यासागर** (एमला):—गाडीवाल्याला भाडें देऊं का मी?

**एम्ः**—अंहः? पंडितजी, आपण कांहीं तसदी घेण्याचें कारण नाहीं. तें एकानें आगाऊच दिलेलें आहे.

नंतर पंडितजींनीं हात जोडून व पुष्कळ वांकून **महाराजांना** प्रणाम केला. इतर मंडळीनेंही तसेंच केलें. गाडीवाल्यानें चाबूक फडकावून घोडे सोडले; व गाडी धडधडत उत्तरेकडे चालूं लागली. हातांत कंदील घेतलेले **पंडित विद्यासागर** फाटकाशीं जमलेल्या इतर मंडळीसह कांहीं वेळ तिकडेच पाहात उभे राहिले. विस्मयानें दंग होऊन त्यांच्या मनांत पुढील विचार आलेः—काय या स्वस्व-रूपीं रंगलेल्या माणसाला म्हणावें तरी! इतका ज्ञानी, पण बाला-प्रमाणें सरळ! किती गोड! किती आनंदी! किती भक्तिपरायण!

संसाराची हमाली करून कोरड्या ठणठणीत व मृतवत् झालेल्या पृथ्वीवरील लोकांत संजीवन भरून त्यांना तेजःसंपन्न करून सोडण्या-करितां प्रत्यक्ष विद्युत् तर याच्या रूपानें अवतरली नाहीं ना? मनु-

ण्याच्या शुष्क व तृषाक्रांत अंतःकरणाला दंवाप्रमाणें आर्द्रता आणण्याकरितां **प्रेमच** हें मूर्तरूप धारण करून आलें नसेल ना? हताश झालेल्या व वैतागलेल्या मनुष्याला, '**बाबा, पुनर्जन्म घेऊन तुला पहिल्यापासून पुन्हा प्रेम** ( अर्थात् भक्ति ) **करायला शिकलें पाहिजे,**' असें सांगण्याकरितां ही आकाशवाणी तर आली नसेल? कीं, आधुनिक चवचाल सुधारणांच्या मद्यानें उन्मत्त झालेल्या लोकांच्या डोळ्यांत चांगलें अंजन घालण्याकरितां परलोकाहून हा कोणी हकीम आला आहे? कीं, ब्रह्मांडाचें कोडें उलगडून सांगणारी ही एक केवळ विभूति आहे? काय समजावें बरें?

---

## बिंदु ११.

ठिकाणः—दक्षिणेश्वरचें देऊळ.

मंडळी:—श्रीरामकृष्ण, नरेंद्र ( विवेकानंद ), राखाल, एम् व इतर शिष्य. महाराज आत्मचरित्र सांगतात.—

**श्रीरामकृष्ण** आज आनंदात होते; कारण **नरेंद्र** त्यांचें दर्शन घेण्याकरितां देवळांत आला होता. **नरेंद्रानें** स्नान केलें व प्रसाद घेतला.

त्या दिवशीं सोमवार होता. इंग्रजी ता. १६ महिना आक्टोबर सन १८८२. मराठी महिना आश्विन. तिथि शुद्ध चतुर्थी. दुर्गापूजेचा उत्सव गुरुवारीं व्हावयाचा होता.

**राखाल** बरेच दिवस **महाराजां**जवळ राहत होता. **रामलाल व हज्रा** हेही तेथेंच होते. **नरेंद्रा**बरोबर दोन तरुण आले होते. **एम्**ही तेथें होता.

दहा व अकरा यांचे दरम्यान दोनप्रहरचें जेवण आटोपलें. नंतर **श्रीरामकृष्णांनीं नरेंद्र** व इतर शिष्य यांना, विशेषेंकरून **नरेंद्राला**, क्षणभर वामकुक्षि करण्यास सांगितलें. जमिनीवरच अंथरूण टाकलें होतें. खालीं चटई, तीवर गादी, गादीवर पांढरीशुभ्र चादर, उश्या व गिरद्या, अशी बिछान्याची व्यवस्था होती. **महाराज नरेंद्रा**जवळच अंथरुणावर पडून एकाद्या पोराप्रमाणें त्याच्याशीं व इतर शिष्यांशीं बोलत होते. त्यांची दृष्टि **नरेंद्रा**कडे असून मुखावर हास्य झळाळत असल्यामुळें तें अत्यंत शोभायमान दिसत होतें. आदर्शरूप म्हणून—**जगांत राहावें कसें**, हें त्यांना शिकवावें म्हणून—कांहीं कथा (गोष्टी) त्यांनीं या वेळीं आपल्या शिष्यांपुढें—विशेषेंकरून **नरेंद्रा**पुढें—मांडिल्या.

**महाराजः**—साक्षात्कारानें माझ्या वृत्तींत जेव्हां बदल पडला, तेव्हां परमेश्वराच्या लीला ऐकाव्या,अशी इच्छा मला होऊं लागली. भागवत, रामायण, भारत, इत्यादि पौराणिक ग्रंथांचें कोठें वाचन चाललें आहे, याच्या तपासांत मी नेहमीं असें; व जेथें तें चालू असे तेथें मी नियमानें जाई. **कृष्ण किशोर बाबू** अध्यात्मरामायण वाचीत असत. तेथें मी नेहमीं जात असें.

**कृष्ण किशोर बाबूं**ची श्रद्धा केवढी दांडगी ! एकदां ते वृंदा-

वनच्या यात्रेला गेले होते. वाटेंत एका ठिकाणीं त्यांना एकदां तहान लागली. ते जवळच्याच एका विहिरीवर गेले. तेथें एक माणूस उभा होता. त्याला त्यांनीं आपल्याला थोडें पाणी काढून घाल, असें सांगितलें. त्या माणसानें सांगितलें, कीं मी जातीनें शूद्र आहें. तेव्हां माझ्या हातचें पाणी आपल्याला, ब्राह्मणाला, चालणार नाहीं. **किशोर बाबू** म्हणाले, "तूं एकदां 'शिव' असें म्हण, म्हणजे पावन होशील." त्या माणसानें तसें केलें व नंतर पाणी काढलें, व तें **किशोर** बाबू–ते ब्राह्मण असूनही–प्याले ! केवढी प्रचंड त्यांची श्रद्धा !

कृष्ण किशोर बाबू व त्यांची श्रद्धा.

एकदां कोणी साधु पुरुष येऊन नदीकांठीं अर्यद घाटावर कांहीं दिवस राहिला होता. आम्ही त्याच्या दर्शनाला जाण्याचा विचार केला. एक दिवस **हलधारीला** (रामकृष्णांचा चुलत भाऊ) मीं म्हटलें, '**कृष्ण किशोर** व मी त्या साधूच्या दर्शनाला जाणार आहों. तूं पण येशील का?' **हलधारीनें** उत्तर केलें, 'पार्थिव शरिराची किंमत मृण्मय पिंजऱ्यापेक्षां कांहीं ज्यास्त नाहीं. तेव्हां असलें शरीर धारण करणाऱ्या प्राण्याच्या दर्शनाला जाण्यांत काय अर्थ?'

**हलधारी** हा मोठा पंडित असून तो रोज गीतेचें पारायण करीत असे. व एक ईश्वरमात्र सत्य असून बाकी सर्व मिथ्या आहे, असें प्रतिपादन करणाऱ्या वेदान्ताचें तो नित्य परिशीलन करी. हें त्याचें

उत्तर जेव्हां मीं कृष्ण किशोरांना सांगितलें, तेव्हां ते रागानें लाल होऊन म्हणाले, ' काय ! हलधारी असें म्हणाला ? सत्पुरुषाच्या शरिराला–ज्या सत्पुरुषाला ध्यानीं, मनीं, स्वप्नीं, आसनीं, शयनीं, पानीं, एका ईश्वराशिवाय दुसरें कांहीं सुचत नाहीं व ज्यानें ईश्वराकरितां संसारावर व तदंगभूत विषयसुखावर पाणी सोडलेलें असतें अशा सत्पुरुषाच्या शरिराला–तो केवळ मृण्मय पंजर मानतो काय ? खऱ्या भक्ताचें शरीर प्राकृत मनुष्याप्रमाणें मृण्मय नसून केवळ चिन्मय असतें, एवढेंही त्याला ज्ञान नाहीं का ?' पूजेकरितां फुलें गोळा करण्यासाठीं जेव्हां ते दुसऱ्या दिवशी देवीच्या बागेंत आले, तेव्हां त्यांनीं हलधारीकडे नुसतें पाहिलेंही नाहीं ! इतका त्यांना त्याच्या उत्तराचा राग आला.

' तुम्हीं आपलें जानवें कां काढून टाकलें ?' असा त्यांनीं मला एक दिवस प्रश्न केला. मागें अश्विनांत ( १८६४ साल) गंगेचें पाणी वाढून त्या पुरानें ज्याप्रमाणें सर्व कांहीं जमीनदोस्त करून टाकलें, त्याप्रमाणें पहिल्याच साक्षात्कारानें माझ्या वृत्तींत जेव्हां अगदीं उलटापालट होऊन गेली, तेव्हां माझें सर्व कांहीं आपोआप सुटलें. सर्व बाह्योपाधि कुठच्या कुठे उडून गेल्या; बाह्य जगाचें ज्ञानच नाहींसें झालें; मग जानव्याची किंवा नेसलेल्या धोतराची दाद कोणाला राहणार ?

साक्षात्कारानंतर श्रीरामकृष्णांची स्थिति.

' ब्रह्मानंदीं लागली टाळी ' अशी अवस्था झाल्यामुळें मी

दिवसांतून बराच वेळ नग्नच असें. यामुळें जानवें फेंकून दिल्या-बद्दल **कृष्ण किशोर** बाबूंनीं जेव्हां माझ्यावर घसरा केला, तेव्हां मीं त्यांना एवढेंच उत्तर दिलें, कीं, 'आपल्याला जर कधीं काळीं ईश्वराचें वेड भरलें, तर मग आपल्याला सगळें कांहीं कळून येईल.'

आणि मीं म्हटलें तसें झालेंही. तेही ईश्वरासाठीं शेवटीं वेडे झाले. ते आपल्याला एका खोलींत बंद करून घेऊन व स्वस्थ बसून केवळ 'ॐ! ॐ!' असा सारखा जप करूं लागले.

त्यांना खरोखरच वेड लागलें, असें त्यांच्या माणसांना वाटलें. त्यांनीं वैद्याला बोलावून आणलें. नाटगोर येथील डा. **राम** हे त्यांना तपासण्याकरितां आले.

खरे स्वरूप.

**कृष्ण किशोरांनीं** डाक्टरसाहेबांना सांगितलें कीं, 'डाक्टर-साहेब, माझा रोग तुम्हीं खुशाल बरा करा. माझें कांहीं म्हणणें नाहीं. पण ईश्वरकृपेनें 'ॐ'-ची व्याधि जी अलीकडे मला जडली आहे, तीमात्र आपण दूर करूं नका. ती मला बरी मानवते.' (हशा).

दुसऱ्या एका प्रसंगीं ते विचारांत गर्क झालेले मला दिसले. काय झालें? म्हणून मीं त्यांना विचारलें. त्यांनीं सांगितलें कीं, "कराची मागणी करण्याकरितां सरकारी मनुष्य आला होता. त्यानें मला अशी ताकीद दिली कीं, 'जर तुम्हीं कर भरला नाहीं, तर तुमचीं हांडींभांडीं मी विकून टाकीन, सोडणार नाहीं.' यामुळें मी थोडा फिकिरींत आहें." त्यावर मीं हासून म्हटलें,—

" मग त्यांत काय झालें ? त्यानें तुमचीं भांडींकुंडीं विकलीं, वाटेल तें केलें; पाहिजे तर तुम्हांलाही चतुर्भुज करून बिनभाड्याच्या घरांत नेऊन टाकलें; तरी तुमचें काय जातें ? तुमचें शरीर म्हणजे कांहीं अर्थात् तुम्ही नव्हे. तेव्हां त्याला कांहीं तुम्हांला—तुमच्या खऱ्या स्वरूपाला—चतुर्भुज करितां येणार नाहीं; कारण ' मी केवळ ख ( आकाश ) आहें. ' असें तुम्ही नेहमीं म्हणत असतां, नाहीं का ? " ( नरेंद्र व इतर हासतात ).

निराकार आकाशासारखें.

होय. ' माझें खरें स्वरूप ( परमात्मा ) आपल्यासभोंवतीं पसरलेल्या निराकार आकाशासारखें आहे, ' असें ते नेहमीं म्हणत. ते अध्यात्मरामायण मोठ्या भक्तीनें वाचीत. ' तुम्ही ' ख ' आहांत. सूत्रात्मा हें तुमचें खरें स्वरूप आहे; शरीर कांहीं नव्हे. ' असें मी त्यांना नेहमीं मौजेनें म्हणें. ' कोणीही सरकारी माणूस तुम्हांला बांधूं शकणार नाही. तुमच्या स्थूल शरीराला बांधील कदाचित् तो; पण स्थूल शरीर म्हणजे कांहीं ' तुम्ही ' नाहीं, हें तुम्हांला कबूलच आहे. ' असें म्हणून त्या दिवशीं मीं त्यांना जरा धीर दिला. ( हशा ).

कोणाचीच परवा नाहीं.

ईश्वरी वेडाच्या भरांत मी सर्व लोकांसंबंधानें व प्रत्येक गोष्टीसंबंधानें अगदीं निःस्पृहतेनें बोलत असें. मी लोकांचा दर्जा-बिर्जा कांहीं पाहात नसें. श्रीमंतांसंबंधानें किंवा थोर लोकांसंबंधानें माझे मनांत भीतिच नव्हती.

आपल्या शेजारीं ही **यदू मलिकाची** वाडी आहे नाहीं का? तेथें एक दिवस **यतींद्रनाथ टागोर** आले होते. 'मनुष्याचें खरें कर्तव्य काय?' असा मीं त्यांना प्रश्न केला. 'आपलें सर्व लक्ष परमेश्वराकडे ठेवणें हें मनुष्याचें आद्य कर्तव्य नाहीं काय?' असेंही मीं त्यांना विचारलें. त्यावर **यतींद्र** म्हणाले, 'आम्ही केवळ संसारी माणसें. संसारी माणसें कसलीं मुक्तीला जाणार? युधिष्ठिराचेंच उदाहरण पहाना. तो मोठा पुण्यात्मा होता. तरी पण त्याला एकदां असत्य बोलल्याबद्दल नरकलोक पहावा लागला.' या उत्तरानें मला फार राग आला. मी लागलेंच तावानें म्हटलें, 'काय चमत्कारिक माणूस आहेस तूं! गृहस्था युधिष्ठिराला तो लोक पाहावा लागला, हेंमात्र तूं पक्कें लक्षांत ठेवलें आहेस! पण, बाबा, सत्यप्रीति, ईश्वरनिष्ठा, क्षमाशीलता, सद्ग्राहकता, संसारानासक्तता, इत्यादि त्याच्या आंगच्या सद्गुणांसंबंधानें तुझें काय म्हणणें आहे?' माझ्या तोंडाचा पट्टा असाच आणखी चालला असता, पण **हृदयानें** माझें तोंड बंद केलें. मला कांहीं जरुरीचें काम आहे, असें सांगून **यतींद्र बाबू** लागलेच चालते झाले.

दुसऱ्या एका प्रसंगीं मी कॅप्टनबरोबर[१] **सुरेंद्र टागोर** यांच्या घरीं गेलों होतों. त्यांना पाहिल्याबरोबरच मी म्हटलें,—'हें पहा, बाबूजी, मी आपल्याला राजा-बिजा कांहीं म्हणणार नाहीं; कारण

---

१ कॅप्टन—यांचे खरें नांव **विश्वनाथ उपाध्याय** असें असून ते नेपाळच्या राजाचे कलकत्ता येथील वकील होते. ते कॅप्टन या नांवानें प्रसिद्ध असत.

तसें म्हटलें तर खोटें बोलल्यासारखें होणार.' त्यांचें माझें कांहीं वेळ संभाषण झालें; पण मध्यें किती तरी लोकांनीं येऊन व्यत्यय आणला. त्यांत कांहीं युरोपियनही होते. एकंदरींत इतर संसारी माणसांप्रमाणें त्यांच्याहीमागें उपाधि फार, असें मला दिसून आलें. आम्ही आलों आहों, असा त्यांनीं **यतींद्र टागोर** (त्यांचे वडील-बंधु) यांना निरोप पाठविला. पण **यतींद्रांनीं** असा उलट निरोप पाठविला कीं, माझा घसा दुखतो आहे, तेव्हां मला कांहीं येतां येत नाहीं.

एक दिवस गंगेच्या कांठीं वराहनगरघाटावर एक वयस्करसा ब्राह्मण नामसंकीर्तन करितांना मला दिसला. पण त्याचें मन दुसरीकडे कुठे तरी आहे, असें जेव्हां मी पाहिलें, तेव्हां त्याचें लक्ष परमेश्वराकडे ओढण्याकरितां मी त्याचे पाठीवर दोन चांगल्या चापट्या दिल्या! (हशा).

एकदां **राणी रासमणी** (दक्षिणेश्वरचें देऊळ बांधणारी बाई) येथें देवळांत येऊन राहिली होती. मी **आईची पूजा** करीत असतांना ती देवळांत आली, व तिनें मला भजन करण्यास सांगितलें. मीं त्याप्रमाणें भजनास सुरुवात केली; पण तिचें लक्षच नव्हतें; ती आपली पूजेकारितां फुलेंच निवडूं लागली. तें जेव्हां मीं पाहिलें, तेव्हां तिलाही दिल्या दोन चापट्या! पण मग ती लागलीच कशी पण भक्तिभावानें हात जोडून स्वस्थ बसली म्हणतां! (हशा).

माझा चुलतभाऊ हलधारी याला मी आपली ही दुष्ट खोड सांगून अनेक वेळा म्हणें, 'काय माझें वर्तन चमत्कारिक आणि उद्धट होत चाललें आहे हें ! याला कांहीं उपाय नाहीं का ?' मी आईचीही कळवळून प्रार्थना करीं; पण अखेरीस तिच्याच कृपेनें ती माझी खोड मोडून गेली.

श्रीरामकृष्ण काशीस जातात. यात्रेचे महत्त्व.

त्या वेळीं माझी वृत्तिच अशी झाली होती की, भगवत्कथेशिवाय इतर शब्द म्हणजे अगदीं माझ्या कानाला झोंबत. लोकांना संसाराच्या भाकडकथा सांगतांना मीं ऐकलें कीं मी आपला एकटाच जाऊन रडत बसें. एकदां मथुर बाबूनें मला आपल्याबरोबर उत्तर हिंदुस्थानांत यात्रेला नेलें. आम्हीं अनेक क्षेत्रें केलीं. काशीला गेल्यावर आम्हीं कांहीं दिवस राजा बाबूच्या घरीं मुक्काम केला. एक दिवस मी दिवाणखान्यांत बसलों होतों. मथुर बाबूही तेथेंच होता. तो, राजा बाबू व त्याची इतर मंडळी यांजबरोबर बोलत होता. त्याच्या नुसत्या संसाराच्या गप्पा चालल्या होत्या. 'अमुक व्यवहारांत इतके इतके पैसे कमावले किंवा गमावले,' अशा प्रकारच्या चालल्या होत्या गोष्टी. मी आपल्याशींच हवा तितका रडलों व आईला म्हटलें, 'आई, कुठे तूं मला आणलेंस हें ? या क्षेत्रापेक्षां मी आपल्या दक्षिणेश्वरच्या देवळांत खरोखरच फार सुखी होतों ! हे लोक क्षेत्रांत आले आहेत देवदर्शनाकारितां म्हणून; पण आई

आतां तूंच पहा, हे 'कामिनी व कांचन ' यांशिवाय दुसरें कांहीं बोलतच नाहींत! तें आपलें माझें देवळांतलें स्थानच मला बरें होतें. कारण तिथे असले शब्द तरी मला ऐकावे लागत नव्हते.

नंतर महाराजांनीं नरेंद्राला थोडीशी झोंप घेण्याला आग्रह केला; व आपणही क्षणभर विश्रांति घेण्याकारितां धाकट्या पलंगडीवर जाऊन पडले.

---

## बिंदु १२.

### नरेन्द्रादि शिष्यांसह कीर्तनानंदांत.

तिसरा प्रहर झाला. नरेन्द्र कांहीं भक्तिपर पदें म्हणूं लागला. राखाल, लातू, एम्, नरेन्द्राचा ब्रह्मसमाजबंधु प्रिय व हाजरा वगैरे मंडळी हजर होती.

नरेन्द्र गाऊं लागला; मृदंगाचा ठेका सुरू झालाः—

**पद.**

(चालः—बीज परावे० )

भक्तविश्राम ॥ ध्याइं मना आत्माराम ॥ ध्रु० ॥
सच्चिद्घन तो भवभयभंजन,
पूर्णपरात्पर निखिलनिरंजन,
सुंदरमूर्ति निजजनरंजन,
पावननाम ॥ कमलेक्षण मेघश्याम ॥ १ ॥
रागसुरंजित रूप झळाळे,
कोटिशशींहुनि तेज आगळें,
चपलेचीही दीप्ति मावळे,

तेजोधाम ॥ पुलकित करि हर्ष निकाम ॥ २ ॥
हृदयसरोजीं सोज्ज्वलरूप,
कल्पुनि मोदें प्राश अमूप,
प्रसन्ननयनीं; हो निष्पाप,
पूज्यपदपद्म ॥ पूजि मना अष्टौ याम ॥ ३ ॥
चिदानंदमधुकंदमरंद,
भक्त्यावेशें सेवुनि धुंद,
होतां सखया तुटतिल बंध,
दुःखविराम ॥ पावे तरि स्मर जितकाम ॥ ४ ॥

नरेन्द्र दुसरें पद म्हणूं लागलाः—

## पद.

(चालः— हटानटाने पहा रंगवुनि० )

जगदीशाची निकामसुंदर शिवद मूर्ति साजिरी ।
प्रकाशे रम्य हृदयमंदिरीं ॥ ध्रु० ॥
प्रशांत, सोज्ज्वल, नयनमनोहर, सौंदर्याचा निधि ।
पहा तरि मज्जन करिं त्यामधीं ॥
अखिल इंद्रियां नयन करोनी आतुरतेनें जरी ।
निरंतर बघसि न शांती तरी ॥
(चाल ब. ) ते अनंतरूपी ज्ञानकिरण भास्कर,
त्या गहन तमोवनिं शिराति जेंवि निर्भर,
ये तसा प्रभुवरा मम हृदयीं सत्वर,
(चा. प. ) शरण शरण हा चरणपंकजीं थकली रसना हरी ।
बावरें चित्त न धैर्या धरी ॥ जगदी० ॥ १ ॥
परमानंदा उदयमान हो हृदयनभोभ्यंतरा ।
अविद्यानिबिडतमः संहारा ॥
तमालतरुनिभ नीलनभीं त्या घेतां उदयाप्रती ।

कलानिधि हिमकर रजनी-पति ॥
(चा. ब.) तो चकोरपक्षी विभो ! मुदित होउनि,
चंद्रमाकांतिमधुरुचिर सुधा प्राशुनि,
होतसे स्वरूपीं लीन जसा रंगुनी,
(चा. प.) निमग्न तैंवी तुझ्या स्वरूपीं चिन्मयसुखसागरीं ।
होउं कीं मधुकर कमलाकरीं ॥ जगदी० ॥ २ ॥

पद.

(चालः–दे रे हरी ! भतपउाचि जोड०)

पावन हरिचें नाम ॥ वद वद० ॥ ध्रु० ॥
मधुर किती तरि सेवुनि पाहीं खर्च न एक छदाम ॥ १ ॥
प्रेमानंदें तन्नामाचा करितां गजर निकाम ॥ २ ॥
करुणामृतनिधि हेलावे तो सेवीं मग अविराम ॥ . ॥
अणुरेणूही जीववितो जो काय त्यजी तुज राम ॥४॥
चिंता दुबळ्या ! करिसी कसली गाई मुनिविश्राम ॥ ५ ॥
दुरितगिरी तव भंगाया क्षम एकचि पवि हरिनाम ॥ ६ ॥
ब्रह्मानंदीं मज्जन करूं ये होऊं पूरितकाम ॥ ७ ॥

मृदंग, करताल वाजत होते. कीर्तनाचा घोष चालू होता. कीर्तनरंगांत नरेन्द्र व इतर शिष्य महाराजांभोंवतीं आनंदानें नाचूं लागले.

सर्वांनीं पुढील कडव्याचा गजर सुरू केलाः—

चिदानंदमधुकंदमरंद,
भक्त्यावेशें सेवुनि धुंद,
होतां सखया तुटतिल बंध,
दुःखविराम ॥ पावे तरि स्मर जितकाम ॥

पुन्हा दुसरें एक कडवें ते घोळूं लागलेः—

**जगदीशाची निकाम सुंदर शिवदमूर्ति साजिरी ।**
**प्रकाशे रम्य हृदयमंदिरीं ॥ ध्रु० ॥**

शेवटीं, **नरेन्द्र** कीर्तनरंगांत बेहोष होऊन त्यानें आपल्या गळ्यांत मृदंग अडकाविला व तो **महाराजां**समवेत पुढील कडवें म्हणूं लागलाः—

**पावन हरिचें नाम ॥ वद वद० ॥ ध्रु० ॥**
**मधुर किती तरि सेवुनि पाहीं खर्च न एक छदाम ॥ १ ॥**

कीर्तनान्तीं **महाराजांनीं नरेन्द्राला** धरिलें व त्याला मोठ्या प्रेमानें पुनःपुन्हा आलिंगन देऊन ते म्हणाले, "बेटा, तुला अखंड शांति व सदानंद यांची प्राप्ति होवो! आज जो अनिर्वचनीय आनंद तूं मला दिलास, तो काय सांगावा!"

**महाराजांच्या** अंतःकरणांतील भक्तिसागराला आज जोराची भरती येऊन तो स्वैरगतीनें व उद्दामपणें आपल्या मर्यादेच्या बाहेर उसळूं लागला.

रात्रीं आठ वाजण्याचा सुमार झाला. तथापि भक्तिसुखाच्या मद्यानें उन्मत्त होऊन ते उत्तरेकडील पडवींत सारख्या येरझारा घालीत होते. एखाद्या तरारलेल्या माणसाप्रमाणें पडवीच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत जलद पावलें टाकीत ते फिरत होते;— मधून मधून ते **आईशीं** बोलत होते. एखाद्या वेडावलेल्या माणसाप्रमाणें ते एकदां मध्येंच मोठ्यानें म्हणाले, "तूं माझें काय करणार?"

**आईनें** ज्याच्या अंगावर मायेची शाल घातली, त्याला

मायेची थंडी कशी झोंबणार? असा तर **महाराजांच्या** वरील उद्गारांचा अर्थ नसेल ना?

रात्रीं सगळे तेथेंच राहावयाचे होते. तेव्हां **श्रीरामकृष्णांच्या** आनंदाला सीमा नाहींशी झाली. **नरेन्द्र** राहणार, हें ऐकून त्यांचा आनंद पोटांत माईना.

रात्रींच्या भोजनाची तयारी झाली. **महाराजांची** आई नौबतखान्यांत राहत होती. तिनें चपात्या, वरण, वगैरे पदार्थ तयार केले व शिष्य मंडळीला जेवण्याकरितां बोलावणें पाठविलें. शिष्य मंडळी अशी मधून मधून तेथें राहत असे. तेथला बहुतेक खर्च **सुरेंद्र** चालवी.

**महाराजांच्या** खोलीच्या आग्नेयकडील पडवींत पानें मांडिलीं होतीं. **नरेन्द्र** व इतर शिष्य खोलीच्या पूर्वेकडील दरवाजांत उभे राहून बोलत होते.

**नरेन्द्र** (एमला) :—बरें, हल्लींच्या मुलांसंबंधानें आपल्याला काय वाटतें? **एम्**:—तीं वाईट नसतात; पण त्यांना धर्मशिक्षण पाहिजे.

शाळा व कॉलेजे यांतील शिस्तासंबधानें नरेंद्राचें मत.

**नरेन्द्रः**—मीं जें कांहीं पाहिलें आहे, त्यावरून मला असें वाटतें कीं, त्यांचा अधःपात होत आहे, त्यांची स्थिति दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. अमेरिकन केसरी तंबाखू (बर्डस् आय्), नटवेगिरी, कुसंगति, वर्गांतील अभ्यासाचे तास चुकविण्याची प्रवृत्ति, इत्यादि गोष्टी जिकडेतिकडे पाहण्यांत येतात.

**एम्ः**—आमच्या वेळीं, आम्ही जेव्हां विद्यार्थी होतों तेव्हां, अशा गोष्टी माझ्या कधीं पाहण्यांत किंवा ऐकण्यांत आल्या नव्हत्या.

**नरेन्द्रः**—तुम्ही, मला वाटतें, अशा मुलांत केव्हां मिसळलां नसाल. माझ्या ओळखीच्या किती तरी मुलांना बदमाश लोकांशीं अगदीं सलगीनें बोलतांना मीं पाहिलें आहे. त्यांत आश्चर्याची गोष्ट इतकीच कीं, तशा लोकांशीं यांचा परिचय कसा व केव्हां व्हावा!

**एम्ः**-ही सर्व स्थिति खरी का?

**नरेन्द्रः**—हो तर! अशा रीतीनें माझे कित्येक मित्र बिघडून फुकट गेल्याचें मला प्रत्यक्ष ठाऊक आहे. शाळा व कॉलेजें यांचे अधिकारी व मुलांचे पालक हे या गोष्टींत लक्ष घालतील तर ठीक आहे.

त्यांचें असें बोलणें चाललें होतें, इतक्यांत **महाराज** खोलींतून 'अन्यां वाचं विमुञ्चथ.' बाहेर आले व हसत हसत म्हणाले, "कां, काय बोलणें चाललें आहे तुमचें!"

**नरेन्द्रः**—कांहीं नाहीं. आमच्या आपल्या शाळांच्या व कॉलेजांच्या गोष्टी चालल्या आहेत. एकंदरींत त्यांतल्या मुलांचें वर्तन जसें असावें तसें नसतें.

यावर **महाराज एमकडे** वळून अगदीं गंभीरपणानें म्हणाले,

“ अशा गोष्टींसंबंधानें बोलत बसणें कांहीं चांगलें नाहीं. बोला-वयाचेंच तर एक ईश्वरासंबंधानें बोलावें, दुसऱ्या कशासंबंधानेंही बोलूं नये! हीं केवळ मुलें आहेत; पण तूं यांच्यापेक्षां वयानें थोर आहेस. तुला तरी कळायला पाहिजे होतें. त्यांना सावध करून ईश्वराशिवाय कांहीं बोलूं नका, असें त्यांना सांगणें, हें तुझें कर्तव्य होतें.”

**एम्** अगदीं विरघळून गेला. **नरेन्द्रादि** शिष्य कांहीं वेळ अगदीं मूग गिळून बसले. **नरेन्द्राचें** वय त्या वेळीं सुमारें १९।२० वर्षांचें असून **एमचें** २७–२८ वर्षांचें होतें.

पुढें मंडळी जेवायला बसली. **महाराज** तेथेंच उभे राहून हासत हासत **नरेन्द्रादि** शिष्यांना थोड्याशा आग्रहानें जेववीत होते. एकंदरींत स्वारी अगदीं आनंदांत होती. भोजनोत्तर

नामसंकीर्तन.

शिष्यमंडळी खोलींत येऊन जमिनीवर आंथरलेल्या चटईवर विश्रांतीस्तव बसली. हासत खिदळत त्यांचें **महाराजांबरोबर** बोलणें चाललें होतें. ती एक ब्रह्मानंदाची पेठच बसली होती म्हणाना! बोलतां बोलतां **महाराज नरेन्द्राला** म्हणाले, “ **जय जय जय करुणामय दुरित-दारणा** !’ हें एकदां पद म्हण पाहूं.”

**नरेन्द्रानें** पद म्हणण्यास सुरवात केली. इतर शिष्यमंडळीनें मृदंग व करताल वाजविण्याला आरंभ केला.

---

१ आत्मानं वा विजानीथ, अन्यां वाच विमुञ्चथ.

## पद.

( चालः—कवण तुज गांजियलं० )

जय जय जय करुणामय दुरितदारणा ॥
अतुलतेज, कमलशेज दीनरक्षणा ॥ ध्रु० ॥
चिदवकाशिं राकाशशि ॥ ये उदया रूपराशि ॥
मधुर सुधासागरासि ॥ ये भरती पूर्ण तशी ॥
हास्यमग्न भुवन सर्व सौख्यवितरणा ॥ जय० ॥ १ ॥
स्वर्भुवनद्वारमुक्त ॥ आनंदा लहरि फुटत ॥
नवविधानरूपलालित ॥ माधवमधुमंजुमरुत ॥
वाहुनि करि मंद मंद मोदवितरणा ॥ जय० ॥ २ ॥
लीलारसमधुर गंध ॥ सेवुनि हा योगिवृंद ॥
होत पहा तुंद धुंद ॥ जेंवि पिउनि अलि मरंद ॥
निजरंगीं गुंग कसा विघ्नवारणा ॥ जय० ॥ ३ ॥
दुस्तरभवसिंधुजलीं नवविधाननवकमलीं ॥
विश्वजनी श्रीकाली ॥ मोदमयी ही रमली ॥
तनुवसना, मधुहसना, पद्मलोचना ॥ जय० ॥ ४ ॥
भक्तराजमधुपाली ॥ भक्त्याकुल ही जमली ॥
मधुपानीं बहु रमली । शुद्धिबुद्धि ही सरली ॥
भेदवृत्ति मनिं जिरली, पतितपावना ॥ जय० ॥ ५ ॥
पाहिं पाहिं मातृवदन ॥ मनमोहन विमलनयन ॥
सौख्यपूर्ण मंजुहसन ॥ साधुवृंद चरणलीन ॥
नृत्य करुनि आनंदें करित गायना ॥ जय० ॥ ६ ॥
प्रियदर्शन अतुलकांति ॥ साधुमना देइ शांति ॥
भ्रांति गळुनि खचित अंतिं ॥ प्रेमदास करि विनति ॥
नमुनि पाय 'गा' वदतो "विश्वकारणा" ॥ जय० ॥ ७ ॥

कीर्तनानंदानें उन्मत्त होऊन **महाराज** नाचूं लागले. भक्तमंडळीही भजनरंगात त्यांच्याभोंवतीं घेर धरून नृत्य करूं लागली.

कीर्तनान्तीं **महाराज** आपल्या खोलीच्या ईशान्येकडील पडवींत फेऱ्या घालूं लागले. **हजरा** पडवीत उत्तरेच्या बाजूला बसून माळेवर हरिनामाचा जप करीत होता. **महाराज** कांहीं वेळानें त्याच्याजवळ जाऊन बसले. **एम्** तेथेंच असून **महाराजांजवळ** मधून मधून कांहीं भाषण करीत होता. **महाराजांनीं** एका शिष्याला विचारलें:—"तुला स्वप्नांत कांहीं चमत्कारबिमत्कार दिसतात का?"

**शिष्यः**—होय, **महाराज**, त्या दिवशीं स्वप्नांत मीं एक मोठ्या मौजेचा चमत्कार पाहिला खरा. हें सर्व जग म्हणजे एक अफाट जलाशय आहे, असें मला दिसलें. जिकडे नजर फेंकावी तिकडे पाणीच पाणी! दुसरें कांहीं नाहीं. त्या पाण्याला आदि ना अंत! पुढें तो जलाशय खवळूं लागला. दूर कांहीं नौका दिसत होत्या; त्यांपैकीं कांहीं मग लाटांनीं पोटांत गडप केल्या. कांहीं त्यांच्या तडाक्यांतून वांचल्या. त्यांपैकीं एकींत माझी आई होती. बरें, मी ज्या जहाजांत होतों, त्याच्यावर अगदीं निवडक लोक होते. तितक्यांत आम्हांला एक ब्राह्मण दिसला. त्याला पाहून आम्हांला केवढें आश्चर्य वाटलें म्हणून सांगूं! तो आपला खुशालपणें त्या क्षुब्ध सागरावरून चालत जात होता—जणूं काय, खालीं साधी जमीनच आहे! नंतर त्याला मीं विचारलें, 'काय हो! आपण या पाण्यावरून अगदीं

स्वप्नांतला सारा चमत्कार.

बेधडक चालत जातां, हें कसें काय ? ' तेव्हां त्या ब्राह्मणानें स्मितपूर्वक उत्तर केलें, ' कां बरें ? येथें भिण्यासारखें कांहीं नाहीं. या पाण्यांत एक चांगला पूल आहे, त्याचा माझ्या पावलांना बरोबर आधार सांपडतो. ' मीं म्हटलें, ' महाराज आपण जात आहां कोणीकडे ? ' त्यानें उत्तर केलें, ' मीं चाललों आहें **भवानीपुराला.** ' त्या सत्पुरुषाची सोबत आपणही गांठावी, अशी उत्कंठा मला लागून मीं त्याला म्हटलें, ' जरा दम खा, महाराज. मीही आपल्याबरोबर आलोंच; मलाही तिथेच जायचें आहे. '

**महाराजः**—ही सगळी हकीगत ऐकून माझी तनु रोमांचित होते बाबा !

**शिष्यः**—त्या ब्राह्मणानें हासून उत्तर दिलें, ' हो, पण मला आहे फार तांतड. तुला यायला बराच वेळ लागेल. हा मार्ग पाहून ठेव. आणि मग तूं ये.'

**महाराजः**—या तुझ्या स्वप्नाची कथा तुझ्या तोंडून ऐकत असतां माझा देह कसा आनंदानें स्फुरत होता ! —माझें अंग आनंदानें रोमांचित होत होतें ! तूं गुरूपदेशाला आतां पात्र झाला आहेस.

---

## बिंदु १३.

### आधीं काय ?—ईश्वरप्राप्ति कीं समाजसुधारणा ?

**रात्रीचे अकरा वाजले. नरेन्द्रादि शिष्य निजण्याचे तयारीला**

लागले. महाराजांचे खोलींतच बिछाने टाकून ते त्यांवर पडले.

प्रभातकाळ झाला. कांहीं शिष्य उठून बिछान्यावरच बसून

श्रीरामकृष्णाचे प्रातःस्मरण.

ईश्वरचिंतन करूं लागले. आणि महाराजांचें काय बरें चाललें होतें? ते आपल्या अमृता-सारख्या मधुर वाणीनें नामघोष करीत होते. बालकासारख्या दिगं-बरवृत्तीनें खोलींत इतस्ततः त्यांचें भ्रमण चालू होतें. खोलींत देवांच्या तसबिरा टांगलेल्या होत्या त्यांपैकीं प्रत्येक तसबिरीजवळ ते जात व भिंतीला कपाळ घांसून तिला प्रणाम करीत. मग त्यांनीं दरवाजा उघडून गंगेचें दर्शन घेतलें. नंतर हरिनाम घेतां घेतां ते मध्येंच म्हणाले, " आई, सर्वत्र तूंच भरून राहिली आहेस. भागवत ( भगवंताचें चरित्र–ज्ञान–भजन ) तूंच, भक्त तूंच, भगवानहीं तूंच ( भजन, भजक, भज्य ही त्रिपुटी तूंच आहेस ). वेद, पुराणें, तंत्रें, गीता, गायत्री यांच्या रूपांनीं प्रकट होणारी तुझी वाणी आणि तूं यांत भिन्नत्व नाहीं; आणि आई, तुझे भक्त म्हणजे केवळ तुझींच स्वरूपें आहेत! ब्रह्म तूंच; शक्ति तूंच; पुरुष तूंच; प्रकृति तूंच; विराट् तूंच; स्वराट् तूंच; नित्य–लीलामयी तूंच; चोवीस तत्त्वें तूंच." गीतेला उद्देशून ते एवढेंच म्हणाले, 'त्यागी, त्यागी, त्यागी, त्यागी.'

इतक्यांत काली व राधाकांत यांच्या मंदिरांत मंगलारति सुरू झाली. शंख, घंटा, झांजा, तास, यांच्या संमिश्र ध्वनीनें तो सर्व प्रदेश निनादून गेला. शिष्यमंडळी उठली; तेव्हां देवीच्या बागेंत

पूजेसाठीं फुलें तोडण्याचें काम चालू होतें. नौबत-खान्यांतून प्रभाती रागाच्या लहरी येऊन कर्णांना सुखवीत होत्या.

नरेन्द्र: एक गोष्ट असली म्हणजे झाले.

**नरेन्द्रादि** शिष्यगणानें प्रातर्विधि आटोपला. नंतर ते प्रफुल्लित वदनानें **महाराजां**जवळ आले. **महाराज** ईशान्येकडील पडवींत पश्चिमेच्या बाजूला उभे होते. त्यांच्या मुखावर हास्य झळकत होतें.

**नरेन्द्रः**—पंचवटीजवळ बरेच नानकपंथी साधु बसलेले आम्हांला दिसले.

**महाराजः**—हो, ते कालच येथें आले. ( नरेन्द्राला ) तुम्ही एकदां सगळे एकत्र बसा पाहूं. मला एकदां डोळे भरून तुम्हांला पाहावयाचें आहे.

त्याप्रमाणें सर्व शिष्य एका चटईवर एकत्र बसले. **महाराजांनीं** आनंदानें त्यांच्याकडे पाहिलें. नंतर ते त्यांच्याशीं भाषण करूं लागले.

**नरेन्द्रः**—ईश्वरप्राप्तीचीं साधनें कोणतीं ?

**महाराजः**—भक्ति हें सर्व साधनांचें सार आहे. तेवढी अंगीं असली म्हणजे झालें. ती असल्यावर विवेक आणि वैराग्य हीं आपोआप येतील.

**नरेन्द्रः**—स्त्रीजनसंगसाधन तंत्रांत सांगितलें आहे. नाहीं का ?

स्त्रियांच्या ठिकाणीं मातृभाव.

**महाराजः**—स्त्रीजनसंगसाधन ! हां ! पण तो मार्ग चांगला नाहीं. तंत्रांत असा एक साधनाचा मार्ग सांगितला आहे, हें खरें. पण तो फार बिकट

आहे. त्या मार्गाचा स्वीकार करून सिद्धि मिळाविणें, अत्यंत कठिण आहे. त्या मार्गानें साधकाचें पतन आपलें निश्चत व्हावयाचें.

साधक साधनमार्गाचें आक्रमण करीत असतां स्त्रीजनांकडे त्याला तीन भावांनीं पाहतां येईलः—वीरभाव, दासीभाव आणि संतानभाव. वीरभावसाधनामध्यें साधक रमण व स्त्री रमणी; दासीभावसाधनामध्यें साधक दासी व स्त्री स्वामिनी; आणि संतानभावसाधनामध्यें साधक संतान व स्त्री माता. मी स्त्रीजनांकडे मातृभावानें पाहतों. दासीभाव फारसा वाईट नाहीं. पण वीरभावसाधनानें पतन आपलें निश्चित ठेवलेलें आहे. कारण तो फार कठिण. संतानभाव हाच फार शुद्ध भाव आहे.

इतक्यांत ते नानकपंथी साधु आले. ते **महाराजांना** अभिवादन करून म्हणालेः—'नमो नारायणाय.' नंतर **महाराजांनीं** त्यांना बसायला सांगितलें.

**महाराजः**—ईश्वरासंबंधानें अशक्य कांहीं नाहीं. त्याचें स्वरूप मुखानें कोणालाही वर्णन कारितां येणार नाही. त्याच्यासंबंधानें सर्व कांहीं संभवनीय आहे.

ईश्वरासंबंधाने अशक्य कांही नाहीं.

पूर्वीं दोन योगी होते. ईश्वरप्राप्तीसाठीं त्यांचें साधन चालू होतें. एक दिवस नारदमुनि त्यांच्या आश्रमाजवळून जात असतां त्यांपैकीं एक योगी त्यांना म्हणाला, 'आपली स्वारी वैकुंठाहून आली असेल, नाहीं बरें? तसें असेल, तर नारायणाची स्वारी या वेळीं काय करीत आहे, तेवढें कृपा करून सांगा.' त्यावर

नारदांनीं उत्तर केलें, 'होय, आपलें म्हणणें खरें आहे. मी वैकुंठाहून आतांच आलों. नारायण या वेळीं सुईच्या नेढ्यांतून हत्तींना व उंटांना जायला लावीत आहे; त्याप्रमाणें मीं त्यांना आंत-बाहेर जातांना प्रत्यक्ष पाहिलें.' तेव्हां त्यांतला एक योगी म्हणाला, 'मग त्यांत आश्चर्य कसलें? ईश्वराला अशक्य असें कांहीं नाहीं.' पण दुसरा म्हणाला, 'असें कसें होईल? हें अगदीं अशक्य आहे, यावरून फक्त एवढेंच दिसतें कीं, आपण मुळीं त्या ठिकाणीं गेलांच नाहीं.'

पहिला योगी बालकाप्रमाणें श्रद्धाळू होता. त्याच्या अंगीं खरी श्रद्धा होती, कारण हें चमत्कारपूर्ण ब्रह्मांड ज्यानें निर्माण केलें त्याला कांहीं अशक्य नाहीं.

नवाचा सुमार झाला. **महाराज** आपल्या खोलींत बसले होते. इतक्यांत **मनमोहन** (एक शिष्य) कोन्नगराहून सपरिवार येऊन दाखल झाला. **महाराजांना** प्रणाम करून तो म्हणाला, 'यांना मी कलकत्त्यास घेऊन चाललों आहें.' **महाराज** त्याला कुशलप्रश्न केल्यावर म्हणाले, 'आज प्रतिपदा—आजचा दिवस चांगला नाहीं; आणि तूं आपलें कुटुंब कलकत्त्याला आज नेत आहेस! काय बोलावें बाबा!' इतकेंच बोलून ते हासले व इतर गोष्टींकडे वळले.

**नरेन्द्र** व कलकत्त्याची त्याची स्नेहीमंडळी यांनीं गंगेवर जाऊन स्नान केलें. नंतर ते कपडे घालण्याकारितां **महाराजांच्या**

खोलींत आले. तेव्हां **महाराज** मोठ्या उत्कंठेनें **नरेन्द्राला** म्हणाले, ‘ जा, वटवृक्षाच्या तळीं जाऊन कांहीं वेळ ध्यान कर; आसन देऊं का तुला ? ’

**नरेन्द्र** व त्याचे ब्रह्मसमाजी बंधु पंचवटीमध्यें जाऊन व तेथील वडाच्या पारावर बसून ध्यान करूं लागले.

साडेदहा वाजले. कांहीं वेळानें **महाराज** तेथें आले. एम्‌ही तेथें आला. **महाराज, नरेन्द्र** व त्याचे मित्र यांच्याशी बोलूं लागले.

ध्यान कसें करावें ?

**महाराज** ( नरेन्द्रादि शिष्यांना ):—ध्यान करते वेळीं वृत्ति अगदीं तल्लीन झाली पाहिजे. ईश्वराच्या ठिकाणीं मन पूर्णपणें निमग्न झालें पाहिजे. जर आपण वरवर पोहत राहिलों तर तळचीं रत्नें आपल्या हातीं लागण्याची आशा आहे काय ? असें म्हणून **महाराज** मधुरस्वरानें गाऊं लागले:—

### पद.

( **चालः**—प्रिये पहा रात्रींचा० )

**मना गड्या ! घेई उडी तांतडिनें आत्महृदयसागरीं ॥ ध्रु० ॥**
**करशिल जरि ईशभजन ॥ सुतर समज सिंधुतरण ॥**
**ना तरि तव त्यांत मरण ॥ सत्य वैखरी ॥ मना० ॥ १ ॥**
**एकदोन जरि बुड्यांस ॥ येइ न धन तव करास ॥**
**रत्नाकर ओस खास ॥ समज ना धरीं ॥ मना० ॥ २ ॥**
**कामादिक नक्र सहा ॥ फिरति त्यांत दुष्ट महा ॥**
**भक्ष्यलोभ धरुनि पहा ॥ नित्य अंतरीं ॥ मना० ॥ ३ ॥**
**सद्विवेकरूपि हळद ॥ निजदेहा मरद मरद ॥**

**येतां तो नक्र गंध ॥ पळति बा दुरी ॥ मना० ॥ ४ ॥**
**सागरिं या मुक्तामणि ॥ असति किती कोण गणी ॥**
**मार बुडी धांव झणीं ॥ भाव मनिं धरीं ॥ मना० ॥ ५ ॥**
**प्रेमदास वचनसुधा ॥ सेविसि जरि चित्त मुदा ॥**
**विषय न तुज छळति कदा ॥ समज अंतरीं ॥ मना० ॥ ६ ॥**

**नरेन्द्र** व त्याचे ब्राह्मबंधु पंचवटीच्या पारावरून खालीं उतरून आले व **महाराजांभोंवतीं** उभे राहिले. **महाराज** दक्षिणाभिमुख होऊन त्यांच्याबरोबर गोष्टी बोलत बोलत आपल्या खोलीकडे येऊं लागले. ते म्हणाले, ‘ बुडी मारल्यावर सहा मगर चावण्याकरितां तुमच्या अंगावर धावून येतील; पण तुमचीं अंगें जर हळदीनें माखलेलीं असलीं, तर ते मगर तुमच्या सावलीलाही उभे राहणार नाहींत. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर, हेच ते सहा मगर होत. ते हृदयरत्नाकराच्या अगाध जलामध्यें निरंतर फिरत असतात. परंतु विवेकवैराग्यरूपी हळद अंगाला माखलेली असली, तर ते तुमच्याकडे पाहणारही नाहींत. एक ईश्वरमात्र सत्य आहे, बाकी सर्व कांहीं मिथ्या आहे, हें विवेकाच्याद्वारें समजतें.

पहिल्याने ईश्वराचें ज्ञान करून घ्या.

विवेक-वैराग्य जोंपर्यंत अंगीं मुरलें नाहीं, तोंपर्यंत कितीही **पांडित्य** अंगीं असलें, तरी त्याचा काय उपयोग? आणि व्याख्यानें तरी काय कामाचीं? ईश्वर सत्य आहे, बाकी सर्व अनित्य आहे; याचें नांव विवेक. तोमात्र एक वस्तु असून बाकी सर्व अवस्तु आहेत, याचें नांव विवेक.

पहिल्यानें हृदयमंदिरांत त्याची प्रतिष्ठा करा; पहिल्यानें ईश्वरांचें अनुभवपूर्वक ज्ञान करून घ्या. वक्तृत्व, भाषणें, हीं हवीं असतील तर करा; पण केव्हां ? ईश्वराला पाहिल्यावर. आधीं नाहीं. लोक एकीकडे संसारकर्दमांत लोळत असतात, आणि एकीकडे शाब्दिक ब्रह्माचा कोंडा कांडीत असतात.

वक्तृत्व, व्याख्याने व समाजसुधारणा हीं नंतर.

विवेक-वैराग्याचा गंधही नसतां नुसतें 'ब्रह्म, ब्रह्म' असें बडबडत सुटण्यांत अर्थ कोणता ? त्याचा काय उपयोग होणार ? देवळांत देवाला नाहीं ठिकाण, आणि नुसत्या शंखध्वनीचा गोंधळ माजविण्यांत फायदा काय ? आतां तुम्हांला मी एक मौजेची गोष्ट सांगतों:—

एका गांवीं पद्मलोचन नांवाचा एक तरुण गृहस्थ राहात असे. तो पोदो या नांवानें लोकांत प्रसिद्ध होता. त्या गांवांत एक पडकें देऊळ होतें. त्या मंदिरांतली देवाची मूर्तिही ठिकाणावर राहिली नव्हती. देवळावर व देवळाभोंवतीं अश्वत्थादि वृक्षांचा पाला अतोनात पडून जिकडेतिकडे अगदीं घाण झाली होती. चिमण्या, वाघळें, इत्यादि प्राण्यांनीं तें मंदिर आपलें निवासस्थान बनविलें होतें. जमीन धुरळा व तेथें वसति करून राहिलेल्या प्राण्यांची विष्ठा यांनीं भरून गेली होती. त्या देवळांत कधींही कोणी पाऊल टाकीत नसे.

हृदयमंदिरांत ईश्वर.

पुढें एके दिवशीं मोठ्या नवलाची गोष्ट घडून आली. संध्यासमयानंतर कांहीं वेळानें त्या ओसाड देवळांतून शंखाचा ध्वनि

लोकांच्या कानांवर येऊं लागला. लोक अगदीं बुचकळ्यांत पडले. 'भों भों' असा हा शंखाचा आवाज देवळांत काढतें कोण? पुरुष, बायका, मुलें, या सर्वांनीं त्या देवळाचा रस्ता धरला. अर्थात् त्या गांवच्या सर्व लोकांना असें वाटलें कीं, त्या देवळांत अलीकडे कोणी देवाची मूर्ति स्थापिली असावी; व कोणी भक्त या वेळीं तिची पूजा करून आरति करीत असावा. तेव्हां साहजिक आबालवृद्धांची सर्व गर्दी त्या मंदिरापुढें जाऊन थडकली. देवाचें दर्शन घ्यावें, आरति पहावी, हा त्यांचा मानस. हात जोडून शंखाचा मधुर ध्वनि ऐकत ते देवळाच्या बाहेरच उभे राहिले.

त्यांपैकीं एकानें शेवटीं धीर करून मंदिराचें दार हळूच उघडलें आणि आंत पाहिलें. तेव्हां त्याला काय बरें दिसलें? आंत एकटा पद्मलोचन असून तोच 'भों भों' करून शंख वाजवीत आहे, असें जेव्हां त्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हां त्याला फार आश्चर्य वाटलें. मंदिराचें मार्जन झालेलें नव्हतें, जमिनीवर विष्ठा वगैरेंची घाण तशीच पडलेली होती, आणि कोणत्याही देवाच्या मूर्तीची नवीन प्रतिष्ठा तेथें केलेली नव्हती! हें पाहून तो संतापानें ओरडून म्हणाला, 'अरे पोद्दा, या तुझ्या देवळांत माधवाच्या मूर्तीला नाहीं ठिकाण; आणि नुसत्या शंखध्वनीचा हा गोंधळ तूं कशाला मांडला आहेस? देऊळ झाडावें, अनेक वर्षांचा सांचलेला केर व घाण हीं काढून टाकावीं, व देवळाची जमीन गंगोदकानें धुवून काढावी, तें राहिलें बाजूला; आणि या तुझ्या नुसत्या शंखध्वनीनें

काय होणार? मंदिरांत रात्रंदिवस अकरा[1] बोंघळें घाण करीत आहेत, त्यांची वाट पूर्वी नको का लावायला?'

पहिल्यानें हृदयमंदिरांत माधवाची प्रतिष्ठा केली पाहिजे, पहिल्यानें भगवल्लाभ करून घेतला पाहिजे. तें न करितां नुसता 'भों भों' करून शंख फुंकला तर काय होणार? भगवल्लाभ होण्यापूर्वी, हृदयमंदिरांत माधव-प्रतिष्ठा होण्यापूर्वी त्या मंदिरांतील सर्व घाण काढून टाकली पाहिजे. पापरूपी मळ धुवून काढला पाहिजे. इंद्रियांनीं उत्पन्न केलेली संसारासक्ति दूर फेंकून दिली पाहिजे. म्हणजे पहिल्यानें चित्तशुद्धि केली पाहिजे. मनाची शुद्धि साधली कीं, मग त्या पवित्र आसनावर भगवान् येऊन बसलाच. मलमूत्राची घाण असतांना माधव तेथें कधींही यावयाचा नाहीं. हृदयमंदिराची पूर्ण सफाई झाल्यावर माधव त्या ठिकाणीं प्रकट होईल. मग वाटेल तर शंख फुंकावा! सामाजिक सुधारणेविषयीं तुम्हांला बोलावयाचें आहे ना? ठीक आहे, बोला. पण पहिल्यानें ईश्वराची प्राप्ति करून घ्या आणि मग तें करा. लक्षांत ठेवा, प्राचीन कालच्या ऋषींनीं ईश्वरप्राप्तीकरितां संसारावर तुळशीपत्र ठेवलें होतें. जें काय पाहिजे आहे तें हेंच. इतर सगळ्या गोष्टी जर तुम्हांला हव्याच असतील, तर त्या नंतर आपोआप तुमच्या चरणांशीं येतील.

---

१ अकरा इंद्रियें—पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें आणि मन.

समुद्राच्या तळीं असलेलीं रत्नें जर तुम्हांला हवीं असतील, तर पहिल्यानें बुडी मारून तळ गांठा. आधीं बुडी मारून रत्नें हातीं घाला. मग दुसरी बात. आधीं माधव-प्रतिष्ठा आपल्या हृदयमंदिरांत करा, मग शंख-ध्वनीची गोष्ट बोला! आधीं परमेश्वराला ओळखा, मग पाहिजे तर व्याख्यानें झोडा नी सामाजिक सुधारणा करा!

बुडी मारण्याचे श्रम कोणालाच नको आहेत! साधन नको, भजन नको, विवेक-वैराग्य नको! दोनचार अक्षरें शिकायचीं आणि लांब जिभा काढून व्याख्यानें द्यायचीं! कीं कृतकृत्य!

लोकशिक्षेचें काम वाटेवर पडलें नाहीं, तें फार कठिण आहे.

सद्गुरु.

भगवानाचें दर्शन पहिलें. तें झाल्यानंतर भगवंताची आज्ञा मिळाल्यास लोकशिक्षेचें कार्य हातीं घेणें उचित होय. ज्याला भगवंताचें दर्शन घडलें व भगवंताची ज्याला आज्ञा मिळाली, त्यानेंच व्याख्यानें देण्यास आपली जीभ उचलावी.

---

# बिंदु १४.

## विवाहित पुरुषाचा प्रश्न.

गोष्टी बोलत बोलत **महाराज** आपल्या खोलीच्या उत्तरेकडील पडवीच्या पश्चिमभागीं येऊन उभे राहिले. **मणि** जवळच उभा होता. **नरेन्द्रादि** शिष्यही तेथें उभे होते.

**महाराज** पुनःपुन्हा असें म्हणाले कीं, ज्याच्या पदरीं विवेक-वैराग्य नाहीं, त्याला भगवंताचें दर्शन होण्याची केव्हांच आशा नाहीं. **मणीचें** वय २७।२८ वर्षांचें होतें. त्याचें इंग्रजी शिक्षण पुरें झालें होतें. विवाहही झाला होता. **महाराजांचे** तोंडचे वरील उद्गार ऐकून त्याच्या जिवाची अगदीं तळमळ होऊं लागली. त्याला कांहींच सुचेना. तो अगदीं गोंधळून आपल्याशींच म्हणाला, 'विवेक-वैराग्य म्हणजे संन्याश्याप्रमाणें संसाराचा त्याग काय? कामिनीकांचन यांचा त्याग काय?'

गृहस्थाश्रमी माणसाचा प्रश्न.

**मणि** ( महाराजांना ):—**महाराज**, स्त्री जर असें म्हणाली कीं, 'आपण माझ्याकडे पाहात नाहीं, तेव्हां मी आत्महत्या करणार,' तर मग कसें ?

**महाराज** ( गंभीरपणानें ):—पतीच्या ईश्वरमार्गांत जी विघ्न करील त्या स्त्रीचा त्याग खुशाल करावा. मग तिचें नशीब आहे आणि ती आहे. ती आत्महत्या करो, कीं दुसरें वाटेल तें करो. पति ईश्वरमार्गाचें आक्रमण करीत असतां जी मध्यें विघ्न आणूं पाहाते ती स्त्री मूर्तिमंत अविद्या होय.

**मणि** अगदीं चिंताकुल होऊन भिंतीला डोकें टेंकून उभा राहिला. नरेन्द्रादि शिष्यही क्षणभर स्तब्ध उभे राहिले. कोणी ब्रही काढीना.

**महाराज** कांहीं वेळ त्यांच्याशीं बोलत होते. **मणि** भिंतीला डोकें टेंकून तसाच उभा होता. एकदम त्याच्याकडे वळून ते त्याला

हळूच म्हणाले, ‘ परंतु ईश्वराच्या ठिकाणीं ज्याची आंतरिक भक्ति असते, त्याची गोष्ट बेगळी आहे. सगळीं माणसें त्याला वशच असतात–राजा, दुष्ट लोक, स्त्री. आपल्या ठिकाणीं आंतरिक भक्ति असली, म्हणजे क्रमानें स्त्रीही ईश्वरमार्गाला येते. पतीची भगवंताचे ठायीं शुद्ध भक्ति असेल, तर स्त्री त्याच्याबाहेर कधींही जाणार नाहीं. ईश्वराच्या कृपेनें तिच्या मनांतही भक्तीचा उदय होईल व खऱ्या सहधर्मचारिणीप्रमाणें ती त्याला साधनमार्गाचें आक्रमण करण्याला साहाय्यच करील.’ **मणींच्या** चिंताग्नीवर या भाषणाचें पाणी पडलें. पुन्हा त्याचें मन पूर्ववत् शांत झालें.

**मणि** ( महाराजांना ):––किती भयंकर संसार आहे हा !

**महाराज** ( मणि, नरेन्द्र, व इतर शिष्य यांना ):––संसारी माणसाचें जीवन भयंकर, यांत तिळमात्रही शंका नाहीं. **चैतन्य-देव** एकदां नित्यानंदाला म्हणाले:––

**ओंवी.**

**नित्यमुक्ता नित्यानंदा ॥ ऐक ऐक बा परमानंदा ॥**
**जो विषयांचा सेवक बंदा ॥ मोक्ष न लाभे नरा त्या ॥ १ ॥**

( मणीला हळूच ) ज्याच्या मनांत ईश्वरासंबंधानें शुद्ध भक्ति नसते, त्या संसारी माणसालामात्र कांहीं गति नाहीं. पण भगवंताच्या ठिकाणीं ज्याचा खरा भाव असतो, त्याची गोष्ट वेगळी. मनुष्यानें एकदां ईश्वरलाभ करून घेतला, आणि मग जरी तो संसारांत राहिला, तरी त्याला भय नाहीं. अशा माणसानें मधून मधून निर्जन स्थानीं जावें आणि शुद्ध भक्तीचीं पुटें मनाला देत असावें.

इतकें केल्यावर त्यानें खुशाल संसारांत राहावें. मग त्याला कांहीं भीति बाळगण्याचें कारण नाहीं. चैतन्यदेवांचे शिष्यवर्गांत बरेच संसारी होते. पण ते नांवाचे संसारी होते. संसारांत असून ते अलिप्त होते, अनासक्त होते.

दोन प्रहरचा सुमार झाला. देवांची भोगारति आटोपली. नंतर देव विश्रांति घेण्याकरितां गेले. देव विश्राममंदिरांत गेले म्हणून नौबत वाजूं लागली. **महाराज** भोजनास बसले. **नरेन्द्रादि** शिष्यांनींही **महाराजां**बरोबर देवांचा थोडा थोडा प्रसाद घेतला.

---

# बिंदु १५.

## ब्राह्मोसमाजाचे पुढारी बाबू केशवचंद्र सेन यांच्याबरोबर महाराज नौका-विहारार्थ जातात.

### महाराज समाधींत.

कोजागरी पूर्णिमेचा—लक्ष्मीपूजनाचा—दिवस. दुर्गापूजेनंतरची—नवरात्रानंतरची—ही पूर्णिमा. या दिवशीं शुक्रवार असून इंग्रजी तारीख २७ माहे आक्टोबर सन १८८२ होती. **महाराज** दक्षिणेश्वर येथील देवळांतील आपल्या खोलींत बसून **विजय** ( गोस्वामी ) आणि **हरलाल** यांच्याबरोबर गोष्टी बोलत होते. इतक्यांत एका गृहस्थांनीं येऊन सांगितलें कीं, **बाबू केशवचंद्र सेन** आले आहेत; ते नौकेंत असून ती नौका घाटाजवळ येऊन उभी राहिली आहे.

थोड्या वेळानें केशवबाबूंचे कांहीं शिष्य आले व महाराजांना प्रणाम करून म्हणाले, 'महाराज, आपल्याकरितां नौका आणिली आहे; केशवबाबू तींत असून आपण कृपा करून तेथें यावें, अशी विनंती करण्याकरितां त्यांनीं आम्हांला आपल्याकडे पाठविलें आहे. कांहीं वेळ नौकेंत बसून विहार केल्यानें आपल्या मनालाही मौज वाटेल, अशी आमची खात्री आहे.'

या वेळीं सायंकाळचे चार वाजले होते. महाराज आगबोटीवर जाण्याकरितां होडींत बसले. बरोबर विजय होता. होडींत पाय टाकल्याबरोबर महाराज बाह्यशून्य झाले. त्यांची समाधि लागली.

एम् आगबोटीवर होता. महाराजांची होडी आगबोटीजवळ येत असतां तो सानंद दृष्टीनें त्या समाधिस्थ चित्राकडे—बाह्यशून्य, स्तब्ध, निश्चळ व समाधिसुखांत रंगून गेलेल्या महाराजांच्या मूर्तीकडे—सारखा पाहात होता. केशवबाबूंच्याच आगबोटींत ३ वाजतां बसून तो त्यांच्याबरोबर कलकत्त्याहून आला होता. महाराज व केशवबाबू यांचें मीलन झाल्यावर जें कांहीं दिव्य आनंदाचें पीक येईल, तें पाहून आपण धन्य व्हावें, त्या दोघांत होणारें संभाषण ऐकून आपले कर्ण पवित्र करावे, अशी त्याची फार इच्छा होती; म्हणूनच तो आला होता. आपल्या साधुचरित्रानें व अद्वितीय वक्तृत्वानें केशवबाबूंनीं एमसारख्या अनेक बंगाली तरुणांचीं मनें हरण केलीं होतीं. अनेकांच्या मनांत केशवबाबू-संबंधानें आत्म-भाव उत्पन्न होऊन अंतःकरणपूर्वक त्यांची त्यांच्या-

वर भक्ति असे. केशवबाबूंचें इंग्रजी शिक्षण पुरें झालें होतें; इंग्रजी दर्शनसाहित्यादि शास्त्रांत ते चांगले संपन्न होते; देव-देवींच्या पूजेचा अनेक वेळा त्यांनीं 'मूर्तिपूजा' असा निंदाव्यंजक हेतूनें आपल्या भाषणांत उल्लेख केला होता. अशा गृहस्थाची रामकृष्णांचे ठिकाणीं भक्ति व श्रद्धा असावी, व त्यानें मधून मधून त्यांच्या दर्शनाला यावें, हें खरोखर मोठें चमत्कारिक होतें! या दोन विभूतींच्या मनांत व विचारांत असें हें उत्तर-दक्षिण ध्रुवांइतकें अंतर असतां, यांच्या मनांचें मीलन कोणत्या सामान्य भूमिकेवर व कसें झालें असावें, या रहस्याचा उलगडा करून घेण्याला एम् वगैरे अनेक गृहस्थ अगदीं उत्कंठित झाले होते.

महाराज निराकारवादी होते; या बाबतींत केशवबाबूंचें व त्यांचें मतैक्य होतें. पण ते साकारवादीही होते. ते ब्रह्मचिंतन करीत, तसेंच पुष्पचंदनादि पूजासाहित्यानें देव-देवींच्या प्रतिमांचेंही पूजन करीत; इतकेंच नव्हे, तर भक्तिभावानें उन्मत्त होऊन त्या प्रतिमांपुढें नृत्य-गायन करीत. बरें, संन्यासी असून पलंगावर —गादीवर निजत! तांबड्या कांठांची धोतरे नेसत! जामानिमा करीत! मोजे व चढाऊ जोडा घालीत! तथापि संसार करीत नव्हते! त्यांच्या मनाची एकंदर ठेवण अगदीं संन्याश्यासारखी असे; म्हणूनच लोक त्यांना परमहंस म्हणत. आतां केशवबाबूंकडे पाहिलें, तर ते केवळ निराकार वादी होते. स्त्रीपुत्रांसह राहून

ते संसार करीत, इंग्रजींत व्याख्यानें देत, धार्मिक बाबींची चर्चा करणारें वर्तमानपत्र चालवीत, आणि अनेक संसारकर्मेंही करीत.

होडी आगबोटीजवळ आली. सर्व मंडळी **महाराजांचें** दर्शन घेण्याला अगदीं उत्सुक झाली होती. त्यांनीं बोटीच्या दरवाजा-जवळ गर्दी करून सोडली. आगबोटीवर चढतांना **महाराजांना** अगदीं त्रास पोहोंचूं नये, म्हणून **केशवबाबू** मोठ्या उत्सुकतेनें काळजी घेत होते.

आगबोटीच्या वरच्या मजल्यावरील खोलींत **महाराजांना** घेऊन जाण्याचे वेळीं त्यांना मोठ्या कष्टानें जागृतीवर आणलें. तरी पण ते भावस्थच होते, ब्रह्मानंदांतच होते. खोलीकडे जातांना त्यांनीं आपल्या शरीराचा सर्व भार एका शिष्याच्या अंगावर टाकिला होता. त्यांचीं पावलें उठत होतीं खरीं, पण केवळ यंत्रासारखीं ! मन होतें ब्रह्मचिंतनांत !

आगबोटीवरील खोलींत त्यांनीं प्रवेश केला; **केशवादि** मंड-ळीनें त्यांना प्रणाम केला, पण तिकडे त्यांचें लक्षही नव्हतें. जी कांहीं थोडी त्यांना जागृति आली होती, तीही हळुहळू नष्ट झाली. त्या खोलींत एक बांक, एक टेबल व कित्येक खुर्च्या होत्या. एका खुर्चीवर **महाराजांना** बसविलें! **केशवबाबू** दुसऱ्या एकीवर बसले; **विजयही** बसला. इतर शिष्यही बसले —बरेच जमिनीवर बसले. ते बहुतेक ब्राह्मोपंथी होते. ती खोली लहानच असल्यामुळें सर्वांचा समावेश तींत होईना. तेव्हां बरेच

खोलीच्याबाहेर उभे राहून दरवाजांतून व खिडक्यांतून मोठ्या उत्सुकतेनें डोकावून पहात होते.

**महाराज** खालीं बसल्याबरोबर पूर्णसमाधींत मग्न—अगदीं बाह्य-शून्य—झाले! सर्व एकदृष्टीनें त्यांच्या मुखाकडे पाहात राहिले. खोलींत फारच गर्दी झाली असून **महाराजांना** मोकळी हवाही मिळत नाहीं, ही गोष्ट **केशवबाबूंच्या** लक्षांत आली. **विजय** पहिल्यानें **केशवबाबूंचा** अनुयायी होता; पण पुढें त्यांच्या पंथाचा त्याग करून तो साधारणब्राह्मोसमाजाचा अनुयायी बनला. **केशवबाबूंनीं** आपल्या समाजाच्या तत्त्वांना पायाखालीं तुडवून आपल्या कन्येचा बालपणींच विवाह केला, याबद्दल त्यानें त्यांच्यावर अनेक प्रसंगीं चांगलें तोंडसुख घेतलें होतें. असा हा **विजय** अगदीं अकल्पित रीतीनें आगबोटीवर आलेला पाहून **केशवबाबूंच्या** मनाची थोडीशी धांदल उडाली. **केशव-बाबू** जागेवरून उठले व त्यांनीं सर्व खिडक्या उघडून टाकिल्या.

संसाराचें कारागृह.

एकदृष्टीनें सर्वांचे डोळे **महाराजांकडे** लागले होते. **महारा-जांची** समाधि उतरली. तरी वृत्ति पूर्ण-पणें ब्रह्मभावांतच रंगलेली होती. ते अस्फुट स्वरानें आईला म्हणाले, ‘आई, तूं मला येथें आणलें कशाला? हे सर्व बद्ध होऊन अडकून पडले आहेत! यांची त्या कारागृहांतून माझ्या हातून मुक्तता कशी बरें होणार?’

संसारी लोक कारागृहांत (संसारांत) बद्ध होऊन अडकले आहेत, कारागृहाच्याबाहेर समाधीच्या मोकळ्या हवेंत त्यांना

येववत नाहीं, त्यांना बाहेरच्या दिव्य प्रकाशाकडे नुसतें पाहा-वतही नांहीं, विषयकर्मांनीं सर्वांचे हातपाय अगदीं जखडून गेले आहेत, असें दिसून आल्यामुळें तर वरील उद्गार महाराजांचे तोंडून निघाले नसतील ना! संसारी जनांना आपल्या कारागृ-हांतील वस्तु तेवढ्या दिसत असतात. देहसुख व विषयकर्म—कामिनी व कांचन—यांतच केवळ जीवनाचें खरें साफल्य आहे, असें त्यांना वाटत असतें. यामुळेंच का **महाराजांचे** तोंडून 'आई, त्वां मला येथें कशाला बरें आणलें! या सर्व बद्धांची या कारागृहां-तून माझ्या हातून कशी मुक्तता होणार?' असे उद्गार निघाले?

देह व आत्मा.

**महाराजांना** हळुहळू बाह्यज्ञान होऊं लागलें. गाझीपूरचे **नीलमाधवबाबू** त्या मंडळींत होते. **महाराज** बाह्यवृत्तीवर आले, असें पाहिल्याबरोबर ते व एक ब्राह्मभक्त, असे दोघे **पाव्हरीबाबा** नांवाच्या एका गाझी-पूरच्या साधूच्या गोष्टी बोलूं लागले.

**एक ब्राह्मभक्त** ( महाराजांना ):—**महाराज**, आम्हां सर्वांच्या सुदैवानें आम्हांला **पाव्हरीबाबांचें** दर्शन घडलें आहे. ते गाझी-पूर येथें असतात. आपणांप्रमाणेंच ते एक सत्पुरुष आहेत.

अद्याप **महाराज** बोलण्यासारख्या स्थितीवर आले नव्हते. त्यांचें हृदय ब्रह्मानंदानें दाटून गेल्यामुळें त्यांच्या तोंडांतून शब्द बाहेर फुटेना. **बाबांची** गोष्ट ज्या गृहस्थानें काढली त्याच्या-कडे पाहून ते फक्त हासले.

**ब्राह्मो** ( महाराजांना ):—**महाराज बाबांनीं** आपली (तुमची) तसबीर आपल्या खोलींत लावून ठेविली आहे.

पुन्हा हासून व आपल्या देहाकडे अंगुलि-निर्देश करून **महाराज** हळूच म्हणाले, ' केवळ उशीची खोळ -उशीचा अभ्रा— आहे हा !'

' उशी व उशीचा अभ्रा ! ' देही व देह ! देह विनश्वर आहे, देहाच्या आंत जो देही आहे, तो अविनाशी आहे; तेव्हां अशा या विनाशी देहाची तसबीर उतरून लाभ कोणता ? असाच **महाराजांच्या** बोलण्याचा आशय असावा, नाहीं बरें ? देह हा अनित्य पदार्थ आहे; तेव्हां अशा अनित्य पदार्थाच्या तसबिरीचा आदर करून काय होणार ? मनुष्याच्या हृदयामध्यें जो अंतर्यामी भगवान् विराजत आहे, त्याचीच पूजा करणें उचित आहे, हाच **महाराजांच्या** बोलण्याचा गर्भितार्थ नव्हे काय ?

**महाराजः**—पण एक गोष्ट विशेषेंकरून लक्षांत ठेविली पाहिजे.

भगवताचा दिवाणखाना.—भक्ताचें हृदय हें भगवंताचें निवासस्थान—मंदिर—होय. तो सर्व भूतांचे ठिकाणीं असतो, हें कांहीं खोटें नाहीं; पण भक्ताचे हृदयामध्यें तो विशेषरूपानें असतो. एखादा जमीनदार असतो, त्याचीं पुष्कळ घरें असतात. त्यांपैकीं वाटेल त्या घरांत तो असतो. पण अमुक घराच्या अमुक दिवाणखान्यांत तो नेहमीं असतो, असें लोक म्हणतात. भक्ताचें हृदय हा भगवंताचा दिवाणखाना होय.

भगवंताचें दर्शन व्हावें, अशी जर कोणाची इच्छा असेल, तर त्यानें त्या दिवाणखान्यांत त्याची गांठ घेण्याचा प्रयत्न करावा.

(सर्व हासतात).

ईश्वर एक—पण त्याचीं भिन्न नांवें.

ज्ञानी किंवा वेदान्ती ज्याला ब्रह्म म्हणतात, त्यालाच योगी आत्मा व भक्त भगवान् म्हणतात. ब्राह्मण तोच; पण जेव्हां तो देवाची पूजा करीतो, तेव्हां त्याला ‘ पुजारी ’ म्हणतात; व तोच जेव्हां स्वयंपाकाचें काम करितो, तेव्हां त्याला ‘ आचारी ’ म्हणतात.

अद्वैत.

जो वेदान्ती ज्ञानमार्गाचा अवलंब करून ब्रह्मपद गांठण्याची खटपट करितो, तो विचार करितां करितां ‘नेति, नेति,’ असें म्हणतो; म्हणजे हें ब्रह्म नव्हे, तें ब्रह्म नव्हे, जीव ब्रह्म नव्हे, जगत् ब्रह्म नव्हे. असा विचार करितां करितां जेव्हां मन स्थिर होतें, वासनोर्मींच्या आघातांनीं जेव्हां तें चलन पावत नाहीं, म्हणजे अर्थात् जेव्हां मनाचा पूर्णपणें लय होतो, तेव्हांच समाधि साधते. तेव्हांच ब्रह्मज्ञान होतें. ‘ब्रह्म सत्य, जगन्मिथ्या’ या तत्त्वाचा अनुभव त्याच वेळीं घडतो. वस्तूमात्राची नामरूपात्मकता स्वप्नवत् आहे; ब्रह्म कसें आहे, हें शब्दांनीं सांगतां येण्यासारखें नाहीं; ब्रह्म म्हणजे एक व्यक्ति आहे (व्यक्तिब्रह्म), असेंही म्हणण्याची सोय नाहीं; असें मग त्याच्या अनुभवास येतें.

वेदान्ती किंवा ज्ञानी लोकांचें हें म्हणणें झालें. भक्तांची विचारसरणी याहून भिन्न असते. त्यांना सर्व अवस्था सत्यच वाटतात.

भक्त किंवा द्वैती.

जागृतावस्था ते सत्य मानितात. जगतालाही ते सत्यच मानितात, स्वप्नवत् मानीत नाहींत. नामरूपेंही त्यांना सत्यशीं वाटतात. ईश्वर सगुण आहे, अनेक गुणांचा निधि आहे, आणि जगतांतील एकंदर वस्तु त्यानें निर्माण केल्या आहेत, हें सर्व त्या भगवंताचें ऐश्वर्य आहे, असें ते म्हणतात. आकाश, नक्षत्रें, चंद्र, सूर्य, पर्वत, समुद्र, जीवजंतु, हें सर्व त्यानें उत्पन्न केलें आहे, त्याचें ऐश्वर्य आहे, अशी त्यांची भावना असते. तो अंतरीं जसा हृदयांत आहे, तसा बाहेरही आहे. जो उत्तम भक्त असतो तो आणखी असें म्हणतो, 'चोवीस तत्त्वें[१]–जीव, जगत्, हें सर्व तो स्वतांच झाला आहे.' साखरेंत मिळून जाऊन साखर होऊन राहणें, भक्ताला आवडत नाहीं; निराळा राहून साखरेची गोडी घेत बसणें त्याला बरें वाटतें. (सर्व हासतात).

भक्ताचा भाव कसा असतो, हें तुम्हांला माहीत आहे काय? भक्त असें म्हणतो, 'हे भगवन्, तूं प्रभु, मी तुझा दास; तूं आई, मी तुझें बालक; किंवा, तूं माझें बालक, मी तुझा पिता वा माता; किंवा, तूं पूर्ण, मी तुझा अंश.' 'मी ब्रह्म आहें,' असें म्हणण्याची इच्छा भक्ताला केव्हांच व्हावयाची नाहीं.

१ चोवीस तत्त्वें=स्थूल पंचमहाभूतें, सूक्ष्म पंचमहाभूतें, पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार, आणि प्रकृति.

परमात्म्याचा साक्षात्कार घडावा, याकरितां योग्याची खटपट असते. आत्मनिग्रहानें जीव व शिव, जीवात्मा व परमात्मा, यांचा योग करणें हा त्याचा असतो मुख्य उद्देश. विषयांच्या मागें सैरावैरा धांवत सुटलेल्या मनाला खेंचून आपल्या ताब्यांत आणण्याचा— एका ठिकाणीं स्थिर करण्याचा—तो पहिल्यानें प्रयत्न करितो; व मग तें स्थिर झालेलें मन तो परमात्म्याकडे लावण्याची व्यवस्था करितो. याकरितांच प्रथमावस्थेंत त्याला निर्जन प्रदेशाचें सेवन करून व स्थिरासन होऊन अनन्यमनानें परमात्म्याचें ध्यानचिंतन करावें लागतें.

परंतु मूल-वस्तु एकच असून भेद काय तो फक्त नांवांत आहे. जें ब्रह्म तोच आत्मा आणि तोच भगवान्. ब्रह्म ब्रह्मज्ञान्याचें; परमात्मा योग्यांचा; आणि भगवान् भक्तांचा. वस्तु एक, नांवेंमात्र तीन.

---

# बिंदु १६.

## सगुणईश्वर, आदिशक्ति व तिचें ऐश्वर्य.

अग्निनौका निघून कलकत्त्याकडे परत जाऊं लागली. मंडळी रामकृष्णांच्या मुखाकडे एकदृष्टीनें पाहत असल्यामुळें व त्यांच्या पवित्र मुखांतून स्रवणाऱ्या वाक्सुधेचें पान करण्यांत तल्लीन होऊन गेल्यामुळें, त्यांना आपली नौका चालली आहे कीं नाहीं, याची

दादही नव्हती. भ्रमर एकदां पुष्पावर बसला, म्हणजे त्याचें गुंऊंऽऽ बंदच होतें.

हळुहळू दक्षिणेश्वराचें देवालय नौकेनें मागें टाकलें. त्या सुंदर देवालयाचा तो मनोहर देखावा दृष्टिपथाच्या बाहेर गेला. खालच्या बाजूला गंगानदीचें निर्मल जल तरंगांच्या रूपानें विहार करीत होतें, व अग्निनौका आपल्या पंख्यानें तरंगांना कापीत आपला मार्ग आक्रमीत असतां ते तरंग विक्षुब्ध होऊन जोरानें फेंसाळत होते, व कल्लोलरव करीत होते. पण नौकेंतील भक्तगणाच्या कर्णांवर त्याचा कांहीं परिणाम होत नव्हता. सहास्यवदन, आनंदमय, प्रेमानुरंजितनयन, प्रियदर्शन, अशी जी एक अद्भुत विभूति त्यांच्या-पुढें बसली होती, तिच्याकडे ते अगदीं मुग्ध होऊन पाहत होते. सर्वत्यागी, प्रेमी व विरागी अशा त्या योगमूर्तीवर केवळ मुग्धपणें त्यांचे डोळे खिळून गेले होते. **महाराजांचें** भाषण चालू होतें.

**महाराजः**—वेदान्ती, ब्रह्मज्ञानी असें म्हणतात कीं, ब्रह्ममात्र वस्तु, बाकी सर्व अवस्तु; एक ब्रह्ममात्र सत्य, सर्व जगत् मिथ्या आहे. त्यांच्या मतानें सृष्टि, प्रलय, जीव, जगत् इत्यादि सर्व दृश्य पसारा केवळ **शक्तीचा—आईचा—मायेचा**—खेळ आहे; विचार करूं गेल्यास हें सर्व स्वप्नवत् आहे, **शक्तिही** स्वप्नवत् आहे, अवस्तु आहे. पण जोंपर्यंत विषयशून्य बनून मनाचा लय साधला नाहीं, जोंपर्यंत समाधिस्थिति हातीं आली नाहीं, तोंपर्यंत सामान्य माण-

ब्रह्म आणि ब्रह्म-शक्ति.

सानें ' नेति, नेति, ' या तत्त्वाची कितीही जरी काथ्याकूट केली, तरी शक्तीच्या—मायेच्या—हद्दीच्या पलीकडे त्याला केव्हांही उडी मारतां येणार नाहीं. ' मी ध्यान करितों, ' ' मी चिंतन करितों,' हे उद्गार—शक्तीच्या—आईच्या—ऐश्वर्यांतलेच—प्रांतांतलेच—आहेत.

ईश्वर एक.

तेव्हां ब्रह्म आणि शक्ति हीं अभेद आहेत. जर ब्रह्म खरें, तर शक्तिही खरी. दाहकशक्तिशून्य अग्नीची कल्पना करितां यावयाची नाहीं. अग्नि म्हटला, कीं त्याची दाहकशक्ति बरोबर आलीच. अग्नि मानिला कीं दाहकशक्तिही पण मानिली पाहिजे. अग्नि सोडून नुसत्या दाहकशक्तीची भावना करितां येणार नाहीं, किंवा दाहक-शक्ति सोडून नुसत्या अग्नीची भावना होणार नाहीं. तसेंच सूर्य सोडून नुसत्या त्याच्या किरणांची कल्पना करितां येणार नाहीं; किंवा किरण सोडून नुसत्या सूर्याची कल्पना होणार नाहीं.

दूध हें काय आहे? तो एक पांढरा पदार्थ आहे, असें आपण म्हणतों. आतां, दूध सोडून त्याच्या नुसत्या धवलत्वाची कल्पना करितां यावयाची नाहीं; किंवा धवलत्व सोडून नुसत्या दुधाची कल्पना व्हावयाची नाहीं.

त्याचप्रमाणें ब्रह्माला सोडून नुसत्या शक्तीची किंवा शक्तीला सोडून केवल ब्रह्माची भावना व्हावयाची नाहीं. नित्याला सोडून लीलेची ( लीला=दृश्य पसारा ) व लीलेला सोडून नित्याची भावना होणें, अशक्य आहे. आदिशक्ति ही लीलामयी आहे; ती उत्पत्ति, स्थिति, लय करिते. तिचें नांव काली.

काली ब्रह्म आहे, ब्रह्म काली आहे. वस्तु एकच. ती निष्क्रिय आहे, उत्पत्तिस्थितिलयादि कोणचेंही कार्य ती करीत नाहीं, अशी जेव्हां माझी भावना असते, तेव्हां मी तिला ब्रह्म म्हणतों. ती हीं सर्व कार्यें करिते, अशी जेव्हां माझी भावना होते, तेव्हांच मी तिला काली म्हणतों, शक्ति म्हणतों. व्यक्ति एकच; भेद काय तो नामरूपाचा.

सर्व धर्मांचा समन्वय.

पदार्थ एकच; पण त्याचीं नांवें निरनिराळ्या भाषांत निरनिराळीं असतात. उदाहरणार्थ—जल, वॉटर (इंग्रजी), पानी, वारि, ऍक्वा (लॅटिन्). तळ्याला चार घाट असतात. एका घाटावर हिंदू पाणी पीत असतात, ते त्याला 'जल' म्हणतात. मुसलमान दुसऱ्या घाटावर पीत असतात, ते त्याला 'पानी' म्हणतात. तिसऱ्या घाटावर इंग्रज गृहस्थ पीत असला, तर तो त्यालाच 'वॉटर' म्हणतो. पाणी एकच; फक्त शब्दांत–नांवांत–फरक!

त्याप्रमाणेंच परमेश्वर एकच, त्याचीं नांवेंमात्र निराळीं. त्याला कोणी अल्ला म्हणतात, कोणी गॉड (इंग्रजी शब्द) म्हणतात, कोणी ब्रह्म म्हणतात, कोणी काली म्हणतात, कोणी राम, हरि, विष्णु, दुर्गा, जीझस (येशू ख्रिस्त), बुद्ध, अशीं त्याला नांवें देतात.

**केशव** (सहास्य):—**महाराज**, काली कोणकोणच्या रूपांनीं लीला करिते—या लीलामय जगतांत प्रगट होते, तेवढें कृपा करून पुन्हा सांगावें.

**महाराज** ( हासत हासत ):—ती नाना भावांनीं लीला करिते;

महाकाली.

—कधीं ती **महाकाली** असते, म्हणजे निरुपाधिक, निरंजन, निराकार असते; कधीं **नित्यकाली** असते, म्हणजे जगतासारखी अशाश्वत नसते; कधीं ती **स्मशानकाली** बनून मृत्यूवर अंमल गाजविते; घटकेंत ती **रक्षाकाली** होऊन आपल्या मुलांचें रक्षण करिते, त्यांचा योगक्षेम चालविते; कधीं ती **श्यामाकालीचें** रूप घेऊन आपल्या भक्तांना आनंदविते. तंत्रांमध्यें **महाकालीचें**, **नित्यकालीचें** वर्णन आहे. जेव्हां जग शून्यावस्थेंत होतें, जेव्हां सृष्टि नव्हती, चंद्र नव्हता, सूर्य नव्हता, ग्रह नव्हते, पृथ्वी नव्हती, जेव्हां जिकडे तिकडे निबिड अंधारावांचून कांहीं नव्हतें, तेव्हां **महाकाली** निराकाररूपानें **महाकालाच्या** ठिकाणीं विलीनपणें विराजत होती ! **महाकालीच्या** ठिकाणीं अनेक कोमलभाव आहेत,—ती वराभयदायिनी आहे ! याच स्वरूपांत गृहस्थांच्या घरोघर तिची पूजा होते. व याच स्वरूपांत सामान्यजनांना ती गम्य आहे ! महामारी, दुर्भिक्ष, धरणीकंप, अनावृष्टि, अतिवृष्टि, इत्यादि आपत्ति जेव्हां मनुष्यांवर कोसळतात, तेव्हां **रक्षाकाली** या भावनेनें लोक तिची पूजा करितात. **स्मशानकालीची** संहारमूर्ति असते. शव, शिवा ( कोल्ही ), डाकिणी, जोगिणी, यांच्या मेळ्यांत ती स्मशानांत वावरत असते. तेव्हां तिचें रूप किती विकट व कराल असतें म्हणून सांगावें ! सर्व शरीर रक्तानें माखलेलें, रक्तानें पाघळलेलें असतें ! गळ्यांत

रुंडमाला लोंबत असतात ! मृतमनुष्यांच्या हस्तांचा पट्टा कमरेला बांधलेला असतो !

उत्पत्ति कशी ?

तिचा उत्पत्तीचा व्यवसाय असा चालतो. जेव्हां जगद्विनाशाचा —प्रलयाचा—समय येतो, तेव्हां एखाद्या दूरदृष्टि, पोक्त व संसारी बाईप्रमाणें माझी आई सृष्टीचें सकलबीज नीट संगृहीत करून ठेविते. जी बायको चांगली संसारी असते, तिचें एक मडकें बाजूला ठेवून दिलेलें असतें; त्यांत ती संसाराला लागणाऱ्या हजारों बारीकसारीक वस्तूंच्या पुरचुंड्या टाकून ठेविते. ( केशवबाबू व इतर हासतात.)

**महाराज** ( हासत हासत ):——हां बाबा ! तसें असतें खरें. संसारी बायकोचें खरोखरच असें एक मडकें केलेलें असतें. भोपळा, काकडी, पडवळ, गोवारी, भेंडी, वगैरे भाज्यांचीं बियें, समुद्रफेण, इत्यादि हजारों जिनसा त्यांत टाकलेल्या असतात. ज्या ज्या वेळीं ज्या ज्या जिनसेची तिला गरज लागते, त्या त्या वेळीं ती ती जिन्नस ती त्यांतून बाहेर काढिते. माझी आई पण जगाच्या नाशानंतर——प्रलयानंतर—सृष्टीचें बीज असेंच राखून ठेविते.

कोळी व त्याचे जाळें.

**आदिशक्ति** सृष्टीच्या जशी आंत असते, तशीच बाहेरही असते. जगत्प्रसवानंतर—सृष्टीच्या उत्पत्तीनंतर —ती जगतांतच वास करून असते. ती कोळ्यासारखी असून जगत् हें तिचें जाळें होय. कोळी पहिल्यानें आपल्याच नाभींतून जाळें बाहेर काढितो आणि आपण मग त्याच्या

मध्यभागीं बसून राहतो. जगताचें आधान आणि आधेय हीं दोन्ही माझी आईच आहे. जगताचें निमित्तकारण तीच व उपादानकारणही तीच.

काली—माझी आई—वर्णानें काळी आहे काय? नाहीं, मुळींच नाहीं. ती दूर आहे—मानवी ज्ञानाला अगम्य आहे—म्हणून काळीशी दिसतेमात्र; तिला जवळ करा—तिचें ज्ञान करून घ्या, कीं ती काळी नाहीं, असेंच तुम्हांला दिसून येईल.

आकाश दुरून निळें दिसतें, नाहीं बरें? पण जवळचें आकाश पाहिलें, तर त्याला रंगच नसतो. समुद्राच्या जलाचीही अवस्था तशीच. दुरून पाहिलें कीं, तें निळें दिसतें. पण जवळ जा, त्यांतलें थोडेंसें हातांत घेऊन पहा, म्हणजे त्याला रंग असा कोणताच नाहीं, असें तुम्हांला दिसून येईल. त्याचप्रमाणें कालीच्या—माझ्या आईच्या—जवळ जाऊन पाहा—तिचें अपरोक्षज्ञान करून घ्या—म्हणजे ती निर्गुण, निराकार ब्रह्मच आहे, असें तुमच्या प्रत्ययास येईल.

इतकें बोलतां बोलतांच प्रेमोन्मत्त होऊन महाराज गाऊं लागले:—

## पद.

### शिव व शक्ति यांचें अभिन्नत्व.

( चालः—वसंती बघुनि मेनकेला० )

**मना श्रीकाली मम जननी ॥**
**काळी काळी कां बदसी बा अविवेका, करुनी ॥ ध्रु० ॥**

भवानी विनटे दिग्वसनीं ॥
औदार्याच्या क्षमादयेच्या सुंदर आभरणीं ॥
दिसे ती श्यामल जरि वरुनी ॥
हृदयपद्म हें करी प्रफुल्लित तेज आंत भरुनी ॥ मना श्री० ॥१॥

बंध व मोक्ष या दोहोंचेंही कर्तृत्व तिच्याकडेच आहे. 'कामिनी व कांचन' यांच्या शृंखलांनीं संसारी जीव जे बद्ध होऊन पडले आहेत, त्याला कारण तिचीच माया आहे. बरें, तिची—माझ्या आईची—कृपा झाली कीं, त्या बंधनांतून ते मुक्त होऊन जातात. ती आपल्या मुलांना भवसागराच्या पलीकडे घेऊन जाते आणि त्यांचीं बंधनें तोडून टाकते. अर्थात् ती भवबंधनहारिणी व तारिणी आहे.

जीविताचे कोडें.

नंतर गंधर्वांनाही लाजवील अशा मधुर आवाजानें महाराज गाऊं लागले:—

## पद.

## आई आणि मुक्त जीव.

( चालः—भूपती खरें ते वैभव० )

श्रीप्रणवरूपिणी शिवदा काली आई ॥
क्रीडनीं गुंग किति साद न ऐकूं जाई ॥ ध्रु० ॥
या विषम जगाच्या ऐन चव्हाट्यावरतीं ॥
खेळते जिवाचा पतंग करुनी सुमती ॥
बांधिला तयाला मायेचा हा दोरा ॥
बहु चढवी वर वर आशेचा त्या वारा ॥
( चा. ब. ) वांकड्या सरळ दिसती ज्या ॥ लोचना ॥

त्या वंशशलाकारूपी ॥ वाहिन्या ॥
हें चर्मचि कागद नोहे ॥ बा मना ॥
( चा. प. ) निर्मिलें पतंगा स्वगुणें निजलीलांहीं ॥
या अन्य उपाधी कृत्रिम साऱ्या कांहीं ॥ श्रीप्रणव० ॥१॥
या विषयरूपि रे काचरसामाझारीं ॥
हा भिजवुनि दोरा मांजा केला भारी ॥
या लक्षपतंगीं चुकोनि एकादाच ॥
होतसे मुक्त कीं तुटोनि दोरा साच ॥
( चा. ब. ) हासते खिदळते माता ॥ बहुपरी ॥
वाजवी प्रमोदें टाळ्या ॥ कितितरी ॥
बघुनि त्या पतंगा मुक्त ॥ झडकरीं ॥
( चा. प. ) दाक्षिण्यसमीरें पतंग उडुनी जाई ॥
लंघुनी भवाब्धी लीन अनंतीं होई ॥ श्री० ॥ २ ॥

माझी आई लीलामयी आहे; हा संसार केवळ तिची लीला आहे. ती इच्छामयी आहे, आनंदमयी आहे. आपल्या लक्षावधि मुलांपैकीं एखाददुसऱ्याची ती स्वेच्छेनें कारागृहांतून मुक्तता करिते.

**एक ब्राह्मभक्तः**—महाराज, तिनें मनांत आणिलें, तर सर्वांना मुक्ति देण्याचें तिचें सामर्थ्य आहे. तर मग तिनें आम्हां सर्वांना संसारांत बद्ध तरी कां करून ठेविलें आहे?

जीवात्मा बद्ध कां ?

**महाराजः**—केवळ तिची इच्छा म्हणून. आपण आपल्या मुलांना घेऊन मांडलेला डाव खेळत रहावें, अशी तिची इच्छा आहे. लपणडावांत जें कोणी येऊन 'भोग्या'-च्या अंगाला शिवेल,

त्याच्या पाठीमागची धांवपळ सुटते. मग पुढें चालू राहिलेल्या डावांत त्याला पडतां येत नाहीं. पण ज्यांना 'भोग्या'-च्या अंगाला शिवण्याचें काम साधलें नाहीं, त्यांना आपला खेळण्याचा क्रम सुरू ठेवावाच लागतो; व तसा तो त्यांनीं ठेविलेला पाहून 'भोग्या'-ला मोठा संतोष वाटतो. सगळ्यांनीं 'भोग्या'-च्या अंगाला शिवून जर खेळ संपवून टाकला, तर 'भोग्या' असंतुष्ट होईल. खेळ चालू असला, कीं 'भोग्या'-ला आनंद! म्हणूनच—

या लक्षपतंगीं चुकोनि एकादाच ॥
होतसे मुक्त कीं तुटोनि दोरा साच ॥
( चा. ब. ) हांसते खिदळते माता ॥ बहुपरी ॥
वाजवी प्रमोदें टाळ्या ॥ कितितरी ॥
बघुनि त्या पतंगा मुक्त ॥ झडकरीं ॥

[ सव आनंदित होतात. ]

तिनें—माझ्या आईनें—मनाला, जणूं काय अगदीं गुपित म्हणून, नेत्रसंकेतानें असें सांगितलें आहे कीं, 'जा, आणि पुन्हा माझी आज्ञा होईपर्यंत संसारांत राहा.' तेव्हां यांत मनाचा काय बरें दोष? बरें तिची कृपा झाली कीं. मनाला तीच संसारांतून परत आणून मुक्त करील;—मनाची विषयबुद्धि नाहींशी करून टाकील कीं तें मुक्तच! मग पुन्हा तें तिच्या पादपद्मीं अनन्यभावानें गुंगून पडेल!

नंतर आपण एक संसारी जन आहों, या भावनेनें महाराज आपलीं सर्व दुःखें पुढील पद्याच्या रूपानें आईपुढें मांडण्याकरितां गायन करूं लागले:—

# पद.

## आई व तिची मुलें.

( चालः—सगुण गुण माया० )

हाच विचार ॥ पीडी मज वारंवार ॥ ध्रु० ॥
कृपासिंधु तूं असतां जननी ॥
मीही जागृत तैसा भुवनीं ॥
चोरी होई कैसी सदनीं ॥
पडे हें गूढ ॥ करि मज तें मूढ-वि-मूढ ॥ १ ॥
ध्याया पावन नाम मनोहर ॥
निश्चय केला कितिदां दृढतर ॥
कैंवि पडे परि कळे न विसर ॥
ऐन प्रसंगीं ॥ मन केवळ चंगीभंगी ॥ २ ॥
दिलें न तूं परि मजला कांहीं ॥
म्हणुनी तुजला मिळलें नाहीं ॥
द्यावें घ्यावें नय हा बाई ॥
कोणता दोष ॥ वद माझा न धरीं रोष ॥ ३ ॥
देतिस जरि तूं मजला कांहीं ॥
त्यांतूनचि गे परि लवलाहीं ॥
मिळतें जननी! खास तुलाही ॥
रूढ हा न्याय । शंका तव धरि कां हृदय ॥ ४ ॥
यशोपयश कीं सुरस कुरस वा ॥
देणें तव हें हातीं जीवा ॥
देशि न त्यांतिल रस जो बरवा ॥
रसेश्वरि सांग ॥ कां करिसी जनरसभंग ॥ ५ ॥
मन तूं अंबे! दिधलें मजला ॥
कानगोष्ट परि कथुनि तयाला ॥

फितूर करुनी डाव साधिला ॥
नेत्रसंकेतें ॥ कथिलें मज वंचायातें ॥ ६ ॥
सुखरूपी या क्षितिजामार्गे ॥
धांवत फिरतों जगतिं शुभांगे ॥
विपरित हा! परि करास लागे ॥
अशी तव माव ॥ वद कैसा लागे ठाव ॥ ७ ॥
बिमल सुखाची इच्छा करितां ॥
दुःखभार तो बसतो माथां ॥
सत्य इच्छितां असत्य हाता ॥
काय करावें ॥ वद कोणा दूषण द्यावें ॥ ८ ॥

तिच्याच—माझ्या आईच्याच—मायेनें भुलून गेल्यामुळें मनुष्य या भवसागरांत गटंगळ्या खात राहिला आहे:—संसारी बनून राहिला आहे. 'प्रसाद' म्हणतोः—

मन तूं अंबे! दिधलें मजला ॥
कानगोष्ट परि कथुनि तयाला ॥
फितूर करुनी डाव साधिला ॥
नेत्रसंकेतें ॥ कथिलें मज वंचायातें ॥ १ ॥

---

## बिंदु १७.

### कर्मयोग,—संसार आणि निष्काम कर्म.

**ब्राह्मभक्तः**—महाराज, सर्वसंगपरित्याग केल्यावांचून ईश्वरप्राप्ति मनुष्याला व्हावयाची नाहीं, हें खरें का?

**महाराजः**—(सहास्य) नाहीं रे बाबा! तुम्हांला सर्वसंगपरित्याग करायला पाहिजे कशाला? तुम्ही आहां ते ठीक आहां. तुम्ही नवरसांत पोहत आहां, तेंच बरें आहे. संसार म्हणजे

अशोधित सोन्यासारखा किंवा उसाच्या रसासारखा आहे. अशोधित सोन्यांत जसें शुद्ध सोनें असतें, तशीच मातीही असते; उसाच्या रसांत जशी शुभ्र व कणीदार साखर असते, तशीच मळीही असते. त्याचप्रमाणें संसार म्हणजे सुख व दुःख यांची खिचडी आहे. दोहोंतही गोडी आहेच, नाहीं का? (हशा).

तेव्हां तुम्ही आपले बरे आहां, झालें. नक्स[1] म्हणून एक

---

१ हा एक प्रकारचा पत्त्यांचा जुगारी डाव आहे. यांत किमान तीन व कमाल दहा गडी असतात. तीनपासून दहापर्यंत असतील तितके गडी चालतात. पत्त्यांच्या एका जोडांतील चार गुलाम काढून टाकून बाकीचीं अठ्ठेचाळीस पानें घेतात. पानावर जितके ठिपके तितके त्या पानाचे मार्क. म्हणजे एक्याला एक मार्क, दुर्रीला दोन, तिर्रीला तीन असे दहल्यापर्यंत; राणीला अकरा व राजाला बारा. पहिल्यानें सतरा मार्क होतील त्यानें डाव जिंकला. सतरापेक्षां ज्यास्त मार्क झाले, तरी डाव हरलाच. बरोबर सतराच मार्क झाले पाहिजेत.

**खेळण्याची पद्धतिः**—जितके गडी असतील त्यापैकीं प्रत्येकानें सारखे पैसे किंवा सारखे रुपये घेऊन वाटोळें बसावयाचें. प्रत्येक डावाला जितके पैसे किंवा रुपये लावावयाचें ठरेल, तितके प्रत्येकानें आपापल्या पैशांतून काढून आपापल्यापुढें ठेवावयाचे. कोणी तरी एका गड्यानें पानें पिसून प्रत्येकाला एकेक पान द्यावयाचें; व बाकीचीं पानें मध्यें ठेवावयाचीं. नंतर प्रत्येकानें प्रत्येक पाळीला एक याप्रमाणें आपल्याला वाटतील तितकीं पानें त्यांतून घ्यावयाचीं. पाळीला पान घेतलेंच पाहिजे, असेंमात्र नाहीं. ती खुशीची गोष्ट आहे. असें पाळीनें पान घेतां घेतां दुसरें पान हातांत उचलून घेतल्यापासून ज्याच्या हातांत पहिल्यानें सतरा मार्क होतील त्यानें आपलीं पानें इतर गड्यांना दाखवावीं व त्या डावाला लाविलेले सर्वांचे पैसे घ्यावे. तात्पर्य सतरा मार्क कोणाचे तरी होतपर्यंत डाव चालू असावयाचा. सतरांपेक्षां ज्यास्त मार्क झाले, तर तो माणूस त्या डावांतून फुकट गेला. कोणाचेच डावांत सतरा मार्क आले नाहींत व ज्यास्त मार्क होतील या भीतीनें कोणीच जर पान ओढून घेण्याला तयार नसेल, तर सर्वांत ज्याचे अधिक (पण सतरांपेक्षां कमी) मार्क असतील, त्यानें डाव जिंकला असें समजावयाचें. हा बंगाली डाव आहे, पण हल्लीं तिकडेही तो फारसा प्रचारांत नाहीं.

पत्त्यांचा डाव आहे, तो तुला ठाऊक आहे का? मीं आपलीं वेड्यासारखीं ज्यास्ती पानें ओढून घेतलीं, त्यामुळें स्वाभाविकपणें माझे वाजवीपेक्षां फाजील मार्क झाले. अर्थात् डावांतून मी जळून गेलों! तुम्ही मोठे वस्ताद! तुमच्यापैकीं कोणी दहा मार्क केले, कोणी सहा केले, कोणी पांचच केले! तुम्ही वस्तादगिरीनें बेताचींच पानें ओढून घेतलीं! तेव्हां माझ्यासारखे तुम्ही जळून कांहीं गेलां नाहीं; तुमचा डाव चालू राहिला; बरेंच झालें; नाहीं का? (हशा).

मी खरेंच सांगतों, तुम्ही संसारांत असलां, तरी कांहीं हरकत नाहीं. फक्त तुमचें मन ईश्वराचे ठिकाणीं असूं द्या. तें नसेल तर मात्र सर्व कांहीं फसेल! एका हातानें आपलीं सर्व कर्मे करा, व दुसऱ्या हातानें भगवंताचें चरणकमल धरून ठेवा. ज्या वेळेस कोणतेंही कर्म करावयाचें नसेल, त्या वेळेस दोन्ही हातांनीं ईश्वराला कवळून धरा.

परिस्थितीचा जोर.

मनावर सर्व मदार आहे पहा. मन बद्ध असलें, कीं तुम्ही बद्ध; मन मुक्त असलें, कीं तुम्ही मुक्त. मनावर जो रंग तुम्ही चढवाल तो रंग तें घेईल. त्याला तांबडा रंग द्या, तें तांबडें होईल; नारिंगी द्या, नारिंगी होईल; पिवळा द्या, पिवळें होईल; जसा रंग घाल तसें तें दिसेल. परीटघडी कपड्यासारखी त्याची अवस्था आहे. तो शुभ्र धुवट कपडा आपण ज्या रंगांत बुडवूं तो रंग त्याच्यावर

लागलाच चढतो, नाहीं बरें? हें पहा, जर एखादा माणूस इंग्रजी शिकला, तर इंग्रजी शब्द आपोआप त्याच्या तोंडांतून बाहेर पडूं लागतात; कित्येक वेळा त्याची इच्छा नसूनसुद्धां त्याची जिव्हा 'फूटफाट, एटमॅट' बोलून जाते (सगळे हांसतात); त्याच्या पायांत बूट येऊन बसतात, तोंड शीळ घालूं लागतें; थोडक्यांत सांगावयाचें, म्हणजे इंग्रज गृहस्थाची सर्व बाह्य ऐट आपल्या वर्तनांत आणण्याची तो शिकस्त करितो. बरें, संस्कृत शिकून जो पंडित झाला, त्याच्या तोंडांत संस्कृत श्लोक खिळून जातात. मनाला जर आपण कुसंगतींत ठेविलें, तर तिचा परिणाम आपल्या आचारावर, विचारावर व उच्चारावर व्हावयाचाच. उलट त्याला जर आपण भक्तसमागम लावून दिला, तर तें ईश्वरचिंतनांत रमेल, व हरिकथेशिवाय जिव्हेला कोणत्याच भाकडकथा उच्चारूं देणार नाहीं.

तेव्हां सर्व कांहीं मनावर आहे. तें मोठें बहुरूपी आहे. जसा देश असेल तसा चटकन वेष करून तें तद्रूप होतें. एका अंगाला पत्नी असते, दुसऱ्या अंगाला कन्या असते; दोघींच्याही अंगावर मनुष्य हात टाकून त्यांना कुरवाळीत असतो. पण पत्नीला कुरवाळतांना भाव निराळा व कन्येला कुरवाळतांना भाव निराळा. भाव दोन खरे, पण मन एकच!

# बिंदु १८.

## ख्रिस्तीधर्म, ब्राह्मसमाज व पापवाद.

**श्रीरामकृष्ण** ( ब्राह्मो भक्तांना ):—बंधनाला कारण मन; मोक्षालाही कारण मनच. मी मुक्त पुरुष आहें; जगांत असलों किंवा अरण्यांत असलों, तरी मला बंधन कशाचें? मीं **राजाधिराजा**चा पुत्र आहें, ईश्वराचा पुत्र आहें. मला बद्ध करणारा कोण आहे? सर्पदंश झालेल्या माणसानें, 'मला विषाची बाधा झालीच नाहीं,' असे जर भावनापूर्वक निश्चयाचे उद्गार काढिले, तर त्याच्यावर विषाचा कांहींच परिणाम होत नाही. त्याचप्रमाणें 'मी बद्ध नाहीं, मुक्त आहें,' अशी मनाची भावना करून जर तसेच तुम्ही उद्गार काढीत रहाल, तर तुम्ही तसेच व्हाल, मुक्तच व्हाल.

एकदां एका माणसानें मला एक ख्रिस्ती पुस्तक आणून दिलें. तें वाचून त्यांतला मला अर्थ सांग, असें मीं त्याला म्हटलें. आणि तुम्हांला काय मौज सांगावी! अव्वलपासून अखेरपर्यंत त्या पुस्तकांत एकच रड गाइलेली होती—'पाप,' 'पाप,' जिकडे तिकडे 'पाप.'

( केशव बाबूंना ) तुम्हां ब्राह्मसमाजी लोकांनासुद्धां 'पाप' आणि 'पापी' यांशिवाय कांहीं दिसतच नाहीं. जो कोणी 'मी बद्ध,' 'मी बद्ध,' असें पावलों-पावलीं घोकीत राहील, त्या बेट्याच्या नशिबीं खरोखर शेवटीं बद्धताच यावयाची. जो अभागी

रात्रंदिवस 'मी पापी.' 'मी पापी,' असें जपीत राहील, तो अखेरीस खराच 'पापी' व्हावयाचा!

पापी माणसानें श्रद्धाळू मनानें जर भगवंताचें नांव घेतलें, तर तो पावन–मुक्त–झालाच पाहिजे. हरिनामासंबंधानें अशी श्रद्धा असली पाहिजे–'काय! मीं त्याचें (भगवंताचें) नाम घेतलें आहे, आतां माझ्या ठिकाणीं पाप असणार कोठलें? पापाचा संभव आतां होणार कसा? आतां मला बंधन तरी कशाचें?' कृष्णकिशोरबाबू पापभीरु हिंदू, सदाचारनिष्ठ ब्राह्मण! ते एकदां वृंदावनाच्या यात्रेला गेले होते. एक दिवस देवळें फिरतां फिरतां त्यांना फार तहान लागली. म्हणून ते एका विहिरीवर गेले. तेथें एक माणूस उभा होता. त्याला ते म्हणाले, 'बाबा, थोडें मला पाणी प्यायला देतोस का? तुझी जात कोण बरें?' त्यानें उत्तर केलें, 'महाराज, मी हीन जातीचा आहें, मोची आहें.' त्यावर कृष्णकिशोर म्हणाले, 'कांहीं हरकत नाहीं. तूं तोंडानें एकदां 'शिव' असें म्हण, आणि पाणी काढ.'

भगवंताचें नाम घेतलें, कीं मनुष्याचा देह, मन, सर्व कांहीं शुद्ध होऊन जाईल.

'पाप' आणि 'नरक' अशा अमंगळ गोष्टींनीं जिव्हा विटाळतां कशाला? 'भगवंता, जीं कर्में करूं नयेत तीं मीं केलीं, जीं करावीं तीं मीं केलीं नाहींत; तेव्हां हे दयासागरा, मला क्षमा कर;' असें एकदां तोंडानें म्हणा, आणि त्याच्या पवित्र नामावर विश्वास ठेवा; कीं तुमच्या सर्व पापांचें क्षालन होईल.

असें म्हणून महाराज प्रेमोन्मत्त होऊन नाममाहात्म्य गाऊं लागले:—

### पद.

( चाल:—शारदे! दासकामदे! )

अंबिके! भक्तरंजके! दुःखभंजके! जरी तव नाम ॥
मृतिसमयिं मुखीं ये असतां मन निष्काम ॥ध्रु०॥
मग तरी, मला शांकरी, मुक्ति झडकरीं कशी ना मिळते ॥
पाहीन हट्टानें विश्वंभरचिच्छक्ते ॥ १ ॥
गोवधा, वाहुनी मदा, करीं मी मुदा, तरी मज त्याचें ॥
भय नसे घडे जरि गान तुझ्या नामाचें ॥ २ ॥
स्त्रीघात, विप्रनिःपात, तुला मी गात, करीं गे अंबे ॥
तरि काय तयाचें मजला जगदालंबे ॥ ३ ॥
बेभान, होउनी जाण, वारुणीपान, बालहत्याही ॥
घडतां मत्करिं भीति न मजला कांहीं ॥ ४ ॥
मंगले! नामिं रंगलें, चित्त गुंगलें, तरी हीं पापें ॥
वद काय बापुडीं करिती मज निष्पापे ॥ ५ ॥
चालके! विश्वमोहिके, जरी मुखिं निकें, नाम तव येई ॥
तें असे ब्रह्मपद सहज सुलभ कीं बाई ॥ ६ ॥

केवळ मला भक्तिमात्र दे, अशी मी आईची प्रार्थना केली. हातांत फूल घेऊन मी आईच्या पायांवर वाहिलें,

आईची प्रार्थना.

आणि म्हटलें, 'आई, शुद्ध व अव्यभिचारी भक्ति माझ्या मनांत उत्पन्न कर. आई, हें पाहा पुण्य, हें पाहा पाप; हीं दोन्ही मला नकोत; हीं दोन्ही मी तुझ्या चरणीं अर्पण करितों. शुद्ध भक्तिमात्र मला पाहिजे,

तेवढी दे. हें ज्ञान आहे, हें अज्ञान आहे; या दोन्हीचीही मला जरूर नाहीं. मी केवळ शुद्ध भक्तीचा भुकेला आहें. हें इकडे आहे शुचित्व, इकडे आहे अशुचित्व; मला दोहोंचीही किंमत नाहीं. तुझा तो धर्म मला नको, तुझा तो अधर्मही मला नको; दोन्ही मीं तुझ्या पायांशीं आणून ठेविले आहेत. त्यांच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं. तुझ्यासंबंधानें निर्मल प्रेमभाव माझ्या मनांत निरंतर वसेल, असें कर.' (ब्राह्मभक्तांना) 'रामप्रसा-दा'-चें एवढें पद ऐका:—

## पद.

### माझी आई आणि मनोबोध.

(चालः—झाली ज्याची उपवर दुहिता०)

चाल मना बा! जाउं फिराया ॥ ईशदयानिलसुख सेवाया ॥ध्रु०
कालीजननीकल्पतरूतळीं, चार फळांची अभिरुचि घ्याया॥१॥
प्रवृत्ती ती तशी निवृत्ती, उभय तुझ्या या सुंदर जाया ॥ २ ॥
संगें घेईं निवृत्तीला, कल्पतरूचा पथ दावाया ॥ ३ ॥
तनय तिचा जो विवेकनामा, तत्त्वकथा तो क्षम सांगाया ॥ ४
शुचिताऽशुचिता सोडुनि जेव्हां, दिव्य मंदिरीं ग्घेसि निजाया,
जननीदर्शन सुलभ, भेद जें, उभय सतींतिल जाई विलया ॥६॥
अहंकार तो पिता अविद्या, जननी दोघां दूर करीं या ॥ ७ ॥
मोह तयांचा मायाजालीं, सजला तुजला जरि ओढाया ॥ ८ ॥
अढळ धृतीच्या अचल स्तंभीं, गुंतवि त्यातें यत्नें सखया ॥९॥
धर्माधर्मा मेषयुगा या, बांधुनि ठेवीं धरितां न भया ॥ १० ॥
ज्ञानासीनें छेदिं तयांना, करितां बल ते तुज रोधाया ॥ ११ ॥
बोधिं दुरोनी प्रवृत्तीच्या, संताना बा! कोपादिक या ॥ १२ ॥

वळति न जरि ते न चुकें लवही, ज्ञानसागरीं त्यां बुडवाया ॥
पथ हा धरितां नलगे तुजला, कृतकर्माची भीति धराया ॥१४॥
शांतपणानें यमधर्माला, कांहिं न चिंता उत्तर द्याया ॥ १५ ॥
घडतां हें तुज आळवीन मी 'बाबा! दादा! हे मनराया! ॥ १६
बाळ! लाडक्या! बापू! बेटा!' कुरवंडिन ही तुजवरि काया
भीति न लवही मग मज वाटे, 'माझें मन' तुज खास वदाया,

संसारांत राहून ईश्वरप्राप्ति होणार नाहीं, असें कसें होईल? राजर्षि जनकाला तशी झालेली आहे. 'हा संसार स्वप्नवत् आहे,' असें एका महाभगवद्भक्ताचें वचन आहे, हें खरें आहे. पण प्रसादाच्या मताप्रमाणें पाहिलें तर तें वचन कांहीं सर्वस्वीं खरें नाहीं. बरें प्रसाद कांहीं कमी भगवद्भक्त होता, असें नाहीं. संसारांत असूनसुद्धां संसारापासून अलिप्त मनुष्याला राहतां येईल. भगवंताच्या पादपद्मीं निःसीम भक्ति ठेवा आणि मग खुशाल असें म्हणाः—

## पद.

## भक्त आणि संसार.

( चालः—जरि नाहि कमल ते करीं० )

या संसृतिसुखसागरीं, मोदमंदिरीं, विबुध रमती ॥
ते लुब्ध न परि त्याप्रती ॥ ध्रु० ॥
जैसें नलिनीदल, विमल सोज्ज्वल, जलीं वसुनी ॥
हो लिप्त न जलबिंदुंनीं ॥ १ ॥
तैसा जनक सन्मती, वसुमतीपती, भवीं तरला ॥
का निंद्य म्हणुनि भासला ॥ २ ॥
शुकादिमुनि त्याप्रती, श्रेष्ठ मानिती, शिरीं धरिती ॥
त्या लवहिं न अवमानिती ॥ ३ ॥

**तैसे भवीं राहुनि, पिउनि खाउनि, सुखें रमुं या ॥**
**परि मग्न नको व्हावया ॥ या० ॥ ४ ॥**

पण जनकराजाची योग्यता कोणालाही आपल्या अंगीं एका टिचकीबरोबर कांहीं आणतां येणार नाहीं. जनकराजानें निर्जन अरण्यांत अनेक वर्षे तपश्चर्येंत घालविलीं. तेव्हां प्रत्येक संसारी जनानें कांहीं काळ असा अरण्यवास करावा, हें योग्य आहे. संसाराचे सर्व व्याप सोडून देऊन व वनवासाचें सेवन करून मनुष्य जर केवळ तीन दिवस भगवंताकरितां अश्रु गाळीत बसला, तर पुष्कळच झालें म्हणावयाचें. एवढें कशाला ? एक दिवस जरी तशा रीतीनें त्याच्या चिंतनांत मनुष्यानें घालविला, तरीही मोठेंच काम होणार आहे. लोक बायकांपोरांकरितां घागरभर अश्रु गाळतील; पण ईश्वराकरितां कोणी कुळचाभर तरी गाळतो का ? सांगा बरें. भगवत्प्राप्तीचें साधन करण्याकरितां संसारी लोक जर मधून मधून एकांतवासाचा स्वीकार करितील, तर त्यांत त्यांचें पुष्कळच बरें होणार आहे.

ब्राह्मसमाज आणि जनकराजा.

साधक जर संसारांत निरंतर असेल, तो जर विषयकर्मांचें गाडें सारखें हाकीत राहील, तर प्रथमावस्थेंत ईश्वराचे ठिकाणीं मन स्थिर होण्याला अनेक व्याघात मध्यें येतील. संसारांतील मोह हे या व्याघातांना कारण होतात. पायरस्त्यावर लाविलेल्या वृक्षाचेंच उदाहरण घ्याना. तो वृक्ष जोंपर्यंत लहान असतो, कोंवळा असतो, तोंपर्यंत त्याच्याभोंवतीं नीट कुंपण वगैरे घालून

चांगला बंदोबस्त करावा लागतो. तसें नाहीं केलें, तर गुरें, बकरीं त्याचा खाऊन फन्ना उडवितील, अशी भीति असते. प्रथमावस्थेंत —झाड जोंपर्यंत लहान व कोंवळें असतें तोंपर्यंत—असा हा कुंपणाचा बंदोबस्त करावा लागतो; तें एकदां मोठें झालें, त्याचीं पाळेंमुळें जमिनींत खोल जाऊन दृढ झालीं, म्हणजे मग कुंपणा-बिंपणाची जरूर राहात नाहीं. मग त्याच्या खोडाला हत्ती जरी बांधून ठेविला, तरी त्याला कांहीं होत नाहीं.

संसारी माणसाला जबरदस्त विकार जडलेला असतो. त्याचीं सर्व इंद्रियें बिघडून गेल्यामुळें आपली योग्य कामगिरी बजावण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य राहिलेलें नसतें. आपल्या **पित्याला —भगवंताला—विसरून** जाऊन तो 'कामिनी व कांचन' यांच्याशीं अष्टौ प्रहर रत होऊन पडलेला असतो. यांच्याच संगामुळें त्याचीं सर्व इंद्रियें विकृत झालेलीं असतात. तेव्हां यांची संगति सोडवून कांहीं काळ त्याला एकांतवासांत विश्राम व स्वास्थ्य यांचा अनुभव देणें जरूर आहे.

विषमज्वरानें पडलेला रोगी ज्या खोलींत असेल, त्याच खोलींत जर आपण पाण्यानें भरलेलें मडकें व तोंडाला पाणी सोडणारीं मसालेदार लोणची ठेविलीं, तर तें चालेल का? तें पाण्याचें मडकें व तीं लोणच्यांचीं भांडीं हीं जर त्या खोलींतून हालविणें शक्य नसेल, व रोगी बरा व्हावा, अशी जर आपली इच्छा असेल, तर आपण त्या रोग्याला तेथून दुसऱ्या खोलींत नेलें पाहिजे.

संसारी जीव हा रोगी होय. विषय हें पाण्याचें मडकें. विषयभोगतृष्णा ही त्या रोग्याची जलतृष्णा. लोणच्यांची कल्पना मनांत आली, कीं तोंडाला पाणी सुटतें; तीं समोरच आपल्याला दिसलीं पाहिजेत, अशांतला भाग मुळींच नाहीं. स्त्रियांचा समागम हा लोणच्यांसारखाच एक जिन्नस आहे. म्हणून निर्जन प्रदेशाचें सेवन हाच एक उत्तम उपाय आहे.

पहिल्यानें विवेकाचा आश्रय करा; नंतर वैराग्याची कास धरा; या दोहोंचा—विवेक व वैराग्य यांचा—लाभ करून घेतल्यावर खुशाल संसारसागरांत डुंबत रहा. पण लक्षांत ठेवा, या संसारसमुद्रांत कामक्रोधादि मगर सारखे फिरत असतात. तेव्हां जर त्या सागरांत तुम्हांला डुंबत राहावयाचें असेल, तर आपल्या अंगाला हळदीचें नीट मर्दन करा. मग त्या मगरांचें तुम्हांला भय बाळगण्याचें कांहीं कारण राहणार नाहीं. विवेक व वैराग्य हीच हळद होय. विवेक म्हणजे सदसद्विचार. ईश्वर हाच एक सत् किंवा नित्य वस्तु आहे; बाकी सगळें असत, अनित्य, किंवा 'दों दिवसांचें' आहे. हा बोध म्हणजेच विवेक.

यांबरोबरच आणखी एक गोष्ट अंगीं आली पाहिजे. ती गोष्ट म्हटली म्हणजे ईश्वरासंबंधानें आत्यंतिक अनुराग—भक्ति—ही होय.

भगवतासंबंधाने आत्यंतिक भक्ति.

वृंदावनांतील गोपींच्या ठिकाणीं असा अनुराग होता. श्रीकृष्णावर त्यांचें निर्मल प्रेम होतें. त्यांचें शुद्ध प्रेम या पदांत कसें वर्णिलें आहे पहा—:

## पद.

### कृष्णभक्ति.

( चालः—चंद्रकांत राजाची कन्या० )

मधुर मधुर ही मुरली वाजे पुनरपि त्या विपिनीं ॥
मन्मन गेलें, मीहि चाललें, ठरति न पद भुवनीं ॥ ध्रु० ॥
श्याम कन्हय्या उभा तिथे तो वाट बघत माझी ॥
येतां किंवा नाहिं वदा गे विरह चित्त भाजी ॥ १ ॥
शब्द मात्र तो तुम्हां भासतो श्याम न हा आन ॥
जिवलग परि मज प्राणविसांवा, माझा पंचप्राण ॥ २ ॥
तुमची वेणू वनीं वाजते परि माझी हृदयीं ॥
कर्णमधुर ते ध्वनी परिसतां तन्मय मन होई ॥ ३ ॥
बन्सी हा बांसरी वाजवी मज कैसा बाही ।
"बोरवनीं या कुंजा शोभा तुजविण लव नाहीं" ॥ ४ ॥
चला चला कासया थांबतां चित्तभृंग उडुनी ॥
कधींच गेला घालायातें रुंजी हरिचरणीं ॥ मधुर० ॥

पद म्हणतां म्हणतांच **श्रीरामकृष्णांच्या** नेत्रांतून प्रेमाश्रूंचे पूर लोटूं लागले. ते प्रेमावेशांत **केशवादि** भक्तांना म्हणाले, 'तुम्ही ब्राह्मपंथी आहां; ईश्वर निराकार आहे, असें तुम्ही मानतां; ईश्वरी अवतारांवर तुमचा विश्वास नाहीं. ठीक आहे नसूं द्या. राधा व कृष्ण यांना तुम्ही माना अगर नका मानूं. पण श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठीं त्यांना (गोपींना) जी व्याकुलता आली होती, ती व्याकुलतामात्र खरोखर अनुकरणीय आहे.

अशी ही व्याकुलता—जिवाची नुसती तळमळ—अंगीं आली, कीं कृष्ण परमात्मा तिथे उभाच आहे.

---

## बिंदु १९.

### गुरु आणि शिष्यः परमेश्वर हाच सद्गुरु.

ओहटी होती. अग्निनौका द्रुतगतीनें कलकत्त्याकडे चालली होती. हावरा पूल टाकून ती सरकारी बागेजवळ येऊं लागली. ती आणखी थोडी खालीं नेण्याला कप्तानाला सांगितलें होतें. नौका किती दूर आली, याचें भान आंत बसलेल्या मंडळीला मुळींच नव्हतें; कारण ती एकाग्र मनानें **रामकृष्णांचें** भाषण ऐकण्यांत अगदीं मग्न होऊन गेली होती. आपण किती अंतर मागें टाकलें, वेळ किती होऊन गेला, यांची दाद कोणालाही नव्हती.

नंतर **केशवबाबूंनीं महाराजांना** थोडेसे पोहे व खोबरें दिलें. सर्वांना पोहे वांटले. आपापल्या पदरांत घेऊन जो तो आनंदानें ते खाऊं लागला. नौकेवर आज एकादा मंगलोत्सव असून त्याप्रीत्यर्थ आनंदाची अगदीं लूट चालली आहे, असें सर्वांना वाटलें.

इतक्यांत **महाराजांचे** असें लक्षांत आलें कीं, **केशवबाबू** व **विजय** हे दोघे एकमेकांशीं मोकळ्या मनानें वागत नाहींत. दोघांच्याही वृत्तींत त्यांना संकोच दिसून आला. तेव्हां त्या दोघांच्या मनांतील किंतू काढून टाकून परस्परासंबंधानें त्यांचीं मनें साफ

करावीं, असें त्यांनीं मनांत आणलें. स्वाभाविकच आहे; 'सर्वभूतहिते रत' या त्यांच्या वृत्तीला तेंच योग्य.

**महाराज** ( केशवबाबूंना ):—हें पहा, बाबा, हा येथें **विजय** आहे. तुमचीं दोघांचीं मनें एकमेकांसंबंधानें शुद्ध नाहींत. कांहीं तरी तंटाभांडण आहे. पण असें बरें नाहीं. शिव आणि राम या दोघांतसुद्धां असेंच युद्ध झालें. ( हशा ). शिव हा रामाचा गुरु. दोघांचें युद्ध जुंपलें. शेवटीं पुन्हा दोघे एक झाले. दोघांची अशा रीतीनें गोडी झाली खरी, पण भूतप्रेतादि शिवाचे अनुचर व रामाचे वानर यांची किचकीच कांहीं केल्या मिटेना! तुमचें ठीक आहे. तुम्ही आज नाहीं उद्यां पुन्हा एक व्हाल; पण तुमचे अनुयायी—हो, मला वाटतें, ते एकदां तुम्ही घालून दिलेला धडा कांहीं विसरणार नाहींत! ( मोठा हशा. )

**विजय** झाला म्हणून तो कांहीं परका आहे कीं काय? आपलाच नाहीं का तो? तुम्ही दोघेही एकच. मतभेद हे जगांत असावयाचेच. भांड्याला भांडें हें कधीं तरी लागतेंच. पितापुत्रांतसुद्धां तंटे होतात. मागें असे अनेक झाले आहेत. **प्रसंगानुसार लव व कुश यांनाही रामाशीं** युद्ध करावें लागलें. दुसरें उदाहरण देतों. आई आपली कांहीं कामना मनांत धरून 'मंगळवार' करिते; मुलगीही स्वतांची कांहीं कामना मनांस धरून 'मंगळवार' करिते. वरवर पाहणाराला दोघींच्या मंगलांत विरोध आहे, असें

दिसतें; पण खरें पाहूं जातां इच्या मंगलांत तिचें मंगल असतें, व तिच्या मंगलांत इचें मंगल असतें.

त्याप्रमाणें तुझा एक स्वतंत्र ' समाज ' आहे; तेव्हां **विजयाचाही** एक निराळा ' समाज ' पाहिजेच ? ( सगळे हसतात. )

हें सगळें हवेंच आहे. तंटेभांडणें, मतभेद, हीं पाहिजेतच. परमेश्वरी सृष्टींत या सगळ्यांना अवकाश (जागा) आहे. या सगळ्यांचा उपयोग आहे. वृंदावनामध्यें **श्रीकृष्णाच्या** रूपानें प्रत्यक्ष परमात्माच लीला करीत होता. आतां असा प्रश्न उभा राहतो कीं, अव्यभिचारी भक्तीचें, प्रेमलक्षण भक्तीचें महात्म्य—सामर्थ्य—दाखविणें, हाच जर त्या लीलांचा हेतु होता, तर जटिल व कुटिल जनांनीं त्या वेळीं **गोपाळकृष्णाला** विरोध करण्याचा खटाटोप कां केला ? मला वाटतें, त्या जटिल व कुटिल लोकांनीं असा विरोध केला नसता, तर त्या लीलांना अशी पुष्टि—गोडी—आलीच नसती. ( हशा ). विरोधानें कार्याला खरें तेज चढतें. **रामानुज** विशिष्टाद्वैतवादी होते. पण त्यांचे गुरु अद्वैतवादी होते. दोघांत असा मतभेद होता. गुरुशिष्य वादांत एकमेकांच्या मतांचें खंडण आपापल्या परी करण्याचा प्रयत्न करीत. असें पाहिजेच. असें जरी होतें, तरी गुरूच्या मनांतील शिष्यासंबंधाचा ' आपलेपणा ' कांहीं नाहींसा झाला नव्हता. तात्पर्य, कितीही मतभेद असला, तरी त्याचें पर्यवसान द्वेषांत व वैरांत होतां कामा नये.

---

१. जटाधारी=भोंदू. २. वक्र=कुटाळ.

सर्वांचीं मनें आनंद व समाधान यांनीं अगदीं उचंबळत होतीं. **श्रीरामकृष्ण केशवबाबूंना** पुढें म्हणाले:—तुझे शिष्य भराभर तुला सोडून जातात, यांत आश्चर्य कांहींच नाहीं. कारण शिष्यशाखेंत घेण्यापूर्वीं कोणाही माणसाच्या स्वभावाची तुझ्याकडून योग्य छाननी होत नाहीं.

बाह्यात्कारीं सर्व माणसें सारखींच दिसतात. पण त्यांच्या प्रकृति सारख्या नसतात. कांहीं सत्वगुणप्रधान, कांहीं रजोगुणप्रधान, व कांही तमोगुणप्रधान असतात. पोळी म्हटली, कीं, तिचें बाह्यरूप सारखेंच असतें; भेद काय तो अंतर्भागांत असतो. कांहींच्या पोटांत पुरण असतें, कांहींच्या सांजा असतो व कांहींच्या नुसता गूळ असतो. ( सगळे हसतात ).

रामकृष्ण व आई यांचें नातें.

आतां माझ्या मनाची रचना आईनें कांहीं निराळीच केली आहे. मी आपला पोरासारखा खातों, पितों, आनंदात असतों. बाकी सर्व आईलाच ठाऊक. मला कशाचीच काळजी नाहीं. हे तीन शब्द ऐकले कीं, माझ्या अंगावर कांटा उभा राहतो:—गुरु, कर्ता आणि बाबा. मी कर्ता नव्हे, कर्तृत्व सारें आईकडे. मी केवळ तिच्या हांतां-तलें बाहुलें आहें. बरें, संसारांत शिरून 'बाबा' होण्याची माझी कांहीं इच्छा नाहीं. परमेश्वर एकाच—आपल्याच—कुटुंबाच्या माणसांतमात्र भरलेला आहे, अशी संकुचित भावना न धरितां, सर्व भूतांच्या रूपानें तोच अखिल ब्रह्मांडांत संचरला आहे, अशी जाणीव निरंतर ठेवून, सर्व काळ त्याचें स्मरण, चिंतन व आराधन

करीत राहणें, हेंच मला बरें वाटतें. तसेंच परमेश्वर हाच आपला खरा गुरु.

खरें गुरुत्व परमेश्वराकडे.

गुरु एक सच्चिदानंद. तोच खरा मार्ग दाखवील. माझा आपला संतानभाव. मुलाच्या सगळ्या उड्या असतात आईच्या जिवावर. तें स्वतः दुबळें असतें. आई दृष्टी-आड झाली, कीं त्याचा जीव कासावीस होतो. हीच अवस्था माझी.

गुरूंना कांहीं तोटा नाहीं. मनुष्य-गुरु लाखों मिळतात. गुरूची आढ्यता सगळेच आणतात. सगळेच गुरु होण्याची हांव धरितात. शिष्य होण्याची हांव धरणारे किती आहेत?

आदिष्ट गुरु.

लोकशिक्षेचें—लोकोपदेशाचें—काम वाटेवर पडलें नाहीं. तें फार कठिण आहे. ज्याला साक्षात्कार झाला असेल व ज्याला भगवंताचा आदेश (परवानगी, हुकूम) मिळाला असेल, त्याची गोष्ट वेगळी. नारदशुकदेवादिकांना हा आदेश होता. शंकराचार्यांनाही होता. हा आदेश जर प्राप्त झाला नसेल, तर तुमचें ऐकणार कोण? कलकत्त्याचे लोक तुला ठाऊकच आहेत, त्यांना क्षणोक्षणीं नवी-नवाळ पाहिजे. दुधाचें भांडें विस्तवावर ठेविलें, खालीं जाळ केला, कीं, तें दूध लागलेंच फसफसून उतास येतें. पण जाळ मागें ओढला, कीं तें लागलेंच जिरलें—खालीं

जातें. कलकत्त्याच्या लोकांची अवस्था हीच. नेहमीं त्यांच्या मनाला कांहीं तरी उत्तेजक हवें, क्षणोक्षणीं कांहीं तरी नवें त्यांना पाहिजे. 'ताजी तार' नाहीं कीं त्यांच्या मनाची तार बेसूर झालीच !

पाणी पाहिजे असें वाटलें, कीं लागलीच ते विहीर खणण्यास सुरुवात करितात; पण जरा कातळ लागतो असें दिसलें, कीं दिली सोडून ! मग दुसऱ्या जागीं पुन्हा खोदूं लागतात. समजा, तिथे वाळू लागली; तर तीही जागा ते सोडून देतात ! पुन्हा तिसरी जागा ! असा त्यांचा क्रम चालायचा ! अशा लोकांच्या मताची किंमत ती काय ?

बरें, असे कांहीं लोक असतात कीं, त्यांच्या मनांत एकादी कल्पना आल्याबरोबर तो ईश्वरी आदेशच आहे, असें त्यांना वाटतें. पण हा समज निवळ चुकीचा असतो. अशी आदेशयुक्त स्फूर्ति म्हणजे कांहीं परसांतली भाजी नव्हे. खरा खरा साक्षात्कार झाला पाहिजे, परमेश्वराशीं समोरासमोर भाषणप्रसंग झाला पाहिजे. तेव्हां आदेशाची गोष्ट, तरच तो आदेश ! भगवंताचा शब्द !—अहाहा ! काय त्याचा जोर सांगावा ! त्यानें पर्वतही ढळेल ! व्याख्यानाला या आदेशाचा आंतून जोर जर नसेल, तर त्याचा काय उपयोग होणार ? व्याख्यानाला स्वतांच्या आंगचा असा कांहीं तरी जोर असतो का ? लोक तें ऐकतील, टाळ्यांचा गजर करतील;

आदेशाचा जोर.

पण पुढल्या घटकेलाच त्याचें जागेवर काय असणार ? ‘ नळी फुंकिली सोनारें ! इकडून तिकडे गेलें वारें; ’ आणि मध्यें कांहींच नाहीं राहणारें. व्याख्यानांतले विचार असे हवेंत कुठच्या कुठे उडून गेल्यावर आचाराची वाट आपोआपच लागते.

अनादिष्ट गुरूंचा निषेध.

कमारपूर गांवांत हालदार-पूकर नांवाचें एक तळें आहे. त्यांत रोज सकाळीं लोक आपली हवी तशी घाण करीत. अर्थात पाणी अगदीं खराब होई. जे कोणी सकाळीं तेथें स्नानसंध्या करण्याकरितां येत, ते संतापून घाण करणारांना खूप शिव्यागाळ्या देत; पण व्यर्थ. दुसऱ्या दिवशीं सकाळी पुन्हा आपली पहिली स्थिति ! घाण कांहीं बंद होईना ! ( सगळे हसतात ). तेव्हां कांहीं लोकांनीं केला सरकाराकडे अर्ज. झालें. तिकडून लागलीच एक शिपाई आला. त्यानें तिथे एक ‘ नोटीस ’ लावून टाकली:— ‘ तळ्याचें पाणी घाण करूं नये. ’ आणि काय चमत्कार सांगावा ! त्या दिवसापासून घाणीचें नांव नाहीं ! ( हशा ).

तात्पर्य काय ? तर लोकशिक्षेचें काम ज्यानें उचललें त्याच्या कमरेला शिपाईगिरीचा पट्टा पाहिजे ! परवाना पाहिजे. आपल्या अधिकारीपणाचें चिन्ह पाहिजे. तसें कांहीं नसतां दुसऱ्यांना उपदेश करण्याकरितां माणसानें तोंड उघडणें म्हणजे आपलेंच हसें करून घेणें आहे. एकादशीच्या घरीं शिवरात्र ! स्वतांचें ज्ञान अकटोपासून विकटोपर्यंत असतां चापून घरीं ज्ञानसत्र सुरू !

एक आंधळा दुसऱ्या आंधळ्याला वाट दाखवायला निघाला! परिणाम काय तो तुम्हीच पहा! भलतेंच औषध घेण्यापेक्षां मुळीं औषधच नसलेलें बरें! त्यानें हित राहील बाजूला, विपरीत-मात्र होईल. उद्यांचें मरण आजच! भगवल्लाभ झाल्यावर अंतर्दृष्टि—ज्ञानदृष्टि—आपोआप तीव्र होते. मग कोणाला काय रोग झाला आहे, याचें निदान सहज करितां येतें. उपायही सुचवितां येतो; व तो उपाय गुणकारीही होतो.

तेव्हां आधीं आदेश, मग उपदेश. आदेश नसतां उपदेश करूं गेल्यास, 'मी उपदेश देतों' किंवा 'मी गुरु व गोमाजी शिष्य,' असा अहंकार उत्पन्न होतो. अहंकाराचा जन्म आहे अज्ञा-नाच्या पोटीं. 'मी कर्ता' ही भावना[1] अज्ञानानें उभी राहते. 'मी कर्ता,' 'मी कर्ता,' या कल्पनेच्या भटाला एकदां मनुष्यानें ओसरी दिली, कीं त्यानें आपले दुःखाचे व अशांतीचे हातपाय पसरलेच! 'कर्ता करविता ईश्वर आहे, तोच सर्व कांहीं करितो. मी कोण? मी काय करणार?' असा खरा खरा बोध ठसला व हरएक आचरणांत त्याचें प्रतिबिंब उमटूं लागलें, कीं तो मनुष्य जीवन्मुक्त झालाच.

---

१ अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ।—**गीता.**

# बिंदु २०.

## कर्मांची पाश्चात्य कल्पना: कर्म हें साध्य कीं साधन?

**श्रीरामकृष्ण:**—(केशवादि भक्तांना):—'आम्ही लोककल्याण करितों,' असें तुम्ही म्हणतां. पण ज्या जगाचें कल्याण करण्याचा विडा तुम्हीं उचलला आहे, तें जग एकाद्या टोपलींत का राहणारें आहे? बरें, जगाचें कल्याण करणारे तुम्ही रे एवढे मोठे कोण? बाबांनो, साधनांच्या द्वारें पहिल्यानें साक्षात्कार अनुभवा आधीं तो साधा. त्याचा जोर मिळाला म्हणजे मग लोकहिताला कंबरा बांधा. तोंपर्यंत बांधूं नका.

**एक ब्राह्मभक्त:**—जोंपर्यंत साक्षात्काराचा लाभ झाला नाहीं, तोंपर्यंत आम्ही सर्व कर्मांचा त्याग करावा, असें का महाराज आपलें म्हणणें?

**श्रीरामकृष्ण:**—नाहीं. कर्मत्याग पाहिजे कशाला? व तो होणार तरी कसा? ईश्वराचें चिंतन, नामकीर्तन, गुणगान, इत्यादि सर्व नित्यकर्में केलींच पाहिजेत.

**ब्राह्मभक्त:**—मग आम्हीं सर्व संसारकर्में सोडावीं, विषयकर्में टाकावीं, असाच ना आपला हेतु?

**श्रीरामकृष्ण:**—तसेंही नव्हे! जीं कर्में केल्यावांचून गत्यंतर नाहीं, सामान्यपणें ही जीवितयात्रा चालण्याला जितकीं कर्में करणें जरूर पडेल, तितकीं करावीं. पण 'देवा, हीं सर्व कर्में

निष्कामभावानें करण्याचें सामर्थ्य आम्हांला दे, ' अशी अगदीं व्याकुळ होऊन, सद्गदित होऊन, डोळ्यांत आसवें आणून मोठ्या आतुरतेनें ईश्वराची प्रार्थना करा. प्रार्थना करतांना आणखी असें म्हणाः—' हे प्रभो, विषयकर्में माझ्या हातून दिवसें दिवस कमी कमी होत जातील, असें कर. कारण, जितका माझ्या कर्मांचा व्याप ज्यास्ती, तितका तुझ्याकडे लक्ष जाण्याचा संभव कमी. भुलून जाणें हा मनाचा आहे स्वभावधर्म ! निष्काम भावानें म्हणून मी आपलेकडून कर्में करायला जातों, पण मध्यें काय भूल पडते कोण जाणे ! हातून प्रत्यक्ष घडलेलें कर्म पाहावें तों तें आपलें सकाम ! मी दानधर्म करितों, सदावर्तें घालतों. पण चमत्कार काय ! तिथे आपली नांवलौकिकाची, लोकमान्यतेची इच्छा हळूच येऊन केव्हांच उभी राहते ! कशी व कुठून येते, कोणाला ठाऊक ! '

' रुग्णालयें, दवाखाने, शाळा, पाठशाळा, रस्ते, विहिरी, तलाव, इत्यादि लोकोपयोगी कामें मला करावयाचीं आहेत,' असें एकदां शंभु मल्लिक मला म्हणाला. तेव्हां मीं म्हटलें, ' हें सगळें ठीक आहे. पण लोककल्याणाचीं कामें करितांना तुझी बुद्धि निष्काम असली पाहिजे. शिवाय जीं कामें अगदीं पुढेंच येतील, जीं कामें केल्याशिवाय गतिच नाहीं, असें दिसेल, तेवढींच कामें हातीं घेण्याचा निर्धार पाहिजे. आतां पुढें काय काम करावें, असें हुडकीत बसूं नये. असें करीत गेलें, तर कर्मांचा पसारा अनावर होतो, आपल्या

साध्य.

आवांक्याबाहेर होतो, आणि ईश्वर मागें पडतो. त्याचें स्मरणसुद्धां होत नाहीं. कांहीं लोक कालीदर्शनाकरितां म्हणून घरून निघतात; व आईचें दर्शन घेण्यापूर्वी रस्त्यावर व घाटावर बसलेल्या दीनदुबळ्यांना, आंधळ्यापांगळ्यांना दानधर्म करूं लागतात. त्यांत कांहीं वावगें नाहीं. पण रात्र होऊन देवळाचे दरवाजे बंद होतपर्यंत जर ते दानधर्म करीत राहिले, तर त्यांना आईचें दर्शन कांहीं घडणार नाहीं. तेव्हां जे सुज्ञ असतात ते धक्क्याबुक्क्या खाऊन पहिल्यानें आईचें दर्शन घेतात; आणि मग वेळा-अंतीं होईल तेवढा दानधर्म व सत्कर्म करितात.

पहिल्यानें ईश्वरलाभ साध, आणि मग अन्य कर्मांच्या भानगडींत पड.

जे कर्में करितात त्यांचें साध्य कोणतें असावें बरें? कर्म हें साधन व परमेश्वर हें साध्य आहे. साध्य व साधन यांचा कधीं घोंटाळा होऊं देऊं नये. साधन हेंच साध्य आहे, अशी मनाची वृथा समजूत कधीं करून घेऊं नये. समज, तुला ईश्वरसाक्षात्कार झाला, ईश्वर तुझ्यापुढें येऊन उभा राहिला; तर, 'प्रभो, रुग्णालयें, दवाखाने, रस्ते, शाळा, इत्यादि अनेक लोकोपयोगी कामें करण्याचें मला सामर्थ्य दे,' अशी का तूं त्याची प्रार्थना करशील? [ हशा ]. छे! या गोष्टी कितीही चांगल्या असल्या, तरी त्या ऐहिक अतएव क्षणभंगुर आहेत. ईश्वराच्या चरणकमलापुढें त्यांची कांहीं मातब्बरी नाहीं. तेव्हां जो खरा भक्त आहे, तो भगवंताला हात जोडून अशी विनंती करील:—'हे भगवन्, मला आपल्या

पादपद्माजवळ जागा दे, तुझा सहवास मला नित्य घडूं दे. तुझ्या चरणीं माझी निरंतर शुद्ध भक्ति असूं दे."

कर्मयोग व भक्तियोग.

कर्मयोग फार कठिण आहे. विहितकर्मांचें—शास्त्रांत जीं कर्में करावीं म्हणून सांगितलें आहे त्या कर्मांचें—यथायोग्य आचरण होणें, या कलियुगांत अत्यंत कठिण आहे. प्राण हा केवळ अन्नमय आहे. आधीं पोटोबा आणि मग विठोबा. तेव्हां आज चालू असलेल्या जीवनार्थ कलहांत हातून कर्म धड होत नाहीं. ज्वरग्रस्त रोग्याला आपल्या जुन्या पद्धतीप्रमाणें आज जर कषाय व गुटिका देत बसलें, तर त्यांचा परिणाम होऊन रोगाचा शेवट होण्यापूर्वीं रोग्याचाच शेवट होतो. लोक अल्पायुषी झाले आहेत, हां हां म्हणतां ताप त्यांना घेऊन जातो. तेव्हां आजकाल तापाला ' डा. गुप्त यांचें रामबाण ज्वर-मिश्रण ' दिलें पाहिजे. त्याचा परिणाम लवकर होतो.

या कलियुगांत संसारज्वराची व्यथा दूर होण्याला भक्तियोगा-सारखें—भगवंताच्या नामगुणांचें अखंड कीर्तन व त्याची नित्य प्रार्थना यांसारखें—दुसरें जालीम औषध नाहीं. भक्तियोग हाच[१] आजच्या युगांतला धर्म आहे.

---

१ तुकारामाचा अभिप्राय:—

**तुटे मायाजाळ विघडे भवसिंधू। जरि लागे छंदू हरिनामें॥ १॥**
**येर कर्म धर्म करितां ये कलीं। मार्जी तरला बळी कोण सांगा॥ २॥**
**न पढवे वेद नव्हे शास्त्रबोध। नामाचे प्रबंध पाठ करा॥ ३॥**
**न साधवे योग न करवे वैराग्य। साधा भक्तिभाग्य संतसंगें॥ ४॥**
**नव्हे अनुष्ठान न कळे ब्रह्मज्ञान। करावी सोपान कृष्णकथा॥ ५॥**
**तुका म्हणे वर्म दावियेलें संतीं। यापरती विश्रांति आणिक नाहीं॥ ६॥**

(केशवादि भक्तांना) तुमचा भक्तिमार्गच आहे. तुम्ही हरि-नाम घेतां, आईच्या नामगुणांचें गायन करितां, तेव्हां तुम्ही धन्य आहां! तुमचा भाव–मार्ग–ठीक आहे. वेदान्ती लोकांप्रमाणें जग हें स्वप्नवत् आहे, असें तुम्ही मानीत नाहीं. हें चांगलें आहे. अहंकार नाहींसा होऊन मनोलय ज्याला साधेल, त्याचा तो मार्ग आहे. तो मार्ग फार बिकट आहे. त्या मार्गाला तुम्ही नाहीं–तुम्ही वेदान्ती नाहीं–तुम्ही भक्त आहां. तुम्ही ईश्वराला सगुण मानतां. फार उत्तम गोष्ट आहे. तोच तुमचा मार्ग चालूं द्या. तुमच्या ठिकाणीं व्याकुळता उत्पन्न झाली, कीं तो तुम्हांला दर्शन अवश्य देईल.

---

## बिंदु २१.

[महाराज एका भक्ताच्या घरीं जातात.]

अग्निनौका परत कयलाघाटाजवळ आली. सर्व खालीं उतरण्याच्या उद्योगाला लागले. नौकेवरील खोलीच्याबाहेर सर्व पडले. अहाहा! त्या वेळचा देखावा किती रमणीय होता! पूर्णचंद्रानें आकाश मनोहर दिसत होतें! कौमुदी भागीरथीच्या पृष्ठभागावर आनंदानें क्रीडा करीत होती!

**महाराजांकरितां** गाडी तयार होती. लागलेच ते, **एम्** व आणखी एकदोन भक्त यांसह तींत जाऊन बसले. **महाराजांबरो**-बर थोडेंसें जावें, या हेतूनें **केशवबाबूंचा** पुतण्या **नंदलाल** हाही गाडींत चढला.

सर्व गाडींत बसल्यावर **श्रीरामकृष्ण** म्हणाले, 'तो कुठे आहे?' अर्थात् **केशवबाबू** कोठें आहेत, असें त्यांनीं विचारलें. पाहतां पाहतांच **केशवबाबू** हसत हसत गाडीजवळ येऊन म्हणाले, '**महाराजां**बरोबर कोण कोण जाताहेत?' या प्रश्नावर मिळालेल्या उत्तरानें त्यांना समाधान वाटलें. नंतर साष्टांग नमस्कार घालून **महाराजांची** पदधूलि **केशवबाबूंनीं** आपल्या मस्तकीं धारण केली. **महाराजांनीं**ही गोड शब्दांनीं त्यांचा निरोप घेतला.

गाडी चालू झाली. कलकत्याच्या ज्या भागांतून गाडी जात होती, त्या भागांत साहेबलोकांची वसति होती. तेव्हां त्याच्या रचनेचें व व्यवस्थेचें वर्णन काय करावें! रस्ता चांगला ऐसपैस, त्यावर धूलिशमनार्थ पाणी शिंपडलेलें, व रस्त्याच्या दोन्ही बाजूंना राजवाड्यांसारख्या सुंदर व भव्य इमारती लागून गेलेल्या! तशांत ती चांदणी रात्र! राजगृहासारख्या सुंदर अशा त्या इमारती विमल व शीतल चंद्रकिरणांमध्यें विश्रांतीस्तव स्वस्थ पडल्या आहेत, असें दिसलें. प्रत्येक घरापुढील दरवाजावर वायुदीप होता; व गृहाचा अंतर्भाग दीपमालांनीं सुप्रकाशित दिसत होता. पेटीच्या सुरावर गात असलेल्या आंग्ल-युवतींचे मधुर आलाप मधून मधून कर्णांवर पडून मनाला आल्हाद देत होते.

अशा त्या रम्य राजपथानें गाडी चालली असतांना **महाराज** आत्मानंदांत रंगून राहिले होते. कांहीं वेळानें मध्येंच ते म्हणाले, 'मला तहान लागली आहे; काय करणार?' **नंदलालनें** 'इंडि-

या क्लब'–समोर गाडी उभी करविली व तो पाणी आणण्याकरितां माडीवर गेला. त्यानें कांच-पात्रांतून पाणी आणलें. 'हें पात्र चांगलें धुतलें आहे ना?' असा **महाराजांनीं** सहास्य प्रश्न केला. 'होय' असें **नंदलालनें** उत्तर दिलें. पुढें **महाराज** तें पाणी प्याले.

गाडी पुन्हा चालू झाल्यावर **महाराज** बालकवृत्तीनें गाडीच्या बाहेर तोंड काढून दोन्ही बाजूंची मौज पाहूं लागले. माणसें, जनावरें, गाड्या, घोडे, चांदिणें, दीपमाला, वगैरे पाहून त्यांना अतोनात गंमत वाटली.

कलकत्याच्या कलूटोला नांवाच्या भागांत **नंदलाल** उतरून गेला. पुढें **महाराजांची** गाडी **सुरेश मित्राच्या** घरापुढें उभी राहिली. **सुरेश** हा **महाराजांचा** मोठा भक्त. पण तो घरीं नव्हता. कांकुरगची येथें त्यानें एक नवीन बाग विकत घेतली होती, तिकडे तो गेला होता. घरांतल्या माणसांनीं तळमजल्यांतील एक खोली मंडळीला बसण्याकरितां उघडून दिली.

पण तितक्यांत एक पंचाईत आली. गाडीचें भाडें द्यावयाचें होतें. तें देणार कोण? **सुरेश** असता, तर तो तें देता. **महाराज** एका शिष्याला म्हणाले, 'घरांतल्या बायकांजवळ भाड्याकरितां पैसे माग. त्यांचे यजमान आपल्याकडे येत असतात, हें त्यांना ठाऊक नाहीं कीं काय?' [ सगळे हसतात ].

**नरेंद्राचें** ( विवेकानंद ) घर जवळच होतें, तेव्हां **महारा-जांनीं** त्याला बोलावणें पाठविलें. इतक्यांत घरच्या मंडळीनें

विवेकानंद.

**महाराजांना** नेऊन माडीवरच्या खोलींत बसविलें. तेथें सतरंजी आंथरलेली असून तीवर शुभ्र चादर घातलेली होती. तीनचार तक्येही पडले होते. भिंतीला एक सुंदर तसबीर लटकत होती. ती पाहिल्याबरोबर सर्व धर्मांचा समन्वय चटकन लक्षांत यावा, म्हणून **सुरेशनें** ती मुद्दाम तयार करविली होती. हिंदू, मुसलमानी, ख्रिस्ती, बौद्ध. इत्यादि सर्व धर्म, व वैष्णव, शाक्त. शैव इत्यादि सर्व धर्मपंथ यांचा समन्वय कसा आहे,–शेवटीं हे सर्व एकाच परमेश्वराकडे माणसाला नेऊन कसे पोंचविणारे आहेत,–हें **श्रीरामकृष्ण केशवबाबूंना** समजावून सांगत आहेत, असें त्या चित्रांत दाखविलें होतें.

सहास्य वदनानें **महाराज** भाषण करीत होते; इतक्यांत **नरेंद्र** यऊन पोहोंचला. तेणेंकरून **महाराजांचा** आनंद द्विगुणित झाला. ते त्याला म्हणाले, ' आज आम्ही **केशवसेना**बरोबर नौकाविहार करण्याकरितां गेलों होतों. फार मौज मारली. **विजय** होता, हे सगळे होते. आई व मुलगी बाह्यात्कारीं निरनिराळ्या कामना मनांत धरून ' मंगळवार ' करितात. जटिल व कुटिल हे निंदक नसते तर भगवंताच्या लीला निस्तेज पडल्या असत्या, इत्यादि किती किती गोष्टी मीं **केशव** व **विजय** यांना सांगितल्या. ( **एम-कडे बोट करून** ) याला विचार. ( **एमला** ) खरें कीं नाहीं रे ?

**एम्** म्हणालाः—होय, महाराज.

रात्र फार होऊन गेली. तरी सुरेश आला नाहीं. साडेदहा वाजले. महाराज दक्षिणेश्वरीं परत जाण्यास तयार झाले. ज्यास्त वाट पाहण्याची त्यांची इच्छा दिसली नाहीं.

रस्त्यावर चांदिणें पिठासारखें पडलें होतें. दरवाजांत गाडी आली. महाराज आंत बसले. नरेंद्र व एम् यांनीं महाराजांना प्रणाम केले, व ते आपापल्या घरीं गेले.

---

# बिंदु २२.

श्रीरामकृष्ण, केशवचंद्र सेन यांच्या 'कमलकुटीर' नांवाच्या घरी त्यांना भेटण्याकरितां जातात.

## शक्ति व तिचीं स्वरूपें.

"पश्यति नव पंथानम्"

जयदेव.

सन १८८३ सालची गोष्ट. नोव्हेंबरची २८ तारीख होती. त्या दिवशीं दोन वाजल्यानंतर एक तरुण गृहस्थ कमलकुटीराच्या-समोर असलेल्या पदपथावर इकडून तिकडे येरझारा घालीत होता. तो पदपथ कुटीराला लागूनच उत्तर-दक्षिण जात होता. तो गृहस्थ कोणाची तरी मोठ्या उत्कंठेनें वाट पाहात असावा, असें त्याच्या एकंदर लक्षणांवरून दिसत होतें.

कमलकुटीराच्या उत्तरेस मंगलवाडी म्हणून ठिकाण होतें; तेथें केशवबाबूंच्या समाजाचे अनेक ब्राह्म भक्त राहात असत. केशवबाबू

कमलकुटीरांत राहात होते. ते या वेळीं फार आजारी असून या दुखण्यांतून ते वांचतील, असा कांहीं त्यांच्या आप्तमित्रांना भरंवसा वाटत नव्हता.

श्रीरामकृष्णांचें केशवबाबूंवर प्रेम फार होतें. ते आज त्यांना भेटायला यावयाचे होते. दक्षिणेश्वराहून ते निघालेही होते. पदपथावर मोठ्या आतुरतेनें फिरत फिरत तो तरुण गृहस्थ—त्यांचा एक शिष्य—त्यांचीच मार्गप्रतीक्षा करीत होता. ते केव्हां येतात, अशी त्याला उत्कंठा लागून राहिली होती. एकावर एक सारख्या गाड्या येत होत्या. गाडी आली, कीं ते आले कीं काय, हें पाहण्याकरितां त्याचे डोळे चटकन तिकडे धांव घेत.

प्रत्येक खेपेला त्याची निराशा होई. मधल्या वेळांत तो जाणारांयेणारांची मौज पाहात असे. रस्त्याच्यासमोरच व्हिक्टोरिया कॉलेजची इमारत होती. तिच्याकडेही तो कांहीं वेळ पाहात असे. ब्राह्मो लोकांच्या बायका व मुली यांचें शिक्षण तेथें चाललें होतें. कॉलेजच्या उत्तरेला एक मनोहर व व्यवस्थित बाग असून तिच्या मध्यभागीं एक टुमदार घर होतें. त्यांत कोणी इंग्रज गृहस्थ रहात होता. त्या घराचा सर्व भाग या गृहस्थाला चांगला दिसत होता.

या घरांत कांहीं तरी कमीज्यास्ती प्रसंग होता—वाईट प्रसंग—होता. बराच वेळ घरांतल्या माणसांत अगदीं चलबिचल उडालेली त्याला दिसत होती. त्यांचीं मुखें म्लान व उदास झालेलीं

होती. कांहीं वेळानें तेथें प्रेतवाहक गाडी येऊन दाखल झाली; हाकणारा व इतर नोकर यांचे पोषाख काळे होते. त्यांच्या त्या शोकवेषांवरून त्या घरांत आज मृत्यूचें ठाणें पडलें होतें, असें स्पष्ट दिसत होतें. हें मर्त्यधाम सोडून कोणी तरी जीव चालता झाला होता; कोणी जीवात्मा आपल्या मृण्मय शरीराचा त्याग करून गेला होता ! तो अव्यक्तांतून या लोकीं आला, व पुन्हा हा लोक सोडून निघून गेला !

'पण गेला कोठें ?' असा प्रश्न त्या गृहस्थाच्या मनांत पद-पथावर येरझारा घालतां घालतां साहजिक उभा राहिला. 'जीवात्मा हें जग सोडून जातो, तो जातो कोठें ?—तो अव्यक्तांतून येतो व पुन्हा अव्यक्तांत नाहींसा होतो.'

उत्तरेच्या बाजूनें पुन्हा कांहीं गाड्या येतांना दिसल्या. महा-राज आले कीं काय. हें पाहण्याकरितां त्याच्या डोळ्यांनीं तिकडे धांव घेतली; पण पुन्हा निराशाच !

शेवटीं पांच वाजले. महाराजांची गाडी येऊन उभी राहिली. लाटू व दुसरे एकदोन शिष्य बरोबर होते; राखाल व एम् हेही होते.

केशवबाबूंच्या लोकांनीं पुढें येऊन त्यांचें स्वागत केलें; व ते त्यांना माडीवर घेऊन गेले. दिवाणखान्याच्या दक्षिणबाजूला बोळ-वजा एक रस्ता होता, तेथें तक्तपोषीवरच महाराज बसले.

बराच वेळ झाला. केशवबाबूंना पाहण्यासाठीं त्यांचें मन

अगदीं अधीर झालें होतें. ते आंतल्या खोलींत निजले होते. यांना तर धीर मुळींच निघेना. पण बाबूजींच्या शिष्यांनीं अति नम्रपणें असें सुचविलें कीं 'त्यांचा थोडा डोळा लागला आहे, तेव्हां थोडा धीर धरावा. इतक्यांत ते बाहेर आपल्याला येऊन भेटतील.'

**केशवबाबूं**ची स्थिति काळजी करण्यासारखी असल्यामुळेंच शिष्य-मंडळी इतकी सावधगिरी घेत होती. पण **केशवबाबूं**ना पाहण्या-संबंधानें **श्रीरामकृष्णां**ची आतुरता उत्तरोत्तर फारच वाढत चालली. **प्रसन्न, अमृत** इत्यादि **बाबूं**च्या शिष्यांजवळ ते रदबदली करूं लागले.

**श्रीरामकृष्ण** ( केशवबाबूंच्या शिष्यांना ):—हें पहा, त्याला बाहेर येण्याचें कांहीं कारण नाहीं. मी आंत जाऊन त्याला पाहतों म्हणजे झालें.

**प्रसन्न** ( नम्रपणें ):—महाराज, एक क्षणभर आपण दम धरावा; ते आत्तां येतील बाहेर.

**श्रीरामकृष्णः**—काय सांगावें तरी! तुम्ही मध्यें विनाकारण आडवे येत आहां पाहा! माझ्या मनांत काय होतें आहे, तें एक माझें मला ठाऊक! त्याला केव्हां एकदां डोळे भरून पाहीन, असें मला झालें आहे.

**श्रीरामकृष्णां**च्या मनाला थोडा विरंगुळा व्हावा, यासाठीं **प्रसन्न केशवबाबूं**च्याच गोष्टी बोलूं लागला.

**प्रसन्नः—महाराज,** त्यांच्या वृत्तींत हल्लीं **केवढातरी फरक**

पडला आहे. केवळ आपल्या सारखीच त्यांची अवस्था झाली आहे. पहावें तेव्हां ते आपले आईशीं बोलत असतात! तिचें बोलणें आपल्याप्रमाणें त्यांनाही ऐकूं येतें, तें ऐकून ते हासतात, कधीं कधीं अश्रुही गाळतात.

आईशी भाषण.

**केशवबाबू** जगज्जननीबरोबर बोलतात, बालकाप्रमाणें हसतात, रडतात, ही सर्व हकीकत ऐकून **महाराजांचें** मन अगदीं उचंबळून आलें. ते बाह्यशून्य होत चालले; पाहतां पाहतां त्यांची समाधि लागली!

**महाराज** समाधिस्थ! हाल नाहीं कीं चाल नाहीं! त्यांची मूर्ति एखाद्या पुतळ्याप्रमाणें अगदीं स्तब्ध होती! शीतसमय असल्यामुळें त्यांच्या अंगांत हिरव्या काश्मिरी बनातीचा कोट होता. शरीर उन्नत—तांठ—असून हात स्वस्तिकाकार ठेविलेले होते. दृष्टि अगदीं स्थिर होती! अशा रीतीनें ते पूर्ण समाधींत मग्न झाले होते! अशा अवस्थेंत ते किती वेळ तरी होते. समाधिभंग होण्याचें, समाधि उतरण्याचें कांहीं चिन्ह दिसेना!

संध्याकाळ झाला. दिवाणखान्यांत दिवे लागले. तसे **महाराजही** प्रकृतीवर—भानावर—येऊं लागले. त्यांना दिवाणखान्यांत नेण्याची मंडळी खटपट करूं लागली. मोठ्या कष्टानें एकदां त्यांना नेऊन एका कोचावर बसविलें.

दिवाणखान्यांत काय, अगदीं थाट होता! कोचें, गादीच्या खुर्च्या, आरसे, यांची अगदीं गर्दी असून दिव्यांचा लखलखाट होता! कोचावर बसल्यानंतरसुद्धां **महाराज** भावाविष्ट--समाधिमग्न --होते. त्यांची समाधि पुरी उतरली नव्हती. एखाद्या निशेंत असलेल्या माणसाप्रमाणें ते आपल्याच रंगांत हंसत होते. कोचें, खुर्च्या, आरसे वगैरे सर्व सामानावर त्यांनीं एकदां दृष्टि टाकली. नंतर ते आपल्या मनाशीं व **आईशीं** बोलूं लागले.

**श्रीरामकृष्ण** (कोचें वगैरेंकडे पाहून):--कांहीं काळापूर्वी यांचा उपयोग होता खरा! पण आतां?--आतां यांचा कांहीं उपयोग नाहीं. **केशवबाबूंची** शेवटची वेळ आली आहे, व आतां ते हें नश्वर जग सोडून **आईकडे** लवकरच जाणार, ही गोष्ट **महाराजांना** दिव्यदृष्टीनें दिसल्यामुळें त्यांच्या तोंडून वरील उद्गार निघाले असतील, नाहीं बरें?

साक्षात्कार व आत्म्याचे अमरत्व.

**राखाल** म्हणून त्यांचा एक शिष्य जवळच बसला होता, त्याकडे पाहून **महाराज** प्रेमानें म्हणाले, '**राखाल,** तूं का हा?'

इतक्यांत ते पुन्हा **आईशीं** बोलूं लागले:--"वा! **आई,** आलीस तूं? हें बनारसी लुगडें तुला किती तरी शोभतें! **आई,** उगीच आपल्याला तसदी कां घेतेस? बैस, बैस तूं."

**महाराज** महाभावाच्या निशेंतच होते! दिवाणखान्यांत उजेड अगदीं लख्ख होता. होतां होतां दिवाणखाना ब्राह्मभक्तांनीं अगदीं

भरून गेला. लाटू, राखाल, एम्, इत्यादि महाराजांचे शिष्य त्यांच्याजवळच बसले होते. महाराज भावावस्थेंत आत्म्याच्या अमरत्वाबद्दल आपल्याशींच बोलत होते. केशवबाबूंचा आत्मा निघून जाणार, असें त्यांच्या ज्ञानदृष्टीला स्पष्ट दिसत असावें काय ? ते म्हणाले:-- " देह आणि आत्मा ! देहाला आदि आहे, तेव्हां त्याला अंतही असणार ! देहाला मृत्यु आहे; आत्म्याला नाहीं.

" आत्मा देहाहून वेगळा आहे. परमेश्वराचें प्रत्यक्ष दर्शन होईपर्यंत मनुष्याची देहात्मबुद्धि--देह हाच आत्मा होय, ही बुद्धि--सुटणें शक्य नाहीं. जे अज्ञानी आहेत--ज्यांना ईश्वरी साक्षात्कार झाला नाहीं--त्यांना ही बुद्धि--ही देहात्मबुद्धि--चिकटलेली असते. देह म्हणजे आत्मा नव्हे, ही वस्तुस्थिति ज्ञान्याच्या दृष्टीला अगदीं स्पष्ट दिसत असते.

" ओल्या पोफळाची साल सुपारीला अगदीं चिकटलेली असते. अशा स्थितींत साल व सुपारी या वेगळ्या करणें मोठें कठिण काम असतें. पण चांगल्या पिकलेल्या पोफळाचें तसें नसतें. त्याची साल सुपारीला चिकटलेली नसते; पक्कें पोफळ आपण हालविलें, तर आंत सुपारी गुड्गुड् करिते. त्याप्रमाणें ईश्वरदर्शन झालें, ईश्वरलाभ झाला, कीं देहबुद्धि आपोआप नष्ट होते. मग देह निराळा व आत्मा निराळा हा बोध होतो."

इतक्यांत कोणी तरी आंत आलें. ती आकृति केवळ अस्थिचर्मांची होती ! कोणी तरीं पिशाच्च हळूहळू महाराजांकडे येत होतें

म्हणाना! भिंतीला धरीत धरीत ती आकृति पुढें पुढें येत होती. अखेर ती अगदीं कोचाजवळ आली. पण इतक्यांत महाराज कोचावरून उतरून खालीं सतरंजीवर बसले. ती आकृति मोठ्या कष्टानें कोचापुढें येऊन बसली. श्रीरामकृष्णांचे तिनें पाय अगदीं घट्ट धरले. ती आकृति अर्थात् केशवबाबूंची होती; केशवबाबूंची होती, असें म्हणण्यापेक्षां केशवबाबूंच्या पूर्वाकृतीची ती केवळ छाया होती, असें म्हटलें तर तें अधिक शोभेल. आपल्या वक्तृत्वाच्या दिव्य प्रभावानें श्रोतृसमूहाकडून ज्यांनीं शेंकडों वेळा 'धन्य, धन्य' म्हणवून घेतलें, ज्यांचें दर्शन झालें कीं, आपल्या दृष्टीचें सार्थक झालें, असें सर्वांना वाटे, तरुण वंगाली लोकांना जे प्रती-ईश्वर वाटत, ब्रह्मसमाजांतील व्यासपीठावर बसून उपासना चालवीत असतांना ज्यांची सत्त्वशील, पुण्यशील, पवित्र अतएव मनोहर व वंद्य मूर्ति श्रोत्यांचीं मनें भक्तिरसानें स्वाभाविकच उचंबळवून सोडी, ज्यांनीं बालकाप्रमाणें ऋजु, निर्व्याज व एकनिष्ठ मनानें आईचें ब्रह्मसमाजांत केलेलें कीर्तन श्रोत्यांच्या मनांवर कायमचें ठसून जाई,—इतकी ज्यांच्या वाणींत मोहकता, मधुरता, कळकळ, शक्ति, व जादू होती, त्या केशवबाबूंची झालेली ती अवस्था पाहून दिवाणखान्यांतली सर्व मंडळी आश्चर्यानें केवळ स्तब्ध झाली.

इतकें झालें, तरी महाराज भावावस्थेंतच होते. एखाद्या अनोळखी माणसाप्रमाणें ते केशवबाबूंकडे पाहूं लागले. तेव्हां केशव-

बाबू मोठ्यानें म्हणाले, 'मी आलों आहें महाराज, मी आलों आहें!' असें म्हणून बाबुजींनीं महाराजांचा डावा हात आपल्या हातांत घेतला व तो ते हळुहळू दाबूं लागले.

तरी स्थितीवर येण्याचें चिन्ह दिसेना! ब्रह्मानंदांत किती खोल बुडी ही! कांहीं वेळानें ते वेड्यासारखे आपल्याशींच बोलूं लागले. भक्तीचें का वेड हें? ते म्हणाले:—

सर्वव्यापी चैतन्य.

" जोंपर्यंत माझ्या आत्म्याच्या खऱ्या स्वरूपाचा बोध मला झाला नाहीं, जोंपर्यंत आत्मस्वरूपावरील उपाधीचा पडदा दूर झाला नाहीं, तोंपर्यंत नाना वस्तूंची—केशव, अमृत, प्रसन्न, इत्यादि नाना व्यक्तींची—भावना माझ्या ठिकाणीं जागृत असते. पूर्ण ज्ञान झालें, कीं सर्वव्यापी चैतन्याचा अनुभव आलाच! पूर्ण ज्ञान म्हणजे अद्वैतज्ञान होय; नाना वस्तूंच्या अंतरंगीं एकच चैतन्य गोचर आहे,—एकच परमात्मा स्थिरचराला व्यापून राहिला आहे—हा बोध म्हणजे पूर्ण ज्ञान होय.

"असें पूर्ण ज्ञान झालें कीं, एकच परमात्मा, एकच चैतन्य या सर्व जीवांच्या व जगताच्या रूपानें—चोवीस तत्त्वांच्या रूपानें—व्यक्त झालें आहे, असा अनुभव मनुष्याला येतो.

"एकच शक्ति कमीज्यास्ती प्रमाणानें नाना वस्तूंत आविर्भूत

झाली आहे. खरें पाहिलें असतां एकच परमात्मा नाना वस्तूंच्या रूपांनीं व्यक्त झाला आहे. कांहीं वस्तूंत त्याचा प्रकाश कमी असतो; कांहींत ज्यास्ती असतो.

नाना स्वरूपे

पंडित विद्यासागर यांनीं मला एकदां असा प्रश्न केला कीं, 'ईश्वरानें आपल्यापैकीं कांहींना ज्यास्त शक्ति दिली आहे, कांहींना कमी दिली आहे, असें खरें का? ईश्वर पक्षपाती आहे का?' तेव्हां मी म्हटलें, 'तसें जर नाहीं म्हणावें, तर एकादा मनुष्य दहांना भारी असतो, याचा उलगडा कसा करावयाचा? पुन्हा तसें जर नाहीं म्हणावें, तर आपल्याला ( विद्यासागरांना ) भेटण्याकरितां आम्ही दक्षिणेश्वराहून इतके लांब आलों, याचें कारण काय? परमेश्वरी सृष्टींत विषमता आहे, हें खरें; पण त्याचा हेतुही गूढ असला पाहिजे. ईश्वर पक्षपाती आहे, असें कांहीं त्यावरून खचित सिद्ध होत नाहीं.'

"ज्याच्या रूपानें ईश्वर आपली लीला विशेष प्रकट करितो, त्याच्या ठिकाणीं शक्ति विशेष असते. श्रीमंत माणसाचीं घरें असतात पुष्कळ. पण कोणत्या तरी एका दिवाणखान्यांत—त्याच्या विशेष आवडीच्या दिवाणखान्यांत—तो विशेषेंकरून सांपडतो. भक्ताचें अंतःकरण हा ईश्वराचा दिवाणखाना होय. भक्ताच्या हृदयांत लीला करीत राहणें हें त्याला फार आवडतें. भक्ताच्या ठिकाणीं—भक्ताच्या हृदयांत—त्याची विशेष शक्ति अवतीर्ण झालेली असते.

विशेष स्वरूपः अवतार.

"काय म्हटलेंस ? अशा पुरुषांचीं लक्षणें काय ? ज्यांच्या हातून थोर कार्यें घडतात त्यांच्या ठिकाणीं परमेश्वरी शक्तीचा प्रकाश ज्यास्त आहे, असें समजावें. थोर कार्यें हीं खरोखर ईश्वरी शक्तीचींच फळें आहेत.

"ही आदिशक्ति व परब्रह्म हीं अभेद आहेत. ब्रह्माचा विचार मनांत आला कीं, शक्तीचा आलाच. शक्तीवांचून केवळ ब्रह्माची भावना केव्हांही होणार नाहीं. तेज सोडून नुसत्या रत्नाची कल्पना करितां येणार नाहीं. किंवा रत्न सोडून त्याच्या नुसत्या तेजाची कल्पना करितां येणार नाहीं. तसेंच, सर्प व त्याची वक्रगति; सर्प सोडून त्याच्या वक्रगतीची कल्पना करितां येणार नाहीं; किंवा वक्रगति सोडून नुसत्या सर्पाची कल्पना करितां येणार नाहीं.

ब्रह्म व शक्ति हीं एकच.

"ब्रह्मशक्तींचें ऐक्य शब्दांनीं सिद्ध करणें केवळ अशक्य आहे. दृष्टांतांनीं त्याची फक्त साधारण कल्पना आणून देतां येईल.

"बरें, माझी आई जीव व जगत् यांच्या रूपांनीं—चोवीस तत्त्वांच्या रूपांनीं—आविर्भूत झाली आहे, पण यांत केवळ अनुलोम व विलोम यांचें—अपक्रांति व उत्क्रांति यांचें—तत्त्व आहे. जीव व जगत् हीं तिच्या ठिकाणीं अपक्रांत—विलीन—अवस्थेंत म्हणजे बीजरूपानें होतींच. पुढें तीं तेथून हळुहळू उत्क्रांत झालीं. राखाल, नरेंद्र (विवेकानंद), इत्यादि तरुणांवर माझा इतका जीव कां बरें ? त्यांच्या भेटीसाठीं मी एवढा व्याकुळ कां होतों ?

त्यांना अद्याप संसाराचा—कामिनी व कांचन यांचा—विटाळ झालेला नाहीं. आई या सर्व ब्रह्मांडाच्या रूपानें प्रकट झाली आहे, हें खरें आहे; पण त्यांतले त्यांत अशा माणसांत तिचा अंश ज्यास्ती असतो! हज्रा यासाठीं मला फार बोलतो. तो म्हणतो, ' आपण यांच्यासाठीं जर इतके व्याकुळ होतां—यांचें जर आपल्याला इतकें वेड आहे—तर भगवंताकडे आपलें लक्ष तरी लागणार कसें? कसें लागतें कोण जाणे बुवा!' (केशवादि हासतात).

"'हज्राच्या या म्हणण्यानें मी मोठा विचारांत पडलों. मला कांहीं सुचेना. मी आईला म्हटलें, ' आई, काय आहे हें? हज्रा म्हणतो तें खरें का? या माणसांसाठीं मी व्याकुळ होतों, येणेंकरून तुझ्यावरील माझ्या भक्तींत कांहीं कमीपणा येतो का?' नंतर मीं भोलानाथालाही विचारलें. या गोष्टीचें निराकरण महाभारतांत बरोबर केलेलें आहे, असें त्यानें मला साधार सांगितलें. त्यांत असें म्हटलें आहे कीं, समाधीपर्यंत मजल मारून ज्या पुरुषानें ईश्वरदर्शनाचें सुख अनुभविलें, त्याला समाधींतून खालीं उतरल्यानंतर या बेगडी जगांत विश्रामाला कोठलें स्थान मिळणार? अर्थात् तो मग कामिनी व कांचन यांच्या थाऱ्यालाही उभे न राहणाऱ्या सत्त्वगुणी भक्तांच्या सहवासाकरितां जीव टाकतो. महाभारताच्या या निर्णयानें माझें मन एकदम हलकें केलें. आपल्या दाव्याला पुष्टि आणणारा पूर्वी होऊन

आईची विशेषरूपें—नरेंद्रासारखे संसारापासून दूर राहिलेले धर्मात्मे.

गेलेल्या एखाद्या दाव्याचा निकाल वादीला आधाराला मिळाला, म्हणजे त्याचें मन जसें आनंदित होतें, तसें माझें झालें. ( सगळे हासतात ).

" हज्राचा दोष कांहीं नाहीं. ईश्वरबोध जोंपर्यंत झाला नाहीं, —जोंपर्यंत साधकावस्था आहे—तोंपर्यंत 'नेति, नेति,' असें—म्हणजे ईश्वराचें वास्तव्य मनुष्य किंवा प्रकृति यांहून अन्य ठिकाणीं आहे, असें—म्हणावेंच लागतें. पण सिद्धावस्थेची गोष्ट आलाहिदा आहे. जीव व जगत् हीं ब्रह्माचे ठिकाणीं विलीनावस्थेंत किंवा बीजावस्थेंत होतीं आणि त्यांच्या रूपानें तेंच आविर्भूत झालें आहे—ही अखिल नामरूपात्मक सृष्टि त्या ब्रह्मांडांतूनच केवळ उत्क्रांत झाली आहे,—अर्थात् हा केवळ अनुलोम व विलोम यांचा खेळ आहे, ही सत्य गोष्ट मग त्याच्या प्रत्ययास येते. लोणी हा एक स्वतंत्र पदार्थ आहे, असें आपण म्हणतों, त्या वेळेस ताकाकडे आपलें लक्षच नसतें; पण विचार करितां लोणी हा ताकाचाच एक भाग आहे, असें आपल्या लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं. त्याचप्रमाणें ताक हा लोण्याचाच एक भाग आहे; म्हणजे ताक व लोणी हीं दोन्ही अन्योन्याश्रयी किंवा सापेक्ष आहेत. तेव्हां जीव व जगत् यांच्या रूपानें तोच प्रकाशित झाला आहे; मात्र कांहीं वस्तूंत त्याचा प्रकाश ज्यास्त असतो, कांहींत कमी असतो.

" साक्षात्कार होऊन मनुष्याचें मन भक्तीनें तुडुंब भरून गेलें,

अगदीं भक्तिमय झालें, म्हणजे जग हरिमय कसें आहे, याचा अनुभव तेव्हांच येतो. महापुरानें नदीचा प्रवाह दुथडी फोडून आपल्या स्वैर गतीनें आसपासचा सर्व प्रदेश जलमय करून टाकीपर्यंत, नदीच्या पात्राला जितकीं वांकणें असतील, तितके वळसे घेत घेतच आपल्याला समुद्रांत गेलें पाहिजे. पण महापुरानें सर्वच भूप्रदेश पाण्यानें व्याप्त झाला, म्हणजे वाटेल तेथून काक-गतीप्रमाणें सरळ आपल्याला नौका चालवितां येते. शेतांतील पिकें कापल्यानंतर बांधाचीं वळणें घेत आपल्याला जावें लागत नाहीं,—शेतांतून मग सरळ वाटेल तिकडे आपल्याला जातां येतें.

" ज्याला एकदां भगवल्लाभ झाला, त्याला, त्यानें सर्व स्थिरचर व्यापून टाकलें आहे, हें स्पष्ट दिसतें. मनुष्यांत त्याचा प्रकाश ज्यास्त असतो. मनुष्यांमध्येंसुद्धां सत्त्वगुणी भक्तांचे ठिकाणीं—जीं माणसें संसारांतील भिकार सुखांकडे ढुंकूनही बघत नाहींत, ज्या माणसांना 'कामिनी व कांचन' यांकडे नुसतें पाहावेंसेंसुद्धां वाटत नाहीं, त्यांच्या ठिकाणीं—त्याचा प्रकाश सर्वांत ज्यास्त असतो. ( सगळे अगदीं निस्तब्ध. )

ज्यांनीं ईश्वर पाहि ला त्यांचें ज्ञान.

" समाधीमध्यें परमेश्वराच्या अमृतमय सहवासाचा अनुभव घेत-लेल्या पुरुषाचें मन या जगांतील क्षुल्लक गोष्टींत रमणें कठिण आहे. कशांत रमणार बरें तें ? तेव्हां तो साहजिक कामिनीकांचनत्यागी व सत्त्वगुणी अशा शुद्ध भक्तांच्या संगतीचा भुकेला असतो.

" आई—आदिशक्ति—व ब्रह्म हीं एकच. परमेश्वर निष्क्रिय आहे, अशी जेव्हां आपली भावना असते, तेव्हां त्याला आपण ब्रह्म म्हणतों, पुरुष म्हणतों. तो सक्रिय आहे, तो सृष्टि, स्थिति व प्रलय करितो, अशी जेव्हां आपली भावना असते, तेव्हां आपण त्याला शक्ति म्हणतों, प्रकृति म्हणतों. सृष्टीच्या चष्म्यांतून पुरुषाकडे पाहिलें, म्हणजे तोच आईच्या—प्रकृतीच्या—रूपांत दिसतो,—तोच ईश्वराच्या, पित्याच्या रूपांत दिसतो. पिता गृहव्यवस्थेचें काम आईकडे सोंपवितो. तिला तो अधिकार पित्यापासूनच प्राप्त झालेला असतो; तिच्या सामर्थ्याच्या सर्व उड्या पित्याच्याच जिवावर.

ब्रह्मसमाज व ईश्वराचा मातृभाव.

"सृष्टीच्या रंगभूमीवर अवतीर्ण झालेल्या ईश्वराकडे—प्रकृतीकडे, मायेकडे, आईकडे पाहिल्यावांचून—आईचा डोळा चुकवून—तुम्हांला कांहीं सृष्टीच्या पडद्यामागें स्वस्थ बसलेल्या परमात्म्याकडे—पुरुषाकडे, परब्रह्माकडे—पाहतां येणार नाहीं. एकाचा विचार मनांत आला, कीं दुसऱ्याचीही आठवण होणारच.

"पुरुषाची आठवण झाली, कीं प्रकृतीची झालीच व प्रकृतीची झाली, कीं पुरुषाची झालीच. ज्याला शिवाचें ज्ञान झालें, त्याला शक्तीचेंही झालेंच. जो बापाला ओळखतो, तो आईलाही ओळखतोच. ( केशवबाबू हासतात ).

"ज्याला अंधकाराचें ज्ञान झालें, त्याला प्रकाशाचेंही झालें.

रात्र म्हणजे काय, हें ज्याला समजलें, त्याला दिवस म्हणजे काय, हें पण समजलेंच. सुखाचा अनुभव ज्याला आला, त्याला दुःखा-चाही आलाच. समजतें का तुला हें?"

**केशवबाबू** (सस्मित):—होय, समजतें, महाराज.

**श्रीरामकृष्णः**—आई! कोणती आई? जगताची आई. जी जगत्सृष्टि करिते, पालन करिते; जी आपल्या मुलांचें निरंतर रक्षण करिते, व जी त्यांना या जगांत राहून धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ कसे साधावे, हें दाखवून देते, ती आई. चांगल्या मुलाला आईला सोडून राहवत नाहीं, आईचा वियोग त्याला सहनच होत नाहीं. त्याला कांहींच कळत नसतें—सगळें कांहीं त्याच्या आईला कळत असतें. मूल खातें, पितें, आणि मौजेनें फिरतें. यांपलीकडे त्याला कांहीं कर्तव्य नसतें. त्याचा सर्व भार आईवर असतो.

**केशवबाबूः**—हां! खरें, अगदीं खरें, महाराज.

---

## बिंदू २३.

इतकें बोलणें होतां होतां **श्रीरामकृष्ण** पूर्ण जागृतीवर आले होते. त्यांची समाधि आतां पुरी उतरली होती. केशवबाबूबरोबर हास्यवदनानें त्यांचें भाषण चाललें असतां, दिवाणखान्यांतील सर्व मंडळी तें अगदीं तटस्थवृत्तीनें ऐकत होती. 'कसें काय?' किंवा

'तुला आतां कसें वाटतें?' इत्यादि प्रकारचीं कांहीं कुशल-प्रश्नोत्तरें आरंभीं त्या दोघांत झालीं नाहींत, हें पाहून सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें. ईश्वराशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीसंबंधानें त्यांनीं कांहीं शब्दसुद्धां काढिला नाहीं.

**श्रीरामकृष्ण** ( केशवबाबूंना ):—जे ब्रह्मसमाजभक्त आहेत, ते ईश्वरमहिम्याचें—ईश्वराच्या कृतींचें—वर्णन कां करितात? 'हे ईश्वरा, हा सूर्य तूं उत्पन्न केलास, हा चंद्र तूं उत्पन्न केलास, हे सर्व तारे तूं उत्पन्न केलेस,' असे त्याच्या कृतींचे गोडवे तुम्ही कां गातां? असें करण्याचें प्रयोजन काय? मनोहर बागेच्या दर्शनानेंच—सुंदर फुलें व मधुर गंध यांनींच—मोहून जाऊन त्या बागेचीच तारीफ करीत सुटणारे लोक फार; बागवानाची चवकशी करणारे थोडेच! बाग मोठी कीं बागवान मोठा? जोंपर्यंत आपल्या पाठीमागें मृत्यूचा ससेमिरा आहे, तोंपर्यंत खरोखर **बाग** मिथ्या आहे; **बागवान**-मात्र सत्य आहे!

आपल्याला काय चार ग्लासें हवीं असतील, तेवढीं झोंकून झाल्यानंतर एकंदर दुकानांत किती मण दारू भरलेली आहे, याची उठाठेव पाहिजे कशाला? बाटलीभर मिळाली कीं आपलें काम भागलें.

**नरेन्द्राचें** दर्शन झालें कीं, माझें अगदीं समाधान होतें. 'तुझ्या बापाचें नांव काय?' 'तुझ्या बापाचीं घरें किती आहेत?' अशा त्याच्याजवळ मीं कधींच चवकश्या केल्या नाहींत.

मनुष्याला आपल्या ऐश्वर्याची—आपली संपत्ति, आपला जमीन जुमला, आपली शेतवाडी, आपलीं घरेंदारें, यांची—मोठी किंमत वाटते; तेव्हां ईश्वरालाही आपल्या ऐश्वर्याची—सूर्य, चंद्र, यांची—तशीच किंमत वाटत असेल, अशी त्यांची समजूत असते. म्हणून मनुष्यांना असें वाटतें कीं, आपण त्याच्या ऐश्वर्याची प्रशंसा केली, तर त्याची मर्जी प्रसन्न होईल. **शंभु मलिक** एकदां म्हणाला कीं, ' **महाराज,** मला आपला आशीर्वाद असावा; तेणेंकरून मी आपलें सर्व ऐश्वर्य आईच्या पादपद्मीं वाहून सुखानें मरेन. ' त्यावर मीं म्हटलें, ' काय बोलतोस हें? हें सगळें म्हणजे ऐश्वर्य आहे, असें तुला वाटतें! आईच्या दृष्टीनें या सगळ्याची किंमत आपल्या पायांखालच्या धुळीपेक्षां कांहीं ज्यास्त नाहीं.

एकदां विष्णु-मंदिरांत झाली चोरी;—चोरानें मूर्तीच्या आंगावरचे सगळे दागिने पसार केले. तेव्हां **मथुरबाबू** ( देवळाचा व्यवस्थापक व राणी रासमणी इचा जांवई ) व मी, काय प्रकार झाला, हें पाहण्याकरितां तेथें गेलों. तेव्हां **मथुर** म्हणाला, ' देवा, तुझ्या अंगीं कांहींच योग्यता—पाणी—नाहीं! तुझ्या अंगावरचें सगळें लोकांनीं चोरून नेलें, पण तुला त्यांचें कांहीं करितां आलें नाहीं!' त्यावर मीं जरा संतापानें म्हटलें, ' किती वेडेपणाचें तुझें बोलणें आहे हें! ज्या जगन्नायकाची या मूर्तीच्या द्वारें तूं पूजा करितोस त्याला तुझे ते दागिने केवळ मृत्तिकेसमान आहेत! लक्षांत ठेव,

लक्ष्मी ही त्याची दासी आहे. तिच्या सामर्थ्याच्या सर्व उड्या त्याच्या जिवावर आहेत. तेव्हां बाबा, असें बोलूं नये!'

देव ऐश्वर्याचा भुकेला आहे का? कोणीं मला काय व किती दिलें, याचा विचार करून त्या झोंकांत का तो आपल्या कृपेच्या वांटणीच्या हाताचा कांटा कमीज्यास्ती ठेवतो? नाहीं बरें. तो केवळ भक्तिवश आहे. त्याला काय आवडतें? पैसा? छे! नाहीं. शुद्ध भाव, प्रेम, भक्ति, विवेक, वैराग्य, हींच काय तीं त्याला प्रिय आहेत.

उपासकाचे भेद.

जसा ज्याचा भाव (स्वभाव) तसा त्याला ईश्वर दिसतो. म्हणजे मनुष्याची ईश्वराच्या स्वरूपासंबंधानें कल्पना त्याच्या स्वभावाला अनुरूप अशी असते. अर्थात् त्या स्वभावाला धरूनच त्याचा उपासनेचा मार्गही असतो. जे भक्त तमोगुणी असतात, ते आईला--आपल्या देवाला--प्राण्यांचे बळी देतात. आपल्याप्रमाणेंच आपला देवही तमोगुणी असून त्याला हिंसोत्पन्न मांसाचें खाद्य प्रिय आहे, अशी त्यांची समजूत असते. रजोगुणी माणसाचें मन असतें नाना वस्तूं-वर उड्या घेणारें; तेव्हां तो आपल्या देवाला नाना भोग अर्पण करितो. सत्त्वगुणी उपासकाच्या पूजेचें अवडंबर मुळींच नसतें; त्याला फूलही लागत नाहीं; एखादें बेलाचें पान व गंगाजल असलें, कीं त्याचें पूजेचें काम होतें. बरें, नैवेद्याला एखादा बत्तासा, किंवा, फार झालें, तर पायस (खीर) असलें कीं त्याचें समाधान.

या तिहींशिवाय भक्तांचा आणखी एक प्रकार असतो. तो

त्रिगुणातीत भक्तांचा होय. त्यांचा स्वभाव बालकांसारखा असतो. प्रकृतिस्थ तीन गुणांनीं ते लिप्त नसतात;—शुद्ध भावानें ईश्वराचें नामकीर्तन करणें हीच त्यांची पूजा. अगदीं शुद्ध—केवळ—नाम दुसरें कांही नाहीं!

---

# बिंदु २४.

## केशवबाबूंबरोबर शेवटचें भाषण.

ईश्वराचे रुग्णालय व आत्म्याची चिकित्सा.

**श्रीरामकृष्ण** ( केशवबाबूंना सहास्य ):—तुला दुखणें आलें आहे; पण त्याचें कारण फार खोल आहे. माझ्या लक्षांत आलें आहे तें. भक्ति उन्मत्त होऊन तिनें तुझ्या शरीरांत खूप धुडगूस घातला; त्याचा हा परिणाम आहे. तिच्या या दंगलीनें होणारी शरीराची नासधूस माणसाच्या तत्काळ लक्षांत येत नाहीं. एखादें मोठें जहाज गंगेवरून जातें, तेव्हां तें फारसें कोणाच्या लक्षातही येत नाहीं. पण कांहीं वेळानें पाहावें तों काय! पाणी आपलें किनाऱ्यावर धपाधप आपटूं लागतें! कधीं कधीं तें किनारा जमीनदोस्तही करून टाकतें!

एखाद्या लहानशा झोंपडींत हत्तीनें प्रवेश केला, तर तो ती बोल बोल करितां गदगदवून जमिनीला मिळवून टाकतो. भाव हा सामर्थ्यानें हत्तीच आहे. त्याचा देहघरांत एकदां प्रवेश झाला, कीं बहुतेक त्याचें वाटोळें!

तुला ठाऊक आहे? एखाद्या घराला जेव्हां आग लागते, तेव्हां पहिल्यानें बारीकसारीक जिनसा जळून जातात; शेवटीं ती आग साऱ्या घराला वेढून टाकून त्याची राखरांगोळी करून टाकते. ईश्वरस्पर्शाचा योग आल्यावर अगदीं असेंच होतें. ज्ञानाग्नि पहिल्यानें कामक्रोधादि षड्रिपूंचा नाश करून टाकतो; त्यानंतर अहंबुद्धीचा तो नाश करितो; आणि शेवटीं सर्व घराचा—देहाचा—नाश तो उडवितो.

ईश्वराच्या मनाप्रमाणें आतां सर्व कांहीं झालें, आतां आपण सुटलों, असें कदाचित् तुला वाटेल! पण तसें नाहीं बरें, बःबा! जोंपर्यंत व्याधि थोडी तरी शिल्लक आहे, तोंपर्यंत तो सुटका करणार नाहीं. रुग्णालयांत रोग्यांच्या यादींत तूं आपलें नांव दाखल केलेंस, आतां रोगाची सर्व कसर नाहींशी होईपर्यंत डॉक्तर-साहेब तुला कांहीं बाहेर जाऊं देणार नाहींत! पहिल्यानें तूं आपलें नांव मुळीं दाखलच कां होऊं दिलेंस? (हशा).

ईश्वराच्या रुग्णालयाची ही गोष्ट ऐकून **केशवबाबू** सारखे हंसूं लागले. त्यांना कांहीं केल्या हंसें मुळीं आवरेना. राहून राहून त्यांना हंसें पुनः पुन्हा लोटे!

**श्रीरामकृष्ण** (केशवबाबूंना):—**हृदय** म्हणे, 'असा भावही मी कुठे पाहिला नाहीं, आणि असा रोग पण मी कुठे पाहिला नाहीं- तेव्हां मी अतिसारानें खूप आजारी होतों. डोक्यांत अशा वेदना चालल्या होत्या, कीं जशा कांहीं लाखों मुंग्या आंत तोडताहेत!

पण माझ्या तोंडांतून रात्रंदिवस फक्त ईश्वराच्या कथा चालल्या होत्या. नाटगोर येथील **राम** (वैद्य) तेव्हां माझी प्रकृति पाहण्याकरितां आला होता. माझा आपला सारखा भगवद्विचार चालू आहे, असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां तो म्हणाला, 'आं! हा माणूस वेडा आहे कीं काय? शरीराचीं नुसतीं चार हाडें राहिलीं आहेत, तरी याच्या तें ध्यानींमनींही नाहीं! याचा विचार निराळाच चालला आहे!'

सर्व कांहीं तिच्या इच्छेनें होतें. आई, तूं इच्छामयी आहेस; सर्वत्र तुझी इच्छा आहे. आपलें कर्म तूं करतेस; पण मनुष्य मूर्खपणानें सर्व कर्तृत्व आपलेकडे घेतो, आणि मोठ्या आढ्यतेनें 'मी यँ केलें,' आणि 'मी त्यँ केलें' अशी फुशारकी मारतो!

साध्या गुलाबाची व्यवस्था कशी करावी, बसराई गुलाबाची व्यवस्था कशी करावी, हें माळ्याला चांगलें समजतें. बसराई गुलाबाला रात्रीं पडणाऱ्या दंवाचा चांगला उपयोग व्हावा, म्हणून तो त्याचीं मुळें चांगलीं मोकळीं करितो. दंवानें तें झाड तेव्हांच भरारतें. तसेंच कदाचित् तुझेंही असावें. तुझी कशी व्यवस्था करावी, हें त्या **भगवंत माळ्याला** पुरें समजतें आहे. त्याच्या प्रेरणेचें दंव तुला सहज मिळावें आणि तूं पूर्वींपेक्षां अधिक शुद्ध, तेजस्वी व जोमदार व्हावास आणि तुझ्याकडून महत् व अविनाशी असें कार्य घडून यावें, यासाठीं तुझीं पाळेंमुळें नीट खणून तो मोकळीं करीत आहे.

भगवंत माळी.

तुला कांहीं दुखणें आलें आहे, असें मीं ऐकलें, कीं, माझे प्राण अगदीं व्याकुळ होतात. मागच्या खेपेला जेव्हां तूं आजारी होतास, तेव्हां पहाटेस मी झोंपेंतून जागा होऊन अगदीं रडत बसें. मी म्हणें 'आई केशवाचें जर कांहीं बरेंवाईट झालें, तर मीं कलकत्त्यास गेल्यावर तुझ्या गोष्टी कोणा-जवळ बोलूं बरें?' नंतर मी कलकत्त्याला आलों आणि फळें व साखर सिद्धेश्वरीपुढें ठेवून तुझें बरें व्हावें, म्हणून मी तिची अगदीं कळ-कळीनें प्राथना केली. या वस्तूंचा मीं तिला नवसच केला होता.

केशवबाबूंसाठीं आईची प्रार्थना.

केशवबाबूंवरील महाराजांचें हें अकृत्रिम प्रेम व त्यांच्यासंबंधीं त्यांची विलक्षण कळकळ पाहून सर्व मंडळी विस्मयानें अगदीं मूढ होऊन गेली.

**श्रीरामकृष्णः**—पण या तुझ्या दुखण्यांत माझा जीव त्या वेळ-च्याइतका घाबरा झाला नाहीं. खरेंच सांगतों मी.

पण आज दोनतीन दिवस थोडी हुरहूर लागली आहे.

दिवाणखान्यांत यायला पूर्वेच्या बाजूला जें दार होतें, तिथे केशवबाबूंची पूज्य माता इतक्यांत येऊन उभी राहिली. तेव्हां उमानाथ महाराजांना मोठ्यानें म्हणाला, 'महाराज, ही पहा आई आपल्याला प्रणाम करीत आहे.'

**महाराज** हासूं लागले. **उमानाथ** आणखी म्हणाला, '**महाराज** आपण केशवबाबूंना आशीर्वाद द्यावा म्हणजे ते लवकर बरे होतील,' असें आईचें म्हणणें आहे. **महाराजांनीं** उत्तर केलें, 'आनंदमयी अशा आईची प्रार्थना

सर्व आईची सत्ता.

करा. सर्व दुःखें—सर्व आधिव्याधि—दूर करणारी तीच आहे.'
**महाराज केशवबाबूंना** पुढें म्हणालेः—

आंतल्या खोलींत फार वेळ राहात जाऊं नको. बायकांमुलांमध्यें राहिल्यानें भगवंताकडलें तुझें लक्ष नाहींसें होईल, आणि तें मायाजाळांत गुंतून पडेल. तुझ्या मित्रमंडळीनें जर भगवंताच्या कथा तुला सारख्या ऐकविल्या तर त्यांत तुझें खरें कल्याण आहे.

गंभीर सूचना.

**महाराज** अगदीं गंभीरपणें एवढें बोलले; पण क्षणांत त्यांचा गंभीरभाव नाहींसा होऊन एकदम ते बालकवृत्तीवर आले. ते हासून **केशवबाबूंना** म्हणाले, 'पाहूं, तुझा हात पाहूं !' त्यांनीं **केशवबाबूंचा** हात आपल्या तळहातावर घेतला आणि आपल्या हातानें तो हळुहळू उडवून ते त्याचें वजन पाहूं लागले. कांहीं वेळानें ते म्हणाले, 'नाहीं, ठीक आहे; तुझा हात हलका आहे. जे खल आहेत, ज्यांचें कायिक, वाचिक व मानासिक आचरण दुष्टपणाचें असतें, त्यांचा हात जड असतो.' ( सगळे हंसतात. )

**उमानाथ** दरवाजाकडून पुन्हा म्हणाला, '**महाराज**, आईचें म्हणणें असें आहे कीं, **केशवबाबूंना** आपण आशीर्वाद द्यावा.'

**श्रीरामकृष्ण** (गंभीरपणानें):—माझ्या हातून काय होणार? आशीर्वाद **आईनें** द्यायचा. सर्व सूत्रें तिच्या हातीं. **आई**, आपलें काम तूं करतेस; पण आतां आहे आणि घटकेंत नाहीं, अशी ज्याची अवस्था, तो मनुष्य मूर्खपणानें सर्व कर्तृत्वाचा टेंभा आपण मिरवतो !

ईश्वराला दोन प्रसंगीं फार हंसूं लोटतें. एक प्रसंग असाः— दोन भाऊ आपल्या वडिलार्जित जमिनीची मोजून-मापून वांटणी करितात; आणि म्हणतात, ‘ हा वांटा माझा आणि तो तुझा.’ ईश्वर अशा प्रसंगीं आपल्याच ठिकाणीं हासून म्हणतो, ‘ सर्व जगत् वास्तविक माझें असतां, ती गोष्ट हे बेटे विसरून जातात आणि भ्रमिष्टपणानें ‘ ही जमीन माझी आणि ती तुझी’ असें म्हणतात.

दुसऱ्या एका प्रसंगीं ईश्वराला असेंच हंसें येतें. मूल अत्यवस्थ असल्यामुळें त्याची आई सारखी रडत असते. तेव्हां वैद्यबुवा आईला असें सांगतात, ‘ बाई, भितां कशाला तुम्ही ? घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. मी आहें ना ! आत्तां तुमच्या मुलाला बरें करतों !’ त्या बेट्या वैद्याला असें कळत नाहीं कीं, ईश्वर ज्याला मारायला निघाला, त्याला पामर नर तारणार किती ! (सगळे अगदीं स्तब्ध).

इतक्यांत केशवबाबूंना खोकला आला. किती वेळ झाला, तरी तो राहीना ! त्या साधु पुरुषाला होत असलेले ते शारीरिक कष्ट पाहून सर्वांची अंतःकरणें अगदीं व्याकुळ होऊन गेलीं. तो दुष्ट खोकला कधीं एकदां बंद होतो, असें सर्वांना होऊन गेलें. राम ! राम ! काय कष्ट ते ! शेवटीं थांबला एकदांचा तो. पण मग केशव-बाबूंच्या अंगीं तिथे बसण्याचें सामर्थ्य कांहीं राहिलें नाहीं. त्यांनीं जमिनीला डोकें लावून महाराजांना प्रणाम केला. प्रणाम केल्या-नंतर पूर्वींप्रमाणें भिंतीला धरीत धरीत मोठ्या कष्टानें ते आपल्या खोलींत निघून गेले.

# बिंदु २५.

**महाराज** दक्षिणेश्वरीं निघून जाण्यापूर्वी मंडळीनें कांहीं मिठाई त्यांचे पुढें आणून ठेविली. मंडळीबरोबर त्यांचें भाषण चालूच होतें. **केशवबाबूंचा** वडील मुलगा येऊन त्यांच्याजवळच बसला होता.

**अमृत** म्हणाला, 'हे त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव. आपला त्यांना आशीर्वाद असावा.' **महाराज** त्या मुलाच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवून त्याला कुरवाळूं लागले. तेव्हां **अमृत** पुन्हा म्हणाला, '**महाराज**, हें काय? मस्तकावर हात ठेवून त्यांना आशीर्वाद द्यावा आपण.' **महाराजांनीं** उत्तर केलें, 'आशीर्वाद देण्याचें काम माझें नाहीं, तें आईचें आहे. आशीर्वाद देणार एकटी ती.' एवढें बोलून ते त्या मुलाच्या अंगावरून पुन्हा प्रेमानें हात फिरवूं लागले.

आशीर्वाद देणार आई. दुसरें कोणी नाही.

**अमृत** ( सहास्य ):—ठीक आहे **महाराज**, त्यांच्या अंगावरून आपला हात फिरला, तरी पुष्कळ झालें. ( सगळे हसतात ).

नंतर **केशवबाबूंच्या** **अमृतादि** शिष्यांजवळ ते **केशवबाबूं**-संबंधानें गोष्टी बोलूं लागले.

**श्रीरामकृष्ण**:—'तुझा रोग बरा होवो,' असा एखाद्याला आशीर्वाद देण्याचें सामर्थ्य माझे अंगीं नाहीं, असें सामर्थ्य मी आपल्या आईजवळ कधीं मागितलेंहीं नाहीं. **आई**-जवळ माझें नेहमीं एक मागणें असतें:—'**आई**, फक्त मला शुद्ध भक्ति दे. मान नको, पान नको, पैसा नको,

भगवंताजवळ मागणें.

सुख नको, आरोग्य नको, इहलोकचें कोणतेंही सुख नको, किंवा कोणत्या ऐहिक सुखाची वासनाही नको. तुझ्या भक्तीशिवाय मला कांहींही नको. तेवढी दे म्हणजे झालें.' लोकांचे रोग बरे करून जगाला चमत्कार दाखविण्याचें सामर्थ्य मी आईजवळ कधींही मागितलें नाहीं.

केशव काय हलका आहे? काय त्याची योग्यता! पैसा हाच ज्यांना परमेश्वर वाटतो, तेही लोक त्याला मानतात; आणि भगवंताच्या भक्तीवांचून ज्यांना दुसरें कांहीं नको, असे साधुलोकही त्याला मानितात.

केशवबाबूंची योग्यता.

एकदां मी दयानंदाला भेटायला गेलों होतों. तो बागेंत रहात होता. त्या दिवशीं केशव तिथे यायचा होता. पण त्याची आतुरता काय? केशव सेन, केशव सेन, असें करीत त्याचें सारखें आंत-बाहेर चाललें होतें! 'आले का केशव सेन?' हा ज्याला त्याला प्रश्न! 'केशव सेन येतात केव्हां,' ही सारखी घोकणी! त्या दिवशीं मीं तिथे पाहिलें, तों सगळ्या आपल्या केशवाच्या येण्याच्या गोष्टी!

दयानंद बंगाली भाषेला 'गौडाण्ड भाषा' (?) असें म्हणे.

मला वाटतें, केशव वैदिक देवता मानीत नसे व होमहवनांचें प्रयोजनही त्याला वाटत नव्हतें. तेव्हां दयानंदानें सांगितलें कीं, 'ईश्वरानें इतक्या वस्तु जर केल्या आहेत, तर त्याला देवता करणें काय कठिण आहे?'

**महाराज** **केशवबाबूंच्या** शिष्यांजवळ त्यांचे गुणानुवाद पुन्हा गाऊं लागलेः—केशव हीनबुद्धि—नीचबुद्धि—नाहीं. गुरुपणाची वृथा

गुरूचा मान.

घमेंड त्याला नाहीं. पुष्कळ वेळा त्यानें आपल्या अनेक शिष्यांना असें सांगितलें आहे कीं, 'तुम्ही दक्षिणेश्वरीं जा, म्हणजे तिथे तुमच्या सगळ्या शंकांचें निरसन होईल.' माझा स्वभाव हा असा; मी म्हणें, '**केशवानें** आणखी कोटिगुणें वाढावें.' मला मान काय करायचा?

**केशव** थोर माणूस—त्याला संपत्तीच्यामागें लागलेले संसारी लोक मानतात, साधुही मानतात.

मिठाई खाऊन झाल्यानंतर **महाराज** गाडीकडे जाण्याकरितां उठले. ब्राह्मभक्त त्यांना पोंचविण्याकरितां त्यांच्याबरोबर माडी-वरून खालीं आले.

खालच्या बाजूला नीट उजेड नाहीं, असें जिना उतरतांना **महाराजांचे** लक्षांत आलें. तेव्हां ते **अमृतादि** भक्तांना म्हणाले,

आपल्या घरांत **आईची** वसति;

'अशा सगळ्या जागीं उजेड असावा; कारण प्रत्येक घरांत **आईची** वसति असते. घरांत जिकडेतिकडे उजेड नसेल, तर दारिद्य येतें. तेव्हां असा काळोख पुन्हा कुठे ठेवूं नका.'

दोनतीन शिष्यांसह **महाराज** गाडींत बसून दक्षिणेश्वरीं नंतर निघून गेले.

---

# बिंदु २६.

## दक्षिणेश्वरचें देवालय. ११ मार्च १८८३.

**श्रीरामकृष्ण** (भेटीला आलेल्या एका गोस्वामीला):—हो, काय आपण म्हटलें? (मुक्तीचें) साधन कोणतें?

**गोस्वामी:**—ती हरिनामानें प्राप्त होईल. कलियुगामध्यें नामाचेंच महात्म्य विशेष आहे.

**श्रीराम०**:—खरें आहे. नामाचा महिमा मोठा खरा; पण भक्तीशिवाय नुसत्या नामाचाच उपयोग होतो का?

'भक्तिविना वश नोहे, गानानें वा मृदंग-नादानें,
कन्यादानफलातें पावे कैसा मृदंगना-दानें?'

हें खरें नाहीं काय? परमेश्वराचें वेड अंत:करणाला सारखें लागून राहिलें पाहिजे. नाहीं तर, तोंड उच्चारीत असावें रामनाम आणि मन शोधीत असावें कांचनकाम! असें चालेल का? विंचवाचें विष नुसत्या मंत्रानें उतरत नाहीं; तर त्याला शेकणी करावी लागते.

**गोस्वामी**:—मग, अजामिळासंबंधानें आपलें काय म्हणणें आहे? तो तर घोर पातकी होता; अमुक पाप म्हणजे त्यानें आचरलें नाहीं, असें नाहींच. पण प्राणोत्क्रमणसमयीं आपल्या 'नारायण' नांवाच्या मुलाला हाक मारल्यानें तो सद्गतीला गेला.

**श्रीराम०**:—बहुधा पूर्वजन्मामध्यें त्याच्या हातून पुष्कळ (सत्) कर्म घडलें असावें. उत्तरवयामध्यें त्यानें बरेंच तपाचरण केलें,

असेंही सांगितलेलें आहे. कदाचित् असेंही म्हणतां येईल कीं, ती त्याची अगदीं अंतवेला [1]असावी. असें पहाः—

'हस्तीतें धुतलें, जळीं बसविलें, मालिन्यही नाशिलें,
तेणें तें पहिलें, स्वकर्म वहिलें, तीरींच आरंभिलें;
शुंडाग्रें धरिलें, धुळीस भरिलें, सर्वांगही आपलें,
प्रायश्चित्त दिलें, तथापि न भलें, ज्याचें मन क्षोभलें.'

अशी जरी हत्तीची स्थिती असली, तरी अगदीं तबेल्यांत सोडण्यापूर्वी जर त्याला धुऊन स्वच्छ केलें, तर त्याला पुन्हा आंग मळविण्याला संधीच मिळत नाहीं. ( त्याच न्यायानें अंतकालीं पण मनाच्या निर्विषय स्थितींत जर परमेश्वराचें नामस्मरण व चिंतन झालें, तर सर्व कर्में दग्ध होऊन तो सद्गतीला जातो. ).

नामोच्चारानें मनुष्याची तात्कालिक शुद्धि होईल; पण अनेक पातकी विचारांचे लेप लागलेच त्याच्यावर चढतील. त्याच्या ठिकाणीं मनोदार्ढ्य नसतें; पुनः पातक करावयाचें नाहीं, असा निश्चय त्याच्याकडून होत नाहीं. श्रीभागीरथीचें स्नान घडल्यानें मनुष्याचीं पापें नष्ट होतात, पण उपयोग काय ? असें म्हणतात कीं, त्याचीं पातकें तो पाण्यांत आहे तोंपर्यंत कांठावरच्या झाडांवर बसून राहतात, आणि तो गंगेंतून बाहेर आल्याबरोबर तीं त्याच्या डोक्यावर भराभर उड्या घालतात. ( हशा ). त्याचीं

---

१. एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ, नैनां प्राप्य विमुह्यति ।
स्थित्वास्यामंतकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥—**श्रीमद्भगवद्गीता.**

जुनीं पातकें त्याच्या फिरून मानगुटीस बसतात,—गंगेपासून चार पावलें तो आला नाहीं तोंच तीं पुन्हा त्याला पछाडतात. याशाठीं नामसंकीर्तन करा; पण 'देवा, तुझी भक्ति मला लागूं दे,' अशी प्रार्थना सारखी मनानें करीत रहा. 'त्याचप्रमाणें, मान, संपत्ति, कीर्ति, विषयलोलुपता, इत्यादि इहलोकच्या क्षणभंगुर वस्तूंविषयींची आमची आसक्ति दिवसेंदिवस कमी होऊं दे,' अशीही त्याची करुणा भाका. ( गोस्वामीला उद्देशून )—धर्म कोणता कां असेना, पण सत्यता असली ( खरी भक्ति लागली ) कीं, परमेश्वराची प्राप्ति झालीच पाहिजे. परमेश्वराचें दर्शन जसें वैष्णवांना होईल तसेंच शाक्तांनाही होईल; वेदान्ती, ब्रह्मसमाजी, मुसलमान, ख्रिस्ती,—प्रत्येक खऱ्या भक्ताला तो प्राप्त होईल. कांहीं लोक वितंडवाद घालून असे भांडत असतात:—"आमच्या कृष्णाचें पूजन केल्याशिवाय कोणाचेंही उद्धरण होणार नाहीं." किंवा "आमच्या कालीमातेची पूजा केल्यावांचून सर्व फुकट आहे." किंवा "ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्याशिवाय कांहीं हातीं लागणार नाहीं."

हे विचार पंथाभिमानाचे झाले! माझाच मार्ग खरा, इतरांचे मार्ग खोटे, असला समज वाईट आहे. ईश्वराकडे अनेक निरनिराळ्या मार्गांनीं जातां येतें.

दुसरे कांहीं म्हणतात कीं, 'तो सगुण आहे. निर्गुण नाहीं.' आणि अशा रीतीनें वाद माजवीत बसतात. वैष्णवांचें वेदांत्यांशीं असें भांडण चालतें.

ईश्वराच्या खऱ्या स्वरूपाचा अपरोक्षानुभव आला कीं, खरा निर्णय लागतो. ज्याला ईश्वराचें ज्ञान झालें, त्याला ठाऊक असतें कीं, तो सगुणही आहे, निर्गुणही आहे, आणि काय काय तरी ज्यास्त आहे.

---

## बिंदु २७.

### ८ एप्रिल, १८८३.

**श्रीराम०:**—( मणि मलीक यांस ):–तुम्ही काशीला गेलां होतां, कोणी साधु तिथे भेटले का आपल्याला ?

**मणि०:**—होय. त्रैलंगस्वामी व भास्करानंद हे भेटले होते.

**श्रीराम०:**—त्यांच्यासंबंधानें काय काय आपण पाहिलें? सांगा पाहूं.

**मणि०:**—त्रैलंगस्वामी जुन्याच ठिकाणीं–बिंदुमाधवाजवळील देवळांत–राहतात. लोक म्हणतात कीं, पूर्वीं त्यांचा अधिकार फार मोठा होता; त्या वेळीं ते फार चमत्कार करीत असत, पण आतां त्यांचें तें सामर्थ्य नष्ट झालें आहे.

**श्रीराम०:**—हे अपवाद संसारी जनांचे आहेत.

**मणि०:**—भास्करानंदांकडे मुक्तद्वार आहे. वाटेल त्याला त्यांची भेट घेतां येते. त्यांचें त्रैलंगस्वामींप्रमाणें नाहीं. ते तर मुळींच बोलत नाहींत.

**श्रीराम०ः**—भास्करानंदांबरोबर तुमचें कांहीं बोलणें, चालणें झालें काय ?

**मणि०ः**—होय, पुष्कळ ! विषयावर विषय निघतां निघतां सद्गुण व दुर्गुण यांवर ओघ वळला. ते म्हणाले, " असन्मार्गापासून दूर रहा. दुर्विचार सोडून द्या. मनुष्यानें ते सोडावे, हें ईश्वराला फार आवडतें. तुमच्या अंगीं सद्गुणांची वसति होईल, अशाच गोष्टी करा. "

**श्रीराम०ः**—खरें आहे. प्रपंचांत ज्यांचें मन रत झालें आहे, त्यांना हा मार्ग ठीक आहे. पण जे जागृत आहेत–एक ईश्वरमात्र सत्य आहे, बाकी सर्व असत्य व क्षणिक आहे, अशी ज्यांची पूर्ण खात्री झाली आहे, त्यांची मनोरचना निराळी असते. ईश्वरच खरा सूत्रधार असून बाकी सगळीं केवळ त्याच्या हातांतलीं बाहुलीं आहेत, हें त्यांना ठाऊक असतें. जे जागृत असतात ते वांकडें पाऊल टाकीतच नाहींत,–असन्मार्ग टाळण्यासाठीं त्यांना पूर्वविचार करावा लागत नाहीं. ईश्वराचेंच त्यांच्यावर इतकें प्रेम असतें कीं, ते जें जें करितात तें तें चांगलेंच होतें. त्याचप्रमाणें त्यांच्या मनांत नित्य असें वागत असतें कीं, आपण कार्याचे खरे कर्ते नव्हों, तर आपण भगवंताचे केवळ दास आहों. ते यंत्रासारखे असून ईश्वर हा यंत्रचालक होय. तो करवितो त्याप्रमाणें ते काम करितात, बोलवितो त्याप्रमाणें बोलतात, तो चालवितो त्याप्रमाणें चालतात.

जे जागृत असतात, ते सद्गुण व दुर्गुण यांच्यापलीकडे असतात. सगळें कांहीं ईश्वर करितो, हें त्यांना समजतें. एका मठांतील साधु भिक्षेवर आपली उपजीविका चालवीत असत. एके दिवशीं त्यांपैकीं एक साधु बाहेर भिक्षेला गेला असतां एक जमीनदार एका माणसाला निर्दयपणें मारीत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. साधु मोठा दयाळू होता. तो त्या दोघांच्या मध्यें उभा राहिला आणि हात थांबविण्याबद्दल त्या जमीनदाराची सारखी मनधरणी करूं लागला. तो जमीनदार रागानें वेडा झाला असल्यामुळें रागाच्या तावांत साधूवरच उलटला व त्यानें त्याला इतकें बेदम मारलें कीं, तो बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला. ती बातमी मठांत पोहोंचली. बाकीचे साधु त्या ठिकाणीं धांवत गेले; तेव्हां बेशुद्ध स्थितींत तो जमिनीवर पडलेला आहे, असें त्यांना आढळलें. त्यांनीं त्याला उचलून मठांत नेलें; आणि त्याला अंथरुणावर निजवून व वाराबिरा घालून ते त्याची शुश्रूषा करूं लागले. तोंडांत थोडें दूध घातल्यावर तो साधु थोडा शुद्धीवर आला, व त्यानें डोळे उघडले. तो पूर्णपणें भानावर आला आहे किंवा नाहीं, हें पाहण्याकरितां त्यांपैकीं एकानें विचारलें, "महाराज, आपल्या तोंडांत दूध कोण घालीत आहे?"

साधूनें मंदस्वरानें उत्तर केलें, 'बंधो, ज्यानें मला मारिलें, तोच माझ्या तोंडांत दूध घालीत आहे.'

ईश्वराची ओळख पटल्याशिवाय अशी मनोरचना शक्य नाहीं.

# बिंदु २८.

**श्रीरामकृष्ण** समाधिमग्न होऊन आपल्या पलंगडीवर बसले होते; भक्तमंडळ सभोंवतीं बसलें होतें. **अधरसेन** आपल्या मित्रमंडळीसह आले होते. **अधर** डेप्युटी मॅजिस्ट्रेट असून **परमहंसांच्या** भेटीला येण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग होता. **अधरसेनांचें** वय २८।२९ वर्षांचें होतें. **अधरांचा शरच्चरण** नांवाचा एक मित्र होता. **शरच्चरण** यांचा ज्येष्ठ पुत्र परलोकवासी झाल्यामुळें ते दुःखभारानें खचून गेले होते. ते शाळाखात्यांत डेप्युटी इन्स्पेक्टर होते. नोकरी करीत असतांना व पेन्शन घेतल्यानंतरही ते आपला बराच काळ परमार्थसाधनांत घालवीत असत. पण पुत्रावर घाला पडल्यापासून त्यांचें मन स्थिर नव्हतें, कांहीं केल्या त्यांना समाधानच वाटेना. तेव्हां **श्रीरामकृष्णांची** कीर्ति ऐकून **अधरसेन** यांनीं त्यांना त्यांच्याकडे आणलें होतें. **रामकृष्णांचें** दर्शन घ्यावें, अशी **अधरांची** पण फार दिवसांची इच्छा होती.

समाधि उतरली. **श्रीरामकृष्णांनीं** डोळे उघडले. तेव्हां सर्व खोली माणसांनीं भरून गेली असून सर्व डोळे आपल्याकडे लागले आहेत, असें त्यांना दिसलें. त्यांचें असें आत्मगत भाषण सुरू झालें:—" प्रपंचरतांना ज्ञानदर्शन कधीं कधीं—दिव्याच्या ज्योतीप्रमाणें मधून मधून—नव्हे एखाद्या फटींतून चुकून आलेल्या सूर्यकिरणाप्रमाणें—होतें. मनांत भक्तीचा लवलेशही नसतां संसारी

जनांनीं परमेश्वरनामाचा नुसता उच्चार करणें, यांत काय अर्थ आहे ? मायमावश्या घरीं भांडत असतां त्यांच्या तोंडांतून निघालेले 'देवाची शपथ' हे शब्द तेवढे उचलून मुलें ज्याप्रमाणें उठल्यासुटल्या त्यांचा उपयोग करितात, त्याप्रमाणेंच त्यांचें तें नामोच्चारण होय !

संसारी लोकांत—केवळ संसारांतच गढलेल्या लोकांत—हातीं घेतलेल्या कामाची चिकाटी नसते. यशाचें किंवा अपयशाचें मोठेंसें महत्त्व नाहीं. पाणी पाहिजे म्हणून तो विहीर खणण्यास सुरुवात करितो. खणतां खणतां खडक लागला कीं, तो ती जागा सोडून देतो आणि दुसरीकडे प्रयत्न करितो. तेथें त्याला वाळू लागली—फारच वाळू लागली—कीं, तो तेंही ठिकाण सोडून देतो. जेथें आरंभ केला तेथेंच खणीत चला. पाणी पाडण्याचा मार्ग हाच!

जसें पेरावें, तसें घ्यावें. ('लिंबाचिया वृक्षा, साखरेचें आळें, बीज तैशीं फळें, येती तया.' किंवा 'कुचलियाचीं वृक्षफळें, मधुर कोठोनि असतील ?')

'मी' आणि 'माझें' असें म्हणणें म्हणजे अज्ञान होय. विचारा-अंतीं तुम्हांला असें समजून येईल कीं, ज्याला तुम्ही 'मी' म्हणून म्हणतां तो केवळ आत्माच होय. तुम्ही म्हणजे कोण ? शरीर, कीं अस्थि, कीं मांस, कीं दुसरें कांहीं, याची मीमांसा करा. मग तुमच्या असें स्पष्ट नजरेस येईल कीं, यांपैकीं आपण कांहीं नाहीं—आपण अगदीं उपाधिरहित आहों.

'हें सोनें,' 'ही पितळ,' अशी भेदबुद्धि बाळगणें म्हणजे अज्ञानच आहे. प्रत्येक वस्तु सोनें आहे, म्हणजे ज्ञानमयच आहे.

परमेश्वर दिसला, कीं विवेकाचें काम संपलें. परमेश्वराची प्राप्ति झाल्यानंतरसुद्धां विवेकाची कास धरणारेही कांहीं आहेत. दुसरे कांहीं असतात, ते भक्तिपुरस्सर परमेश्वराचा नाममहिमा गात राहतात.

मूल कोठपर्यंत रडत असतें? फक्त स्तनपान त्याला मिळालें नाहीं तोंपर्यंत. स्तनपान करूं लागतांच त्याचें रुदन बंद होतें. मग तेथें आनंदाशिवाय कांहीं नसतें. तें आनंदानें स्तनपान करूं लागतें; स्तनपान चालू असतां तें खेळत असतें, व एकीकडे पुनः हासत असतें. पण हें सगळें **तोच** (ईश्वरच) झालेला आहे. माणसांत तो सुव्यक्त असतो. बालाप्रमाणें जेथें मन ऋजु आहे, मुलाप्रमाणें जेथें सरळपणा, निःष्कपटपणा आहे, मुलाप्रमाणें निश्चितपणें हासणें, ओरडणें, नाचणें, बागडणें, गाणें, हीं जेथें चालू आहेत, जेथें दैवी संपत्तीचा संचय झाला आहे, तेथें तेथें **त्याचें** अस्तित्व असतें.

छापत आहे ! ] स्वामी विवेकानंद यांच्या [ छापत आहे !!

# 'मुलाखती' व संभाषणें'

महाराष्ट्र–समाज जागृत व  कर्मोन्मुख व्हावा, या  विवेकानंदांच्या स  व्याख्यानांचें व लेखांचें  लेखकांकडून सवर्ह  ठीत रूपांतर करवून तें 'विवेकानंद–पुस्तकमाला' य. नावानें प्रसिद्ध  करण्याचे  आम्ही योजिलें आहे.  उपरिनिर्दिष्ट पुस्तक हे या मालेंतील पहिलें  त्याचे भाषांतर  लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे यांच्याच हातून  तत्त्व : भाषांतर झालें असल्यामुळे ते कसे वठलें असेल, हे निराळें लिहा  नच. परतकारी सुमारें पावणेतनिशें पानें होऊन त्यात 'श्रीरामकृष्ण' व 'विवेकानंद' अशीं  सुंदर चित्रें येतील. किंमत मागाहून प्रसिद्ध करण्यात येईल.

 पाट भाग आहेत,—मुलाखती व संभाषणें  स्वामींचीं मतें व कार्य-क्षेत्र सम  ण्याकरितां येथील व  वा  देशांतील  वर्तमानपत्राच्या प्रति-निधींनी त्यांच्या  'मुलाखती' घे  त्या  विषय योजिलें  आहेत. त्याचक्रमानें त्यांचा   त्याच्या भेटीकरितां आलेल्या हजारों लोकांनी त्यांना  विषयास- यानें जे अनेक प्रश्न विचारले व त्यांची स्वामीजी आपल्या  वकार  वाणीनें जी उत्तरें दिलीं, त्यांचा समावेश 'संभाषणे' या भागात आहे.

 धार्मिक, औद्योगिक शिक्षण, धार्मिक शिक्षण,  बालविवाह,  विवाह, जातिभेद, वर्णभेद, कलाकौशल्य,  धर्मा  व  इत्यादि  विषय  स्वामींचीं   ड  त्याच  नक्की  इ  

## ...ट आणि मंडळी, पुणें सिटी.